
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं क्र. ६५५

# दिशान्तर / रमेश मंत्री



REFBK-0024385

# दिशान्तर

प्रवास वर्णन

रमेश मंत्री

REFBK-0024385

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशनकाल · प्रथमावृत्ती
२४ जून १९८३

मुखपृष्ठ सुभाष अवचट

मूल्य वीस रुपये

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
टिळक रोड, पुणे ३०

टोकियोमधील माझे स्नेही
नरेश मंत्री
यांना —

| | | |
|---|---|---|
| १ | संपन्नतेच्या बुरख्याखालील अस्वस्थ थायलंड | १ |
| २ | थायलंडमध्ये स्त्रियांचे अधिराज्य | ६ |
| ३ | हॉंगकॉंग : आर्थिक सुबत्तेची गुहा | ११ |
| ४ | हॉंगकॉंगमधील भारतीय | १७ |
| ५ | जपान : यंत्रमानवाच्या घामाची समृद्धी | २२ |
| ६ | रंगमंच आणि उद्यानात फुलणारे जपानचे सांस्कृतिक विश्व | २७ |
| ७. | आजचा इंग्लंड | ३२ |
| ८. | या शतकातील सर्वांत महत्त्वाचा विवाह | ३७ |
| ९ | पर्ल हार्बर आणि होनोलुलू | ४४ |
| १० | भक्कम नोकरशाहीने जपलेले फ्रान्सचे स्थैर्य | ५० |
| ११. | बेशिस्त आणि असुरक्षिततेने ग्रासलेला आजचा इटली | ५५ |
| १२ | चार्वाकाचे खरे वारसदार आजचे इटालियन | ६० |
| १३ | स्वित्झर्लंड : त्रेसष्ट लाख लोकांचा स्वर्ग | ६६ |
| १४. | हॉलंड : समुद्राबरोबरची सततची लढाई | ७३ |
| १५ | चिमुकला बेल्जियम आणि शांत निवांत लक्झेंबर्ग | ८० |
| १६ | दोन जगे विभागणारी बर्लिनची भिंत | ८७ |
| १७ | अखंड महोत्सवाचा चिरतरुण देश | ९४ |
| १८. | देशोदेशीचे विनोद | १०० |

●

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५६
ग्रा. क्र. २२३८५


# १

## संपन्नतेच्या बुरख्याखालील अस्वस्थ थायलंड

बॅंकॉकचे प्रथमदर्शन मनावर एकदम छाप पाडते अत्यंत स्वच्छ आणि प्रशस्त रस्ते, त्यावरून भन्नाट वेगाने धावणाऱ्या अमेरिकन आणि जपानी बनावटीच्या मोटारी, भव्य डिपार्टमेंटल स्टोअर्स, वातानुकूलित टॅक्सी, बादशाही हॉटेले अशा दिमाखामुळे आपण अमेरिकेत आहोत की काय असा भास होतो विद्युदणूच्या नव्या जगाचे दर्शन बॅंकॉकमध्ये पावलोपावली घडते. तुम्ही हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ पाय ठेवल्याबरोबर दरवाजा आपोआप उघडतो व मग बंद होतो. हॉटेलच्या लॉबीत अनेक चॅनेल्सचे रंगीत टी व्ही चालू असतात भोजनगृहापासून लिफ्टपर्यंत प्रत्येक जागा वातानुकूलित. हॉटेल्स, उपाहारगृहे, सार्वजनिक बस, डिपार्टमेंटल स्टोअर्स अशा प्रत्येक ठिकाणी छोट्या बांध्याच्या, नाजूक सुंदर थाई तरुण मुली काम करतात. सगळे कसे अद्ययावत, चटपटीत आणि तत्पर

पण हा वरवरचा मुलवटा दूर करून थायलंडचे अंतरंग पाहिले, तर अस्वस्थ वाटणाऱ्या अनेक घटना दिसतात थायलंडच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग म्हणजे परदेशी प्रवाशानी या देशात खर्च केलेला पैसा परकीय प्रवासी यावेत म्हणून थाई सरकारने अनेक आकर्षणे निर्माण केली येथे येण्यासाठी व्हिसा लागत नाही विमानतळावरच तुमच्या पासपोर्टवर शिक्का मारला जातो. प्रवाशासाठी खास 'नाईट लाईफ' म्हणजे ख्यालीखुशालीची केंद्रे उघडली गेली आहेत त्याची सुरुवात व्हिएतनामी युद्धाच्या काळात झाली युद्धजर्जर अमेरिकन सैनिकाची भरपूर करमणूक व्हावी अशी व्यवस्था येथे झाली आणि मग त्या सुखाने मिळणाऱ्या पैशाचीच या

राष्ट्राला सवय लागली वास्तविक, थायलंडचे पचाऐंशी टक्के लोक धर्माने बौद्ध आहेत. बुद्धाने सर्वसंगपरित्यागाची शिकवण दिली पण तेथील नाईट क्लबमध्ये नृत्य करणाऱ्या तरुणींनी कपड्याशिवाय इतर कशाचाच त्याग केलेला नाही !

थायलंडची राजकीय परिस्थितीही अस्थिर आणि चमत्कारिक आहे या देशात लोकशाही आहे, पण तिचे स्वरूप काहीसे नकलीच आहे. लष्करी क्रांती करून सत्ता हाती बळकावयाची आणि मग निवडणूक घ्यायची, ती एकाच व्यक्तीच्या किंवा गटाच्या दडपणाखाली घ्यायची, असे प्रकार थायलंडमध्ये घडले आहेत आपल्याकडे ज्याला खोटी किंवा नुरा कुस्ती म्हणतो, तशाच नुरा निवडणुका येथे होतात त्याविषयी बोलताना बँकॉक पोस्टचे राजकीय समीक्षक मला म्हणाले, “ आमच्या देशात लोकशाहीची पाळेमुळे कधी रुजलीच नाहीत. ज्याच्या हाती एका रात्रीत सत्ता येते, त्याला ती एका रात्रीत जाईल अशी सतत भीती वाटत असते तो स्वतः भीतीच्या वातावरणामध्ये वावरतोच आणि इतरानाही भीतीत ठेवतो गेल्या एप्रिल-मध्ये लष्करी क्रांती करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला या बंडखोरानी असा बेत आखला होता, की आपल्या हाती सत्ता आल्यास निरोधकापैकी पाचशे प्रमुख लोकाना देहान्त शासन द्यायचे अशा वातावरणात निवडणुका व लोकशाही ही नावापुरतीच असतात ”

थायलंडची लोकसंख्या चार कोटी सत्तर लक्ष आहे त्यापैकी साठ लक्ष लोक बँकॉकमध्ये राहतात. सरकारने जनतेचे दोन ठळक भाग मनाशी कल्पिले आहेत ग्रामीण भागातील लोक भात पिकवतात. त्यानी भात खाऊन स्वस्थ राहावे, सर-कारची पचायत करू नये शहरात नाईट लाईफचा धडाका चालू असतो त्यानी नाच-गाण्यात रमावे आणि सरकारला हवे ते करू द्यावे, असे हे अलिखित धोरण आहे त्यामुळे सर्वसामान्य थाई नागरिकाना राजकारणात स्वारस्य नाही थायलंडमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे, असे मी म्हटले, तेव्हा एका थाई नागरिकाने खासगी म्हणून एक गोष्ट सागितली, “ आमचे नागरिक फारसे गुन्हे करीत नाहीत, कारण बहुतेक अट्टल गुन्हेगार सरकारमध्ये आहेत ! ”

चलनवाढ आणि वाढती महागाई हा थायलंडपुढील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे यासंबधी अभ्यास केलेल्या एका अर्थतज्ज्ञाने सागितले, “ थायलंडमध्ये भात, रबर, टिन असे उत्पादन होते थोडाफार कापडधंदा सोडला तर फारसे औद्योगिक उत्पादन नाही पण अमेरिकेच्या अनुकरणाने सर्वांना आधुनिक विद्युदणूची साधने व सुखसोई तर अवश्य हव्या आहेत भाताला फारसे निर्यात मूल्य नाही कारण पाश्चात्त्य देशाना भाताची आवश्यकता कमी असते आणि पौर्वात्य देशात आधीच भात पिकतो त्यामुळे मोटारी, टी. व्ही , वातानुकूलित करण्याची यत्रे इत्यादींच्या आयातीवर फार मोठा खर्च होतो याचाच परिणाम म्हणजे थायलंडमध्ये झालेली अपूर्व महागाई. ”

येथे थाई दैनिकाला अडीच रुपये आणि इंग्रजी दैनिकाला चार रुपये पडतात. हॉटेलमध्ये चहा किंवा कॉफीला १० ते १५ रुपये घेतात फूटपाथवरच्या चहालाही चार रुपये पडतात पुण्यातील पूनमच्या धर्तीवरच्या हॉटेलला रोज १४० ते १६० रु (जेवणाशिवाय) पडतात कोकाकोला पाच रुपये (येथे जॉर्ज फर्नांडिस नसल्याने कोकाकोला आहे) बसचा किमान दर सव्वा रुपाया आहे दूध आपल्यापेक्षा पाचपट महाग आहे चागल्या हॉटेलमध्ये जेवणाला ७५ ते ९० रु पडतात चित्रपटाचे दर १५ ते २५ रु आहेत नऊशे चौरस फुटाच्या चार खोल्याच्या फ्लॅटचे भाडे दरमहा पाच हजार रुपये आहे मालकी पद्धतीने गाळे देण्याची पद्धत नाही

या महागाईचे परिणाम साहजिकच सामाजिक जीवनावर दूरपर्यंत झाले आहेत. मुलींना काम करावेच लागते. भरपूर पैसा शिल्लक ठेवीपर्यंत त्याना लग्न करणे अशक्य असते अजून थायलडमध्ये विवाहाच्या वेळी मुलीने नवऱ्याला पैसा द्यावा लागतो तो पैसा तिला स्वत.लाच मिळवावा लागतो याचाच अर्थ लग्नाचे वय उलटून गेले तरी तिला लग्न करणे परवडत नाही मग ती पुरुषाशी 'मैत्री' ठेवू लागते माझ्याबरोबर गाईड म्हणून आलेली वॉन पेन म्हणाली, "मला गाईड म्हणून दरमहा तीन हजार बाथ (थाई नाणे) मिळतात (सुमारे दीड हजार रुपये) नवरा फार तर चारपाच हजार बाथ मिळवील पण तेवढ्यावर आमचा संसार चालू शकणार नाही म्हणून माझे लग्न ठरले असले तरी आणखी काही वर्षे आम्ही लग्न करू शकणार नाही"

बाथ या थाई नाण्याचे नाव मला मोठे अर्थपूर्ण वाटले कारण येथे इतकी महागाई आहे की, परकीय प्रवाशाना लुबाडून त्याना अगदी आघोळ घालण्यात येते म्हणून या चलनाला बाथ हे नाव ठेवले असावे! थायलडमध्ये दरसाल अठरा लक्ष परदेशी प्रवासी येतात आणि प्रत्येक प्रवासी सुमारे तीन हजार रुपये या देशात खर्च करतो परदेशाहून येणाऱ्या प्रवाशात जपानचा पहिला व अमेरिकेचा दुसरा क्रमाक लागतो त्यापाठोपाठ युरोप व नतर आशियाई देश येतात

थायलडमध्ये टी व्ही प्रसार प्रचड प्रमाणावर आहे टी व्ही चे दहा चॅनेल्स (कार्यक्रम) येथे दिसू शकतात पण कार्यक्रम पाहिले तर थायलडच्या राजकीय मागासलेपणाची आणि सामाजिक जाणिवेच्या अभावाची कल्पना येते टी व्ही वरील साठ ते सत्तर टक्के कार्यक्रम जपान व अमेरिकेहून आयात केलेल्या चित्रपटाचे असतात स्थानिक कार्यक्रमात नृत्य, बॉक्सिग आणि सगीत यावर भर असतो आयात केलेल्या चित्रपटापैकी दररोज एक किंवा दोन कार्टून्सचा (व्यगपट) असतो थाई चित्रपटात गुन्हेगारी व स्त्री-पुरुषातील आकर्षण हे महत्त्वाचे विषय आहेत सध्याच्या परिस्थितीत तरी राजकीय किंवा सामाजिक पार्श्वभूमीवरील चित्रपट दिसणे कठीणच आहे. बँकॉकसारख्या साठ लाखाच्या वस्तीत चारच नाट्यगृहे आहेत आणि

त्यातूनही रोज नाटके होत नाहीत. नाटकाचे विषयही धार्मिक किंवा पारंपरिक असतात मात्र बॉक्सिंग हा थायलंडचा आवडता खेळ आहे. बॉक्सिंगच्या सामन्याना मात्र तुफान गर्दी होते

ज्याला राष्ट्रीय पेय म्हणता येईल असे पेय थायलंडला नाही भारतात चहा किंवा अमेरिकेत कॉफी घरोघर दिसते तसे काहीही पेय थायलंडध्ये नाही पाणी हेच त्यांचे राष्ट्रीय पेय म्हणता येईल मात्र सूप, मासे, चिकन आणि मुख्य म्हणजे भात याचे हातगाडीवरील हजारो स्टॉल्स बँकॉकमध्ये दिसतात या स्टॉल्सवर थाई लोक सकाळी सहापासून रात्री दहापर्यंत भात आणि मासे किंवा चिकन, भाजी याचे कालवण खाताना दिसतात

भगवी वस्त्रे घातलेले बौद्ध भिक्षू सर्वत्र आढळतात बँकॉक शहरात बुद्धाची तीनशे-पासष्ट मंदिरे आहेत म्हणजे रोज एका देवळात जायचे म्हटले तर वर्षभर सहज लागेल पण हे बौद्ध भिक्षू राजकीय अगर सामाजिक विकासात लक्ष घालत नाहीत. ( येथे इराणच्या खोमेनींचे उलट लोकाचे धोरण आठवते )

उच्च पातळीवरील भ्रष्टाचार आणि वशिलेबाजी याची चौकशी करण्यासाठी काही महिन्यापूर्वी सरकारने सिनेटची ( पार्लमेंट ) एक समिती नेमली होती. या समितीने “ आम्हाला तसे काही अपप्रकार आढळले नाहीत ” असा गुळमुळीत अहवाल दिला त्यावर बँकॉक पोस्टने छान व्यगचित्र काढले आहे लोकशाहीच्या सिंहाच्या छाव्याला दंश करण्यासाठी जंगलात नाग आणि विंचू ( भ्रष्टाचार व वशिलेबाजी ) टपले, पण जवळ असूनही सिनेटच्या समितीला ते दिसत नाहीत असे या व्यगचित्रात दाखवले आहे.

राष्ट्राची सरक्षण व्यवस्था दुर्लक्षित राहिल्याने कॉपुचियामधून येणारे निर्वासित आणि व्हिएतनामकडून होणारे हल्ले याच्याशी योग्य असा मुकाबला करण्यात थायलड कमी पडत आहे कॉपुचियात दुष्काळी परिस्थिती असल्याने तेथून थायलडमध्ये चोरून येणाऱ्या निर्वासिताना थोपविण्यासाठी मोठ्या सरहद्दीवर पक्का बदोबस्त ठेवणे सरकारला कठीण झाले आहे. व्हिएतनामचे दडपण कमी व्हावे म्हणून अमेरिकेला जोरदार विनंत्या चालू आहेत सर्व बळ एकवटूनही ज्या अमेरिकेला व्हिएतनामवर विजय मिळविता आला नाही, ती आता पश्चात बुद्धीने व्हिएतनामवर कितपत वजन पाडू शकेल हा प्रश्नच आहे

मात्र दैनदिन जीवनात सुव्यवस्था आणि शातता प्रस्थापित करण्यात थाई सर-कारने चागले यश मिळविले आहे. गुन्हेगारीचे प्रमाण अतिशय कमी आहे रात्री-अपरात्री परकीय प्रवासीही निश्चित मनाने फिरू शकतो बाजारात कोणतीही वस्तू मुबलक आहे, महागाई आहे, पण टचाईमुळे बोकाळणारा काळाबाजार नाही व्यापार, उद्योगधंदा करणाऱ्याना सरकार उत्तेजन देते मला तीन भारतीय व्यापारी भेटले.

त्यानी सागितले, " भारतात कायद्याच्या एवढ्या कटकटी असतात की, व्यापार करणे नकोसे वाटते. थायलडमध्ये आमचा व्यापार चागला होतो बारीकसारीक नियमाच्या कटकटी नाहीत, त्यामुळे आम्ही सुखी आहोत " या परिस्थितीमुळे सर्व सामान्य लोकाच्या मनात पतप्रधान प्रेम तिन्सुनंदा याच्याविषयी आदर आहे. थायलंडचे एक वैशिष्ट्य म्हणजे भारत, सिलोन, ब्रह्मदेश या देशांप्रमाणे थायलडवर कधीही पाश्चात्त्य साम्राज्यवाद्याचा अमल आला नाही, याचा लोकाना सार्थ अभिमान आहे

बॅंकॉकच्या पोलिस खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्याना मी भेटलो ते म्हणाले, " चोरी, खून, दरोडे असे गुन्हे आमच्याकडे फारसे नाहीत पण चीनमधून चरस, अफू, गाजा असे अमली पदार्थ चोरून आयात करून पाश्चात्त्य प्रवाशाना विक्री करण्याचे गुन्हे घडतात तसेच बॅंकॉकच्या नाईट क्लब्सना मुली विकण्याचे प्रकारही घडतात हॉंगकॉंग आणि थायलडच्या उत्तरेकडील गरीब भाग यातून मुली भुलवून आणल्या जातात म्हणून अनेक नाईट क्लब्स आणि संशयास्पद हॉटेले यांच्यावर छापे घालून आम्ही या प्रकाराना आळा घालण्याचा प्रयत्न करतो प्रवाशाना उपद्रव देणाऱ्या भिकाऱ्याना लगेच पकडण्यात येते. त्यामुळे सबध थायलडमध्ये भिकारी क्वचितच दिसतात भीक मागणे हा आमच्या देशात गुन्हा आहे. " बॅंकॉकच्या मुक्कामात मला एकही भिकारी दिसला नाही.

थायलडचे साक्षरतेचे प्रमाण ऐशी टक्के आहे बहुतेक वृत्तपत्रे थाई भाषेतील, अनेक रंगात भडकपणे छापलेली असतात. त्यात जवळच्या देशाविषयी ( कॉपुचिया, व्हिएतनाम, इडोनेशिया वगैरे ) काहीशा बातम्या असतात पण मुख्यतः स्थानिक किंवा थायलंडबद्दलच्या अधिक असतात राजधानीतील थाई दैनिकाचे स्वरूप आपल्याकडील जिल्हापत्रासारखे असते पण पाने मात्र बारा ते सोळा ( रविवारी २० पर्यंत ) असतात प्रमुख दैनिकाचा खप तीन ते चार लाखापर्यंत आहे पण 'बॅंकॉक पोस्ट ' व ' नेशन ' या इग्रजी दैनिकाचा खप कमी असला तरी त्याचे महत्त्व अधिक आहे विशेषतः ' बॅंकॉक पोस्ट ' हे समतोल विचाराचे व निर्भय दैनिक आहे. सरकारवर लोकहिताच्या दृष्टीने अनेकदा कडक टीका करते पण सरकारच्या योग्य धोरणाना पाठिंबाही देते.

# २

# थायलंडमध्ये स्त्रियांचे अधिराज्य

भारताचे थायलंडमधील राजप्रतिनिधी हे मराठी भाषिक आहेत, असे मला बँकॉकला समजले मी त्याना फोन केला, तेव्हा ते म्हणाले, “ लेखक म्हणून तुमचे नाव मी खूप ऐकले आहे तुम्ही उद्या सकाळी अकराला वकिलातीच्या इमारतीत अवश्य या. ” त्याप्रमाणे मी सोमवारी सकाळी गेलो हे राजप्रतिनिधी पुण्याचेच आहेत त्याचे नाव श्री अशोक भालचद्र गोखले असे आहे थायलडमधील त्याचे अनुभव आणि प्रतिक्रिया मी विचारल्या, तेव्हा श्री गोखले म्हणाले, “ गेल्या ऑक्टोबरमध्ये मी इथे आलो ( इथे फार चागले अनुभव आले ) थाई लोक हे मूलतः सुस्वभावी, शाततेने जगणारे, शिस्तप्रिय आणि आनदी आहेत. भारताचे आणि थायलडचे सबंध नेहमीच सलोख्याचे राहिले आहेत कॉपुचिया, व्हिएतनाम अशा अपवादात्मक बाबतीत भारताचे आणि थायलडचे धोरण वेगळे असले तरी सर्वसामान्यपणे या दोन देशाचा प्रत्यक्ष संघर्ष कधीही झाला नाही. मी असे पाहिले की, मगोलियन वशाचे लोक ज्याना येलोरेसीस असे म्हणतात–ते नेहमीच सुसस्कृत आणि नम्र राहिले आहेत भारताची आणि थायलडची मोठीच सास्कृतिक जवळीक आहे सास्कृतिक-दृष्ट्या या दोन देशात बरेच साम्य आहे बिर्ला, थापर अशा अनेक उद्योगसमूहाना थायलड सरकारने कारखाने काढण्यास सवलती दिल्या आहेत येथील व्यापार आणि उद्योगधंद्यात शेकडो भारतीय आहेत

हे भारतीय कोणत्या भागातील आहेत आणि त्यात मराठी भाषिक किती आहेत, असे मी विचारले तेव्हा श्री गोखले म्हणाले, “ त्यापैकी बहुतेक लोक पंजाब आणि

उत्तर प्रदेशातील आहेत मराठी लोक आपल्या देशाबाहेरच काय पण राज्याबाहेर किंवा गावाबाहेरही नोकरी किंवा कामधंद्यासाठी जायला नाराज असतात. आपल्या लोकात उपक्रमशीलतेचा ( इनिशिएटिव्ह ) अभावच आहे त्यामुळे परदेशात प्रमुख जागी मराठी लोक सहसा दिसत नाहीत."

बँकॉकमधील भारतीय वकिलातीचे कामकाज सकाळी साडेसातला सुरू होते बारा ते एक जेवणाची सुटी साडेतीनला कचेरी सुटते श्री गोखले म्हणाले, "भारतातील हवामान पाहता ७-३० ते ३-३० किंवा ४ अशाच कचेरीच्या वेळा हव्यात सकाळी माणूस ताजातवाना असतो आणि तो कचेरीचे काम त्या वेळी जास्तीत जास्त करू शकतो अमेरिका, इंग्लडमध्ये सकाळी आठ ते साडेआठला कचेऱ्या सुरू करण्याची पद्धत आहे. थायलंडमध्येही तीच पद्धत आहे शनिवार-रविवार सुटी असते लवकर काम सुरू केल्याने सरकारला भरपूर काम मिळते आणि दोन दिवस सुटी व चारनतर मोकळा वेळ यामुळे कर्मचाऱ्यानाही आपल्या वेळेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेता येतो "

जनतेच्या धर्मप्रियतेविषयी बोलताना श्री. गोखले म्हणाले, " थाई लोक वर्षातून पधरा दिवस भिक्षू होतात स्वतः राजासुद्धा पधरा दिवस भिक्षू होऊन उपवास करणे, भिक्षा मागणे, धर्मग्रथाचे पठण करणे वगैरे भिक्षूंची कर्तव्ये करतो थाई भाषा उत्तम प्रकारे विकसित झाली आहे सर्व उच्च शिक्षणही अगदी इजिनियरिंग आणि वैद्यकसुद्धा थाई भाषेतून दिले जाते "

बँकॉकमधील भारतीय वकिलातीत तीस भारतीय आहेत त्यापैकी श्री सराफ आणि श्री चाकणकर हे दोन वरिष्ठ अधिकारी मराठी भाषिक आहेत श्री गोखले हे काही काळ भारताचे अमेरिकेतील हगामी राजप्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टनला काम करीत होते त्यापूर्वी ते लडन येथे उच्चायुक्ताचे क्रमाक एकचे सहायक होते

थायलंडमधील सामाजिक आणि सास्कृतिक जीवनाचे जे विशेष आहेत त्यापैकी प्रमुख असा की येथे बऱ्याच प्रमाणात अजून मातृसत्ताक पद्धत आहे स्त्री हीच कुटुबप्रमुख असते. वडिलार्जित ( खरे म्हणजे आईआर्जित ) संपत्तीचा वारसा वडिलाकडून मुलाकडे न जाता आईकडून मुलीकडे जातो याचा परिणाम म्हणजे एकदर सामाजिक जीवनावर स्त्रियाचा प्रभाव आहे दुकानातील कर्मचारी, बस कंडक्टर्स, विक्रेत्या, शिक्षक अशा अनेक क्षेत्रात प्रामुख्याने स्त्रियाच आहेत त्याच्या वागण्यातील स्वतंत्रतेची छाप सहजच लक्षात येते

थायलडने आपली सास्कृतिक परपरा काळजीपूर्वक जपून ठेवली आहे थाई नृत्य, सगीत, शॅडो प्ले नावाचा करमणुकीचा प्रकार, धर्मग्रंथाचा प्रसार हे देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचले आहेत राम, सीता, लक्ष्मण, हनुमान अशा देवताची चित्रे पुठ्ठयावर कापून त्याची छाया पडद्यावर पाडली जाते, आणि काड्याच्या साहाय्याने

त्या चित्राच्या हालचाली करून कथा सांगितली जाते, त्याला शॅडो प्ले म्हणतात. बँकॉकमधील रोझ गार्डनमध्ये रोज दुपारी थाई पारंपरिक क्रीडांचा व संगीत नृत्याचा उत्कृष्ट कार्यक्रम होतो त्यात थाई लढाई, बॉक्सिंग, नृत्य, संगीत, थाई विवाहाचे प्रात्यक्षिक वगैरे दाखविण्यात येते. या वेळी हत्तींचे काही खेळ दाखविण्यात येतात ते स्मरणीय असतात आठदहा लोक थोडेसे अंतर ठेवून जमिनीवर झोपतात त्यांच्यामधून हत्ती चालत जातो हत्ती आपले पुढचे पाय माणसांच्या मधून पाहून टाकत असेल. पण मागचे पायही तो किती अचूकपणे बरोबर मधल्या लहानशा मोकळ्या जागेतच टाकतो हे पाहून प्रेक्षक आश्चर्यचकित होतात. कार्यक्रमाच्या शेवटी प्रेक्षकातील काही जणाना रंगमंचावर बोलावून थाई नर्तक व नर्तकी नृत्य करतात

अनेक क्षेत्रात भारत आणि थायलंड यांच्यातील साम्य आढळते गणपतीची मूर्ती कित्येक ठिकाणी दिसते राम, सीता, हनुमान ही दैवते तरच्या भागातील थायलंड, मलेशिया, सिंगापूर, बाली इत्यादींत सर्वत्र आढळतात आपल्या रामलीलेसारखेच इकडेही रामकथेवरील कार्यक्रम होतात आपल्या परिचयाची नावेही दिसतात. राज-प्रसग, राज दमारी, राजदमन ही रस्त्याची नावे राजावरून पडली आहेत. आपल्याकडे कोल्हापूर, सोलापूर, नागपूर अशी गावाची नावे आहेत तशीच इकडे चानबुरी, साराबुरी, लोबबुरी अशी गावे आहेत धर्मोपदेशक आणि वडीलधारी माणसे यांच्या-विषयी भारताप्रमाणेच इकडेही आदर आहे. गेल्या तीन तपात थायलंडमधील नागरिकांच्या वेशभूषेत, राहणीत आणि सामाजिक जीवनात प्रचड फरक पडला असला तरी बौद्ध भिक्षूंचे हजारो वर्षांचे जीवन आहे तसेच ठेवले गेले आहे. पिवळसर वस्त्रे नेसलेले हे भिक्षू अनवाणी पायाने चालताना सर्वत्र दिसतात आपल्या संस्कृतीचा थायलंडवर प्रभाव दर्शविणारे आणखी एक नाव म्हणजे फिश्णुलोक ( विष्णुलोक ) अलीकडच्या काळात बँकॉकच्या ( स्मृती ) भारतीयांच्या मनावर खोलवर रुजवल्या त्या नेताजी सुभाषचंद्र बोस यानी. नेताजींनी विलक्षण नाट्यपूर्ण रीतीने ब्रिटिशांच्य तावडीतून आपली सुटका करून घेतली आणि जपानशी संपर्क साधून बँकॉकमध्ये आझाद हिंद सेनेचे केन्द्र उघडले थायलंड, सिंगापूर वगैरे भागातील भारतीयाना एकत्र करून नेताजी सुभाषचंद्र बोस यानी ' चलो दिल्ली ' ही गर्जना केली ती याच बँकॉकमधून त्यांच्याबरोबर आझाद हिंद सेनेत लढा दिलेले नारायणसिंग चावला हे अजूनही बँकॉकमध्ये आहेत.

थायलंडला फुलांचे फार वेड येथील स्त्रिया भरपूर फुले माळतातच, पण फुलांचे महोत्सवही होतात. योन बुदा नावाच्या सणात स्त्रिया कमळांची फुले पाण्यात सोडतात योन बुदा या शब्दाचा अर्थच 'लोटस थ्रोइंग' म्हणजे कमळे टाकणे असा आहे १३ ऑक्टोबरला हा सण येतो बुद्धाच्या पुनरागमनाच्या स्वागतार्थ लहान ( साधारण हातभर ) नावा केल्या जातात आणि त्या पाण्यात सोडून त्यांच्याबरोबर

कमळेही सोडली जातात. ११ नोव्हेंबरला आपल्या दिवाळीसारखाच लाय क्रथॉंग म्हणजे दिव्याचा सण असतो या वेळी जलदेवीला वंदन करण्यासाठी केळीच्या पानाच्या छोट्या होड्या करून पाण्यात सोडल्या जातात राजघराण्यावर थाई लोकांचे अतोनात प्रेम आहे. घरोघर आणि दुकानादुकानातून राजा आणि राणी यांची छायाचित्रे लावली गेली आहेत. या वाढदिवसाला संबंध थायलंडमध्ये सार्वजनिक सुट्टी असते हे वाढदिवस जनता दिवाळीसारखे साजरे करते हत्ती हा थायलंडचा लाडका प्राणी आहे. त्याच्या सन्मानार्थ नोव्हेंबर २१ व २२ रोजी हत्तींचे खेळ आयोजित करण्यात येतात या वेळी हत्ती फुटबॉल खेळतात, रस्सीखेच करतात, नृत्य करतात.

या देशात भरपूर पाणी आहे त्यामुळे नदीवर होड्यातच बांधलेली किंवा नदीकाठी उभारलेली लाकडी घरे सर्वत्र दिसतात या घरांच्या दैनंदिन गरजांसाठी होडीतून भाजी, मसाले, तांदूळ, फळे वगैरे माल विक्रीसाठी येतो त्याला फ्लोटिंग मार्केट म्हणतात. असा एक मोठा तरंगता बाजार बँकॉकच्या मधून जाणाऱ्या मेनाम नदीच्या कालव्यावर आहे ते प्रवाशांचे एक आवडते ठिकाण आहे मे म्हणजे माता आणि नाम म्हणजे पाणी म्हणून जलमाता या अर्थाने या नदीचे नाव मेनाम पडले आहे. आपणही गंगामाई म्हणतोच, त्याची इथे सहजच आठवण होते मेनामचे संबंध नाव मेनाम चाओ पया म्हणजे अत्यंत श्रेष्ठ जलमाता असे आहे पाणी भरपूर असल्याने नारळ, भात, फणस, केळी यांचे मुबलक उत्पादन थायलंडमध्ये होते. प्रसन्न निसर्गाच्या सान्निध्याने असेल किंवा परंपरेने असेल, पण थाई लोक अत्यंत प्रसन्न आणि हसऱ्या चेहऱ्याचे आहेत बँकॉकच्या मुक्कामात मी कधीही कुणाचे भांडण, बाचाबाची, मारामारी पाहिली नाही कशाची चौकशी केली आणि ते ठिकाण माहीत असेल तर थाई नागरिक आपले काम सोडून दुकानातून बाहेर येऊन हसतमुखाने तुम्हाला मार्गदर्शन करील माहिती नसली आणि भाषा येत नसेल तर तो नम्रपणे पण तेही प्रसन्न हास्याने मान हलवून सुचवील. म्हणून सरकारी पुस्तिकेतही या देशाचा उल्लेख 'स्मित हास्याचा देश' (लँड ऑफ स्माईल्स) असा केलेला आढळतो

बँकॉकमध्ये यूनोची एस्काप (इकॉनॉमिक अँण्ड सोशल कमिशन फॉर एशिया अँड पॅसिफिक) ही संघटना आहे इराणपासून अतिपूर्वेतील सर्व देशांची मध्यवर्ती कचेरी बँकॉकमध्ये आहे भारतही या संघटनेच्या कार्यक्षेत्रात येतो या संघटनेच्या कचेरीत मी प्रमुख अधिकारी डॉ. राय, मेहरुन्निसा रामानी, श्री अमृत महाल, श्री रेळे वगैरे अधिकाऱ्यांना भेटलो लोकसंख्याविषयक संशोधन, कुटुंब-नियोजन, निर्वासितांची पुनर्रचना, अशा यूनोच्या अनेक कार्यक्रमांची अंमलबजावणी या कचेरीमार्फत होते सध्या कॉंपुचियातून थायलंडला आलेल्या निर्वासितांच्या पुनर्रचनेचे मोठे काम इस्कापने हातीघेतले आहे. या निर्वासितांच्या छावण्या बँकॉक शहरात

आणि इथून तीनशे मैलावर आहेत. श्री रेळे हे मराठी अधिकारी पूर्वी मुंबईला डेमोग्राफी इन्स्टिटयूटचे प्रमुख म्हणून होते

आशिया आणि अतिपूर्व या भागात अत्यंत वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी त्या त्या देशाना उपाय सुचविणे आणि आर्थिक व इतर साहाय्य करणे हे महत्त्वाचे काम यूनोची ही संघटना करते. माझ्या बँकॉकच्या मुक्कामात मी बँकॉक पोस्टच्या सहायक संपादिका खुन टुण यानाही भेटलो 'भारतातील विनोदी अभिनेत्री टुणटुण या आपल्या भगिनी आहेत काय ?' असे त्याना विचारावेसे वाटले. पण खुन टुण याची नाजूक व छोटी शरीरयष्टी पाहून तो प्रश्न विचारण्याचे धाडस केले नाही ! थायलंडमधील महिलाची प्रगती गेल्या वीस वर्षात झपाट्याने झाली असून कोणत्याही पाश्चात्त्य देशातील महिलापेक्षा थाई महिला कमी नाहीत, असे खुन टुण यानी सांगितले वृत्तपत्रातूनही थाई स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने काम करतात असे त्या म्हणाल्या

थायलंडच्या विविध अंगाची माहिती घेऊन मी हाँगकाँगला निघालो

## ३

# हाँगकाँग : आर्थिक सुबत्तेची गुहा

हाँगकाँग हे तीन प्रमुख विभागाचे बनले आहे कौलून, हाँगकाँग आणि न्यू टेरिटरी किंवा नवा प्रदेश उंच डोंगराच्या मध्ये समुद्राच्या काठाशी वसलेल्या या ब्रिटिश वसाहतीचे क्षेत्रफळ अवघे तीस चौरस मैल आहे. पण या छोट्याशा जागेवरील कल्पक लोकानी जगाच्या इतिहासातील सर्वात मोठा आर्थिक चमत्कार करून दाखवला आहे ! हाँगकाँगची लोकसंख्या फक्त पन्नास लाख आहे त्यापैकी ९९ टक्के लोक चिनी आहेत. राजकीय दृष्ट्या हाँगकाँग ब्रिटिश नियंत्रणाखालील प्रदेश आहे जगाचा बारा टक्के व्यापार या छोट्या हाँगकाँगमधून होतो हे जगातील पहिल्या क्रमाकाचे रिएक्सपोर्टकेंद्र आहे. म्हणजे एका देशातून येथे माल येतो व दुसऱ्या देशात पाठवला जातो. हाँगकाँगमध्ये जवळ जवळ काहीच पिकत नाही पिण्याचे पाणीसुद्धा चीनकडून विकत घ्यावे लागते ! आणि तरीही न्यूयॉर्क व पॅरिसच्या खालोखाल जगातील सर्वात मोठी आर्थिक उलाढाल या हाँगकाँगमध्ये होते. बॅटरी किंवा विजेवर चालणाऱ्या खेळण्याचे हे जगातील सर्वात मोठे केंद्र आहे. आर्थिक वाढीचे प्रमाण हाँगकाँगएवढे इतर कोणत्याही देशात गेल्या तीन वर्षात झालेले नाही

## चौरसफूट जमीन ३५ हजारास

विराट आर्थिक भरभराट आणि जमिनीची टचाई यामुळे हाँगकाँगमधील जमिनीच्या किंमतींनी जागतिक उच्चांक स्थापन केला आहे. येथील व्यापारी

विभागात आज एका चौरस फुटाला पस्तीस हजार रुपये पडतात! न्यूयॉर्कच्या मॅनहटन विभागातील जागा आतापर्यंत जगात सर्वात महाग होती पण तो विक्रम गेल्या दोन वर्षात हॉंगकॉंगने मोडला आहे ॲबरडीन भागातील काही भागात सहाशे चौरस फुटाच्या फ्लॅटला एक कोटी वीस लक्ष रुपये पडतात. अर्थात हॉंगकॉंगच्या उत्पन्नाच्या मानाने ही रक्कम आपल्याला वाटते त्यापेक्षा बरीच कमी भरते.

हॉंगकॉंगचे साक्षरता प्रमाण ९८ टक्के आहे. वयाच्या पाचव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंतचे शिक्षण मोफत आणि सक्तीचे आहे. ज्यांची मुले शाळेत जात नसतील त्यांच्या आईबापाच्यावर खटला भरण्यात येतो पण सहसा असा प्रसंग येत नाही टी व्ही खासगी व्यापारी संस्थाच्याकडे आहे येथील टी व्ही चे चार चॅनेल्स असून त्यापैकी दोन चिनी भाषेत आणि दोन इंग्रजी भाषेत आहेत. तीन चॅनेल्स दिवसातून पंधरा तास आणि चौथा चॅनेल बावीस तास कार्यक्रम सादर करतो. बॅंकिंगची हॉंगकॉंगएवढी अद्ययावत पद्धत इतरत्र कोठेही नाही प्रत्येक बॅंकेचा ‘ ईटीसी ’ कौंटर तीनशेपासष्ठ दिवस चोवीस तास उघडा असतो. ई टी. सी म्हणजे इलेक्ट्रिक टॉकिंग कार्ड. बॅंकेच्या इमारतीत रस्त्याच्या बाजूला दीड फूट बाय दोन फूट अशी खिडकी असते प्रत्येक खातेदाराजवळ एक कार्ड असते या खिडकीतील काचेच्या यंत्रात कार्ड सरकावले की कॉम्प्युटरच्या साहाय्याने तुमच्या खात्यावर किती शिल्लक आहे ते कळते मग जेवढी रक्कम हवी असेल तेवढ्या आकड्याचे बटन दाबले की रोख रक्कम यंत्रातून येते तेवढी रक्कम वजा करून उरलेल्या रकमेची चिठ्ठीही लगेच येते बहुतेक वैयक्तिक खाती ईटीसीवर चाललेली आहेत. फक्त मोठमोठ्या व्यापारी संस्था, उद्योगधंदे, बडे लक्षाधीश वगैरेंचे व्यव हारच पारंपरिक बॅंकिंग पद्धतीने चालतात.

## पाचशे रुपयांना टी व्ही.

हॉंगकॉंग ही जगातील सर्वात स्वस्त बाजारपेठ आहे इथे कोणतीही वस्तू मुबलक आणि विश्वास बसणार नाही एवढी स्वस्त मिळते मुंबईला पॅंटची शिलाई ५०–६० रुपये घेतील तर इथे तयार पॅंट २०–२५ रुपयांना मिळते मुंबईला १५० रु ना मिळणारी जपानी साडी इथे चाळीस ते साठ रुपयांपर्यंत पडते १२५ ते १५० रु पर्यंत कॉम्प्युटर, ४०० ते ५०० रु टी व्ही आणि ५०।६० रु ना व्ही डी ओ सेट मिळतो जपानमुळे येथील बाजारपेठेत विद्युद्णूच्या वस्तू, कॅमेरे, मोटारी, घड्याळे इत्यादींचा खच पडलेला असतो हॉंगकॉंग हे जगातील फार महत्त्वाचे व्यापारी बंदर आहे येथील जवो बंदरात पाच हजार होड्या असतात हे एक तरंगते शहरच समुद्रात वसले आहे.

करमुक्त खुली बाजारपेठ हे हॉंगकॉंगच्या विलक्षण भरभराटीचे रहस्य आहे. इथे

कुणालाही कसलाही व्यवसाय सहज सुरू करता येतो. उद्योगधंदे आणि व्यापार यावर कसलीही बंधने नाहीत त्यामुळे व्यापारउदीम करणाऱ्याचा हा स्वर्गच झाला आहे जगातील प्रत्येक मोठ्या व्यापारी आणि बँकिंग विमा कंपन्याच्या इथे कचेऱ्या आहेत. व्यापारावर व उद्योगधंद्यावर कर नसला तरी त्याच्या वाढीमुळे जी इतर आनुषंगिक वाढ होते त्याचा अमाप फायदा सरकारला होतो १९८० मध्ये या छोट्याशा वसाहतीचा निर्यात व्यापार ६८१७ कोटी डॉलर्सचा होता यावरून त्याच्या आर्थिक उलाढालीची काहीशी कल्पना येईल त्याशिवाय रीएक्स्पोर्ट किंवा आयात करून परत निर्यात केलेल्या मालाची किंमत तीन हजार कोटी डॉलर्स ( हाँगकाँग डॉलर्स ) एवढी होती अमेरिका, चीन, जपान, ब्रिटन या देशाना मुख्यतः ही निर्यात झाली

## प्रवासी व्यापाऱ्यांचा लोंढा

आजच्या जगातील सर्वात चैतन्यमय असा कोणता प्रदेश असेल तर हाँगकाँग. राजकीय चळवळीचा संपूर्णपणे अभाव असतानाही आर्थिक विकास किती झपाट्याने होऊ शकतो, याचे हाँगकाँग हे जिवंत उदाहरण आहे अनेक क्षेत्रात हाँगकाँगने गाठलेली उंची स्तिमित करणारी आहे तीस चौरस मैलाच्या या टापूत १७ वर्तमानपत्रे ( सकाळची आणि सायंकाळची दैनिके ) आणि ३८८ नियतकालिके प्रसिद्ध होतात दर हजारी ३५० प्रतींचा दैनिकाचा खप आहे हा जगातील दुसऱ्या क्रमाकाचा खप आहे जपानचा पहिला क्रम लागतो ( दर हजारी ४९० ). हाँगकाँगमध्ये चिनी भाषेतील ६७ दैनिके असून बाकीची इंग्रजी भाषेतील आहेत ९० टक्के घरात रंगीत टेलिव्हिजन आहेत हाँगकाँगमध्ये १९८० मध्ये १४२ चित्रपट तयार झाले साडेसहा कोटी प्रेक्षकानी चित्रपट पाहिले ( व्हीडीओवर चित्रपट पाहणाऱ्याची संख्या लोकसंख्येच्या ८२ टक्के आहे ) हाँगकाँगमध्ये दोन हजार छापखाने असून त्यात २३ हजार लोक काम करतात. टाईम, न्यूजवीक, वॉलस्ट्रीट जर्नल, रीडर्स डायजेस्ट अशा अनेक प्रमुख पाश्चात्त्य नियतकालिकाच्या अतिपूर्वेतील आवृत्त्या हाँगकाँगमध्ये निघतात. कॉम्प्युटरच्या साहाय्याने फोटो कंपोझिंगची पद्धत इकडे रूढ झाली आहे

जवळच्या पाण्यात सापडणारे मासे सोडले तर इतर प्रत्येक खाद्य पदार्थ हाँगकाँगमध्ये आयात करावा लागतो अर्थात वाहतुकीची सोय म्हणून सगळीकडे टिन्ड म्हणजे हवाबंद डब्यातले खाद्यपदार्थ दिसतात. स्वस्त माल मिळत असल्याने जगाच्या कानाकोपऱ्यातून लक्षावधी प्रवासी व व्यापारी याचा लोंढा हाँगकाँगला येतो त्यामुळे जीवनाला विलक्षण गती आली आहे गेल्या वर्षी येथे पचवीस लक्ष प्रवासी आले म्हणजे येथील कायम वस्तीच्या ५० टक्के प्रवासी आले. दरमाणशी हे जगातील सर्वात मोठे प्रमाण आहे. या प्रवाशाच्या सोईसाठी हिल्टन, शेरेटन पेनिन्सुला,

एक्सेल्सियर अशी अवाढव्य बादशाही हॉटेले येथे आहेत .परदेशातून येणारे प्रवासी हॉंगकॉंगमध्ये ६५० कोटी डॉलर्स खर्च करतात ( ते विकत घेत असलेल्या वस्तूंचा यात समावेश नाही )

स्थानिक चिनी अधिकाऱ्याकडून अधिक माहिती मिळवावी म्हणून मी यूनोच्या इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सोशल वेल्फेअर या संस्थेच्या हेनेसी रस्त्यावरील कचेरीत गेलो माझे स्नेही श्री शरच्चंद्र गोखले यानी या कचेरीतील तीन अधिकाऱ्याना पत्रे लिहून मी त्याना भेटण्यासाठी येणार असल्याची पूर्वसूचना दिली होती मी कचेरीत सकाळी नऊच्या सुमाराला गेलो, तेव्हा तेथील प्रमुख अधिकाऱ्याची सेक्रेटरी मला म्हणाली, " दुर्दैवाने हे तिन्ही अधिकारी आता इथे नाहीत एकाची दुसऱ्या कचेरीत बदली झाली आहे एक महिला अधिकारी रजेवर आहेत आणि तिसरे अधिकारी कचेरीच्या कामासाठी दौऱ्यावर आहेत " भारतात अशी परिस्थिती असती तर चिटणिसाने " माझा नाइलाज आहे " म्हणून पाहुण्याला कटवले असते. पण ही चिटणीस मुलगी अतिशय तत्पर आणि केवळ नियमापेक्षा अधिक विशालपणे कामाकडे पाहणारी होती तिने मला सांगितले, " आंतरराष्ट्रीय कौन्सिलचे अध्यक्ष श्री हु यिन फॅ हे आता येतील तोपर्यंत आपण चहा घ्या " माझे एक त्रोटक चरित्र मी डेटा प्रोसेसने तयार करून नेले होते ,त्याची प्रत मी तिला दिली मी चहा घेत होतो इतक्यात हु यिन फॅ हे आले ते युनोच्या समाजकल्याण शाखेचे जागतिक अध्यक्ष आहेत त्यानी माझे त्रोटक चरित्र वाचून रिसेप्शनच्या खोलीत माझी भेट घेतली. माझा चहाचा कप स्वत. उचलून त्यानी मला आपल्या खोलीत नेले आणि सुमारे तासभर वेळ देऊन मला हवी ती सर्व माहिती दिली

ते म्हणाले, " मी जन्मापासून इथेच आहे मी दोन वेळा भारताला गेलो आहे हॉंगकॉंगचे गव्हर्नर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे साहाय्याने या भागाचा कारभार पाहतात कौन्सिलमध्ये पाच एक्स ऑफिशिओ आणि दहा सरकारने नेमलेले सभासद आहेत आमची फक्त तीन टक्के लोकसंख्या शेती व मासेमारीवर अवलंबून आहे इथे ४५ हजार छोटे मोठे कारखाने आहेत त्यात नऊ लक्ष कामगार काम करतात १५ वर्षाखालील मुलाना कारखान्यात काम करण्यास बंदी आहे या कायद्याचे पालन केले जावे म्हणून आमचे कौन्सिल सरकारला साहाय्य करते

" कायदा आणि सुव्यवस्था यासाठी ३५००० पोलिस आहेत प्रत्येक पोलिसाजवळ रेडिओसंदेशाच्या द्वारे मुख्य कचेरीशी संपर्क ठेवण्याची साधने, रिव्हॉल्व्हर आणि दडुका असतो त्याशिवाय मुले, अपग, महिला, बेकार याच्यासाठी कार्य करणाऱ्या शंभर खासगी संस्थाना सरकार आर्थिक साहाय्य करते इथे सुबत्ता असल्याने आजूबाजूच्या देशातून चोरून इथे येणाऱ्याची संख्या फार मोठी आहे असे चोरट्या मार्गाने गेल्या वर्षी एक लाख लोक आले, पण त्यापैकी ६५ हजाराना पोलिसानी

पकडून परत पाठवले हॉंगकॉंगमध्ये दहा हजारावर छोट्या होड्या आहेत त्या होड्यातून चोरून येणाऱ्यावर नियंत्रण घालणे हे अत्यंत बिकट काम आहे, " असे श्री. हु यिन फॅ यानी सांगितले

## वेश्याव्यवसाय नाही

हॉंगकॉंग हे जागतिक बंदर असल्याने इथे वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो अशी एक समजूत आहे वेश्यांचे पुनर्वसन हे यूनोचे एक कार्य असल्याने श्री फॅ याना मी त्याबद्दल प्रश्न विचारला, तेव्हा ते हसून म्हणाले, " ही समजूत सपशेल चुकीची आहे १९४० ते १९५० या काळात हॉंगकॉंगला वेश्यांचा बाजार आणि व्यापार मोठ्या प्रमाणावर होता 'सूझी वॅग' ही कादंबरी आणि तीवरील चित्रपट यामुळे बाहेरच्या जगात हॉंगकॉंगविषयीची ही कल्पना रूढ आहे पण वीस–पंचवीस वर्षांपूर्वीच या प्रकाराना आळा घालण्यास सुरुवात झाली वेश्याव्यवसाय आणि मुलींचा व्यापार पोलिसांच्या मदतीशिवाय चालणे शक्य नाही याचाच अर्थ भ्रष्टाचाराशिवाय असे प्रकार होऊ शकत नाहीत म्हणून १९७० मध्ये सरकारने भ्रष्टाचारविरोधी कमिशन नेमले आणि त्याच्या शिफारशी कडकपणे अमलात आणल्या. आज वेश्याव्यवसाय आणि नाईट लाईफ ही हॉंगकॉंगहून बॅंकॉकला हलली आहेत खुद्द हॉंगकॉंगमध्ये त्याचे फार थोडे प्रकार घडतात इथे टॉपलेसच्या पुढे नाईट क्लब जात नाहीत."

हॉंगकॉंगमध्ये धर्माचा कितपत प्रसार आहे असे विचारता श्री हु यिन फॅ म्हणाले, " हे व्यापारी केंद्र आहे इथे मुख्यतः बौद्ध धर्म आहे. पण चाळिशी किंवा पन्नाशीच्या पुढचे लोक धर्माविषयी आस्था दाखवितात नवी चिनी पिढी डिस्को, पाश्चात्त्य नृत्य यातच गुंग आहे त्याच्यावर बुद्ध धर्माचा विशेष परिणाम झालेला दिसत नाही मला वाटते हे हॉंगकॉंगमध्येच घडत आहे असे नाही जगातील सर्वच देशातील तरुण पिढी धर्माविषयी उदासीन आहे आमच्याकडे जगातील सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान व तंत्रज्ञ आहेत कारण वाटेल तेवढा पैसा ओतण्याची येथील उद्योग व व्यापार यांची तयारी असते त्यामुळे जपान आणि अमेरिका यांच्या निवडक तंत्रज्ञानाचा मिलाफ येथे दिसतो."

देशोदेशीच्या नाट्याविषयी मला विशेष उत्सुकता असल्याने हॉंगकॉंगमधील नाटकाची परिस्थिती काय आहे असे मी श्री फॅ याना विचारले. ते म्हणाले, " प्रत्यक्ष रंगमंचावरील नाटके इकडे क्वचितच होतात पण टी व्ही वर नाटकाची मालिका असते त्यात प्रचलित विषय प्रभावीपणे हाताळले जातात "

हॉंगकॉंगमध्ये सोशल सिक्युरिटी पद्धत प्रचलित आहे असे सांगून ते पुढे म्हणाले, " वृद्ध व बेकार याना सरकारकडून भत्ता मिळतो येथे भिकारी दिसत नाहीत कारण

कोणी आढळलाच तर त्याला पकडून त्याची चौकशी होते तो कायदेशीर नागरिक असेल तर त्याला तावडतोब भत्ता चालू होतो · तो बेकायदेशीरपणे आला असेल तर त्याला त्याच्या मूळ देशात परत पाठवले जाते ”

## ४

## हाँगकाँगमधील भारतीय

हाँगकाँगची भौगोलिक रचनाच अशी आहे, की तेथे शहर वसविणे हे अत्यत अवघड काम सतत वादळे होणाऱ्या समुद्रात तीन खडे टाकल्यासारखी तीन मुख्य बेटे आजूबाजूला दोनशेवर छोटी बेटे. मोठ्या बेटावर डोंगर त्यामुळे सपाट जमीन शोधून काढणे, रस्ते करणे अतिशय कठीण, पण १८९५ साली ब्रिटिशानी चीनपासून हा भाग घेतल्यानतर अत्यत चिकाटीने त्याची पद्धतशीर वाढ केली. आता इथे उच्च-सखल का होईना पण अद्ययावत रस्ते, बसेस, टॅक्सीज, विमानतळ व जमिनीखालची रेल्वे या सर्व सोई आहेत एक बोगदा तर समुद्रसपाटीच्या खालून नेण्यात आला आहे तो कौलून आणि हँगकाँगला जोडतो डोंगर आणि समुद्र याच्या खोबणीत दाटीवाटीने विमानतळ तयार केला आहे बंदरातील छोट्या होड्यातच जवळजवळ एक लाख लोक राहतात त्याना जमिनीवर घरे देण्याचा प्रयत्न सरकारने केला, पण हे चिनी कोळी पारपरिक पद्धतीवर विश्वास ठेवणारे आहेत पाण्यातून बाहेर येऊन जमिनीवर राहणे हे अशुभ आहे असे ते अजूनही मानतात मी गेलो तेव्हा या कोळ्यांचा महोत्सव चालला होता हजारो होड्या सजवल्या होत्या हा महोत्सव जलदेवतेचा होता तिला प्रसन्न केले की सागरावरील तुफानापासून ती रक्षण करते अशी या चिनी कोळ्याची समजूत आहे तीस मैलाचा हा प्रदेश. महाराष्ट्राच्या मानाने एकदशाशाहूनही लोकसख्या कमी, पण एवढ्याशा समाजात एकीकडे तत्र ज्ञानाचा सर्वोत्तम विकास तर दुसरीकडे लोकभ्रम व जुन्या समजुतीवर विश्वास असा विरोधाभास दिसतो

घोडयाच्या शर्यती हा हॉंगकॉंगच्या लोकांचा मनस्वी व्यास आहे. या छोट्या प्रदेशात दोन रेस कोर्स आहेत प्रत्येक रेसवर पन्नास लाख डॉलर्स लावले जातात अशा रोज आठ ते नऊ शर्यती पावसाळा सोडून दर बुधवारी व शनिवारी होतात मात्र या शर्यतीपासून होणारा फायदा सार्वजनिक व धर्मार्थ कामासाठी उपयोगात आणला जातो हॉंगकॉंगचे शिंपी जगात प्रसिद्ध आहेत ते अत्यंत स्वस्त किंमतीत उत्तम सूट चार-सहा तासात शिवून देतात असा सूट कापडासह फक्त अडीचशे ते तीनशे रुपयापर्यंत मिळतो रस्त्यात आडव्या पाट्या उंचावर लावणे हे हॉंगकॉंगचे आणखी एक वैशिष्ट्य जमीन थोडी व लोकसंख्या प्रचंड यामुळे रस्ते सतत गर्दीचे पण वाहतूक अतिशय शिस्तीची वेगाने मोटारी धावत असतात झेब्रा खुणेशिवाय इतर ठिकाणी पादचाऱ्यानी रस्ता ओलांडला तर खटला होऊ शकतो. हॉंगकॉंग ते कौलून फेरीवर रात्रदिवस गर्दी असते बंदरात अवाढव्य बोटी मालाची जगभर वाहतूक करण्यासाठी येत-जात असतात

पिण्याच्या पाण्यापासून जवळजवळ प्रत्येक वस्तू आयात करूनही अत्यत गतिमान असलेल्या या भागाविषयी भारत सरकारचा दृष्टिकोण समजून घ्यावा म्हणून मी येथील प्रमुख दर्जाचे भारतीय राजनैतिक अधिकारी श्री सी व्ही रंगनाथन् याची भेट घेतली भारत सरकारच्या परराष्ट्र-खात्यात त्यानी जॉईंट सेक्रेटरी म्हणून काम केले असून जपान व कोहिमातील भारत सरकारच्या वकिलातीतही उच्च पदावर त्यानी कामे केली आहेत. श्री. रंगनाथन् याना चिनी भाषा उत्तम प्रकारे येते ते म्हणाले, “ सप्टेंबर १९८० पासून मी येथे आहे हॉंगकॉंग हा आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे पण हे स्वतंत्र राष्ट्र नसून नियंत्रित प्रदेश असल्याने येथील वकिलातीला हायकमिशनच्या दर्जाऐवजी कमिशन ही संज्ञा आहे हॉंगकॉंगमध्ये एकदर चौदा हजार भारतीय असून त्यापैकी आठ हजाराचे भारतीय पासपोर्ट आहेत, आणि सहा हजार भारतीय लोक ब्रिटिश पासपोर्टवर येथे आले आहेत. बहुतेक हे व्यापारात आहेत हे १४ हजार भारतीय कोणत्या भागातील आहेत आणि त्यापैकी महाराष्ट्रातील किती आहेत, असे मी विचारले तेव्हा कमिशनर श्री रंगनाथन् म्हणाले, “ बहुतेक भारतीय उत्तरेकडील म्हणजे सिंधी व पंजाबी आहेत महाराष्ट्रातून येथे आलेल्याची संख्या २५ ते ३० एवढी असावी तेही कोणत्या ना कोणत्या तरी नोकरीवर आले आहेत इथे सात भारतीय बँकांच्या शाखा आहेत, आणि भारतीय विमा कंपन्यांच्या व आगबोट कंपन्यांच्या शाखा आहेत या एवढ्याशा भागात भारतातून दरसाल शभर कोटी रु च्या मालाची आयात होते हा आकडा अतिशय उत्साहजनक असला तरी हा माल मुख्यतः एकाच प्रकारचा आहे याबद्दल मला फार समाधान नाही पॉलिश्ड व कट्‌ डायमंड, इमिटेशन ज्युवेलरी याच प्रकारची मुख्यतः आयात होते त्याशिवाय काजूसारख्या वस्तूची थोडीशी आयात होते.

गुजरातेतून मुख्यतः डायमंड व दागिन्यासाठी वापरण्यात येणारे खडे आयात होतात "

हाँगकाँगचा काही भाग १६ वर्षांनी चीनकडे जाणार आहे काय असे विचारता कमिशनर रंगनाथन् म्हणाले, "त्याबाबतची परिस्थिती अनिश्चितच आहे १८९७ च्या कराराने हाँगकाँगचा न्यू टेरिटरी हा भाग चीनकडून ब्रिटनने ९९ वर्षांच्या कराराने घेतला पण आपण जुने करार मानीत नाही असे चीनने जाहीर केले आहे शिवाय हाँगकाँगच्या व न्यू टेरिटरीच्या सध्याच्या भरभराटीचा फायदा जवळच्या चीनलाही मिळत आहे त्यामुळे या प्रदेशाची राजकीय परिस्थिती आहे तशीच ठेवण्याकडे चीनचा कल आहे पण येत्या सोळा वर्षांत काय होईल ते सांगता येत नाही. चीनने याबाबत ठाम निर्णय घ्यायचा आहे."

हाँगकाँग आणि भारत यांचे संबंध सलोख्याचे आहेत. व्हिएटनामसारख्या एखाद्या प्रश्नावर या दोघात वेगळ्या भूमिका घेतल्या गेल्या तरी सर्वसामान्यपणे आमच्यात कधीही संघर्ष आलेला नाही, असेही कमिशनर श्री रंगनाथन् यांनी सांगितले ते म्हणाले, " राजकीय चळवळ नसतानाही हाँगकाँगने केलेल्या अभूतपूर्व आर्थिक प्रगतीमुळे जगातील सर्व राष्ट्रांचे लक्ष या भागाने वेधून घेतले आहे चीनसारख्या राष्ट्राला हाँगकाँगने त्याच्या पारंपरिक आर्थिक धोरणाबद्दल पुनर्विचार करावा असे वाटू लागले हाँगकाँग आता लँड ऑफ अपॉर्च्युनिटी ( भव्य संधी मिळण्याचा प्रदेश ) म्हणून ओळखले जात आहे तुमच्या 'सकाळ'मार्फत मी तुमच्या वाचकांना आवाहन करू इच्छितो की त्यांनी हाँगकाँगला येऊन आर्थिक भरभराटीची संधी घ्यावी "

भारतीय कमिशनचे अर्थविषयक सल्लागार श्री सुरेंद्रकुमार यानाही मी भेटलो. ते म्हणाले, " हाँगकाँगची आर्थिक उलाढाल जगातील तिसरी ( पहिली न्यूयॉर्क, दुसरी लंडन ) आहे येथील उद्योग व्यापाराने बँकांचे ३५ बिलियन अमेरिकन डॉलर्सचे कर्ज घेतले आहे १९८० मध्ये हाँगकाँगने ६८१७ कोटी डॉलर्सची निर्यात केली त्यापैकी ३५ टक्के निर्यात अमेरिकेला व ३४ टक्के पश्चिम युरोपला केली त्यात तयार कपडे, खेळणी, घड्याळे, रेडिओ, टी व्ही, प्रवासाचे सामान वगैरेंचा समावेश आहे आयातीपैकी सर्वात अधिक म्हणजे २३ टक्के जपानहून, १२ टक्के अमेरिकेहून, २० टक्के चीनहून होते आयातीत कापूस, कापड, तयार यंत्रसामग्री, खाद्यपदार्थ, रसायने इत्यादी असतात हाँगकाँगमध्ये भारतीयांच्या १४ संघटना आहेत. गुरुद्वार मंदिर वगैरेही आहेत असे श्री कुमार म्हणाले येथे भारतीय चित्रपट लागतात काय असे विचारता श्री कुमार म्हणाले, " पूर्वी काही चित्रपट लागत होते, पण आता घरोघर व्हिडिओ आले आहेत भारतीय चित्रपट भारतात प्रदर्शित होण्यापूर्वीच येथे अनेक घरातून ते व्हिडिओवर पाहिले जातात २०० ते ३०० रु ला हिंदी चित्रपटाचा व्हिडिओ मिळतो. बऱ्याच सिंधी व पंजाबी व्यापाऱ्यांच्या घरी ५०।६० चित्रपटांचे टेप्स आहेत हाँगकाँगच्या भारतीय कमिशनमध्ये वीस भारतीय

अधिकारी व दहा स्थानिक नोकर आहेत असे ते म्हणाले.

भारतीय कमिशनजवळच शिखांचे गुरुद्वार आहे मी हिंदू मंदिराचा पत्ता श्री कुमार यांच्याकडून घेऊन सुमारे फर्लांगभर चालून गेलो तिथे रेसकोर्ससमोरच एका टेकडीवर उंच जागी मंदिराचे शिखर आणि भगवे निशाण दिसले वर गेलो आणि प्रथमच इतक्या दूरवर मारुतीचे देऊळ पाहून बरे वाटले समोरच भव्यमंदिर आहे त्यात मध्यभागी लक्ष्मी-विष्णु, उजवीकडे शिवपार्वती, गणपती व शिवलिंग आहे डावीकडे सिंधी लोकांच्या वरुणदेवाची मूर्ती आहे आवार अतिशय स्वच्छ आणि प्रसन्न आहे आवारात ग्रंथालय, दोन सभागृह आणि राहण्याची जागा आहे मंदिराचे चिटणीस रमेशचंद्र त्रिवेदी हे स्वतः एक चांगले हिंदी कवी आहेत त्यांनी माझे आस्थेने स्वागत करून मंदिराची माहिती दिली ते म्हणाले, " हिंदू असोसिएशनतर्फे हे मंदिर १९५६ मध्ये बांधले गेले संस्थेची वार्षिक वर्गणी दरसाल शंभर हाँगकाँग डॉलर्स असून सध्या एक हजार सभासद आहेत त्याशिवाय इमारतीच्या वाढीसाठी किंवा खास कारणासाठी देणग्या देणारे लोक आहेत या मंदिरात नेहमी प्रवचने, पूजा, भजने वगैरेंचे कार्यक्रम होतात त्याशिवाय येथील मराठी लोकांचा गणेशोत्सव, बंगाली लोकांचा कालिमहोत्सव, इतर भारतीयांची कृष्णाष्टमी असे विविध सणही साजरे केले जातात या कार्यक्रमाची पूर्वसूचना स्थानिक रेडिओवरून देण्यात येते प्रवचन करण्यासाठी येणाऱ्याची राहण्याची मोफत सोय होते ग्रंथालयातून धार्मिक ग्रंथ वाचण्यासाठी देण्यात येतात " या मंदिराच्या आवारात देवळाली येथील शकुंतला ओझरकर या मराठी महिला गेली अठरा वर्षे राहात आहेत

हाँगकाँगचे एक विशेष प्रेक्षणीय स्थळ म्हणजे टायगर बाम उद्यान आपुन हॉग नावाच्या एका धनाढ्य व उदार व्यापाऱ्याने डोंगराच्या उतरणीवर हे नयनमोहर उद्यान तयार केले आहे त्यात अनेक पॅगोडे, चिनी मूर्ती, धबधबे आणि निवडक फुलझाडे व फळझाडे लावली आहेत साठ लाख डॉलर्स खर्चून तयार केलेली ही बाग त्याने जनतेसाठी मोफत खुली ठेवली आहे त्याची एक मुलगी अद्यापही या बागेच्या आवारातील बंगल्यात राहते एका डोंगरावर एक बाई लहान मुलगा पाठी-वर घेऊन उभी असलेला एक पुतळा आहे युद्धावर गेलेल्या नवऱ्याची ही पत्नी पतीची वाट पाहताना निधन पावली, तिचा हा पुतळा एखाद्या चपळ घोरपडीसारखी डोंगरावर चढणारी केबल कार हे हाँगकाँगचे एक वैशिष्ट्य या डोंगराळ भागात जमिनीला भूकंपांनी आणि सागराला तुफानांनी हैराण केले आहे तरीही माणसे चिकाटीने या दोन्हींवर विजय मिळवून टिकून आहेत गव्हर्नरचे निवासस्थान वर्षातून एक वेळा जनतेला खुले असते हॉंगकाँगमध्ये सर्व अधिकृत नागरिकांना मोफत वैद्यकीय मदत असते अपंगांना खास भत्ता असतो या भागात पेयेन नावाचे सुगंधी झाड आहे त्यास हॉंग असेही म्हणतात कॉंग म्हणजे बंदर. असा हाँगकॉंग ( सुगंधी

बदर ) हा शब्द झाला आहे कौलून याचा अर्थ नऊ ड्रॅगन्स पूर्वीच्या काळी जे चिनी प्रथम इथे आले, त्याना आजूबाजूचे डोंगर ड्रॅगनसारखे दिसले म्हणून त्यानी त्या बेटाचे नाव कौलून असे ठेवले

हॉंगकॉंग येथील एस पी गोखले यानी तेथील मराठी भाषिकाची व माझी भेट घडवून आणण्यासाठी आपल्या घरी एका संध्याकाळी जेवणाला बोलविले होते श्री. जोशी, देवळालीकर, फायझरमधील श्री आपटे, श्री समर्थ वगैरे दहाबारा मराठी जोडपी होती. त्यानी सागितले की तीन वर्षापूर्वी येथे महाराष्ट्र मडळ स्थापन झाले आहे मडळातर्फे दिवाळी, गणेशोत्सव वगैरे सण साजरे केले जातात गेल्या वर्षी मडळाने श्री पु ल देशपाडे याची एक नाटिकाही बसविली होती

# ५

## जपान : यंत्रमानवाच्या घामाची समृद्धी

जपानच्या विमानळावर पाऊल ठेवल्याबरोबरच या देशाच्या कमालीच्या स्वच्छतेची, लोकांच्या नम्रतेची आणि समृद्धीची कल्पना येते सर्व आधुनिक यत्रणा इथे वापरली जाते जलद कामे करण्यात हे लोक इतके तत्पर आहेत की, विमानातून उतरून पासपोर्ट दाखवून तुम्ही सामान घेण्याच्या जागेवर पोचण्यापूर्वीच तुमचे सामान तेथे तयार असते टॅक्सी, बस ही वाहने सज्ज असतात नव्या प्रवाशाला मार्गदर्शन करण्यासाठी हसतमुख व माहितगार जपानी तरुणी हवी ती माहिती लगेच देतात विमानतळ भव्य, देखणा आणि कणभरही केरकचरा नसलेला असा आहे. या सर्वांची छाप तुमच्यावर पडते न पडते तोच जपानच्या महागाईचा वडगा बसतो मी जेथे राहतो तेथे विमानतळावरून जाण्यासाठी टॅक्सीला एक हजार रु पडतात ! निम्मा मार्ग बसने काटला तरी साडेपाचशे रुपये नुसते घरापर्यंत पोचण्यासाठी लागतात कारण नारिता हा नवा विमानतळ गावापासून पचेचाळीस मैल लाब आहे

जपानची लोकसंख्या ११ कोटी दहा लाख त्यापैकी सुमारे एकदशाश म्हणजे १ कोटी ११ लाख लोक टोकियो शहरात राहतात जगातील सर्वांत अधिक लोकसंख्या असलेले हे शहर पण अतिशय शिस्तबद्ध. आजचा जपान अनेक क्षेत्रात जगातील पहिल्या क्रमाकावर आहे मोटारीचे उत्पादन, आगबोट बाधणी, इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तूंचे उत्पादन, घड्याळे, व्हिडिओ, टी. व्ही , कॉम्प्युटर्स, दर हजारी वाचली जाणारी वर्तमानपत्रे, आगगाड्या, पोलादाचे उत्पादन, सर्वांत बळकट चलन ( येन ) अशा अनेक क्षेत्रात या छोट्याशा देशाने आपल्या उद्योगप्रियतेने आणि

कल्पकतेने जगातील उच्चांक स्थापन केले आहेत. ते केवळ संख्येचे नसून गुणवत्तेचेही आहेत. रोबोचा (यान्त्रिक माणूस) उपयोग कारखान्यात माणसाच्या ऐवजी करणारा जपान हा पहिला देश आहे केवळ गरिबी नष्ट करणाराच नव्हे, तर देशातील प्रत्येक नागरिकास किमान समृद्धी देणारा हा पहिला देश आहे वास्तविक या देशाची भौगोलिक परिस्थिती समृद्धीला सर्वस्वी प्रतिकूल आहे कारण हा सलग देश नसून दोनशेवर लहानमोठ्या बेटांचा बनलेला आहे. तीन लाख सत्तर हजार चौरस किलोमीटर हे जपानच्या जमिनीचे क्षेत्रफळ म्हणजे हा देश फिनलंडपेक्षा मोठा पण मोरोक्कोपेक्षा लहान आहे. भूकंपामुळे अनेकदा जपानमधील गावे आणि शहरे उद्ध्वस्त झालेली आहेत भूकंपमापन यन्त्रावर वर्षातून दीडशेवर लहान-मोठे भूकंप नोंदले जातात डोंगर आणि पाणी यामुळे सलग भूप्रदेश काही अपवाद सोडता मोठ्या प्रमाणावर मिळत नाही बर्फ पडण्यापासून कडक उन्हाळ्यापर्यंत विविध प्रकारचे हवामान आहे जपानमध्ये अनेक ज्वालामुखी पर्वतही आहेत

या सर्व अडचणींवर जपानी लोकांनी मात केली आहे. त्यांना गेल्या पस्तीस वर्षांत राजकीय परिस्थितीही अनुकूल मिळाली नागासाकी व हिरोशिमावर गेल्या महायुद्धाचे अखेरीच्या पर्वात अमेरिकेने अणुबॉंब टाकले जपानला शरणागती पत्करावी लागली. दोस्त राष्ट्रांनी जपानवर कडक अटी लादल्या या देशाने लष्कर वाढवून पुनः डोईजड होऊ नये म्हणून लष्कर, हवाईदल किंवा नौदल बाळगण्यास जपानला बंदी करण्यात आली दोस्त राष्ट्रे आणि जपान यांच्यातील हा करार जपानच्या पथ्यावर पडला, कारण सरक्षणावर होणारा अफाट खर्च आणि मनुष्यबळ जपानला आपल्या औद्योगिक प्रगतीसाठी वापरता आले कोणत्याही देशाचा ४५ ते ५० टक्के खर्च संरक्षणावर होतो म्हणजे जपानचा निम्मा खर्च वाचला या संधीचा जपानने पुरेपूर उपयोग करून घेतला. महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जपानने पुन्हा उभारी धरली आणि तीस-पस्तीस वर्षांत अनेक क्षेत्रात पहिला क्रमांक पटकावला

सुदैवाने राजकीय स्थैर्यानेही जपानला हात दिला अगदी लहान कालखंडाचा अपवाद सोडला तर जपानमध्ये महायुद्धानंतर लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष सत्तेवर आहे. या पक्षाला आव्हान देऊ शकेल असा बळकट विरोधी पक्ष नाही या पक्षाचे नेते श्री सुझुकी हे सध्या जपानचे पंतप्रधान आहेत त्यांच्यापुढे अलीकडे नवाच प्रश्न अमेरिकेने उभा केला आहे जपानने लष्करी दृष्ट्या डोईजड होऊ नये म्हणून दोस्तांनी त्यांच्यावर निर्बंध घातले, पण गेल्या दहा वर्षांत जपान हा अमेरिकेला आर्थिक दृष्ट्या डोईजड होऊ लागला आहे जपानी मोटार उद्योगाचे आव्हान पेलणे अमेरिकन मोटार कारखान्यांना कठीण होत आहे विद्युत्‌अणू वस्तूत तीच गत आहे जपानी माल अमेरिकेत स्वस्त पडतो यावर उपाय म्हणून अमेरिकेने जपानला आता सुचवले आहे, की जपानला रशियाच्या वाढत्या लष्करी बळाचा धोका असल्याने

## ५

## जपान : यंत्रमानवाच्या घामाची समृद्धी

जपानच्या विमानळावर पाऊल ठेवल्याबरोबरच या देशाच्या कमालीच्या स्वच्छतेची, लोकाच्या नम्रतेची आणि समृद्धीची कल्पना येते सर्व आधुनिक यत्रणा इथे वापरली जाते. जलद कामे करण्यात हे लोक इतके तत्पर आहेत की, विमानातून उतरून पासपोर्ट दाखवून तुम्ही सामान घेण्याच्या जागेवर पोचण्यापूर्वीच तुमचे सामान तेथे तयार असते. टॅक्सी, बस ही वाहने सज्ज असतात नव्या प्रवाशाला मार्गदर्शन करण्यासाठी हसतमुख व माहितगार जपानी तरुणी हवी ती माहिती लगेच देतात. विमानतळ भव्य, देखणा आणि कणभरही केरकचरा नसलेला असा आहे. या सर्वांची छाप तुमच्यावर पडते न पडते तोच जपानच्या महागाईचा बडगा बसतो. मी जेथे राहतो तेथे विमानतळावरून जाण्यासाठी टॅक्सीला एक हजार रु पडतात ! निम्मा मार्ग बसने काटला तरी साडेपाचशे रुपये नुसते घरापर्यंत पोचण्यासाठी लागतात. कारण नारिता हा नवा विमानतळ गावापासून पन्नेचाळीस मैल लाब आहे.

जपानची लोकसख्या ११ कोटी दहा लाख त्यापैकी सुमारे एकदशाश म्हणजे १ कोटी ११ लाख लोक टोकियो शहरात राहतात. जगातील सर्वांत अधिक लोक-संख्या असलेले हे शहर पण अतिशय शिस्तबद्ध आजचा जपान अनेक क्षेत्रात जगातील पहिल्या क्रमाकावर आहे मोटारीचे उत्पादन, आगबोट बाधणी, इलेक्ट्रॉ-निक्सच्या वस्तूचे उत्पादन, घड्याळे, व्हिडिओ, टी व्ही., कॉम्प्युटर्स, दर हजारी वाचली जाणारी वर्तमानपत्रे, आगगाड्या, पोलादाचे उत्पादन, सर्वांत बळकट चलन ( येन ) अशा अनेक क्षेत्रात या छोट्याशा देशाने आपल्या उद्योगप्रियतेने आणि

कल्पकतेने जगातील उच्चांक स्थापन केले आहेत ते केवळ संख्येचे नसून गुणवत्तेचेही आहेत रोबोचा ( यांत्रिक माणूस ) उपयोग कारखान्यात माणसाच्या ऐवजी करणारा जपान हा पहिला देश आहे केवळ गरिबी नष्ट करणाराच नव्हे, तर देशातील प्रत्येक नागरिकास किमान समृद्धी देणारा हा पहिला देश आहे वास्तविक या देशाची भौगोलिक परिस्थिती समृद्धीला सर्वस्वी प्रतिकूल आहे कारण हा सलग देश नसून दोनशेवर लहानमोठ्या बेटाचा बनलेला आहे तीन लाख सत्तर हजार चौरस किलोमीटर हे जपानच्या जमिनीचे क्षेत्रफळ म्हणजे हा देश फिनलंडपेक्षा मोठा पण मोरोक्कोपेक्षा लहान आहे भूकपामुळे अनेकदा जपानमधील गावे आणि शहरे उद्ध्वस्त झालेली आहेत भूकंपमापन यंत्रावर वर्षातून दीडशेवर लहान-मोठे भूकंप नोंदले जातात डोंगर आणि पाणी यामुळे सलग भूप्रदेश काही अपवाद सोडता मोठ्या प्रमाणावर मिळत नाही बर्फ पडण्यापासून कडक उन्हाळ्यापर्यंत विविध प्रकारचे हवामान आहे जपानमध्ये अनेक ज्वालामुखी पर्वतही आहेत

या सर्व अडचणींवर जपानी लोकानी मात केली आहे. त्याना गेल्या पस्तीस वर्षांत राजकीय परिस्थितीही अनुकूल मिळाली नागासाकी व हिरोशिमावर गेल्या महायुद्धाचे अखेरीच्या पर्वात अमेरिकेने अणुबॉंब टाकले जपानला शरणागती पत्करावी लागली. दोस्त राष्ट्रानी जपानवर कडक अटी लादल्या या देशाने लष्कर वाढवून पुनः डोईजड होऊ नये म्हणून लष्कर, हवाईदल किंवा नौदल बाळगण्यास जपानला बंदी करण्यात आली दोस्त राष्ट्रे आणि जपान याच्यातील हा करार जपानच्या पथ्यावर पडला, कारण संरक्षणावर होणारा अफाट खर्च आणि मनुष्यबळ जपानला आपल्या औद्योगिक प्रगतीसाठी वापरता आले कोणत्याही देशाचा ४५ ते ५० टक्के खर्च सरक्षणावर होतो म्हणजे जपानचा निम्मा खर्च वाचला या संधीचा जपानने पुरेपूर उपयोग करून घेतला महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जपानने पुन्हा उभारी धरली आणि तीस-पस्तीस वर्षांत अनेक क्षेत्रात पहिला क्रमाक पटकावला

सुदैवाने राजकीय स्थैर्यानेही जपानला हात दिला अगदी लहान कालखंडाचा अपवाद सोडला तर जपानमध्ये महायुद्धानतर लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष सत्तेवर आहे या पक्षाला आव्हान देऊ शकेल असा बळकट विरोधी पक्ष नाही या पक्षाचे नेते श्री सुझुकी हे सध्या जपानचे पतप्रधान आहेत त्याच्यापुढे अलीकडे नवाच प्रश्न अमेरिकेने उभा केला आहे जपानने लष्करी दृष्ट्या डोईजड होऊ नये म्हणून दोस्तानी त्याच्यावर निर्बंध घातले, पण गेल्या दहा वर्षांत जपान हा अमेरिकेला आर्थिक दृष्ट्या डोईजड होऊ लागला आहे जपानी मोटार उद्योगाचे आव्हान पेलणे अमेरिकन मोटार कारखान्याना कठीण होत आहे विद्युत्अणू वस्तूत तीच गत आहे जपानी माल अमेरिकेत स्वस्त पडतो यावर उपाय म्हणून अमेरिकेने जपानला आता सुचवले आहे, की जपानला रशियाच्या वाढत्या लष्करी बळाचा धोका असल्याने

आता जपानने आपले सरंक्षण दल वाढवावे आपल्या देशाचे अग्रक्रम असे एकदम बदलता येणार नाहीत, असे जपानचे म्हणणे आहे.

सांस्कृतिक दृष्ट्याही जपान आघाडीवर आहे नाटक, नृत्य, संगीत, साहित्य यात देशाला श्रेष्ठ परंपरा आहेच; पण गेल्या पचवीस वर्षांत जपानला अधिक सुबत्ता आणि स्वास्थ्य लाभलेल्या सांस्कृतिक विकासाचे अधिक पद्धतशीर प्रयत्न झाले. कबुकी या नाट्य प्रकाराची परंपरा ३५० वर्षे चालू आहे. चित्रकला प्रथम चीनमधून आठव्या शतकात आली पण पुढे जपानने स्वतंत्र शैलीचा विकास केला उद्याने हा जपानचा खास आवडीचा विषय आहे देशभर अनेक सुंदर उद्याने आहेत छोटी झाडे म्हणजे मोठ्या झाडाच्या रोपावर प्रयोग करून तयार केलेली लहान झाडे हे जपानचे वैशिष्ट्य. प्रत्येक घरातील तोकोनामा आणि इकेबाना ( पुष्परचना ) या लोकांची फुलांची आवड दाखवितात मुंबईत मराठी, गुजराती व अन्य भाषकांची मिळून अकरा नाट्यगृहे आहेत तर टोकियोतील लहान मोठ्या नाट्यगृहांची संख्या अडीचशेवर आहे जपानइतके परिपूर्ण रंगीत चित्र इतरत्र कोणत्याही टी व्ही वर दिसत नाही. अनेक जपानी शहरात दहा चॅनेल्सवर जवळजवळ रात्रंदिवस टी व्ही चालू असतो. एम एच के या जपान सरकारच्या अंतर्गत व परदेशी प्रसारण कामाच्या नभोवाणी केंद्रावर पस्तीस हजार लोक काम करतात.

जपान हा शब्द निप्पान-पोन या शब्दावरून आला असून त्याचा अर्थ सूर्याचा उगम असा आहे म्हणून या देशाला ‘ उगवत्या सूर्याचा देश ’ असे म्हणतात राजकीय दृष्ट्या हा देश कधीही परक्याच्या अंमलाखाली गेला नाही चौथ्या शतकापासून हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून अखंडपणे विकसित झाले आहे सम्राट म्हणून फक्त राष्ट्रप्रमुख अस्तित्वात आहे आणि तो जपानचा जवळजवळ देवाइतकाच जपानमध्ये सम्राटाला मान आहे प्रत्यक्ष कारभार मात्र डायेट ( पार्लमेंट ) कडे आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांवर आर्थिक हुकमत गाजविणारा जपान हा एकमेव पौर्वात्य देश आहे

जपानचे कितीही गुण असले, तरी परदेशी प्रवाशाला येथील कमालीची महागाई त्राहि भगवान ’ करून सोडते. जपानी लोकांचे उत्पन्नही आपल्या मानाने अनेक पटींनी असल्याने त्यांना ही महागाई तेवढी जाणवत नसेल पण आपल्या दराच्या तुलनेने येथील काही दर असे आहेत. चित्रपट ६५ ते १२५ रु, आंबा ( मेक्सिकोचा ) एका फळास २२ रु. ( भारताचा ) ३० रु, वर्तमानपत्र ( दैनिक ) ४ ५० रु, बूट पॉलिश १५ रु, राहण्याचे हॉटेल दररोज ६०० ते १५०० रु, जेवण एक वेळचे १०० रु, चहा किंवा कॉफी १८ ते ३० रु, केळी प्रत्येकी ५ रुपये, स्थानिक आगगाडी किंवा बस किमान ७ रुपये, टॅक्सी किमान दर २० रु असे काही दर आहेत टॅक्सीचे दर फार वाढले म्हणून अलीकडे टीका झाली त्यावर उत्तर म्हणून प्रत्येक टॅक्सीत एक आलेख ( ग्राफ ) आहे. त्यात पाण्याचे दर गेल्या पाच वर्षांत

किती वाढले, विजेचे किती वाढले आणि टॅक्सीचे किती वाढले हे दाखवले असून टॅक्सीचे दर त्या मानाने कमी प्रमाणात वाढले, असे दाखवले आहे

गेल्या आठ वर्षांत पेट्रोलचे दर दहापट झाले त्यावर उपाय काढावा म्हणून जपानी संशोधकानी दीर्घकाल सशोधन करून पेट्रोलला पर्यायी रसायन शोधून काढले आहे त्याचा व्यापारी उपयोग व्हायला सुरुवात होईल तेव्हा जागतिक व्यापार-उद्योगात विलक्षण फरक पडेल, असे जपानी संशोधकाचे मत आहे या सशोधकानी यात्रिक मानवाचे युग आणले आहे आपोआप जिन्यावरून चढणे, वेल्डिंग करणे, नट-बोल्ट आवळणे, रंग देणे, अशी अनेक कामे हे रोबो करतात रोबो तयार करणारे १३० कारखाने जपानमध्ये आहेत आणि त्याचे दररोजचे रोबो उत्पादन ५७००० आहे वेल्डिंग ( झाळकाम ) करणारा रोबो दररोज तीस हजार झाळकामे करतो जपानी सशोधकाचे म्हणणे की, भविष्यकाळात धोक्याची आणि नेहमीची ( रुटिन ) अशी दोन्ही प्रकारची सर्व कामे रोबो करतील माणसाऐवजी रोबोंचा वापर केल्याने गैरहजेरी, आजार, संप इत्यादी कारणामुळे होणारे नुकसान टाळता येते जपानमधील मोटारधद्यात आता ६२ टक्के कामे रोबो करतात. अणुभट्टीतील धोक्याची कामे रोबोकडे सोपविण्यात आली आहेत मोटारीला रग देण्याचे काम जेव्हा माणसे करीत होती, तेव्हा ४० टक्के कामगाराना श्वासोच्छ्वासातून रग फुप्फुसात गेल्याने फुप्फुसाचे रोग होत आता रोबोंच्या उपयोगामुळे तो प्रश्नच येत नाही रोबोने कोणती कामे करायची, त्याच्या सूचना देऊन एक कॉम्प्युटर रोबोच्या मेंदूत ठेवतात त्या सर्व सूचना रोबो ततोतत पाळतो वैद्यकीय महाविद्यालयात जपानमधील प्राध्यापक हृदयविकारावरील उपाय शिकविताना माणसाऐवजी रोबो वापरतात या रोबोच्या हृदयाच्या संपूर्ण क्रिया माणसाच्या हृदयासारख्या होतात टोकियो इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सध्या मोटारी चालविणाऱ्या रोबोच्या निर्मितीवर सशोधनच चालू असून पहिली मोटार ड्रायव्हिंगची चाचणी रोबोने यशस्वीपणे पार केली आहे ‘ इंटेलिजट रोबो ’ हा या क्षेत्रातील अधिक विकसित प्रकार आहे हे रोबो स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकतात. वैद्यकीय कारणासाठी तयार केलेल्या रोबोंना ताप आला किंवा प्रयोगासाठी यत्राने ताप आणला तर माणसासारखा घामसुद्धा येतो मानवाचे जीवन अधिक सुकर करण्यास रोबोंचा अधिकाधिक उपयोग कसा करता येईल आणि रोबोमध्ये अधिक सुधारणा कशा करता येतील, याचा विचार करण्यासाठी जपानी उद्योजकानी ७ ते १२ ऑक्टोबरपर्यंत टोकियोत आतर-राष्ट्रीय परिषद बोलावली आहे परदेशी जाणाऱ्या जपानी प्रवाशासाठी जपानने एक कॉम्प्युटर ( ट्रॅन्स्लेटर ) शोधून काढला आहे त्यात नेहमी उपयोगी पडणारी २०० वाक्ये इग्रजी किंवा फ्रेंचमध्ये भाषातरित होतात. या कॉम्प्युटरवर जपानी भाषेतून ‘ हाटेल कोठे आहे ? ’ असे म्हटले तर त्याचे इग्रजी किंवा फ्रेंच भाषेतले वाक्य

मी जपानमध्ये होतो, तेव्हा फुजीयामा पर्वतावर चढण्याचा मोसम सुरू झाला. सध्या इकडे उन्हाळा असल्याने पहाटे साडेचार वाजताच सूर्य उगवतो उन्हाळ्याच्या पहिल्या दिवशी तीनशे लोक फुजीवर चढण्यासाठी सज्ज होते सूर्याचे पहिले किरण पडताच मोठमोठे पडघम वाजविण्यास आले गेल्या वर्षीच्या मोसमात पर्वत चढताना निधन पावलेल्या लोकाना श्रद्धाजली वाहण्यात आली आणि सूर्याच्या जयजयकारात तीनशे लोकानी पर्वत चढण्यास सुरुवात केली सध्या टोकियो नगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार सुरू आहे निवडणूक चार दिवसावर आली, तरी मिरवणुका, सभा, गडबड, गोंधळ वगैरे काही नाही. सकाळी लोक कचेरीत जातात, तेव्हा उमेदवारातर्फे त्याना प्रचारसाहित्य देण्यात येते. सध्याकाळी लोक परत येतात तेव्हा भुयारी गाड्याच्या स्टेशनजवळ मालवाहू मोटारीच्या मधे उभे राहून उमेदवार किंवा त्याचे प्रतिनिधी पाच दहा मिनिटे भाषण करतात एवढेच

जपानमध्ये जीवनमान सर्वात अधिक उच्च प्रतीचे आहे समृद्धीचा लाभ सर्वांना होतो, तरीही आत्महत्या करणाऱ्याचे प्रमाण बरेच मोठे आहे राष्ट्राचे नेते आणि सामाजिक कार्यकर्ते याच्या चिंतेची ही बाब झाली आहे जपानमधील १९८० तील आत्महत्याविषयीचा सरकारी अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यात म्हटले आहे, की गेल्या वर्षी जपानमध्ये ६७३० लोकानी आत्महत्या केली त्यात १८ वर्षांखाली मुलाची संख्या ८५० एवढी होती जपानमध्ये आयुर्मान खूपच वाढले आहे साठी-नंतर निवृत्तिवेतन मिळत असले तरी दिवसभर करण्यासारखे काही काम नसल्याने वृद्ध किंवा वृद्धत्वाकडे झुकणाऱ्याच्या जीवनात पोकळी निर्माण होते एकटेपणा किंवा आजार असह्य झाल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे, असे सरकारी अहवालात म्हटले आहे अठरा वर्षांखालील मुलाच्या आत्महत्याना अति-भावनाविवशता, प्रेमभग, घरगुती भाडणे ही प्रमुख कारणे आहेत

जपानमधील लोकाची धर्माच्या दृष्टीने वर्गवारी केली, तर ७० टक्के बौद्ध, ८० टक्के शिंटो आणि १ टक्का खिश्चन व इतर असे उत्तर येते. म्हणजे १५१ टक्के झाले ही वर्गवारी चमत्कारिक वाटली तरी वस्तुस्थिती अशी आहे की, बहुतेक जपानी लोक बौद्ध आणि शिंटो अशा दोन्ही धर्माचे आहेत शिंटो हे मूळचे भातशेती करणारे आणि निसर्गपूजक. सूर्य, नदी, पाऊस, झाडे, वारा असे निसर्गाचे जे जे अंग शेतीच्या कामी उपयोगी पडेल त्याला देवाप्रमाणे मानून पूजा करणारा हा धर्म आहे त्याचा आणि बौद्ध धर्माचा विरोध तर नाहीच, पण बरीच वैशिष्ट्ये समान आहेत म्हणून बहुतेक बौद्धानी शिंटो धर्माचाही अगीकार केला आहे.

६

# रंगमंच आणि उद्यानात फुलणारे जपानचे सांस्कृतिक विश्व

आजच्या जपानमध्ये साहित्य, प्रकाशने आणि नाट्य याची प्रगती किती झाली आहे, याविषयी मला विशेष उत्सुकता होती म्हणून मी अनेक जपानी लेखक, प्रकाशक, नाटककार व संपादकाना भेटलो जपानमधील आजचे श्रेष्ठ साहित्यिक श्री शिनिची होशी म्हणाले, " आजचा जपानी लेखक साहित्यावर उत्तम प्रकारे जगू शकतो या देशात विशेष जास्त कर भरणारे जे लोक आहेत, त्यात कारखानदार, व्यापारी याच्याबरोबरच काही लेखकाचीही नावे आहेत आमच्याकडे चागल्या लेखकाच्या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीच्या ( पुठ्ठा बाधणी - हार्ड कव्हर ) २५ हजार प्रती निघतात व वर्षभरात पेपर बॅकमध्ये त्याच पुस्तकाच्या १ ते १॥ लाख प्रती निघतात चरित्र, आत्मचरित्र, कादबरी, सायन्स फिक्शन ( वैज्ञानिक नवलकथा ) हे विशेष लोकप्रिय प्रकार आहेत " श्री होशी याची आतापर्यंत ४६ पुस्तके प्रसिद्ध झाली असून ते पूर्वी अमेरिकेत इलिनॉय विद्यापीठात जपानचा इतिहास शिकवीत होते त्यानी जपानमधील साहित्यात वैज्ञानिक नवलकथाचे नवे दालन उघडून ते समृद्ध केले आहे

## लेखक व प्रकाशक

प्रा नारा जपानमधील एक प्रथितयश लेखक असून त्याना भारताविषयी खास आपुलकी वाटते. त्यानी भारतात निरनिराळ्या वेळी मिळून दहा वर्षे वास्तव्य केले आहे त्याना बंगाली व हिंदी भाषा चागल्या येतात श्री राजगोपालाचारी याच्या

महाभारत ' या ग्रंथाचे प्रा. नारा यानी जपानीत भाषातर केले आहे अलीकडे जपानच्या साहित्याच्या प्रगतीत येणाऱ्या नव्या अडथळयाविषयी बोलताना प्रा नारा म्हणाले, " गेल्या काही वर्षात जपानमध्ये हलक्या दर्जाच्या कॉमिक्सच्या पुस्तकाचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणावर झाला आहे मुलाची कॉमिक्सची पुस्तके असतात तशी ही मोठ्याची आहेत. साहस, प्रेम आणि विनोद यावर आधारलेल्या या चित्र-कथा तीनशे पृष्ठाच्या मासिकाच्या आकाराच्या असतात व अतिशय स्वस्त मिळतात. त्यामुळे लोकाची अभिरुची बिघडत आहे उच्च साहित्याच्या प्रसाराला हे अवघड आव्हान होऊन बसले आहे "

प्रा नारा यानी सांगितले, " ज्याला आधुनिक जपानी साहित्य असे म्हणता येईल त्याचा उगम एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झाला जुन्या रोमॅन्टिक वळणापासून हे साहित्य अलग असून ते वास्तवाला अधिक सामोरे जाते कवाबाटा ,मिशिका, नागाई, हिरोशी नोमा अशी आधुनिक प्रमुख साहित्यिकापैकी काही नावे सागता येतील कवाबाटा याना साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले होते हायकू हा खास जपानी काव्यप्रकार ' वाका ' या प्रकारावरून आला आहे वाका या ३१ अक्षरी कवितेचे दोन भाग खेळण्यातल्या पत्त्याप्रमाणे करून कवितेचा खेळ करीत त्यावरून निम्मी म्हणजे १७ अक्षराची हायकू कविता झाली. अनेक देशात आता हायकू लोकप्रिय झाली आहे "

प्रकाशन व्यवसायात काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी मी जपान मधील एका प्रमुख प्रकाशन संस्थेच्या संपादकाना व सचालकाना भेटलो. या संस्थेचे नाव इवानामी शॉटेन असे आहे संस्थेचे संपादक श्री कोझी टाकेडा म्हणाले, " जपानमध्ये दहा प्रमुख प्रकाशक आहेत ते क्रमिक आणि इतर अशी दोन्ही प्रकारची पुस्तके प्रसिद्ध करतात त्यापैकी ८० ते ८५ टक्के पुस्तके जपानी भाषेत असतात जपानमध्ये दरसाल सुमारे ३७,००० पुस्तके प्रसिद्ध होतात त्यापैकी इतिहास, समाजशास्त्र वगैरेची ६००० आणि कादंबरी, कथा याची ५००० पुस्तके असतात ५ जवाहरलाल नेहरू याच्या ' डिस्कव्हरी ऑफ इडिया ' या ग्रंथाचा अनुवाद आम्ही जपानी भाषेत प्रसिद्ध केला होता, त्याला चागला प्रतिसाद मिळाला.

" आमच्याकडे २०० पृष्ठाच्या पुस्तकाची किंमत ८०० ते १०००-येन ( २२५ येन=१ डॉलर ) असते लेखकाला आम्ही १२॥ ते १५ टक्के रॉयल्टी देतो कार्टून पुस्तकामुळे आमच्या ग्रंथनिर्मितीवर काहीसा परिणाम झाला आहे हे खरे, पण तो मुख्यत' कथा-कादबऱ्यावर इतर क्षेत्रातील पुस्तके पूर्वीइतकीच प्रसिद्ध होतात व हळूहळू का होईना पण त्याच्या सख्येत वाढच होत आहे जपानमध्ये निघणाऱ्या इग्रजी पुस्तकाना बाहेर चागली बाजारपेठ आहे. पण इग्लड, अमेरिकेतील पेपर बॅक्सशी आम्ही पुरेशी चढाओढ करू शकत नाही " टोकियोतील पुस्तकाच्या

दुकानात पुस्तक घेतल्यावर त्यावर वेष्टन घालून देतात शिवाय पुस्तकात एक का असते त्यावर प्रकाशकाचा पत्ता छापलेला असतो ' या पुस्तकावरील आपला अभिप्राय कृपया आम्हाला कळवा' अशी विनती करणारा मजकूर त्यावर छापलेला असतो.

वृत्तपत्राच्या क्षेत्रात जपानने जागतिक उच्चांक स्थापन केला आहे दर हजारी लोकसंख्येत अधिकाधिक वृत्तपत्राचा खप जपानमध्ये आहे आणि तोही इग्रजी वृत्तपत्राचा नसून जपानी वृत्तपत्राचा आहे अकरा कोटी लोकसंख्येच्या या देशात इग्रजी व जपानी दैनिकाचा रोजचा खप ७ कोटी ५६ लक्ष आहे त्याशिवाय साप्ताहिकाचा आठवड्याचा खप १० कोटी आहे असाही शिंबून आणि माईनिची शिंबून या दोन प्रमुख वृत्तपत्राच्या साखळ्या आहेत माईनिची शिंबूनचे महाव्यवस्थापक आणि प्रमुख संपादक श्री हिरोशी हिरानो याना मी भेटलो ते म्हणाले, " आमच्या दैनिकाचा खप पन्नास लाख असून असाही शिंबूनचा सत्तर लाख आहे सर्व वृत्तपत्रात मिळून जपानमध्ये १ लाख ८० हजार लोक संपादकीय खात्यात काम करतात आमच्या बारा वृत्तपत्रात सपादकीय वर्ग एक हजार व इतर कर्मचारी चार हजार आहेत. इतर कोणत्याही देशापेक्षा जपानी वृत्तपत्राचे जास्तीत जास्त प्रतिनिधी परदेशात आहेत 'जपान न्यूजपेपर्स ॲण्ड पब्लिशर्स असोसिएशन' ही आमची सस्था जी अनेक व्यावसायिक प्रकाशने वाटते, त्यात परदेशातील या सर्व बातमीदाराची नावे व पत्ते दरसाल प्रसिद्ध होतात आमच्याकडे पत्रकार व सफाई कामगार याच्या सघटना बळकट आहेत मात्र आमचे त्याच्याशी चागले सबध असल्याने वाटाघाटीनेच प्रश्न मिटतात संपाचा प्रसंग क्वचितच येतो "

सरकार व वृत्तपत्रे याच्याविषयी बोलताना श्री. हिरोशी हिरोनो म्हणाले, " जपानी वृत्तपत्रे पूर्णपणे स्वतत्र आहेत. त्याच्यावर सरकारचे कोणतेही नियत्रण नाही कागद, जाहिराती अगर इतर कोणत्याही बाबतीत आम्ही सरकारवर अवलबून नाही आम्ही सरकारवर जरूर तेव्हा टीका करतो देशाच्या हिताच्या प्रश्नावर शक्य तेथे आम्ही सहकार्य करतो, पण आवश्यक असेल तर निर्भय मतप्रदर्शन करून सरकारला आपले निर्णय वृत्तपत्रानी बदलायला लावले आहेत "

जपानमध्ये कार्टून पुस्तकाचा ( पेपर बॅक ) खप वाढला आहे, त्याचा वृत्तपत्रव्यवसायावर कोणता परिणाम झाला आहे, असे विचारता श्री हिरानो म्हणाले, " दैनिकाच्यावर मुळीच झालेला नाही कारण ताज्या बातम्याना पर्याय नाही मात्र साप्ताहिके व मासिके याचे खप ५ ते १० टक्क्यानी कमी झाले आहेत. "

## प्रदीर्घ नाट्यपरंपरा

जपानमधील नाट्यव्यवसाय हा जुनी परपरा असलेला आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे जुन्या व नव्या जपानी नाटकांचा मागोवा घ्यावा म्हणून मी जपानी नाटककार,

दिग्दर्शक, नट श्री एसुके सुगावा याना व आजची प्रसिद्ध अभिनेत्री कु हैडी उट-सोनिया याच्या भेटी घेतल्या श्री सुगावा म्हणाले, "जपानमधील जे पारपरिक नाट्य-प्रकार गेली सातशे वर्षे चालू आहेत, त्यात बुकागो नोह, निन्गुयो जोरुरी आणि कबुकी हे प्रसिद्ध आहेत त्यातही कबुकी हा सर्वांत लोकप्रिय नाट्यप्रकार आहे हे केवळ नाटक नसून नाट्य, नृत्य आणि संगीत याचा मिलाफ त्यात असतो ते पाच ते सहा तास चालते आणि ४० ते ५० कलाकार त्यात भाग घेतात राजे, दरोडेखोर, लढाया, प्रेम, जुने सरदार हे या नाटकाचे प्रमुख विषय असतात टोकियोत अडीचशे वर नाट्यगृहे आहेत त्यात आधुनिक व्यावसायिक प्रायोगिक आणि विद्यार्थ्यांची अशी तीन प्रकारची नाटके चालू असतात जपानमधील इतर गावातही नाट्यविषयक चळवळ फार जोरदार आहे." स्वतः श्री सुगावा यानी आधुनिक विषयावर वीस नाटके लिहिली असून पंचवीस नाटकाचे दिग्दर्शन केले आहे कौटुंबिक जीवन, प्रेम, व्यक्ती आणि समाज याच्यातील सघर्ष अशा विषयावर आधुनिक नाटके आधारलेली असतात जपानमधील बहुतेक नाटके दुःखान्तिका असतात असेही श्री सुगावा यानी सागितले कळसूत्री बाहुल्याची नाटकेही ( पपेट ड्रामा ) जपानमध्ये लोकप्रिय आहेत मुलाच्या बरोबरीने मोठी माणसेही ही नाटके आवडीने पाहतात

## सेन्सॉर नाही

अभिनेत्री कु उत्सुनोमिया म्हणाल्या, "मी आतापर्यंत ३५ नाटकामधून कामे केली आहेत त्यापैकी २४ नाटकात मी नायिका होते व आजही पाच नाटकातून मी नायिकेचे काम करते मला शेक्सपियरच्या नाटकातून काम करणे विशेष आवडते. शेक्सपियरची आणि चेकॉव्ह याची अभिजात नाटके, जपानमधे लोकप्रिय आहेत 'केटेकोन शियाग' ( विवाहाचा अर्ज ) हे माझे नाटक विशेष गाजले आहे" जपानी रंगभूमीवर चुंबनाला परवानगी आहे व येथे नाटकावर सरकारी सेन्सॉरशिप नसते असेही त्यानी सागितले

चित्रकलेचे क्षेत्रात जपानने स्वतःची शैली विकसित केली आहे येथील मूळ चित्र-कला चिनी शैलीची असली तरी पुढे जपानी चित्रकार स्वतन्त्र मार्गाने गेले चित्र कलेला शाळेपासून उत्तेजन देण्यात येते आणि प्रथितयश चित्रकाराच्याप्रमाणेच जपानी मुलाच्या कलाकृतींची प्रदर्शने देशात आणि परदेशातही भरविण्यात येतात. असे एक प्रदर्शन पुणे येथे बालगंधर्व कलादालनात भरले होते उद्याने आणि पुष्प-रचना या क्षेत्रातही जपानने आपले वेगळे स्थान प्रस्थापित केले आहे जपानी उद्यान हा खास प्रकार आहे. 'इकेबाना' हा पुष्परचनेचा प्रकार आता महाराष्ट्रापर्यंतही पोहोचला आहे होनोलुलू येथील ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये जपानने आपल्या पद्धतीची बाग तयार करून त्या केंद्राला भेट म्हणून दिली आहे अनेक देशात अशा जपानी

मध्ये स्थायिक झाले. परदेशातून परत आलेले ब्रिटिश आणि हे स्थायिक होत असलेले परकीय याच्यात नोकऱ्या व घरे यासाठी अंतःस्थ किंवा उघड संघर्ष सुरू झाला. त्याचा परिस्फोट होऊन दंगली झाल्या

इंग्लंडमधील कामगार संघटना गेल्या पंचवीस वर्षांत अत्यंत बलवान झाल्या आणि नवे सरकार निवडण्यात या संघटनांचा वाटा अधिकाधिक मोठा होऊ लागला त्यांच्या मागण्या वाढत गेल्या त्या दबावाला बळी पडून कामगारांचे वेतन सतत वाढवावे लागले चलनवाढ होऊन महागाईने कहर केला वर्णद्वेषाच्या आणि आयरिश स्वतंत्रतेच्या लढ्यांना तोंड देताना सरकारी यंत्रणेच्या नाकीनऊ आले. थॅचर सरकारने महागाईला आळा घालण्याचा निर्णय घेऊन सरकारी खर्चात कपात केली असली तरी सतत दंगलीच्या व धोक्याच्या वातावरणात काम करणाऱ्या पोलिस दलाला तेरा टक्के पगारवाढ देणे सरकारला भाग पडले इतर क्षेत्रात बळकट कामगार संघटना असल्याने त्यांना हात लावणे सरकारला अशक्य झाले. शेवटी सांस्कृतिक बाबींवर होणाऱ्या खर्चात कपात करून सरकारला कपात दाखवावी लागली त्याचा परिणाम म्हणजे नाट्यगृहांच्या पुनरुज्जीवनाचे काम थंडावले आणि जगात पहिल्या दर्जाची ठरलेली लंडनची काही नाट्यगृहे बंद पडली

आज इंग्लंडमध्ये प्राध्यापकापेक्षा बसड्रायव्हरला अधिक पगार आहे कामगार संघटना पाठीशी असल्याने वाहतूक, खाणकाम, टेलिफोन, पाणीपुरवठा अशा कित्येक क्षेत्रातील कामगार किमान काम आणि कमाल पगार असे दोन्ही फायदे मिळवतात.

सध्या इंग्लंडमध्ये कारकुनाला सुमारे ४५०० ते ५५०० पौंड वर्षाला पगार मिळतो (१ पौंड = सुमारे १८ रु ) बसड्रायव्हरचा पगार ३८०० ते ४००० असला तरी तो ओव्हरटाईम करून ५५०० ते ६००० पौंड सरासरी मिळवतो इंजिनियरला व आर्किटेक्टला ९००० पौंड मिळतात डॉक्टर मात्र १२,००० ते १५,००० पौंड मिळवू शकतात बँक मॅनेजर्सना १४,००० ते १६,००० पौंड मिळतात पण ९८ टक्के बँक मॅनेजर्स हे ब्रिटिश आहेत वैद्यकीय उपचार इंग्लंडमध्ये इतके महाग झाले आहेत की, एका भारतीयाने मला सांगितल्याप्रमाणे काही आजारावर इंग्लंडमध्ये उपचार करण्यात जो खर्च येतो त्यात तो रुग्ण विमानाने भारतास जाऊन उपचार करून घेऊ शकतो अनेकदा डॉक्टर मिळणे महाग तर असतेच, पण दुरापास्तही असते याचे कारण परकीय डॉक्टरांनी येथे येण्यात इंग्लंडचा अंतःस्थ विरोध आणि सहा वर्षे वैद्यकीय शिक्षणाचा खर्च करण्यापेक्षा बहुतेक ब्रिटिश तरुण पदवीच्या आसपास शिक्षण घेऊन नोकरी धरणे पसंत करतात

स्नेहाचे रूपांतर प्रेमात होणे व लवकर लग्न करणे, हे अमेरिकेप्रमाणे इंग्लंड-मध्येही वाढत्या प्रमाणावर घडत आहे तरुण–तरुणी लग्नासाठी शिक्षण मध्येच सोडून स्वतंत्र घर करतात आणि दोघानाही नोकऱ्या सहजपणे उपलब्ध नसतात

त्याचा परिणाम म्हणजे तरुणानी साउथ हॉलसारख्या ठिकाणी केलेल्या वर्णद्वेषाच्या दंगली अलीकडेच साऊथ हॉल विभागात लंडनमध्ये झालेल्या दगलीची प्रमुख कारणे म्हणजे बेकारी आणि वाढती महागाई ही होत

## प्रवासी संख्येत घट

इंग्लडमध्ये येणाऱ्या परकीय प्रवाशाच्या संख्येत अलीकडच्या काळात बरीच कपात झाली आहे अमेरिका, फ्रान्स आणि जपान या देशातून येणाऱ्या प्रवाशाकडून इग्लडला बरेच चलन मिळत असे, पण अतोनात वाढलेली महागाई आणि वारवार उद्भवणाऱ्या दगलीमुळे परकीय प्रवासी नाराज आहेत इग्लडमध्ये होणाऱ्या खर्चा-पेक्षा कमी किंवा जवळपास त्याच खर्चात युरोपमध्ये विविधता आणि मनोरंजन अधिक असते म्हणून अमेरिका व जपानचे प्रवासी सुटीसाठी फ्रान्स, जर्मनी, हॉलड, इटली या देशाना जाणे अधिक पसत करू लागले आहेत सध्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हा सुट्याचा मोसम असूनही इग्लंडमधील अनेक प्रेक्षणीय स्थळाच्या गावच्या हॉटेल्सना अपेक्षित धंदा मिळाला नाही या हॉटेल्सनीच आता सरकारकडे मदतीची याचना केली आहे राजपुत्राचा विवाह आणि सुट्याचा मोसम यामुळे अमाप प्रवासी येतील या अदाजाने त्यानी जादा नोकरवर्ग व खरेदी केली आता बॅकेकडून कर्ज काढून हॉटेलवाल्याना हा खर्च भागवावा लागत आहे।

आता आर्थिक मदी सपली आहे असे इंग्लडच्या अर्थमंत्र्यानी जाहीर करून चार दिवस होतात न होतात तोच सत्तारूढ पक्षाच्या बैठकीत पक्षाच्या प्रमुखानी अजून मदी संपण्याचे लक्षण नाही' असे निवेदन केले अर्थमंत्र्याचे पूर्वीचे विधान आर्थिक परिस्थितीपेक्षा राजकीय कारणानी केले गेले, अशी यावर वृत्तपत्रानी टीका केली आहे आपले अर्थविषयक धोरण यशस्वी होत असल्याचा भास अर्थमंत्र्यानी निर्माण केला, पण त्याला सत्यस्थितीचे पुरेसे पाठबळ मिळू शकले नाही

## भारतीयांत नैराश्य

लडनच्या साऊथ हॉल भागात अलीकडेच वर्णद्वेषाच्या दगली झाल्या त्या भागात मी गेलो, तेव्हा बहुतेक दुकानाच्या काचा फुटलेल्या आढळल्या त्या फुटक्या काचावर आता प्लायवुडचे आवरण चढवण्यात आले आहे काही दुकानाच्या काचा फुटलेल्या नसतानाही त्यावर सुरक्षिततेसाठी प्लायवूडच्या फळ्या मारण्यात आल्या आहेत. वातावरण भीतीचे आहे या भागात आशियाई लोक मोठ्या प्रमाणावर राहतात आणि व्यवसाय करतात एक भारतीय दुकानदार म्हणाला, "या भागात दंगलींना गोऱ्या लोकानी सुरुवात केली मग आफ्रिकन त्यात पडले आम्ही आशियाई लोक दोघाच्याही मत्सराला आणि द्वेषाला बळी पडत आहोत माझ्या नातेवाइकाचे दुकान दगलीत फोडले गेले आणि सत्तर हजार पौंडाचे नुकसान झाले. आता विमा

कपन्याही जबर हप्ते मागू लागल्या आहेत. गेली पस्तीस वर्षे मी या भागात व्यवसाय करतो आहे दंगलीच्या दडपणाला बळी पडून पुन्हा भारतात जाणे कठीण आहे आणि येथे राहणे अधिकाधिक कठीण होत आहे ''

शांततेच्या काळातही इंग्लंडमधील भारतीयाना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे एक भारतीय इंजिनियर म्हणाले, '' मी गेली सोळा वर्षे एका विख्यात कपनीत काम करतो आहे, पण एका विशिष्ट रेषेपलीकडे भारतीयाना बढती मिळत नाही अनेक बॅकामध्येही पात्रता असूनही मॅनेजरची जागा भारतीयास न मिळता ती ब्रिटिशाला दिली जाते समान गुणाचे अनेक अधिकारी असतील तर प्रथम ब्रिटिश, मग युरोपियन, नतर अमेरिकन व शेवटी आशियाई अधिकाऱ्याला वरची जागा मिळते आर्किटेक्ट, प्राध्यापक वगैरे व्यवसायातही हीच परिस्थिती आहे कमी पात्रता असलेल्या ब्रिटिश नागरिकाला वरची जागा मिळाल्यानेही भारतीयात नैराश्य आले आहे ''

सत्तारूढ पक्षाचा एक ब्रिटिश समर्थक म्हणाला, '' परकीयाचा लोंढा थोपविण्याचे थॅचर सरकारचे धोरण योग्यच आहे खुद्द ब्रिटनमधील बेकारी भयानक वाढत आहे सध्या आमच्या लहान देशात तीस लाख बेकार आहेत थॅचर सरकारने १९८१-८२ साठी ठरविलेल्या धोरणाप्रमाणे आणखी अडीच ते तीन लाख बेकाराची त्यात भर पडेल आमच्या नागरिकाना नोकऱ्या नसताना परकीयाना इथे नोकऱ्या आणि बढत्या मिळाव्यात असे कोणत्याही देशाला वाटणार नाही '' अशा बिकट परिस्थितील इग्लंडच्या रेल्वे कामगारानी अवास्तव मागण्या करून संपावर जाण्याची धमकी दिली आहे. संप, बेकारी, दगली अशा अनेक कारणानी एकेकाळचा पराक्रमी इग्लंडचा सिंह आता थकलेला, जेरीस आलेला असा झाला आहे.

जगातील जनेक देशात मराठी भाषिक लोक कमी-अधिक प्रमाणात आहेत न्यूयॉर्क आणि लडन या शहरात मराठी भाषिकाची वस्ती सर्वात अधिक आहे. दहा वर्षापूर्वी लडनमध्ये मराठी लोकाची वस्ती इतर शहराच्या तुलनेने अधिक होती कारण पूर्वी उच्च शिक्षणासाठी भारतीय इग्लडला प्रथम अग्रक्रम देत असे. मात्र गेल्या दहा-पंधरा वर्षात इग्लंडमध्ये शिक्षणानतर नोकरी मिळण्याचा संभव कमी होऊ लागला आणि अमेरिकेत ती शक्यता वाढली म्हणून भारतीयानी अमेरिकेला अग्रक्रम दिला सध्या लडनमध्ये सुमारे १५०० मराठी भाषिक आहेत ते मुख्यतः इंजिनियरिंग, आर्किटेक्चर, बॅकिंग, वैद्यक, अध्यापन अशा क्षेत्रात काम करतात फक्त व्यापार-उद्योगधंदा करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत महाराष्ट्र मडळ ही मराठी भाषिकाची सस्था जोमाने कार्य करीत आहे १९३२ मध्ये श्री तात्यासाहेब केळकर हे गोलमेज परिषदेसाठी लडनला आले, तेव्हा त्यानी त्या वेळच्या मराठी विद्यार्थ्यांना बोलावून जेवण दिले. तेव्हा या विद्यार्थ्यांबरोबर बॅ एम आर जयकर,

द वि ताम्हणकर, गोडबोले वगैरेंही होते श्री केळकर यानीच या प्रसंगी ' महाराष्ट्र मडळ ' ही सस्था स्थापन करून लडनमधील मराठी भाषिकाची सघटना केली

" हे महाराष्ट्र मडळ १९४० पर्यंत चागले चालले, पण महायुद्ध सुरू झाल्यानतर त्याचे कामकाज जवळजवळ एक तप बद पडले श्री बाळासाहेब खेर हे भारतीय कमिशनर म्हणून लंडनला आले तेव्हा त्यानी मडळाचे पुनरुज्जीवन केले त्या वर्षी मडळाने ' लग्नाची बेडी ' हे नाटकही सादर केले " अशी माहिती महाराष्ट्र मडळाचे सध्याचे प्रसिद्धी कार्यकर्ते श्री किशोर वेंगुर्लेकर यानी सागितली ते पुढे म्हणाले, "१९६३ नतर मंडळाच्या कार्यात विविधता आली सहल, दिवाळी भोजन, नाटक, गाण्याचे व इतर करमणुकीचे कार्यक्रम मडळातर्फे नियमितपणे होऊ लागले महाराष्ट्रातून येणाऱ्या कलावताना मार्गदर्शन करणे, त्याचे कार्यक्रम ठरविणे वगैरे कामे मडळ सातत्याने करीत आहे १९६३ मध्ये डॉ श्रीराम लागू येथे होते त्यानी ' बिचारा डायरेक्टर ' ही एकाकिका सादर केली होती. या सुमारास श्री. किशोर वेंगुर्लेकर यानीही ' पुढारी पाहिजे ' व ' सदू आणि दादू ' या एकाकिका दिग्दर्शित केल्या होत्या. १९७५ पासून महाराष्ट्र मंडळास व्यावसायिक स्वरूप आले श्री. रामदास कामत, श्री सुधीर फडके, सी रामचद्र, श्रीमती बकुल पडित इत्यादी कलावंताचे कार्यक्रम मडळाने सभासदासाठी दिले १९८० मध्ये मडळाने स्वतःची इमारत विकत घेण्याचा निर्णय घेतला त्याच वर्षी ' महानिर्वाण ' आणि ' घाशीराम कोतवाल ' नाटके इमारत-निधीसाठी करण्यात आली, पुणे येथील ' थिएटर अकॅडमी 'ने ही नाटके सादर केली

## ८

## या शतकातील सर्वांत महत्त्वाचा विवाह

**लंडन**

या शतकातील सर्वांत महत्त्वाचा विवाहसमारंभ यथासांग पार पडला आणि अनेक गंमतीच्या, हृद्य स्मृती मागे ठेवून गेला इंग्लंडचा राजपुत्र चार्लस् आणि लेडी डायना ही दोघे सेंट पॉल चर्चमध्ये विवाहबद्ध झाली प्रत्यक्ष लग्न लागत असताना वधू-वरानी ज्या शपथा घ्यायच्या असतात, तेव्हा दोघानीही गफलती केल्या 'चार्लस् फिलिप आर्थर याचा मी पती म्हणून स्वीकार करते' अशी शपथ घेताना वधूने चुकून 'फिलिप चार्लस् आर्थर' असे म्हटले वराने शपथ घेताना 'मी माझ्या सर्व भौतिक बाबीत डायनाला सहभागी करीन' असे म्हणताना 'भौतिक' ( wroldly ) हा शब्दच गाळला ! अनेकदा रंगीत तालीम करूनही ऐनवेळी अशा ठळक चुका झाल्या पण ब्रिटिश जनतेने मात्र त्या चुकाचे कौतुक केले 'या गफलतीमुळेच या शाही विवाहाला मानवी स्पर्श ( Human touch ) आला' अशी शीर्षके वृत्तपत्रानी दिली

**डायनाचा वेष** .

विवाहाच्या वेळी डायनाचा वेष कसा असेल हे अत्यंत गुप्त राखण्यात आले होते ऐन वेळेपर्यंत या वेषाचे स्वरूप बाहेर फुटू नये अशी काळजी घेण्यात आली होती येत्या काही महिन्यात ज्या मुलींचे विवाह होणार आहेत, त्यानी 'आपल्याला डायना-सारखाच विवाहाचा वेष हवा' अशा ऑर्डर्स मोठमोठ्या फॅशन कंपन्याच्याकडे

पूर्वीच देऊन ठेवल्या होत्या अनेक फॅशन डिझायनर्स स्त्री-पुरुष हातात कागद पेन्सिल घेऊन तयार होते दूरदर्शनवर लेडी डायना दिसल्यावरोबर त्यानी तिच्या वेषाची नक्कल उतरण्यास सुरुवात केली विवाह झाल्यापासून वीस मिनिटात सपूर्ण डिझाईन कागदावर उतरले गेले त्याबरहुकूम तंतोतंत तयार केलेला पहिला वेष विवाहाच्या क्षणापासून साडेतीन तासात विक्रीसाठी तयार झाला !

वधूच्या अंगावर लग्नाच्या वेळी कोणते दागिने असतील यावद्दल स्त्रीवर्गात कमालीची उत्सुकता होती तिने गळ्यात काहीच घातले नव्हते केसावर हिऱ्याचा एक टायरा ( दीड इंच उचीचा मुकुट ) फक्त ठेवला होता कानात कर्णभूषणे होती आणि एका बोटात अगठी होती त्याखेरीज इतर कोणताही दागिना तिने घातला नव्हता पायातील स्लिपर्स क्लाईव्ह शिलटन या कपनीने हाताने तयार केला होता वधूच्या हातात पिवळा गुलाब, पाढरी जिरावडीन फुले आणि हिरवी पाने याच्या दिमाखदार गुच्छ होता वडलाच्या हातावर हात ठेवून ती विवाहाच्या ठिकाणी हळूहळू गेली तिच्या कपड्याचा लाब पचवीस फुटी पट्टा चार मुली साभाळीत होत्या चार्लस् यानी नौदलाच्या अधिकाऱ्याचा निळ्या रंगाचा पोशाख केला होता

## लाखोंची गर्दी

विवाहाचा अद्वितीय सोहळा पाहण्यासाठी लक्षावधी लोक आले होते मिरवणूक आणि समारभ पाहण्यास प्रत्यक्षात नऊ लक्ष लोक हजर होते दूरदर्शनवर हा कार्यक्रम जगातील बहुतेक देशात दाखविण्यात आला तो सुमारे शहात्तर कोटी लोकानी पाहिला मिरवणुकीच्या मार्गावरील जागा अडविण्यासाठी त्या त्या रस्त्याच्या कडेने हजारो लोक रात्रभर झोपले होते बुधवारी सकाळी विवाह होता, तर मगळवार सध्याकाळपासून पथाऱ्या पसरणारे रसिक होते मिरवणुकीच्या मार्गावरील दुकाने आणि घरे याच्या मालकानी आपल्या गॅलऱ्या आणि खिडक्या याचा वापर करण्यासाठी माणशी अडीचशे ते पाचशे पौंड आकारले होते या जागा जथाबद भाड्याने घेऊन प्रवासी कपन्यानी जगाच्या विविध भागातून हौशी प्रवाशी तीन तीन महिने आधी नावे नोंदवून आणले होते जनतेचा उत्साह उफाळून आला होता पहाटे पाच वाजल्यापासून लोक हातात इग्लडचे निशाण आणि तोंडात शिट्या किंवा घोषणा यानी आसमत दणाणून सोडीत होते लडनच्या पोलिसावर व्यवस्थेचा अपूर्व ताण पडला होता पहिल्या दोनचार रागा मागील लोकाना मिरवणूक पाहता यावी म्हणून लक्षावधी पुठ्याचे पेरिस्कोप ( periscope ) विक्रीसाठी तयार होते काही मुलानी तर आपल्या चेहऱ्यावरच ब्रिटिश निशाण रगवून घेतले होते

वधूवर आणि इतर राष्ट्रप्रमुख याच्या सरक्षणासाठी कडक बंदोबस्त होता पण

या वेळी पोलिसाची जबाबदारी द्विविध होती कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून उत्तम सरक्षण व्यवस्था तर करायला हवी होतीच, पण विवाहाच्यासारख्या शुभप्रसगी पोलिसाचा गणवेष मिरवणुकीत किंवा समारंभात दिसू नये अशी काळजीही घेणे अवश्य होते म्हणून वधूवराना मिरवणुकीने नेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वेगळया दोन रथाच्या मागे शोभिवत कपड्यातील सेवक असतात, ते वस्तुतः स्कॉटलंड यार्डातील उत्कृष्ट नेमबाज पोलिस होते त्याच्या शोभिवंत लाटा व जरीच्या कपड्यात गोळ्या भरलेल्या शॉट गन्स सज्ज होत्या आयर्लंडच्या प्रश्नावर तप्त झालेल्या वातावरणाचा स्फोट होऊन काही घातपाताचा प्रकार घडू नये म्हणून ही खास व्यवस्था करण्यात आली होती

मॅडम टुसाड हे जगप्रसिद्ध प्रदर्शन लडनमध्ये आहे या ठिकाणी जगतील सर्व प्रमुख व्यक्तींचे पुतळे आहेत प्रिन्स चार्लस् आणि डायना याच्या विवाहाच्या वेळचा प्रसगही या प्रदर्शनात तयार ठेवण्यात आला होता लेडी डायनाचे विवाहाच्या वेळचे कपडे ज्यानी शिवले होते, त्यानी त्याच कपड्याची दुसरी नक्कल करून ती मॅडम टुसाड प्रदर्शनाकडे पाठविली आणि विवाहाच्या सायकाळीच मेणाच्या पुतळ्याचे हे जोडपे सर्व पोशाखानिशी लोकाना कायमचे दर्शन देण्यासाठी सज्ज झाले

## वेषाची कथा

लेडी डायना हिच्या कपड्याचे डिझाईन व वर्णन लगेच त्याच दिवशी सायकाळच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात आले या वेषाची जी मागे लाबवर जमिनीवर रुळणारी पट्टी ( train ) असते, ती पंचवीस फूट लाब होती रेशमी कापडाचा रंग हस्तिदती ( ivory silk ) होता राजघराण्याचे वेषभूषातज्ज्ञ डेव्हिड आणि एलिझाबेथ इमॅनुएल यानी तो वेष तयार केला होता विवाह झाल्याबरोबर त्या दोघाच्या मुलाखती दूरदर्शनवर घेण्यात आल्या डायनाच्या डोकीवरील पातळ रेशमी कपड्यावर मोती लावण्यात आले होते गळा उघडा होता आणि स्कर्टचे हात कोपराच्या किंचित खाली घेऊन त्यावर लेस होती पचवीस फूट लाब पट्ट्याच्या भोवतीही नाजूक लेस होती ऐनवेळी पाऊस आलाच तर उपयोगी पडावी म्हणून हस्तिदती रगाच्या रेशमी कापडाची व्हिक्टोरियन पद्धतीची छत्री तयार करण्यात आली होती पण पाऊस न आल्याने तिचा वापर केला गेला नाही ' डायनाचा ड्रेस कसा आहे याची गुप्त माहिती आपण मिळविली आहे आणि हे पाहा त्या कपड्याचे डिझाईन · असे म्हणून ' वुमेन्स वेअर लेडी ने विवाहाच्या आधल्या दिवशी एक डिझाईन प्रसिद्ध केले पण ते खोटे निघाले खरे डिझाईन वेगळेच होते म्हणून वेषभूषेसाठी वाहिलेल्या या नियतकालिकावर लोकाना फसवल्याबद्दल बरीच टीका झाली टाईम्स' ने तर ' हा पाहा बोगस वेष ' असे मोठे शीर्षक देऊन या बनावट

कपड्याचे बेड फोडले. येत्या अनेक वर्षांत इग्लड, अमेरिका, युरोप, वगैरे भागातील वधूचे विवाहाचे कपडे डायनाच्या वेषाबरहुकूम बेतले जातील

विवाहाच्या दिवशी सकाळी दहा वाजता राजपरिवारातील बऱ्हाडी मोटारीने सेंट जेम्स राजवाड्यातून निघून सेंट पॉल चर्चमध्ये गेले सव्वा दहा वाजता परराष्ट्रातील राजघराण्यातील पाहुणे ( उदा जपान ) मोटारीने बकिंगहॅम राजवाड्यातून सेंट पॉलकडे गेले त्यानंतर मुख्य मिरवणुकीतील रथ येऊ लागले प्रथम इग्लंडच्या राणी एलिझाबेथ आपले पती ड्यूक ऑफ एडिंबरो याच्या बरोबर रथाने निघाल्या राणी एलिझाबेथ यानी फिकट निळ्या रंगाचा वेष परिधान केला होता नतर त्याच्या मातोश्री राणी मेरी याचा रथ निघाला. त्यापाठोपाठ राजकन्या ॲन, राजकन्या अलेक्झाड्रा वगैरे निकटचा परिवार, मग डायनाचे वडील व आई, राजपुत्र चार्लस्, लेडी डायना असे इतर वेगळ्या रथातून सेंट पॉल चर्चमध्ये आले तेथे प्रथम लॉर्ड मेयर म्हणजे लडनचे महापौर यानी सर्वांचे स्वागत केले. मग विवाह लावणारे पुरोहित डॉ रून्सी आणि आर्चबिशप ऑफ कॅन्टरबरी यानी सर्वांचे स्वागत केले त्यापूर्वी निरनिराळ्या राष्ट्राचे पतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, राज्यप्रतिनिधी, प्रमुख निमन्त्रित येऊन स्थानापन्न झाले होते

चर्चमधील बसण्याची किंवा प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी उभे राहण्याची व्यवस्था अशी होती '— लाल गालिच्यावर राजपुत्र चार्लस, त्याच्या शेजारी सहायक, डायना, तिच्या जवळ तिचे वडील आणि समोर आर्चबिशप. वराच्या उजव्या हाताला राणी एलिझाबेथ, राजपुत्र ॲड्यू आणि राणीच्या मातोश्री डायनाच्या डाव्या हाताला वधूपक्षातील प्रमुख मडळी त्यामागे ब्रिटिश राजघराण्याचा परिवार, माजी पतप्रधान, परराष्ट्रातील प्रमुख, खास निमन्त्रित अशी साडेचारशे बडी मडळी होती महत्त्वाची वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन्स याच्या प्रतिनिधींची सोय दोन्ही बाजूच्या चबुतऱ्यावर केली होती बी बी सी , आय टी व्ही व परदेशातील टेलिव्हिजन्स याचे प्रत्येकी निदान पचवीस कॅमेरे मिरवणुकीच्या मार्गावर आणि चर्चमध्ये होते टोंगाचे राष्ट्रप्रमुख सात फूट उच व प्रचंड वजनाचे आहेत. त्याच्यासाठी डबल खुर्ची ठेवण्यात आली होती.

**लग्नाचे वचन :**

राजपुत्र चार्लस् विवाहविधीसाठी जाण्यापूर्वी चर्चच्या एका प्रतिनिधीने ' अगठी आणली आहे काय ?' असे विचारले चार्लस्च्या सहकाऱ्याने खिशातून अगठी काढून दाखविली लग्नाच्या गोंधळात अगठी विसरली तर ऐनवेळी पंचाईत किंवा फजिती होऊ नये म्हणून ही दक्षता घेतली होती अगठी निघताना बरोबर घेतली तरी वाटेत हरवण्याचाही संभव असतो पुरोहितानी डायनाला विचारले, " तू चार्लस् फिलिप

ऑर्थर याचा पती म्हणून स्वीकार करतेस काय ?" तिने म्हटले, "आय विल आय ॲक्सेप्ट फिलिप चार्लस् ऑर्थर ॲज माय हजबंड" त्यानंतर तसाच प्रश्न पुरोहित डॉ. रून्सी यानी चार्लसला विचारला व त्याने होय म्हटले मग डॉ रून्सी सर्व निमंत्रिताच्याकडे वळून म्हणाले, "हा विवाह होऊ नये असे इथे जमलेल्या कोणाला वाटत असेल तर त्याने पुढे यावे आणि कारणे दाखवावी" थोडा वेळ स्तब्धता पसरली होती मग ते म्हणाले, "या लग्नाला आता जर कोणाचा विरोध नसेल तर यापुढे कधीही कोणीही या विवाहाला विरोध करू नये" मग त्यानी डायना व चार्लस् याचे हात एकमेकाच्या हातात देऊन म्हटले, "नाऊ आय प्रोनाउन्स यू ॲज हजबड ॲड वाईफ" या वेळी वराने वधूच्या बोटात अगठी घातली आणि विवाह झाला सगीताचे मधुर ध्वनी उमटले मग डॉ रून्सी म्हणाले, "परमेश्वराच्या आशीर्वादाने एकत्र आलेल्या या जोडप्याला यापुढे कोणीही कधीही अलग करणार नाही." त्यानतर नवरा-बायकोने एकनिष्ठेच्या शपथा घेतल्या डॉ रून्सी आणि आर्चबिशप ऑफ कॅन्टरबरी यानी आशीर्वाद देऊन बायबलमधील काही भाग वाचून दाखविला ख्रिश्चन विवाह झाल्यावर पतिपत्नी चुंबन घेतात ते मात्र या वेळी घेतले गेले नाही विवाहानतर राणी एलिझाबेथ, राजमाता मेरी आणि इतर ज्येष्ठ नातेवाइकाचे आशीर्वाद घेतल्यानतर त्यानी चर्चच्या मॅरेज रजिस्टरवर सह्या केल्या मग पतिपत्नी मिरवणुकीने बकिंगहॅम राजवाड्याकडे गेली परत जाताना राणी एलिझाबेथ यानी आपल्या रथात अर्ल स्पेन्सर याना घेतले रथात चढताना पहिला मान इंग्लडच्या राणीचा असतो पण या वेळी राणी एलिझाबेथ यानी अर्ल स्पेन्सरना प्रथम रथात बसण्याची विनती केली आणि नतर त्या बसल्या राजपुत्र व त्याची पत्नी याच्यावर परत जाताना लक्षावधी लोकानी अभिनदनाचा, तादुळाचा आणि फुलाचा वर्षाव केला

## 'वुई वॉंट ए किस

बकिंगहॅम राजवाड्यासमोरील विस्तीर्ण मैदानात आपल्या जनतेला भेटणे हे इग्लडच्या राजाचे व राण्याचे पारपरिक कर्तव्य असते त्यानुसार लक्षावधी लोक मिरवणूक संपताच त्या चौकाकडे निघाले पण ही विराट गर्दी पोलिसानी अत्यत चातुर्याने आवरली त्यानी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रथम घोडेस्वाराची राग आणि त्या पाठोपाठ वीस फुटावर पायी चालणाऱ्या पोलिसाची बळकट राग ठेवली होते घोडेस्वार आणि पोलिस संथ गतीने चालत होते त्यामुळे नवविवाहिताचे दर्शन घेण्यासाठी धावाधाव झाली नाही व चेंगराचेंगरीही टळली. चौकाच्या मध्यभागी असलेल्या कारंजाच्या पाण्यातही लोक उभे होते थोड्याच वेळात राजपुत्र व लेडी डायना बाल्कनीत आले त्यानी अनेकदा हात वर करून लोकाच्या शुभेच्छाचा स्वीकार केला ते दोघे परत गेले तरी लोकाच्या गर्जना चालूच होत्या— 'वुई वॉंट

ए किस नवविवाहित जोडपे पुनः दार उघडून बाल्कनीत आले त्यानी हात उंच करून लोकाना दाद दिली पण जनता चुंबनाशिवाय परतण्यास तयार नव्हती राजपुत्र आणि डायना यानी त्याबाबत एकमेकाशी थोडा संवाद केला आणि अखेर खास लोकाग्रहास्तव चुंबन घेतले त्याबरोबर लोकानी कौतुकाच्या टाळ्याचा आणि घोषणाचा अफाट कडकडाट केला शेकडो कॅमेऱ्यानी टिपलेले ते दृश्य त्याच दिवशी सायकाळच्या व दुसऱ्या दिवशी सकाळच्या दैनिकाच्या पहिल्या पानावर ठळकपणे छापले होते.

दुपारी चार वाजता नूतन परिणित जोडपे वॉटर्लू स्टेशनवरून ब्रॉडलँडस्‌कडे मधुचंद्रासाठी प्रयाण करणार होते त्याही ठिकाणी लाखभर लोक जमले होते चार्लस् आणि डायना वीस मिनिटे उशिरा स्टेशनवर आले अर्थात गाडी चुकेल किंवा जागा मिळणार नाही अशी काही त्याना भीती नव्हती ! स्टेशनच्या प्लॅटफॉर्म-पर्यंत बिनीचे घोडेस्वार आणि दापत्याचा रथ आला होता या ठिकाणी अधिकृत ओळखपत्र घेऊन आलेल्या दोन जणाच्या हालचाली पोलिसाना सशयास्पद वाटल्याने त्याना पोलिसानी दापत्याची गाडी जाईपर्यंत अटक करून ठेवलेले मी पाहिले साडेचारच्या सुमाराला गाडी सुरू झाली आणि समारंभ सुरक्षित पार पडल्याचा आनद सर्वांनीच व्यक्त केला राजदापत्य हनीमूनला जाण्यासाठी वॉटर्लूवर आले, तेव्हा त्याना शुभेच्छा देण्यासाठी जमलेला अफाट जनसमुदाय पाहून मला वाटले, की, आमच्याकडील गर्भाधानाच्या समारंभास सुशिक्षित लोक अडाणी म्हणतात, पण इथे तशाच समारभाला मात्र प्रतिष्ठा मिळते !

नवविवाहित दापत्य सुखरूपपणे रवाना झाले, तेव्हा लंडनच्या स्कॉटलंड यार्डने सुटकेचा निःश्वास सोडला कारण गेले चार-पाच दिवस अनेक राष्ट्रप्रमुख आणि खुद्द राजपुत्र व डायना याच्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेचा अपूर्व ताण त्याच्यावर पडला होता— बी बी सी , टेलिव्हिजनवर या समारंभाच्या कार्यक्रमाच्या अखेरीस सागण्यात आले, ' आम्ही नेहमी अत्याचार व दंगली दाखवतो अशी आमच्यावर टीका होते आजच्या कार्यक्रमाच्या सुखद दर्शनाने आमच्या प्रेक्षकाना विरंगुळा वाटला असेल ' आय टी व्ही या लंडनच्या दुसऱ्या केंद्राच्या कॅमेऱ्यात विवाह – समारंभ चालू असतानाच बिघाड झाला आणि दीड मिनिट काही दिसू शकले नाही म्हणून त्या केंद्रावर नतर कडक टीका झाली गाबियाचे राष्ट्राध्यक्ष जावरा हे विवाह-समारभात मशगुल असतानाच त्याच्या देशात क्रांती होऊन त्याचे हक्क काढून घेण्यात आले दहावीस लडनवासी असे निघाले की, त्यानी ' हा भपका आणि व्यर्थ खर्च आम्हाला आवडत नाही' म्हणून समारभावर बहिष्कार घातला जिब्राल्टर-मधून नवविवाहित दापत्य नौकाविहारास जाणार आणि त्यामुळे जिब्राल्टरवर इग्लडचा जुना हक्क असल्याचे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होणार म्हणून स्पेनचे राष्ट्रप्रमुख

समारंभास आले नाहीत अशी तुरळक उदाहरणे सोडली तर या शतकातील अत्यंत महत्त्वाचा समारंभ अविस्मरणीय झाला

## डायनाची अंगठी

या विवाहाला इंग्लंडच्या इतिहासात खास महत्त्व असण्याचे कारण असे की गेल्या सहाशे वर्षांत ज्येष्ठ राजपुत्राचा विवाह होण्याचा हा फक्त सातवा प्रसंग आहे इतर बाबतींत तो राज्यावर आल्यावर वा आल्यानंतर विवाहित झाला किंवा व्हिक्टोरिया आणि एलिझाबेथसारखी ती राजकन्या होती. २४ फेब्रुवारी १९८१ रोजी हा विवाह अधिकृतपणे जाहीर करण्यात आला. त्यापूर्वी राजपुत्र चार्लस् याच्या नावाशी अनेक सुंदर तरुणींचा संबंध वृत्तपत्रातून आणि खाजगी गप्पासप्पातून जोडण्यात आला होता विवाहनिश्चितीच्या वेळी राजपुत्र चार्लस्ने लेडी डायनाला जी अंगठी दिली, तिच्यात एका मोठ्या नीलमणी (सफायर) भोवती चौदा हिरे जडविण्यात आले होते. ही अंगठी तिने विवाहापर्यंत बोटात ठेवली होती. अर्ल स्पेन्सर याची कन्या डायना ही राजपुत्र चार्लस् याच्या नावाशी निगडित होईपर्यंत प्रसिद्ध नव्हती. पण त्यानंतर ती अचानक जगभर प्रसिद्धीच्या झोतात आली आणि अगदी डोळ्यापर्यंत येतील असे केस कपाळावर घेणे ही तिची फॅशन आहे आता इंग्लंडमधे लक्षावधी तरुणी डोळ्यापर्यंत केस आणून ते मागे फिरवीत मिरवताना दिसतात. एकेकाळी महाराष्ट्रात बालगंधर्वांचे अनुकरण करण्याची स्त्रियात फॅशन होती तशीच आता लेडी डायनाचे अनुकरण करण्याची फॅशन इकडे रूढ झाली आहे.

१

# पर्ल हार्बर आणि होनोलुलू

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन यानी पाकिस्तान, चीन, अर्जेंटिना इत्यादी देशाना लष्करी साहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे याची तीव्र प्रतिक्रिया खुद्द अमेरिकेत आणि इंग्लडमध्ये झाली आहे 'न्यूयॉर्क टाईम्स' ने या धोरणावर टीका केली आहे इंग्लडमधील दोनशेवर विचारवतानी जाहीर पत्रक काढून अमेरिकेच्या या धोरणाचा निषेध केला आहे या पत्रकात म्हटले आहे, की कम्युनिझमला आळा घालण्यासाठी म्हणून अमेरिकेने गेल्या सहा महिन्यात सोविएटविरोधी राष्ट्राना लष्करी साहाय्य करणाऱ्या कार्यक्रमात जी वाढ चालविली आहे, त्यामुळे जागतिक शातता धोक्यात येत आहे परराष्ट्राच्या अतर्गत बाबीत अमेरिकेने ढवळाढवळ करू नये अहिंसक मार्गाने आतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याच्या तत्त्वाविरुद्ध रेगन राजवटीचे हे आक्रमक धोरण आहे, असेही या पत्रकात म्हटले आहे लडनच्या 'टाईम्स' मध्ये पानभर प्रसिद्ध झालेल्या पत्रकावर अनेक पत्रकार, लेखक, कवी व प्राध्यापक याच्या सह्या आहेत

वॉशिंग्टन पोस्ट'मधून एका भारतीयाने अमेरिकन सरकारच्या या धोरणावर टीका केली आहे अनेक अमेरिकन नागरिकानाही अमेरिकेचे धोरण नापसंत आहे

## फोर्ड फौंडेशन

फोर्ड फौंडेशनच्या आशियाई विभागाचे प्रमुख श्री जॉन ब्रेन्सन याना मी भेटलो त्यानीही अमेरिकन सरकारचे भारताविषयीचे आपले स्वारस्य कमी होत असल्याचे

मत व्यक्त केले. ते म्हणाले, " मात्र हे धोरण तसेच राहील असे नाही. परिस्थितीनुसार या धोरणात बदल होईल अशी मला आशा आहे फोर्ड फौंडेशनची आशियाविषयी अणि विशेषतः भारताविषयीची आस्था वाढत आहे " मराठीतील एक प्रत्ययकारी लेखक श्री दया पवार याना फोर्ड फौंडेशनने दिलेल्या एक लाख रुपयाच्या अनुदानाबद्दल मी श्री ब्रेन्सन याना धन्यवाद दिले. या योजनेविषयी बोलताना ते म्हणाले, " आमच्या फौंडेशनचे कार्य मुख्यत' नव्या पिकाचे संशोधन करणे, पाटबधारे, रोगाचे निर्मूलन अशा प्रकारचे असते या कार्याच्या मानाने साहित्यविषयक कामासाठी फारसा निधी नसतो तरी पण काही देशातील लेखकाच्या कामाविषयी कृतज्ञता सुरू करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे या योजनेसाठी लेखकाला स्वतः अर्ज करता येत नाही दिल्ली येथील आमच्या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे आम्ही भारतीय लेखकाना साहाय्य करतो " श्री ब्रेन्सन गेली ३० वर्षे फोर्ड फौंडेशनमध्ये काम करीत आहेत भारताला त्यानी अनेकदा भेटी दिल्या आहेत. आपण पुन्हा महाराष्ट्रात येऊ तेव्हा मराठी लेखकाना अवश्य भेटू असे आश्वासन त्यानी मला दिले आहे

## होनोलुलू

अमेरिकेतील मुक्कामात मी हवाईतील होनोलुलूला गेलो होतो हवाई हे बेट जरा आडवाजूला असल्याने तेथे जाणे सोपे नाही पण मी टोकियोहून प्रथम होनोलुलूला जाऊन तेथून सॅनफ्रॅन्सिस्कोला गेलो वीस वर्षांपूर्वी अमेरिकेने हवाईला आपले एक राज्य म्हणून प्रवेश दिला तेव्हापासून या बेटाची आणि विशेषतः होनोलुलूची जोराची भरभराट झाली आहे उत्कृष्ट निसर्गसौंदर्य आणि अत्याधुनिक यंत्रयुग याचा मनोहर मिलाफ होनोलुलूत झाला आहे जगप्रसिद्ध वायकीकी चौपाटी इथेच आहे होनोलुलू हे जगाच्या इतिहासात प्रसिद्ध असण्याचे प्रमुख कारण म्हणजे गेल्या महायुद्धात जपानने अचानक बॉबहल्ला करून जेथे दोन हजारावर अमेरिकन नौसैनिक आणि नागरिक एका रात्रीत ठार करून हाहाकार केला, ते पर्ल हार्बर बंदर इथेच आहे. या इतिहासप्रसिद्ध जागेला मी भेट दिली तेव्हा ७ डिसेंबर १९४१ च्या दैनिकाची पुनर्मुद्रित आवृत्ती मला मिळाली ज्या ओहायो भागात होनोलुलू व पर्ल बंदर आहे त्या भागावर जपानने केलेल्या हल्ल्याचे विदारक वर्णन या दैनिकात आहे या बातमीच्या शीर्षकासाठी खूप मोठा, तीन इंच उंचीचा टाईप वापरला आहे या अनपेक्षित बॉबहल्ल्यात चारशे लोक ठार झाले असावेत असा पहिला अंदाज होता नक्की मोजदाद केली तेव्हा ही संख्या एकवीसशेवर गेल्याचे आढळले ज्या ठिकाणी हा भयानक हल्ला झाला, तेथे आता एक भव्य स्मारक बांधलेले आहे त्या वेळी हवाई हा अमेरिकेच्या नियंत्रणाखालील स्वतंत्र प्रदेश होता

होनोलुलू येथे हवाई विद्यापीठ आणि ईस्ट वेस्ट सेंटर ही दोन महत्त्वाची शैक्षणिक केंद्रे आहेत होनोलुलूत एकमेव मराठी भाषिक आहेत त्याचे नाव नारायण वर्दे ते गोव्याच्या माजी शिक्षणमंत्र्याचे चिरंजीव असून ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये शेतीविषयक संशोधन करतात हे केंद्र १९६० मध्ये अमेरिकेने स्थापन केले पौर्वात्य आणि पाश्चात्त्य देशातील संशोधक व अभ्यासक याना एकत्र आणून विविध संस्कृतींचा आणि ज्ञानाच्या इतर क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी या केंद्राची स्थापना झाली फुलब्राईट शिष्यवृत्त्या घेऊन येथे दहा भारतीय प्राध्यापक व विद्यार्थी सध्या वास्तव्य करीत आहेत समाजशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, वातावरण, टेलिकम्युनिकेशन, शेती, इत्यादी विविध क्षेत्रात अभ्यास करणारे अडीच हजार विद्यार्थी आणि दोनशेवर प्राध्यापक येथे आहेत संस्थेच्या इमारती निसर्गसुंदर वातावरणात आहेत जपान, कोरिया, इंग्लंड, फ्रान्स इत्यादी देशानी या केंद्राच्या उभारणीस साहाय्य केले असून काही देशानी स्वतंत्र इमारती व उद्याने तयार करून दिली आहेत होनोलुलूचा एक विशेष म्हणजे एकेकाळी भारताच्या स्वातन्त्र्यलढ्यात परदेशाचे साहाय्य मिळावे म्हणून गद्दर चळवळीचे नेते श्री ; हरदयाळ हे या ठिकाणी सन् युत् सेन याना भेटले होते होनोलुलूत एक हिंदू मंदिरही आहे सिंधी व पंजाबी लोकानी या ठिकाणी व्यापाराचा जम चांगला बसवला आहे हवाई सुंदरींचा नृत्याचा छानदार मोफत कार्यक्रम रोज होतो पाहुण्याना चाफ्याच्या फुलाच्या माळा घालण्याची इथली पद्धत आहे होनोलुलू विमानतळावरून परत जाणाऱ्या प्रवाशाना या माळाचे विशेष कौतुक वाटते हवई विधिमंडळाच्या अधिवेशनाची सुरुवातही स्थानिक मुलींच्या नृत्याने आणि फुलाच्या नजराण्याने होते ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये पन्नासावर देशाचे विद्यार्थी शिकत असल्याने निरनिराळ्या देशाची गाणी, नृत्ये, नाटके याचे उत्कृष्ट कार्यक्रम येथे वारंवार होतात भारतीय सतार आणि दक्षिण भारतीय नृत्य इकडे फार लोकप्रिय आहे

न्ययॉर्कमध्ये आल्यावर मी न्यूयॉर्क टाईम्सच्या अशियाई विभागातील सहसंपादिका श्रीमती बार्बरा क्रॉसेट याची भेट घेतली. त्या भारतात दहा महिने राहिल्या असून चंडीगड येथे त्यानी वृत्तपत्रव्यवसायाचे अध्यापनही केले आहे त्या म्हणाल्या, " अमेरिकन सरकारला भारताविषयी कमी आस्था वाटावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे मला स्वतःला भारताचे महत्त्व पटले आहे जागतिक राजकारणात भारताला अधिक स्थान मिळाले पाहिजे. पंजाबने आपली शेती अद्ययावत साधने वापरून उत्तम केली आहे हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे बौद्धिक क्षेत्रातही भारतीय अग्रेसर आहेत हे अनेक अमेरिकन विद्यापीठातील भारतीय प्राध्यापकानी आणि शास्त्रज्ञानी सिद्ध केले आहे. श्रीमती क्रॉसेट याची नवी नेमणूक ' न्यूयॉर्क टाईम्स'च्या राजनैतिक प्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टनला झाली आहे राजधानीच्या ठिकाणी भारताविषयी अधिक अनुकूल मत

होईल असे आपण प्रयत्न करू असेही क्रॉसेट म्हणाल्या

जागतिक कवी परिषदेचे ( वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ पोएट्स् ) पाचवे अधिवेशन सॅन्-फ्रॅन्सिस्कोमध्ये अलीकडेच भरले होते या अधिवेशनाला मी हजर होतो जगाच्या विविध भागातून चारशे कवी व कवयित्री या अधिवेशनासाठी आले होते भारतातून १८ कवी आले होते त्यात अमरावतीचे श्री ओ पी भटनागर हे एकमेव मराठी कवी होते ते विदर्भ महाविद्यालयात इग्रजीचे प्राध्यापक आहेत कोरिया ( २४ ), जपान ( २० ), इंग्लंड ( २१ ), चीन ( १७ ), रशिया ( २२ ), फिन्लड ( ३ ), फ्रान्स ( ७ ), जर्मनी ( ९ ) असे इतर राष्ट्राचे कवी होते अमेरिकेतून ७५ कवी व कवयित्री यानी अधिवेशनात भाग घेतला रोझमेरी विल्किन्सन या अमेरिकन कवयित्री अध्यक्षस्थानी होत्या भारतातील मद्रास हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री मोहन हे व्यास-पीठावर होते. त्यानी ' कवी आणि बधुत्व या विषयावर भाषण केले विशेष म्हणजे या जागतिक कवी परिषदेचा प्रारभ बगलोर येथील एका गायिकेच्या संस्कृतमधील स्तवनाने झाला

सॅन्फ्रॅन्सिस्कोच्या सेंट फ्रॅन्सिस हॉटेलमध्ये ही कवी परिषद भरली होती विशेष म्हणजे ३६ वर्षापूर्वी याच हॉटेलमध्ये युनायटेड नेशन्सचा जाहीरनामा मान्य करणाऱ्या राष्ट्राच्या प्रतिनिधींनी संमत केला होता पाचव्या कविसंमेलनात वाचल्या गेलेल्या बहुतेक कविताचा विषयही शातता, विश्वबधुत्व आणि प्रेम हा होता अनेक कवींनी आपले काव्यसग्रह फुकट वाटले या जागतिक कवी परिषदेतही काव्याच्या पुस्तकाची विक्री नगण्य झाली बहुतेक कवींनी आपणाच स्वखर्चाने आपले संग्रह प्रसिद्ध केले असे सागितले

श्री इगॉर मिखेलुसेन्को या रशियन कवीन आपल्या भाषणात सागितल, "रशियात लेखकाला व कवीला फार मान आहे आम्ही आमच्या लेखनक्षेत्रात स्वतत्र असतो " प्रश्नोत्तराच्या वेळी मात्र त्याना अनेकानी छेडून विचारले, "मग सोल्झेनित्सिन आणि पास्तरनाक याचे रशियात हाल का झाले ? " त्यावर श्री मिखेलुसेन्को यानी " साहित्य आणि राजकारण याची गल्लत नको " असे गुळमुळीत उत्तर दिले पाच दिवस चाललेल्या या अधिवेशनात शंभरावर कवी आणि कवयित्री त्यानी आपल्या कविता वाचल्या. मात्र त्यापैकी ७५ टक्के कवयित्री होत्या आणि त्यातील बहुतेक ८५ ते ९० टक्के स्त्रिया साठी उलटलेल्या होत्या जगातील प्रमुख कवीऐवजी सामान्य आणि दुय्यम-तिय्यम दर्जाचे कवी आणि विशेषतः कवयित्री याचीच उपस्थिती अधिक होती. म्हणून सॅन्फ्रॅन्सिस्कोच्या वृत्तपत्रानी ' ओल्ड वुईमेन्स नीडल क्लब ' ( वृद्ध स्त्रियानी विणत बसण्याची सघटना ) असे या जागतिक कवी परिषदेचे वर्णन केले होते !

काव्य आणि सगीत, काव्य आणि वैद्यक, काव्य आणि विज्ञान, काव्य आणि धर्म,

अमेरिकन काव्य, अशा विविध विषयावर परिसवाद झाले त्याशिवाय फ्रेंच, स्पॅनिश, स्वीडिश अशा निरनिराळ्या भाषातील काव्यावरही चर्चा झाली. कार्यक्रमपत्रिकेत श्री सिद्धरामय्या याचे योगावर भाषण हा एक कार्यक्रम होता काव्य आणि योग याचा संबंध कवींना सहजासहजी समजला नाही 'मी करतो ती शस्त्रक्रिया ही एक कविताच असते ' असे एका डॉक्टर कवींनी काव्य आणि वैद्यक या विषयावर बोलताना सांगितले अमेरिकन सरकारने या जागतिक काव्य परिषदेस आर्थिक साहाय्य न केल्याबद्दल अध्यक्षा रोझमेरी विल्किन्सन यानी दु ख व्यक्त केले

## थिएटर–डिस्ट्रिक्ट

न्यूयॉर्कमधील नाट्यप्रयोगाना आता बहर आला आहे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर हा प्रवाशाचा मोसम शिवाय या काळात हवामान उत्तम असते. सुट्याची, करमणुकीची ही सर्वांत मोठी पर्वणी अशा वेळी न्यूयॉर्कच्या रंगमचालाही नवा उत्साह आला आहे टाईम्स चौकाच्या आसपासचा भाग हा थिएटर-डिस्ट्रिक्ट म्हणून ओळखला जातो एक चौरस मैलाच्या या विभागात चाळीसवर नाट्यगृहे आहेत या वर्षाचे सर्वोत्कृष्ट नाटकाचे पारितोषिक अमाडियस ' या नाटकाला मिळाले आहे पीटर शेफर्ड याचे हे नाटक जगप्रसिद्ध ऑस्ट्रियन सगीतकार मोझार्ट याच्या जीवनावर आधारलेले आहे. एलिझाबेथ टेलर या विख्यात चित्रपट अभिनेत्रीचे रंगभूमीवर पदार्पण ही नाट्यक्षेत्रातील महत्त्वाची घटना त्याची प्रमुख भूमिका असलेले ' लिटल फॉक्सेस ' हे नाटक हाऊसफुल्ल गर्दी खेचत आहे मिकी रूनी हा जगप्रसिद्ध चित्रपट अभिनेता सध्या ' शुगरबेबी ' या संगीतप्रधान नाटकात काम करीत आहे न्यूयॉर्कचा रगमचाचा या वेळचा विशेष म्हणजे संगीतप्रधान नाटकाना आलेली तेजी. ' इव्हिटा ' हे सर्वोत्कृष्ट संगीतप्रधान नाटक ठरले आहे त्याशिवाय फॉर्टीसेकंड स्ट्रीट ', ' फिफ्थ ऑफ जुलाई ', ' बर्फलो ' ही सगीतप्रधान नाटके आघाडीवर आहेत गेल्या वर्षी न्यूयॉर्कच्या ब्रॉडवे विभागातील नाटकानी उत्पन्नाचा उच्चाक केला आहे १९८० मध्ये १ कोटी १० लाख प्रेक्षकानी ब्रॉडवेवर नाटके पाहिली त्यानी सुमारे १५ कोटी डॉलर्स नाटकावर खर्च केले

अमेरिकन सरकारने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार अमेरिकेतील आशियाई लोकाची सख्या १९७० मध्ये १५ लक्ष ३८ हजार होती, ती १९८० मध्ये ३५ लाखावर गेली आहे न्यूयॉर्क शहरात २ लाख ३१ हजार आशियाई लोक असून त्याखालोखाल शिकागो येथे ६९ हजार आशियाई आहेत. अमेरिकेतील भारतीयाची सख्या २ लाख आहे सरकारी अधिकृत नोंदीत मराठी भाषिकाचा वेगळा गट नाही, पण तेथील लोकाच्या माहितीनुसार अमेरिकेत सुमारे पाच हजार मराठी भाषिक असून त्यापैकी जास्तीत जास्त म्हणजे सुमारे सोळाशे लोक न्यूयॉर्कमध्ये आहेत

मध्ये स्थायिक झाले. परदेशातून परत आलेले ब्रिटिश आणि हे स्थायिक होत असलेले परकीय याच्यात नोकऱ्या व घरे यासाठी अंतःस्थ किंवा उघड संघर्ष सुरू झाला त्याचा परिस्फोट होऊन दगली झाल्या

इग्लडमधील कामगार सघटना गेल्या पंचवीस वर्षांत अत्यत बलवान झाल्या आणि नवे सरकार निवडण्यात या सघटनाचा वाटा अधिकाधिक मोठा होऊ लागला. त्याच्या मागण्या वाढत गेल्या त्या दबावाला बळी पडून कामगाराचे वेतन सतत वाढवावे लागले चलनवाढ होऊन महागाईने कहर केला वर्णद्वेषाच्या आणि आयरिश स्वतत्रतेच्या लढ्याना तोंड देताना सरकारी यत्रणेच्या नाकीनऊ आले थॅचर सरकारने महागाईला आळा घालण्याचा निर्णय घेऊन सरकारी खर्चात कपात केली असली तरी सतत दगलीच्या व धोक्याच्या वातावरणात काम करणाऱ्या पोलिस दलाला तेरा टक्के पगारवाढ देणे सरकारला भाग पडले इतर क्षेत्रात बळकट कामगार संघटना असल्याने त्याना हात लावणे सरकारला अशक्य झाले. शेवटी सास्कृतिक बाबींवर होणाऱ्या खर्चात कपात करून सरकारला कपात दाखवावी लागली त्याचा परिणाम म्हणजे नाट्यगृहाच्या पुनरुज्जीवनाचे काम थडावले आणि जगात पहिल्या दर्जाची ठरलेली लडनची काही नाट्यगृहे बद पडली

आज इग्लडमध्ये प्राध्यापकापेक्षा बसड्रायव्हरला अधिक पगार आहे कामगार सघटना पाठीशी असल्याने वाहतूक, खाणकाम, टेलिफोन, पाणीपुरवठा अशा कित्येक क्षेत्रातील कामगार किमान काम आणि कमाल पगार असे दोन्ही फायदे मिळवतात

"सध्या इग्लडमध्ये कारकुनाला सुमारे ४५०० ते ५५०० पौंड वर्षाला पगार मिळतो (१ पौंड = सुमारे १८ रु ) बसड्रायव्हरचा पगार ३८०० ते ४००० असला तरी तो ओव्हरटाईम करून ५५०० ते ६००० पौंड सरासरी मिळवतो इंजिनियरला व आर्किटेक्टला ९००० पौंड मिळतात डॉक्टर मात्र १२,००० ते १५,००० पौंड मिळवू शकतात बॅक मॅनेजर्सना १४,००० ते १६,००० पौंड मिळतात पण ९८ टक्के बॅक मॅनेजर्स हे ब्रिटिश आहेत वैद्यकीय उपचार इग्लडमध्ये इतके महाग झाले आहेत की, एका भारतीयाने मला सागितल्याप्रमाणे काही आजारावर इंग्लडमध्ये उपचार करण्यात जो खर्च येतो त्यात तो रुग्ण विमानाने भारतास जाऊन उपचार करून घेऊ शकतो अनेकदा डॉक्टर मिळणे महाग तर असतेच, पण दुरापास्तही असते .याचे कारण परकीय डॉक्टरानी येथे येण्यात इग्लडचा अतःस्थ विरोध आणि सहा वर्षे वैद्यकीय शिक्षणाचा खर्च करण्यापेक्षा बहुतेक ब्रिटिश तरुण पदवीच्या आसपास शिक्षण घेऊन नोकरी धरणे पसंत करतात

स्नेहाचे रूपातर प्रेमात होणे व लवकर लग्न करणे, हे अमेरिकेप्रमाणे इंग्लड-मध्येही वाढत्या प्रमाणावर घडत आहे तरुण-तरुणी लग्नासाठी शिक्षण मध्येच सोडून स्वतत्र घर करतात आणि दोघानाही नोकऱ्या सहजपणे उपलब्ध नसतात.

त्याचा परिणाम म्हणजे तरुणानी साउथ हॉलसारख्या ठिकाणी केलेल्या वर्णद्वेषाच्या दगली अलीकडेच साऊथ हॉल विभागात लडनमध्ये झालेल्या दगलीची प्रमुख कारणे म्हणजे वेकारी आणि वाढती महागाई ही होत

## प्रवासी संख्येत घट

इंग्लडमध्ये येणाऱ्या परकीय प्रवाशाच्या सख्येत अलीकडच्या काळात बरीच कपात झाली आहे अमेरिका, फ्रान्स आणि जपान या देशातून येणाऱ्या प्रवाशाकडून इग्लडला बरेच चलन मिळत असे, पण अतोनात वाढलेली महागाई आणि वारवार उद्‌भवणाऱ्या दगलीमुळे परकीय प्रवासी नाराज आहेत इंग्लडमध्ये होणाऱ्या खर्चा-पेक्षा कमी किंवा जवळपास त्याच खर्चात युरोपमध्ये विविधता आणि मनोरजन अधिक असते म्हणून अमेरिका व जपानचे प्रवासी सुटीसाठी फ्रान्स, जर्मनी, हॉलड, इटली या देशाना जाणे अधिक पसंत करू लागले आहेत सध्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हा सुट्याचा मोसम असूनही इग्लंडमधील अनेक प्रेक्षणीय स्थळाच्या गावच्या हॉटेल्सना अपेक्षित धदा मिळाला नाही या हॉटेलसनीच आता सरकारकडे मदतीची याचना केली आहे राजपुत्राचा विवाह आणि सुट्याचा मोसम यामुळे अमाप प्रवासी येतील या अदाजाने त्यानी जादा नोकरवर्ग व खरेदी केली आता बँकेकडून कर्ज काढून हॉटेलवाल्याना हा खर्च भागवावा लागत आहे !

आता आर्थिक मदी सपली आहे असे इंग्लडच्या अर्थमत्र्यानी जाहीर करून चार दिवस होतात न होतात तोच सत्तारूढ पक्षाच्या बैठकीत पक्षाच्या प्रमुखानी ' अजून मदी संपण्याचे लक्ष नाही ' असे निवेदन केले अर्थमत्र्याचे पूर्वीचे विधान आर्थिक परिस्थितीपेक्षा राजकीय कारणानी केले गेले, अशी यावर वृत्तपत्रानी टीका केली आहे आपले अर्थविषयक धोरण यशस्वी होत असल्याचा भास अर्थमत्र्यानी निर्माण केला, पण त्याला सत्यस्थितीचे पुरेसे पाठबळ मिळू शकले नाही

## भारतीयांत नैराश्य

लडनच्या साऊथ हॉल भागात अलीकडेच वर्णद्वेषाच्या दगली झाल्या त्या भागात मी गेलो, तेव्हा बहुतेक दुकानाच्या काचा फुटलेल्या आढळल्या त्या फुटक्या काचावर आता प्लायवुडचे आवरण चढवण्यात आले आहे काही दुकानाच्या काचा फुटलेल्या नसतानाही त्यावर सुरक्षिततेसाठी प्लायवूडच्या फळ्या मारण्यात आल्या आहेत. वातावरण भीतीचे आहे या भागात आशियाई लोक मोठ्या प्रमाणावर राहतात आणि व्यवसाय करतात एक भारतीय दुकानदार म्हणाला, “ या भागात दंगलींना गोऱ्या लोकानी सुरुवात केली मग आफ्रिकन त्यात पडले आम्ही आशियाई लोक दोघाच्याही मत्सराला आणि द्वेषाला बळी पडत आहोत. माझ्या नातेवाइकाचे दुकान दंगलीत फोडले गेले आणि सत्तर हजार पौंडाचे नुकसान झाले आता विमा

कपन्याही जबर हप्ते मागू लागल्या आहेत गेली पस्तीस वर्षे मी या भागात व्यवसाय करतो आहे. दगलीच्या दडपणाला बळी पडून पुन्हा भारतात जाणे कठीण आहे आणि येथे राहणे अधिकाधिक कठीण होत आहे ”

शाततेच्या काळातही इंग्लंडमधील भारतीयाना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे एक भारतीय इजिनियर म्हणाले, “ मी गेली सोळा वर्षे एका विख्यात कपनीत काम करतो आहे, पण एका विशिष्ट रेषेपलीकडे भारतीयाना बढती मिळत नाही अनेक बॅकामध्येही पात्रता असूनही मॅनेजरची जागा भारतीयास न मिळता ती ब्रिटिशाला दिली जाते समान गुणाचे अनेक अधिकारी असतील तर प्रथम ब्रिटिश, मग युरोपियन, नतर अमेरिकन व शेवटी आशियाई अधिकाऱ्याला वरची जागा मिळते आर्किटेक्ट, प्राध्यापक वगैरे व्यवसायातही हीच परिस्थिती आहे कमी पात्रता असलेल्या ब्रिटिश नागरिकाला वरची जागा मिळाल्यानेही भारतीयात नैराश्य आले आहे ”

सत्तारूढ पक्षाचा एक ब्रिटिश समर्थक म्हणाला, “ परकीयाचा लोंढा थोपविण्याचे थॅचर सरकारचे धोरण योग्यच आहे खुद्द ब्रिटनमधील बेकारी भयानक वाढत आहे सध्या आमच्या लहान देशात तीस लाख बेकार आहेत थॅचर सरकारने १९८१-८२ साठी ठरविलेल्या धोरणाप्रमाणे आणखी अडीच ते तीन लाख बेकाराची त्यात भर पडेल आमच्या नागरिकाना नोकऱ्या नसताना परकीयाना इथे नोकऱ्या आणि बढत्या मिळाव्यात असे कोणत्याही देशाला वाटणार नाही ” अशा बिकट परिस्थितीत इग्लंडच्या रेल्वे कामगारानी अवास्तव मागण्या करून सपावर जाण्याची धमकी दिली आहे सप, बेकारी, दगली अशा अनेक कारणानी एकेकाळचा पराक्रमी इग्लडचा सिंह आता थकलेला, जेरीस आलेला असा झाला आहे

जगातील अनेक देशात मराठी भाषिक लोक कमी-अधिक प्रमाणात आहेत न्यूयॉर्क आणि लडन या शहरात मराठी भाषिकाची वस्ती सर्वात अधिक आहे दहा वर्षापूर्वी लडनमध्ये मराठी लोकाची वस्ती इतर शहराच्या तुलनेने अधिक होती कारण पूर्वी उच्च शिक्षणासाठी भारतीय इग्लडला प्रथम अग्रक्रम देत असे मात्र गेल्या दहा-पधरा वर्षात इग्लंडमध्ये शिक्षणानतर नोकरी मिळण्याचा संभव कमी होऊ लागला आणि अमेरिकेत ती शक्यता वाढली म्हणून भारतीयानी अमेरिकेला अग्रक्रम दिला सध्या लडनमध्ये सुमारे १५०० मराठी भाषिक आहेत ते मुख्यतः इजिनियरिंग, आर्किटेक्चर, बॅकिंग, वैद्यक, अध्यापन अशा क्षेत्रात काम करतात फक्त व्यापार-उद्योगधंदा करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत महाराष्ट्र मडळ ही मराठी भाषिकाची संस्था जोमाने कार्य करीत आहे १९३२ मध्ये श्री तात्यासाहेब केळकर हे गोलमेज परिषदेसाठी लडनला आले, तेव्हा त्यानी त्या वेळच्या मराठी विद्यार्थ्यांना बोलावून जेवण दिले तेव्हा या विद्यार्थ्यांबरोबर बॅ एम. आर. जयकर,

द वि ताम्हणकर, गोडबोले वगैरेही होते. श्री केळकर यानीच या प्रसगी ' महाराष्ट्र मंडळ ' ही संस्था स्थापन करून लडनमधील मराठी भाषिकाची संघटना केली

" हे महाराष्ट्र मडळ १९४० पर्यंत चागले चालले, पण महायुद्ध सुरू झाल्यानतर त्याचे कामकाज जवळजवळ एक तप बंद पडले श्री बाळासाहेब खेर हे भारतीय कमिशनर म्हणून लंडनला आले तेव्हा त्यानी मडळाचे पुनरुज्जीवन केले. त्या वर्षी मंडळाने ' लग्नाची बेडी ' हे नाटकही सादर केले " अशी माहिती महाराष्ट्र मंडळाचे सध्याचे प्रसिद्धी कार्यकर्ते श्री किशोर वेंगुर्लेकर यानी सागितली ते पुढे म्हणाले, "१९६३ नतर मडळाच्या कार्यात विविधता आली. सहल, दिवाळी भोजन, नाटक, गाण्याचे व इतर करमणुकीचे कार्यक्रम मंडळातर्फे नियमितपणे होऊ लागले महाराष्ट्रातून येणाऱ्या कलावताना मार्गदर्शन करणे, त्याचे कार्यक्रम ठरविणे वगैरे कामे मडळ सातत्याने करीत आहे. १९६३ मध्ये डॉ श्रीराम लागू येथे होते त्यानी ' बिचारा डायरेक्टर ' ही एकांकिका सादर केली होती. या सुमारास श्री. किशोर वेंगुर्लेकर यानीही ' पुढारी पाहिजे ' व ' सदू आणि दादू ' या एकांकिका दिग्दर्शित केल्या होत्या. १९७५ पासून महाराष्ट्र मंडळास व्यावसायिक स्वरूप आले श्री. रामदास कामत, श्री सुधीर फडके, सौ रामचद्र, श्रीमती बकुल पडित इत्यादी कलावंताचे कार्यक्रम मडळाने सभासदासाठी दिले १९८० मध्ये मंडळाने स्वतःची इमारत विकत घेण्याचा निर्णय घेतला त्याच वर्षी ' महानिर्वाण ' आणि ' घाशीराम कोतवाल ' नाटके इमारत-निधीसाठी करण्यात आली. पुणे येथील ' थिएटर अकॅडमी 'ने ही नाटके सादर केली

# ८

# या शतकातील सर्वात महत्त्वाचा विवाह

**लंडन :**

या शतकातील सर्वात महत्त्वाचा विवाहसमारंभ यथासांग पार पडला आणि अनेक गंमतीच्या, हृद्य स्मृती मागे ठेवून गेला इंग्लंडचा राजपुत्र चार्लस् आणि लेडी डायना ही दोघे सेंट पॉल चर्चमध्ये विवाहबद्ध झाली प्रत्यक्ष लग्न लागत असताना वधू-वरानी ज्या शपथा घ्यायच्या असतात, तेव्हा दोघानीही गफलती केल्या 'चार्लस् फिलिप आर्थर याचा मी पती म्हणून स्वीकार करते' अशी शपथ घेताना वधूने चुकून 'फिलिप चार्लस् आर्थर' असे म्हटले वराने शपथ घेताना 'मी माझ्या सर्व भौतिक बाबीत डायनाला सहभागी करीन' असे म्हणताना 'भौतिक' ( wroldly ) हा शब्दच गाळला! अनेकदा रंगीत तालीम करूनही ऐनवेळी अशा ठळक चुका झाल्या पण ब्रिटिश जनतेने मात्र त्या चुकाचे कौतुक केले 'या गफलतीमुळेच या शाही विवाहाला मानवी स्पर्श ( Human touch ) आला' अशी शीर्षके वृत्तपत्रानी दिली

**डायनाचा वेष :**

विवाहाच्या वेळी डायनाचा वेष कसा असेल हे अत्यत गुप्त राखण्यात आले होते. ऐन वेळेपर्यंत या वेषाचे स्वरूप बाहेर फुटू नये अशी काळजी घेण्यात आली होती येत्या काही महिन्यात ज्या मुलींचे विवाह होणार आहेत, त्यानी 'आपल्याला डायना-सारखाच विवाहाचा वेष हवा' अशा ऑर्डर्स मोठमोठ्या फॅशन कपन्याच्याकडे

पूर्वीच देऊन ठेवल्या होत्या अनेक फॅशन डिझायनर्स स्त्री-पुरुष हातात कागद पेन्सिल घेऊन तयार होते दूरदर्शनवर लेडी डायना दिसल्याबरोबर त्यानी तिच्या वेषाची नक्कल उतरण्यास सुरवात केली विवाह झाल्यापासून वीस मिनिटात संपूर्ण डिझाईन कागदावर उतरले गेले त्याबरहुकूम तंतोतंत तयार केलेला पहिला वेष विवाहाच्या क्षणापासून साडेतीन तासात विक्रीसाठी तयार झाला !

वधूच्या अगावर लग्नाच्या वेळी कोणते दागिने असतील याबद्दल स्त्रीवर्गात कमालीची उत्सुकता होती तिने गळयात काहीच घातले नव्हते केसावर हिऱ्याचा एक टायरा ( दीड इच उचीचा मुकुट ) फक्त ठेवला होता कानात कर्णभूषणे होती आणि एका बोटात अगठी होती त्याखेरीज इतर कोणताही दागिना तिने घातला नव्हता पायातील स्लिपर्स क्लाईव्ह शितटन या कपनीने हाताने तयार केला होता वधूच्या हातात पिवळा गुलाब, पाढरी जिरावडीन फुले आणि हिरवी पाने याचा दिमाखदार गुच्छ होता वडलाच्या हातावर हात ठेवून ती विवाहाच्या ठिकाणी हळूहळू गेली तिच्या कपड्याचा लाब पचवीस फुटी पट्टा चार मुली साभाळीत होत्या चार्लस् यानी नौदलाच्या अधिकाऱ्याचा निळया रगाचा पोशाख केला होता

## लाखोंची गर्दी

विवाहाचा अद्वितीय सोहळा पाहण्यासाठी लक्षावधी लोक आले होते मिरवणूक आणि समारंभ पाहण्यास प्रत्यक्षात नऊ लक्ष लोक हजर होते दूरदर्शनवर हा कार्यक्रम जगातील बहुतेक देशात दाखविण्यात आला तो सुमारे शहात्तर कोटी लोकानी पाहिला मिरवणुकीच्या मार्गावरील जागा अडविण्यासाठी त्या त्या रस्त्याच्या कडेने हजारो लोक रात्रभर झोपले होते बुधवारी सकाळी विवाह होता, तर मगळवार संध्याकाळपासून पथाऱ्या पसरणारे रसिक होते मिरवणुकीच्या मार्गावरील दुकाने आणि घरे याच्या मालकानी आपल्या गॅलऱ्या आणि खिडक्या याचा वापर करण्यासाठी माणशी अडीचशे ते पाचशे पौंड आकारले होते या जागा जथाबद भाड्याने घेऊन प्रवासी कपन्यानी जगाच्या विविध भागातून हौशी प्रवाशी तीन तीन महिने आधी नावे नोंदवून आणले होते जनतेचा उत्साह उफाळून आला होता पहाटे पाच वाजल्यापासून लोक हातात इग्लडचे निशाण आणि तोंडात शिट्या किंवा घोषणा यानी आसमत दणाणून सोडीत होते लंडनच्या पोलिसावर व्यवस्थेचा अपूर्व ताण पडला होता पहिल्या दोनचार रागा मागील लोकाना मिरवणूक पाहता यावी म्हणून लक्षावधी पुठ्याचे पेरिस्कोप ( periscope ) विक्रीसाठी तयार होते. काही मुलानी तर आपल्या चेहऱ्यावरच ब्रिटिश निशाण रंगवून घेतले होते

वधूवर आणि इतर राष्ट्रप्रमुख याच्या संरक्षणासाठी कडक बदोबस्त होता पण

या वेळी पोलिसाची जबाबदारी द्विविध होती कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून उत्तम सरक्षण व्यवस्था तर करायला हवी होतीच, पण विवाहाच्यासारख्या शुभप्रसगी पोलिसाचा गणवेष मिरवणुकीत किंवा समारंभात दिसू नये अशी काळजीही घेणे अवश्य होते म्हणून वधूवराना मिरवणुकीने नेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वेगळया दोन रथाच्या मागे शोभिवत कपड्यातील सेवक असतात, ते वस्तुत. स्कॉटलंड यार्डातील उत्कृष्ट नेमबाज पोलिस होते त्याच्या शोभिवत लाटा व जरीच्या कपड्यात गोळया भरलेल्या शॉट गन्स सज्ज होत्या आयर्लंडच्या प्रश्नावर तप्त झालेल्या वातावरणाचा स्फोट होऊन काही घातपाताचा प्रकार घडू नये म्हणून ही खास व्यवस्था करण्यात आली होती

मॅडम टुसाड हे जगप्रसिद्ध प्रदर्शन लडनमध्ये आहे. या ठिकाणी जगतील सर्व प्रमुख व्यक्तींचे पुतळे आहेत प्रिन्स चार्लस् आणि डायना याच्या विवाहाच्या वेळचा प्रसगही या प्रदर्शनात तयार ठेवण्यात आला होता लेडी डायनाचे विवाहाच्या वेळचे कपडे ज्यानी शिवले होते, त्यानी त्याच कपड्याची दुसरी नक्कल करून ती मॅडम टुसाड प्रदर्शनाकडे पाठविली आणि विवाहाच्या सायकाळीच मेणाच्या पुतळ्याचे हे जोडपे सर्व पोशाखानिशी लोकाना कायमचे दर्शन देण्यासाठी सज्ज झाले

## वेषाची कथा

लेडी डायना हिच्या कपड्याचे डिझाईन व वर्णन लगेच त्याच दिवशी सायकाळच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात आले या वेषाची जी मागे लाबवर जमिनीवर रुळणारी पट्टी ( train ) असते, ती पचवीस फूट लाब होती रेशमी कापडाचा रंग हस्तिदती ( ivory silk ) होता राजघराण्याचे वेषभूषातज्ज्ञ डेव्हिड आणि एलिझाबेथ इमॅनुएल यानी तो वेष तयार केला होता विवाह झाल्याबरोबर त्या दोघाच्या मुलाखती दूरदर्शनवर घेण्यात आल्या डायनाच्या डोकीवरील पातळ रेशमी कपड्यावर मोती लावण्यात आले होते गळा उघडा होता आणि स्कर्टचे हात कोपराच्या किंचित खाली घेऊन त्यावर लेस होती पचवीस फूट लाब पट्ट्याच्या भोवतीही नाजूक लेस होती ऐनवेळी पाऊस आलाच तर उपयोगी पडावी म्हणून हस्तिदती रंगाच्या रेशमी कापडाची व्हिक्टोरियन पद्धतीची छत्री तयार करण्यात आली होती पण पाऊस न आल्याने तिचा वापर केला गेला नाही ' डायनाचा ड्रेस कसा आहे याची गुप्त माहिती आपण मिळविली आहे आणि हे पाहा त्या कपड्याचे डिझाईन असे म्हणून ' बुमेन्स वेअर लेडी ' ने विवाहाच्या आधल्या दिवशी एक डिझाईन प्रसिद्ध केले पण ते खोटे निघाले खरे डिझाईन वेगळेच होते म्हणून वेषभूषेसाठी वाहिलेल्या या नियतकालिकावर लोकाना फसवल्याबद्दल बरीच टीका झाली टाईम्स' ने तर ' हा पाहा बोगस वेष असे मोठे शीर्षक देऊन या बनावट

कपड्याचे बेड फोडले येत्या अनेक वर्षांत इग्लड, अमेरिका, युरोप, वगैरे भागातील वधूंचे विवाहाचे कपडे डायनाच्या वेषाबरहुकूम घेतले जातील

विवाहाच्या दिवशी सकाळी दहा वाजता राजपरिवारातील वऱ्हाडी मोटारीने सेंट जेम्स राजवाड्यातून निघून सेंट पॉल चर्चमध्ये गेले सव्वा दहा वाजता परराष्ट्रातील राजघराण्यातील पाहुणे ( उदा जपान ) मोटारीने बकिंगहॅम राजवाड्यातून सेंट पॉलकडे गेले त्यानतर मुख्य मिरवणुकीतील रथ येऊ लागले प्रथम इग्लडच्या राणी एलिझाबेथ आपले पती ड्यूक ऑफ एडिंबरो याच्या बरोबर रथाने निघाल्या राणी एलिझाबेथ यानी फिकट निळ्या रंगाचा वेष परिधान केला होता नतर त्याच्या मातोश्री राणी मेरी याचा रथ निघाला त्यापाठोपाठ राजकन्या ॲन, राजकन्या अलेक्झाड्रा वगैरे निकटचा परिवार, मग डायनाचे वडील व आई, राजपुत्र चार्लस्, लेडी डायना असे इतर वेगळ्या रथातून सेंट पॉल चर्चमध्ये आले तेथे प्रथम लॉर्ड मेयर म्हणजे लडनचे महापौर यानी सर्वांचे स्वागत केले. मग विवाह लावणारे पुरोहित डॉ रून्सी आणि आर्चबिशप ऑफ कॅन्टरबरी यानी सर्वांचे स्वागत केले त्यापूर्वी निरनिराळ्या राष्ट्राचे पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, राज्यप्रतिनिधी, प्रमुख निमत्रित येऊन स्थानापन्न झाले होते

चर्चमधील बसण्याची किंवा प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी उभे राहण्याची व्यवस्था अशी होती '— लाल गालिच्यावर राजपुत्र चार्लस, त्याच्या शेजारी सहायक, डायना, तिच्या जवळ तिचे वडील आणि समोर आर्चबिशप वराच्या उजव्या हाताला राणी एलिझाबेथ, राजपुत्र ॲड्र्यू आणि राणीच्या मातोश्री डायनाच्या डाव्या हाताला वधूपक्षातील प्रमुख मडळी त्यामागे ब्रिटिश राजघराण्याचा परिवार, माजी पंतप्रधान, परराष्ट्रातील प्रमुख, खास निमत्रित अशी साडेचारशे बडी मडळी होती महत्त्वाची वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन्स याच्या प्रतिनिधींची सोय दोन्ही बाजूंच्या चबुतऱ्यावर केली होती बी बी सी, आय टी व्ही व परदेशातील टेलिव्हिजन्स याचे प्रत्येकी निदान पचवीस कॅमेरे मिरवणुकीच्या मार्गावर आणि चर्चमध्ये होते टोंगाचे राष्ट्रप्रमुख सात फूट उंच व प्रचड वजनाचे आहेत त्याच्यासाठी डबल खुर्ची ठेवण्यात आली होती.

**लग्नाचे वचन :**

राजपुत्र चार्लस् विवाहविधीसाठी जाण्यापूर्वी चर्चच्या एका प्रतिनिधीने ' अगठी आणली आहे काय ? असे विचारले चार्लस्च्या सहकाऱ्याने खिशातून अगठी काढून दाखविली लग्नाच्या गोंधळात अंगठी विसरली तर ऐनवेळी पंचाईत किंवा फजिती होऊ नये म्हणून ही दक्षता घेतली होती अगठी निघताना बरोबर घेतली तरी वाटेत हरवण्याचाही संभव असतो पुरोहितानी डायनाला विचारले, " तू चार्लस् फिलिप

ऑर्थर याचा पती म्हणून स्वीकार करतेस काय ?" तिने म्हटले, "आय विल आय ॲक्सेप्ट फिलिप चार्लस् ऑर्थर ॲज माय हजबंड" त्यानंतर तसाच प्रश्न पुरोहित डॉ रून्सी यानी चार्लसला विचारला व त्याने होय म्हटले मग डॉ रून्सी सर्व निमंत्रिताच्याकडे वळून म्हणाले, "हा विवाह होऊ नये असे इथे जमलेल्या कोणाला वाटत असेल तर त्याने पुढे यावे आणि कारणे दाखवावी" थोडा वेळ स्तब्धता पसरली होती मग ते म्हणाले, "या लग्नाला आता जर कोणाचा विरोध नसेल तर यापुढे कधीही कोणीही या विवाहाला विरोध करू नये" मग त्यानी डायना व चार्लस् याचे हात एकमेकाच्या हातात देऊन म्हटले, "नाऊ आय प्रोनाउन्स यू ॲज हजबंड ॲंड वाईफ" या वेळी वराने वधूच्या बोटात अंगठी घातली आणि विवाह झाला. संगीताचे मधुर ध्वनी उमटले मग डॉ रून्सी म्हणाले, "परमेश्वराच्या आशीर्वादाने एकत्र आलेल्या या जोडप्याला यापुढे कोणीही कधीही अलग करणार नाही" त्यानतर नवरा-नायकोने एकनिष्ठेच्या शपथा घेतल्या डॉ रून्सी आणि आर्चबिशप ऑफ कॅन्टरबरी यानी आशीर्वाद देऊन बायबलमधील काही भाग वाचून दाखविला ख्रिश्चन विवाह झाल्यावर पतिपत्नी चुंबन घेतात ते मात्र या वेळी घेतले गेले नाही. विवाहानतर राणी एलिझाबेथ, राजमाता मेरी आणि इतर ज्येष्ठ नातेवाइकाचे आशीर्वाद घेतल्यानतर त्यानी चर्चच्या मॅरेज रजिस्टरवर सह्या केल्या मग पतिपत्नी मिरवणुकीने बकिंगहॅम राजवाड्याकडे गेली. परत जाताना राणी एलिझाबेथ यानी आपल्या रथात अर्ले स्पेन्सर याना घेतले रथात चढताना पहिला मान इग्लडच्या राणीचा असतो पण या वेळी राणी एलिझाबेथ यानी अर्ले स्पेन्सरना प्रथम रथात बसण्याची विनती केली आणि नतर त्या बसल्या राजपुत्र व त्याची पत्नी याच्यावर परत जाताना लक्षावधी लोकानी अभिनंदनाचा, तादुळाचा आणि फुलाचा वर्षाव केला

## 'वुई वॉंट ए किस'

बकिंगहॅम राजवाड्यासमोरील विस्तीर्ण मैदानात आपल्या जनतेला भेटणे हे इंग्लडच्या राजाचे व राण्याचे पारंपरिक कर्तव्य असते त्यानुसार लक्षावधी लोक मिरवणूक संपताच त्या चौकाकडे निघाले पण ही विराट गर्दी पोलिसानी अत्यत चातुर्याने आवरली त्यानी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रथम घोडेस्वाराची राग आणि त्या पाठोपाठ वीस फुटावर पायी चालणाऱ्या पोलिसाची बळकट राग ठेवली होते घोडेस्वार आणि पोलिस संथ गतीने चालत होते त्यामुळे नवविवाहिताचे दर्शन घेण्यासाठी धावाधाव झाली नाही व चेंगराचगरीही टळली चौकाच्या मध्यभागी असलेल्या कारंजाच्या पाण्यातही लोक उभे होते थोड्याच वेळात राजपुत्र व लेडी डायना बाल्कनीत आले. त्यानी अनेकदा हात वर करून लोकाच्या शुभेच्छाचा स्वीकार केला. ते दोघे परत गेले तरी लोकाच्या गर्जना चालूच होत्या— वुई वॉंट

ए किस ' नवविवाहित जोडपे पुनः दार उघडून बाल्कनीत आले त्यानी हात उच्च करून लोकाना दाद दिली पण जनता चुंबनाशिवाय परतण्यास तयार नव्हती राजपुत्र आणि डायना यानी त्याबाबत एकमेकाशी थोडा संवाद केला आणि अखेर खास लोकाग्रहास्तव चुंबन घेतले त्याबरोबर लोकानी कौतुकाच्या टाळ्याचा आणि घोषणाचा अफाट कडकडाट केला शेकडो कॅमेऱ्यानी टिपलेले ते दृश्य त्याच दिवशी सायकाळच्या व दुसऱ्या दिवशी सकाळच्या दैनिकाच्या पहिल्या पानावर ठळकपणे छापले होते

दुपारी चार वाजता नूतन परिणित जोडपे वॉटर्लू स्टेशनवरून ब्रॉडलँडसकडे मधुचंद्रासाठी प्रयाण करणार होते त्याही ठिकाणी लाखभर लोक जमले होते चार्लस् आणि डायना वीस मिनिटे उशिरा स्टेशनवर आले. अर्थात गाडी चुकेल किंवा जागा मिळणार नाही अशी काही त्याना भीती नव्हती ? स्टेशनच्या प्लॅटफॉर्मपर्यंत बिनीचे घोडेस्वार आणि दापत्याचा रथ आला होता या ठिकाणी अधिकृत ओळखपत्र घेऊन आलेल्या दोन जणाच्या हालचाली पोलिसाना सशयास्पद वाटल्याने त्याना पोलिसानी दापत्याची गाडी जाईपर्यंत अटक करून ठेवलेले मी पाहिले साडेचारच्या सुमाराला गाडी सुरू झाली आणि समारंभ सुरक्षित पार पडल्याचा आनद सर्वानीच व्यक्त केला राजदापत्य हनीमूनला जाण्यासाठी वॉटर्लूवर आले, तेव्हा त्याना शुभेच्छा देण्यासाठी जमलेला अफाट जनसमुदाय पाहून मला वाटले, की, आमच्याकडील गर्भाधानाच्या समारंभास सुशिक्षित लोक अडाणी म्हणतात, पण इथे तशाच समारभाला मात्र प्रतिष्ठा मिळते !

नवविवाहित दापत्य सुखरूपपणे रवाना झाले, तेव्हा लंडनच्या स्कॉटलंड यार्डने सुटकेचा निःश्वास सोडला कारण गेले चार-पाच दिवस अनेक राष्ट्रप्रमुख आणि खुद्द राजपुत्र व डायना याच्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेचा अपूर्व ताण त्याच्यावर पडला होता— बी बी सी., टेलिव्हिजनवर या समारभाच्या कार्यक्रमाच्या अखेरीस सागण्यात आले, ' आम्ही नेहमी अत्याचार व दंगली दाखवतो अशी आमच्यावर टीका होते आजच्या कार्यक्रमाच्या सुखद दर्शनाने आमच्या प्रेक्षकाना विरंगुळा वाटला असेल ' आय टी व्ही या लडनच्या दुसऱ्या केंद्राच्या कॅमेऱ्यात विवाह - समारभ चालू असतानाच बिघाड झाला आणि दीड मिनिट काही दिसू शकले नाही म्हणून त्या केंद्रावर नंतर कडक टीका झाली गाबियाचे राष्ट्राध्यक्ष जावरा हे विवाह समारभात मशगुल असतानाच त्याच्या देशात क्राती होऊन त्याचे हक्क काढून घेण्यात आले दहावीस लंडनवासी असे निघाले की, त्यानी ' हा भपका आणि व्यर्थ खर्च आम्हाला आवडत नाही' म्हणून समारंभावर बहिष्कार घातला जिब्राल्टरमधून नवविवाहित दापत्य नौकाविहारास जाणार आणि त्यामुळे जिब्राल्टरवर इग्लडचा जुना हक्क असल्याचे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होणार म्हणून स्पेनचे राष्ट्रप्रमुख

समारंभास आले नाहीत अशी तुरळक उदाहरणे सोडली तर या शतकातील अत्यत महत्त्वाचा समारभ अविस्मरणीय झाला

## डायनाची अंगठी

या विवाहाला इग्लडच्या इतिहासात खास महत्त्व असण्याचे कारण असे की गेल्या सहाशे वर्षांत ज्येष्ठ राजपुत्राचा विवाह होण्याचा हा फक्त सातवा प्रसंग आहे इतर बाबतींत तो राज्यावर आल्यावर वा आल्यानंतर विवाहित झाला किंवा व्हिक्टोरिया आणि एलिझाबेथसारखी ती राजकन्या होती. २४ फेब्रुवारी १९८१ रोजी हा विवाह अधिकृतपणे जाहीर करण्यात आला. त्यापूर्वी राजपुत्र चार्लस् याच्या नावाशी अनेक सुदर तरुणींचा सबंध वृत्तपत्रातून आणि खाजगी गप्पासप्पातून जोडण्यात आला होता विवाहनिश्चितीच्या वेळी राजपुत्र चार्लस्ने लेडी डायनाला जी अगठी दिली, तिच्यात एका मोठ्या नीलमणी ( सफायर ) भोवती चौदा हिरे जडविण्यात आले होते ही अंगठी तिने विवाहापर्यंत बोटात ठेवली होती अर्ल स्पेन्सर याची कन्या डायना ही राजपुत्र चार्लस् याच्या नावाशी निगडित होईपर्यंत प्रसिद्ध नव्हती पण त्यानतर ती अचानक जगभर प्रसिद्धीच्या झोतात आली आणि अगदी डोळ्या-पर्यंत येतील असे केस कपाळावर घेणे ही तिची फॅशन आहे आता इग्लडमधे लक्षावधी तरुणी डोळ्यापर्यंत केस आणून ते मागे फिरवीत मिरवताना दिसतात एकेकाळी महाराष्ट्रात बालगधर्वांचे अनुकरण करण्याची स्त्रियात फॅशन होती तशीच आता लेडी डायनाचे अनुकरण करण्याची फॅशन इकडे रूढ झाली आहे

१

# पर्ल हार्बर आणि होनोलुलू

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन यानी पाकिस्तान, चीन, अर्जेंटिना इत्यादी देशाना लष्करी साहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे याची तीव्र प्रतिक्रिया खुद्द अमेरिकेत आणि इग्लडमध्ये झाली आहे 'न्यूयॉर्क टाईम्स' ने या धोरणावर टीका केली आहे इग्लडमधील दोनशेवर विचारवंतानी जाहीर पत्रक काढून अमेरिकेच्या या धोरणाचा निषेध केला आहे या पत्रकात म्हटले आहे, की कम्युनिझमला आळा घालण्यासाठी म्हणून अमेरिकेने गेल्या सहा महिन्यात सोविएटविरोधी राष्ट्राना लष्करी साहाय्य करणाऱ्या कार्यक्रमात जी वाढ चालविली आहे, त्यामुळे जागतिक शातता धोक्यात येत आहे परराष्ट्राच्या अतर्गत बाबीत अमेरिकेने ढवळाढवळ करू नये अहिंसक मार्गाने आतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याच्या तत्त्वाविरुद्ध रेगन राजवटीचे हे आक्रमक धोरण आहे, असेही या पत्रकात म्हटले आहे लडनच्या 'टाईम्स' मध्ये पानभर प्रसिद्ध झालेल्या पत्रकावर अनेक पत्रकार, लेखक, कवी व प्राध्यापक याच्या सह्या आहेत

'वॉशिंग्टन पोस्ट'मधून एका भारतीयाने अमेरिकन सरकारच्या या धोरणावर टीका केली आहे अनेक अमेरिकन नागरिकानाही अमेरिकेचे धोरण नापसंत आहे

## फोर्ड फौंडेशन

फोर्ड फौंडेशनच्या आशियाई विभागाचे प्रमुख श्री. जॉन ब्रेन्सन याना मी भेटलो त्यानीही अमेरिकन सरकारचे भारताविषयीचे आपले स्वारस्य कमी होत असल्याचे

मत व्यक्त केले. ते म्हणाले, "मात्र हे धोरण तसेच राहील असे नाही परिस्थितीनुसार या धोरणात बदल होईल अशी मला आशा आहे फोर्ड फौंडेशनची आशियाविषयी आणि विशेषतः भारताविषयीची आस्था वाढत आहे." मराठीतील एक प्रत्ययकारी लेखक श्री दया पवार याना फोर्ड फौंडेशनने दिलेल्या एक लाख रुपयाच्या अनुदानाबद्दल मी श्री ब्रेन्सन याना धन्यवाद दिले. या योजनेविषयी बोलताना ते म्हणाले, "आमच्या फौंडेशनचे कार्य मुख्यत. नव्या पिकाचे सशोधन धरणे, पाटबधारे, रोगाचे निर्मूलन अशा प्रकारचे असते या कार्याच्या मानाने साहित्यविषयक कामासाठी फारसा निधी नसतो तरी पण काही देशातील लेखकाच्या कामाविषयी कृतज्ञता सुरू करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे या योजनेसाठी लेखकाला स्वतः अर्ज करता येत नाही दिल्ली येथील आमच्या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे आम्ही भारतीय लेखकाना साहाय्य करतो" श्री ब्रेन्सन गेली ३० वर्षे फोर्ड फौंडेशनमध्ये काम करीत आहेत भारताला त्यानी अनेकदा भेटी दिल्या आहेत. आपण पुन्हा महाराष्ट्रात येऊ तेव्हा मराठी लेखकाना अवश्य भेटू असे आश्वासन त्यानी मला दिले आहे

## होनोलुलू

अमेरिकेतील मुक्कामात मी हवाईतील होनोलुलूला गेलो होतो हवाई हे बेट जरा आडबाजूला असल्याने तेथे जाणे सोपे नाही पण मी टोकियोहून प्रथम होनोलुलूला जाऊन तेथून सॅनफ्रॅन्सिस्कोला गेलो वीस वर्षांपूर्वी अमेरिकेने हवाईला आपले एक राज्य म्हणून प्रवेश दिला तेव्हापासून या बेटाची आणि विशेषत. होनोलुलूची जोराची भरभराट झाली आहे. उत्कृष्ट निसर्गसौंदर्य आणि अत्याधुनिक यंत्रयुग याचा मनोहर मिलाफ होनोलुलूत झाला आहे जगप्रसिद्ध वायकीकी चौपाटी इथेच आहे होनोलुलू हे जगाच्या इतिहासात प्रसिद्ध असण्याचे प्रमुख कारण म्हणजे गेल्या महायुद्धात जपानने अचानक बॉबहल्ला करून जेथे दोन हजारावर अमेरिकन नौसैनिक आणि नागरिक एका रात्रीत ठार करून हाहाकार केला, ते पर्ल हार्बर बंदर इथेच आहे. या इतिहासप्रसिद्ध जागेला मी भेट दिली तेव्हा ७ डिसेंबर १९४१ च्या दैनिकाची पुनर्मुद्रित आवृत्ती मला मिळाली ज्या ओहायो भागात होनोलुलू व पर्ल बदर आहे. त्या भागावर जपानने केलेल्या हल्ल्याचे विदारक वर्णन या दैनिकात आहे या बातमीच्या शीर्षकासाठी खूप मोठा, तीन इंच उचीचा टाईप वापरला आहे या अनपेक्षित बॉबहल्ल्यात चारशे लोक ठार झाले असावेत असा पहिला अदाज होता नक्की मोजदाद केली तेव्हा ही सख्या एकवीसशेवर गेल्याचे आढळले ज्या ठिकाणी हा भयानक हल्ला झाला, तेथे आता एक भव्य स्मारक बाधलेले आहे त्या वेळी हवाई हा अमेरिकेच्या नियंत्रणाखालील स्वतत्र प्रदेश होता

होनोलुलू येथे हवाई विद्यापीठ आणि ईस्ट वेस्ट सेंटर ही दोन महत्त्वाची शैक्षणिक केंद्रे आहेत होनोलुलूत एकमेव मराठी भाषिक आहेत त्याचे नाव नारायण वर्दे ते गोव्याच्या माजी शिक्षणमन्त्र्याचे चिरंजीव असून ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये शेतीविषयक संशोधन करतात हे केंद्र १९६० मध्ये अमेरिकेने स्थापन केले पौर्वात्य आणि पाश्चात्त्य देशातील संशोधक व अभ्यासक याना एकत्र आणून विविध संस्कृतींचा आणि ज्ञानाच्या इतर क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी या केंद्राची स्थापना झाली फुलब्राईट शिष्यवृत्त्या घेऊन येथे दहा भारतीय प्राध्यापक व विद्यार्थी सध्या वास्तव्य करीत आहेत समाजशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, वातावरण, टेलिकम्युनिकेशन, शेती, इत्यादी विविध क्षेत्रात अभ्यास करणारे अडीच हजार विद्यार्थी आणि दोनशेवर प्राध्यापक येथे आहेत संस्थेच्या इमारती निसर्गसुंदर वातावरणात आहेत जपान, कोरिया, इंग्लंड, फ्रान्स इत्यादी देशानी या केंद्राच्या उभारणीस साहाय्य केले असून काही देशानी स्वतंत्र इमारती व उद्याने तयार करून दिली आहेत होनोलुलूचा एक विशेष म्हणजे एकेकाळी भारताच्या स्वातन्त्र्यलढ्यात परदेशाचे साहाय्य मिळावे म्हणून गदर चळवळीचे नेते श्री हरदयाळ हे या ठिकाणी सन् युत् सेन याना भेटले होते होनोलुलूत एक हिंदू मंदिरही आहे सिंधी व पंजाबी लोकानी या ठिकाणी व्यापाराचा जम चांगला बसवला आहे हवाई सुंदरींचा नृत्याचा छानदार मोफत कार्यक्रम रोज होतो पाहुण्याना चाफ्याच्या फुलाच्या माळा घालण्याची इथली पद्धत आहे होनोलुलू विमानतळावरून परत जाणाऱ्या प्रवाशाना या माळाचे विशेष कौतुक वाटते हवई विधिमंडळाच्या अधिवेशनाची सुरुवातही स्थानिक मुलींच्या नृत्याने आणि फुलाच्या नजराण्याने होते ईस्ट वेस्ट सेंटरमध्ये पन्नासावर देशाचे विद्यार्थी शिकत असल्याने निरनिराळ्या देशाची गाणी, नृत्ये, नाटके याचे उत्कृष्ट कार्यक्रम येथे वारवार होतात भारतीय सतार आणि दक्षिण भारतीय नृत्य इकडे फार लोकप्रिय आहे

न्यूयॉर्कमध्ये आल्यावर मी न्यूयॉर्क टाईम्सच्या आशियाई विभागातील सहसंपादिका श्रीमती बार्बरा क्रॉसेट याची भेट घेतली त्या भारतात दहा महिने राहिल्या असून चंडीगड येथे त्यानी वृत्तपत्रव्यवसायाचे अध्यापनही केले आहे त्या म्हणाल्या, " अमेरिकन सरकारला भारताविषयी कमी आस्था वाटावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे मला स्वतःला भारताचे महत्त्व पटले आहे जागतिक राजकारणात भारताला अधिक स्थान मिळाले पाहिजे पंजाबने आपली शेती अद्ययावत साधने वापरून उत्तम केली आहे हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे बौद्धिक क्षेत्रातही भारतीय अग्रेसर आहेत हे अनेक अमेरिकन विद्यापीठातील भारतीय प्राध्यापकानी आणि शास्त्रज्ञानी सिद्ध केले आहे श्रीमती क्रॉसेट याची नवी नेमणूक ' न्यूयॉर्क टाईम्स'च्या राजनैतिक प्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टनला झाली आहे राजधानीच्या ठिकाणी भारताविषयी अधिक अनुकूल मत

होईल असे आपण प्रयत्न करू असेही कॉसेट म्हणाल्या

जागतिक कवी परिषदेचे (वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ पोएट्स्) पाचवे अधिवेशन सॅन्‌फ्रॅन्सिस्कोमध्ये अलीकडेच भरले होते या अधिवेशनाला मी हजर होतो जगाच्या विविध भागातून चारशे कवी व कवयित्री या अधिवेशनासाठी आले होते भारतातून १८ कवी आले होते त्यात अमरावतीचे श्री ओ पी भटनागर हे एकमेव मराठी कवी होते ते विदर्भ महाविद्यालयात इग्रजीचे प्राध्यापक आहेत कोरिया ( २४ ), जपान ( २० ), इग्लंड ( २१ ), चीन ( १७ ), रशिया ( २२ ), फिन्लड ( ३ ), फ्रान्स ( ७ ), जर्मनी ( ९ ) असे इतर राष्ट्राचे कवी होते अमेरिकेतून ७५ कवी व कवयित्री यानी अधिवेशनात भाग घेतला. रोझमेरी विल्‌किन्सन या अमेरिकन कवयित्री अध्यक्षस्थानी होत्या भारतातील मद्रास हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. मोहन हे व्यासपीठावर होते. त्यानी कवी आणि बधुत्व ' या विषयावर भाषण केले विशेष म्हणजे या जागतिक कवी परिषदेचा प्रारभ बंगलोर येथील एका गायिकेच्या संस्कृतमधील स्तवनाने झाला

सॅन्‌फ्रॅन्सिस्कोच्या सेट फ्रॅन्सिस हॉटेलमध्ये ही कवी परिषद भरली होती विशेष म्हणजे ३६ वर्षापूर्वी याच हॉटेलमध्ये युनायटेड नेशन्सचा जाहीरनामा मान्य करणाऱ्या राष्ट्राच्या प्रतिनिधींनी संमत केला होता पाचव्या कविसंमेलनात वाचल्या गेलेल्या बहुतेक कविताचा विषयही शातता, विश्वबधुत्व आणि प्रेम हा होता अनेक कवींनी आपले काव्यसंग्रह फुकट वाटले या जागतिक कवी परिषदेतही काव्याच्या पुस्तकाची विक्री नगण्य झाली बहुतेक कवीनी आपणच स्वखर्चाने आपले संग्रह प्रसिद्ध केले असे सागितले

श्री इगॉर मिखेलुसेन्को या रशियन कवीने आपल्या भाषणात सागितले, “रशियात लेखकाला व कवीला फार मान आहे. आम्ही आमच्या लेखनक्षेत्रात स्वतंत्र असतो ” प्रश्नोत्तराच्या वेळी मात्र त्याना अनेकानी छेडून विचारले, “मग सोल्झेनित्सिन आणि पास्तरनाक याचे रशियात हाल का झाले ? ” त्यावर श्री मिखेलुसेन्को यानी “ साहित्य आणि राजकारण याची गल्लत नको ” असे गुळमुळीत उत्तर दिले. पाच दिवस चाललेल्या या अधिवेशनात शभरावर कवी आणि कवयित्री त्यानी आपल्या कविता वाचल्या. मात्र त्यापैकी ७५ टक्के कवयित्री होत्या आणि त्यातील बहुतेक ८५ ते ९० टक्के स्त्रिया साठी उलटलेल्या होत्या जगातील प्रमुख कवीऐवजी सामान्य आणि दुय्यम-तिय्यम दर्जाचे कवी आणि विशेषत: कवयित्री याचीच उपस्थिती अधिक होती म्हणून सॅन्‌फ्रॅन्सिस्कोच्या वृत्तपत्रानी ‘ ओल्ड वुईमेन्स नीडल क्लब ( वृद्ध ' स्त्रियानी विणत बसण्याची संघटना ) असे या जागतिक कवी परिषदेचे वर्णन केले होते ?

काव्य आणि सगीत, काव्य आणि वैद्यक, काव्य आणि विज्ञान, काव्य आणि धर्म,

अमेरिकन काव्य, अशा विविध विषयावर परिसवाद झाले त्याशिवाय फ्रेंच, स्पॅनिश, स्वीडिश अशा निरनिराळ्या भाषातील काव्यावरही चर्चा झाली कार्यक्रमपत्रिकेत श्री सिद्धरामय्या याचे योगावर भाषण हा एक कार्यक्रम होता काव्य आणि योग याचा संबध कवींना सहजासहजी समजला नाही मी करतो ती शस्त्रक्रिया ही एक कविताच असते ' असे एका डॉक्टर कवींनी काव्य आणि वैद्यक या विषयावर बोलताना सागितले अमेरिकन सरकारने या जागतिक काव्य परिषदेस आर्थिक साहाय्य न केल्याबद्दल अध्यक्षा रोझमेरी विल्किन्सन यानी दुःख व्यक्त केले

## थिएटर–डिस्ट्रिक्ट

न्यूयॉर्कमधील नाट्यप्रयोगाना आता बहर आला आहे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर हा प्रवाशाचा मोसम शिवाय या काळात हवामान उत्तम असते सुट्याची, करमणुकीची ही सर्वात मोठी पर्वणी अशा वेळी न्यूयॉर्कच्या रगमचालाही नवा उत्साह आला आहे टाईम्स चौकाच्या आसपासचा भाग हा थिएटर-डिस्ट्रिक्ट म्हणून ओळखला जातो एक चौरस मैलाच्या या विभागात चाळीसवर नाट्यगृहे आहेत या वर्षाचे सर्वोत्कृष्ट नाटकाचे पारितोषिक ' अमाडियस ' या नाटकाला मिळाले आहे पीटर शेफर्ड याचे हे नाटक जगप्रसिद्ध ऑस्ट्रियन संगीतकार मोझार्ट याच्या जीवनावर आधारलेले आहे एलिझाबेथ टेलर या विख्यात चित्रपट अभिनेत्रीचे रगभूमीवर पदार्पण ही नाट्य-क्षेत्रातील महत्त्वाची घटना त्याची प्रमुख भूमिका असलेले ' लिटल फॉक्सेस हे नाटक हाऊसफुल्ल गर्दी खेचत आहे मिकी रूनी हा जगप्रसिद्ध चित्रपट अभिनेता सध्या ' शुगरबेबी ' या सगीतप्रधान नाटकात काम करीत आहे न्यूयॉर्कचा रंगमचाचा या वेळचा विशेष म्हणजे सगीतप्रधान नाटकाना आलेली तेजी. ' इव्हिटा ' हे सर्वोत्कृष्ट सगीतप्रधान नाटक ठरले आहे त्याशिवाय ' फॉर्टीसेकंड स्ट्रीट ', ' फिफ्थ ऑफ जुलाई ', ' बर्फलो ' ही संगीतप्रधान नाटके आघाडीवर आहेत गेल्या वर्षी न्यूयॉर्कच्या ब्रॉडवे विभागातील नाटकानी उत्पन्नाचा उच्चाक केला आहे १९८० मध्ये १ कोटी १० लाख प्रेक्षकानी ब्रॉडवेवर नाटके पाहिली त्यानी सुमारे १५ कोटी डॉलर्स नाटकावर खर्च केले

अमेरिकन सरकारने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार अमेरिकेतील आशियाई लोकाची सख्या १९७० मध्ये १५ लक्ष ३८ हजार होती, ती १९८० मध्ये ३५ लाखावर गेली आहे. न्यूयॉर्क शहरात २ लाख ३१ हजार आशियाई लोक असून त्याखालोखाल शिकागो येथे ६९ हजार आशियाई आहेत अमेरिकेतील भारतीयाची संख्या ३ लाख आहे सरकारी अधिकृत नोंदीत मराठी भाषिकाचा वेगळा गट नाही, पण तेथील लोकाच्या माहितीनुसार अमेरिकेत सुमारे पाच हजार मराठी भाषिक असून त्यापैकी जास्तीत जास्त म्हणजे सुमारे सोळाशे लोक न्यूयॉर्कमध्ये आहेत.

फिलाडेल्फिया, शिकागो, डेट्रॉईट, वॉशिंग्टन, लॉस एंजेलिस, सॅन्फ्रॅन्सिस्को येथेही भाषिक लोक मोठ्या प्रमाणावर आहेत इंजिनियरिंग, आर्किटेक्चर, वैद्यक, शिक्षण अशा विविध क्षेत्रात हे लोक काम करीत आहेत. वरील सर्व ठिकाणी महाराष्ट्र मंडळे असून दिवाळी, गणेशोत्सव वगैरे सण साजरे होतात. वॉशिंग्टन व न्यूयॉर्क येथे हिंदू मदिरे असून शिकागोला जगप्रसिद्ध विवेकानद सोसायटी आहे. मराठी भाषा आणि सस्कृती जपण्यासाठी येथील मराठी भाषिक विशेष उत्सुक असतात 'एकता' हे त्रैमासिक टोरंटो व उत्तर अमेरिका या भागातील मराठी भाषिकांच्यातर्फे प्रसिद्ध होत असते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# १०

## भक्कम नोकरशाहीने जपलेले फ्रान्सचे स्थैर्य

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मित्तराँ यानी आपल्या सरकारमध्ये कम्युनिस्टांचा समावेश केला आणि अमेरिका व इंग्लंड याना धक्का दिला पण प्रत्यक्ष फ्रान्समध्ये आल्या-वर या घटनेचा जो अन्वयार्थ लागतो, तो धक्कादायक नाही. गेली पंचवीस वर्षे या देशातील १६ ते २० टक्के मतदार सातत्याने कम्युनिस्टांच्या बाजूने मतदान करीत आले आहेत यापूर्वी तीन वेळा कम्युनिस्टांना सरकारमध्ये लहानसहान खाती देण्यात आली होती, पण त्यामुळे त्यानी सर्व सत्ता बळकावल्याचे उदाहरण नाही ज्या पक्षाच्या मागे देशातील जवळजवळ एकपंचमांश लोक सतत आहेत त्याना प्रति-निधित्व मिळणे लोकशाहीला धरूनच आहे. फ्रान्समधील बहुसंख्य जनता परंपरावादी असल्याने ते एकदम डावीकडे झुकण्याचा मुळीच संभव नाही. कम्युनिस्टांना लहान-सहान खाती देऊन संपासारख्या मार्गापासून देशाला वाचवणे ही राजकारणातील एक हितप्रद खेळी आहे.

### भक्कम नोकरशाही

फ्रान्सच्या सरकारमध्ये अनेकदा अनपेक्षित आणि झपाट्याचे बदल होऊनही सरकारी यंत्रणा अतिशय सुरक्षित व स्थिर असते. याचे कारण म्हणजे भक्कम नोकरशाही, साठ-सत्तर वर्षांपूर्वीच्या भारताप्रमाणेच फ्रान्समध्येही समाजातील उत्तम बुद्धिवान वर्ग सिव्हिल सर्व्हिस म्हणजे सरकारी नोकरीकडे आकर्षिला जातो म्हणून आपल्याकडील पूर्वीच्या आय सी एस सारखी कार्यक्षम वरिष्ठ अधिकाऱ्यांची

बळकट फळी या देशात निर्माण झाली आहे मन्त्रिमंडळातील बदलीचा या यंत्रणेवर कसलाही परिणाम होत नाही व त्यामुळे कोणतेही सरकार आले तरी सरकारी कामाचा गाडा सुस्थित राहतो

सध्या फ्रान्समधील वातावरण उत्तम आहे व्यापार-उद्योगधंदे तेजीत आहेत सुट्याचा मोसम असल्याने परदेशी प्रवासी पॅरिसमध्ये खच्चून भरले आहेत. नाट्यगृहे, रेव्ह्यूची प्रेक्षागृहे, नाईट क्लब्स याना तुडुंब गर्दी आहे. जगातील महिलांच्या नव्या नव्या फॅशन्स सुरू करण्यात पॅरिस शहर पूर्वीप्रमाणेच अग्रेसर आहे साहित्य, चित्रपट, नाट्य, प्रकाशन, संगीत, ऑपेरा इत्यादी सास्कृतिक क्षेत्रातील धुरीणत्व हा देश राखून आहे राजकारणातील बदलाचा सास्कृतिक क्षत्रावर तिळमात्रही परिणाम होत नाही पूर्वीच्या कॉलनीत या देशाचा जीव अजून गुंतून राहिला आहे कोणीही फ्रेंच गृहस्थ भेटला व त्याला आपण भारतीय आहोत असे सांगितले तर तो चटकन विचारतो, " म्हणजे आपल्या पॉंडेचरीचे का ? "

## आर्थिक बळकटी

फ्रान्सविषयी परदेशात बरेच गैरसमज आहेत पॅरिस येथील रंगेल नाईट क्लब्सच्या ख्यातीमुळे फ्रान्स हा फक्त ख्यालीखुशाली आणि मौजमजेचा देश अशी सर्वसाधारण कल्पना आहे पण ती चुकीची आहे वस्तुतः आर्थिकदृष्ट्या फ्रान्स हा एक बळकट आणि प्रगतिशील देश आहे या देशातील बेकारी फक्त सात टक्के आहे चलनवाढ फक्त १२ टक्के आहे आणि गेली तेरा वर्षे राष्ट्रीय उत्पन्न सतत ४½ टक्क्यानी वाढत आहे अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न फक्त २ ७ टक्क्यानी वाढत आहे यावरून फ्रान्सच्या प्रगतीची कल्पना येईल जपानखेरीज इतर कोणत्याही राष्ट्राच्या गुतवणुकीची प्रगती फ्रान्सइतकी नाही मित्तराँ याचे सरकार आल्यावर लवकरच त्याने किमान वेतनात १० टक्के वाढ केली ( फ्रान्समध्ये दर तासाला ३० रुपये असे किमान वेतन आहे ). वृद्धाना सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या भत्त्यात २५ टक्क्यानी वाढ केली आणि सर्व पगारी नोकराना वर्षातून चार आठवड्याऐवजी पाच आठवडे भरपगारी सुटी वाढवून दिली फ्रान्समध्ये बेकाराना, गरिबाना आणि अपगाना खास भत्ता मिळतो अर्थव्यवस्थेला अधिक चालना देण्यासाठी नव्या सरकारने ५४,००० नव्या जागा निर्माण केल्या इग्लडचे सरकार काटकसरीसाठी नोकरकपात करीत असताना फ्रान्सचे हे पाऊल धाडसाचेच म्हटले पाहिजे एक वर्षात आणखी दीड लाख सरकारी नोकऱ्या निर्माण करण्याचे सरकारने ठरवले आहे विमानाची निर्मिती, विद्युत्वर चालणाऱ्या यंत्राचे उत्पादन आणि रसायने याच्या उत्पादनात भरीव वाढ करण्याची योजनाही सरकारने कृतीत आणली आहे फ्रान्समधील बेकारीचे प्रमाण या नव्या योजनेमुळे किमान राहील असा अर्थतज्ज्ञाचा विश्वास आहे.

## ‘ युनेस्को ’ची कचेरी

‘ युनेस्को ’ या यूनोच्या सास्कृतिक विभागाची जागतिक कचेरी पॅरिसमध्येच आहे. या मध्यवर्ती कचेरीच्या प्रसिद्धी विभागाचे नायब डायरेक्टर जनरल म्हणून महाराष्ट्रातील लेखक व विचारवत श्री दिलीप पाडगावकर काम करीत आहेत त्याना मी भेटलो ‘ युनेस्को ’च्या येथील कचेरीत साडेतीन हजार लोक काम करतात. त्यात पाडगावकर हे एकमेव महाराष्ट्रीय आहेत पूर्वी ते पॅरिस येथे ‘ टाईम्स ऑफ इंडिया ’ चे प्रतिनिधी होते त्यानतर काही काळ त्यानी ‘ टाईम्स ’च्या मुबई आणि नवी दिल्लीच्या आवृत्त्यात सहायक संपादक म्हणूनही काम केले तीन वर्षे बॅंकॉकला युनेस्कोचे प्रसिद्धी अधिकारी म्हणून काम केल्यानतर ते गेल्या महिन्यापासून पॅरिसला आले आहेत

१९४६ मध्ये युनेस्कोची स्थापना झाली, त्या वेळी तिचे ४५ सभासद होते आज ही संख्या १५५ झाली आहे. युनेस्कोच्या कार्याविषयी बोलताना श्री दिलीप पाडगावकर म्हणाले, “ आताच्या सभासदात नव्याने स्वतत्र झालेल्या राष्ट्राची संख्या मोठी आहे या राष्ट्राच्या अपेक्षा आणि आकाक्षा याचे प्रतिबिंब युनेस्कोच्या कार्यक्रमात पडणे साहजिकच आहे सर्व देशाच्या सस्कृतीची प्रतिष्ठा समान आहे हे युनेस्कोचे तत्त्व आहे शातता हे युनोस्कोचे एक उद्दिष्ट आहे, पण शातता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नाही मानवी हक्काचे संरक्षण आणि विकास ही शाततेची मूलभूत अगे आहेत जगातील विविध देशाचे लेखक, विचारवंत, संपादक, शिक्षणतज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ यात सुसंवाद राहावा यासाठी युनेस्को प्रयत्नशील असते विकसनशील देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढावे व विशेषत. त्या भागातील मुली व प्रौढ स्त्रिया याना शिक्षणाचा लाभ मिळावा इकडे युनेस्कोचा कटाक्ष आहे

## वार्ताप्रसरण

जागतिक वृत्तप्रसरणात सध्या केवढा मोठा असमतोल आहे हे सागताना श्री दिलीप पाडगावकर म्हणाले की, अमेरिकेतील दोन वृत्तसस्था सध्या दररोज तीन कोटी शब्दाच्या बातम्या प्रसारित करतात पश्चिम युरोपमधील तीन वृत्तसस्था दररोज तीस लक्ष शब्दाच्या वार्ता जगात पाठवतात याउलट तिसऱ्या जगातील सर्व वृत्तसंस्था मिळून दररोज फक्त दोन लक्ष शब्दाच्या बातम्याचे प्रसारण करतात. यामुळे जगातील सर्व वृत्तपत्रात अमेरिका आणि पश्चिम युरोप याचा प्रभाव असलेल्या बातम्या लोकाना वाचाव्या लागतात

टेलिव्हिजनच्या बाबतही हीच वस्तुस्थिती आहे जगातील सर्व टेलिव्हिजन कार्यक्रमापैकी ७५ टक्के कार्यक्रम एकट्या अमेरिकेत होतात, ५० टक्के चित्रपट अमेरिकेत दाखवले जातात. ६० टक्के ध्वनिमुद्रिका आणि कॅसेट्स अमेरिकेत वाजवल्या जातात

आणि जगातील ६५ टक्के जाहिरातींचे उत्पन्न एकट्या अमेरिकेला मिळते ! जगातील ३० टक्के प्रदेशात एकही वृत्तपत्र नाही. जगातील ७५ टक्के लोकसंख्येस टेलिव्हिजन पाहायला मिळत नाही अशा असमतोलाच्या परिस्थितीत लोकशिक्षणाचे कामही अमेरिकेत फार पुढे तर अनेक भागात जवळजवळ शून्य असे होत राहिले आहे. जगातील अशा दुर्लक्षित भागाकडे 'युनेस्को' विशेष लक्ष देत आहे सर्व देशाच्या सस्कृती आदरणीय आहेत, असे युनेस्कोचे धोरण आहे आणि त्या त्या सस्कृतीचे जतन करणे हे युनेस्कोने अंगीकृत केलेले कार्य आहे इजिप्त, भारत, पाकिस्तान, श्रीलका, थायलड अशा अनेक देशातील जुने अवशेष रक्षण करण्याचे काम युनेस्कोने हाती घेतले आहे व त्यासाठी लक्षावधी डॉलर्स खर्च केले आहेत. दक्षिण भारतातील नृत्याच्या सशोधनासाठीही या संस्थेने साहाय्य केले आहे " असे श्री पाडगावकर म्हणाले

'युनेस्को'चे १९७९ व १९८० चे अदाजपत्रक तीस कोटी डॉलर्सचे होते दर दोन वर्षासाठी साधारण एवढी रक्कम खर्च होते मध्यवर्ती कचेरीत १२० राष्ट्रांचे नागरिक काम करतात. ४४० आतरराष्ट्रीय सघटना युनेस्कोसाठी कार्य करतात. युनेस्कोतर्फे 'इम्पॅक्ट' आणि 'युनेस्को कुरियर' अशी दोन नियतकालिके सर्वासाठी आणि म्युझियम्स, संस्कृती, समाजशास्त्र अशा खास विषयाना वाहिलेली बारा नियतकालिके युनेस्कोतर्फे निघतात दरसाल सास्कृतिक विषयावरील अनेक पुस्तकेही या संघटनेतर्फे प्रसिद्ध केली जातात प्राचीन प्रौर्वात्य ग्रथाची भाषातरे विशेष उल्लेखनीय असून, युनेस्कोने 'ज्ञानेश्वरी'चे इग्रजी भाषातरही प्रसिद्ध केले आहे

## फ्रान्स-इंग्लड बोगदा

फ्रान्स आणि इग्लड याना जोडणारा बोगदा इंग्लिश खाडीच्या खालून काढण्याच्या योजनेला पुन्हा चालना मिळाली आहे ही योजना इतकी जुनी आहे की, १८०२ मध्ये नेपोलियनने प्रथम ही सुचवली पण इंग्लडवर स्वारी करणे परकीयाना या बोगद्यामुळे सुलभ होईल म्हणून ईंग्लड गेली दीडशे वर्षे त्या योजनेला विरोध करीत आहे अलीकडच्या काळात मात्र युरोपियन कॉमन मार्केटमध्ये इंग्लडचा समावेश झाल्यानतर या तऱ्हेचा बोगदा असावा याबद्दल इग्लड आणि फ्रान्स या दोन्ही देशात लोकमत अनुकूल होत आहे फ्रान्समधील कॅले आणि इग्लडमधील डोव्हर याना मुख्यतः हा नियोजित बोगदा जोडील त्यातून दररोज १२० आगगाड्या आणि ५० हजार मोटारी जातील सुमारे दोन अब्ज डॉलर्सचा खर्च या योजनेसाठी येईल असा अंदाज आहे ब्रिटिश रेल या इग्लडच्या सरकारी रेल्वेने हा अंदाज दिला आहे. मात्र इग्लड, फ्रान्स, हॉलड आणि जर्मनी या चार देशाच्या एका संयुक्त इंजिनिअरिंग कंपनीने या खर्चापेक्षा ६५ कोटी डॉलर्स कमी खर्चाचे टेंडर सादर

केले आहे. बारा वर्षांत टोलच्या रूपाने या बोगद्याचा खर्च भरून येईल अशी अपेक्षा आहे. टनेल आणि चॅनेलचे समिश्र नाव घेऊन या नियोजित बोगद्याला 'चनेल' असे नाव देण्यात आले आहे पारपरिक रीतीने चढाई होणे कठीण आहे आणि पश्चिम युरोपमध्ये दोस्त राष्ट्रेच आहेत, या दोन विचारानी इंग्लंडमध्ये आता या योजनेला फारसे विरोधक उरले नाहीत

## मराठी लोक

फ्रान्समध्ये सुमारे ६० मराठी कुटुबे स्थायिक झाली आहेत त्यापैकी २० कुटुंबे पॅरिसमध्ये राहतात श्री. राजगुरु, श्री पाध्ये (एअर इडिया), पाडगावकर (युनेस्को), श्री शिंत्रे, श्री. सवईकर, श्री वामन भिडे अशी काही नावे सागता येतील मात्र राहण्याच्या ठिकाणातील मोठी अतरे आणि महाराष्ट्रीयाची अल्पसंख्या यामुळे महाराष्ट्र मडळासारखी संस्था नाही. वैयक्तिक पातळीवरच लोकाच्या भेटी-गाठी होतात

# ११

## बेशिस्त आणि असुरक्षिततेने ग्रासलेला आजचा इटली

पॅरिसहून मी आगगाडीने रोमला निघालो लिऑं स्टेशनवरून सकाळी साडेदहाला निघणारी गाडी रात्री मिलानला पोचणार होती. तिथे गाडी बदलून रोमची गाडी घ्यायची होती. मिलानपर्यंतचा प्रवास चांगला झाला. वाटेत स्वित्झर्लंड ओलांडले. पण मिलान ते रोम ही गाडी मात्र खच्चून भरली होती युरोपमधील इतर शिस्तबद्ध, सौंदर्यपूर्ण देश आणि इटलीचा गबाळेपणा, अदाधुदी याचे मिलानला प्रत्यंतर आले

### पाण्यासाठी १२ रुपये

माझे पहिल्या वर्गाचे तिकीट असूनही पहिला आणि दुसरा हे दोन्ही वर्ग आपल्याकडच्या पंढरपूरच्या आषाढी यात्रेत बार्शी लाईटचे डबे भरतात तसे मेंढराप्रमाणे माणसे कोंबलेल्या अवस्थेत होते रात्री अकरा वाजता मिलानला हॉटेल शोधण्यापेक्षा गर्दीतून प्रवास करण्याचे मी पसंत केले आणि सकाळी सहाला रोमला पोचलो वाटेत कुठेही खाण्यापिण्याची सोय नाही. गाडीतील कॅन्टीनपर्यंत पोचणे अत्यंत अवघड आणि इटली हा चोरीबद्दल नामांकित देश असल्याने सामान डब्यात ठेवून कॅन्टीनपर्यंत जाणे धोक्याचे होते म्हणून रात्रीचे जेवण मिलान स्टेशनवरच सँडविच खाऊन भागवावे लागले सँडविचबरोबर सुलभपणे मिळणारी इटालियन उग्र वाईन होती पण त्याऐवजी पाणीच घ्यावे म्हणून मी पाणी मागितले. वेटरने पाण्याची बाटली आणि ग्लास समोर ठेवला आणि त्या पाण्याचे बारा रुपये लिरामध्ये घेतले! इटलीत, जर्मनीत किंवा फ्रान्समध्ये पाण्यापेक्षा वाईन किंवा बियर स्वस्त मिळते इटलीत

कोकाकोला किंवा पाण्याला आठशे लिरा तर बियरला सहाशे लिरा पडतात (एक हजार लिरा म्हणजे सुमारे नऊ रुपये )

रोम म्हटले की मनावर एक प्रकारचे दडपण पडते प्राचीन रोमने साऱ्या जगावर दरारा पसरवला होता अजूनही जगभर पसरलेल्या रोमन कॅथॉलिकाचे धर्मगुरू पोप याची ही राजधानी क्रौर्याबद्दल प्रसिद्ध असणारा नीरो आणि धैर्याबद्दल मशहूर असणारा ज्युलियस सीझर अशा सम्राटाची ही भूमी कोलोसियम या इथल्या प्रचंड स्टेडियममध्ये खवळलेल्या सिंहाच्यापुढे गरीब ख्रिश्चनाना टाकण्यात येत असे आणि सम्राटाच्या करमणुकीसाठी योद्धे एकमेकाचे शिरच्छेद करीत असत मायकेल ॲंजेलो सारख्या जगातील सर्वश्रेष्ठ चित्रकाराची ही कर्मभूमी रोम एकेकाळी जगातील सत्ताचा मध्य बिंदू होता म्हणून 'ऑल रोड्स लीड टू रोम (सर्व रस्ते रोमकडे जातात ) अशी म्हण रोमन साम्राज्याच्या तेराशे वर्षांच्या वैभवशाली कारकीर्दीत पडली होती प्राचीन रोमन शिल्प आणि स्थापत्यकलानी जगाच्या बहुतेक सर्व भागावर अद्यापही छाप ठेवली आहे रोम हे विश्वविख्यात शहर रोमलुस आणि रेमस या दोन बंधूनी इसवी सनापूर्वी ७५३ मध्ये बसवले त्या काळचे काही पूल आज दोन हजार वर्षानंतरही बळकट आहेत. भव्यता आणि वैभव याचा रोमन साम्राज्याशी अजोड संबध आहे सार्वजनिक स्नानगृहेसुद्धा एवढी प्रचंड असत की, एकावेळी तीन तीन हजार लोकाना तेथे स्नान करता येत असे सर्कस मॅक्झिमस या रिंगणात जेव्हा रथाच्या शाही शर्यती चालत तेव्हा तीन लाख प्रेक्षक त्या पाहण्यासाठी गर्दी करीत

## आजचा असुरक्षित इटली

मात्र आजचा इटली या जुन्या पराक्रमाच्या आठवणीवरच जगत आहे दोन महायुद्धानी खचून गेलेल्या या देशाची नैतिक पातळी फार खाली गेली आहे सबंध युरोपमध्ये हा सर्वात असुरक्षित देश. परकीय प्रवाशाचे सामान चोरीला जाणे हा इथला नेहमीचा अनुभव प्राचीन वैभव पाहायला आलेला प्रवासी शिरसलामत आणि चोरीमारी न होता इथून सुटला तर तो नशीबवान समजला पाहिजे फसवाफसवी आणि बनवाबनवी करण्यात इटलीतील अनेक सरकारी नोकर आणि खुद्द पोलिसही भाग घेतात ! गेल स्टेशनवर मी उतरलो तेव्हा माझ्याकडे फ्रॅंकच्या म्हणजे फ्रान्सच्या नोटा होत्या त्या बदलून मला लिरा घ्यायच्या होत्या पैसे बदलून देणारे मनी एक्स्चेंज ' बंद होते. जवळच उभ्या असलेल्या रेल्वे पोलिस अधिकाऱ्याला मी विचारले "ही कचेरी कधी उघडते ?" त्याने सांगितले, "आज शनिवार ही सोमवार शिवाय उघडणार नाही तुम्हाला इटालियन पैसे पाहिजे असतील तर मी देतो." मी वटणावळीचा दर विचारला तेव्हा तो म्हणाला, "शभर फ्रॅंकला सोळाशे लिरा".

मला आश्चर्य वाटले. कारण अधिकृत दर शंभर फ्रँकला दोन हजार लिरा होता! आमचे हे बोलणे चालले होते इतक्यात एक्स्चेंजची कचेरी उघडली आणि मला दोन हजार लिराचे दराने चलन मिळाले पण रेल्वे पोलिसाने मला फसविण्याचा केलेला प्रयत्न मात्र लक्षात राहिला ज्या देशात पोलिसच लोकाना मार्गदर्शन करण्याऐवजी लुबाडतात, तेथे हजारो वर्षांपूर्वीची प्राचीन सस्कृती काय उपयोगी पडणार?

रोममध्ये हॉटेलात उतरलो पण तिथे कळले की सर्व्हिस नाही!' कारण काय? तर रोममधील सर्व वेटर्सनी संप पुकारला आहे! इटलीतल्या सारखे आळशी कामगार जगाच्या पाठीवर कुठेही नाहीत त्यातल्या त्यात हॉटेल्सच्या वेटर्सना तर चागला पगार, खायला-प्यायला उत्तम आणि वर निदान पधरा टक्के टिप्स तरीही हे वेटर्स प्रवाशाचा ऐन मोसम आला की अचानक संपावर जातात त्याच्या नेहमीच्या मागण्या दोन अधिक पगार हवा आणि अधिक सुट्या हव्यात त्यामुळे हॉटेल मालक त्रस्त झाले आहेत त्यानी दर वाढविले की प्रवासी नाराज होतात कमी दराच्या हॉटेलमध्ये जातात किंवा मुक्काम कमी करतात

वेटर्सच्या मागोमाग रोममधील बड्या हॉटेल्सच्या स्वयपाक्यानीही सप केला अर्थातच अमेरिकन, ब्रिटिश, जपानी हजारो प्रवाशाचे थवे रस्त्यावरच्या आणि स्टेशन्सवरच्या खाद्यपेयाच्या स्टॉल्सवर तुटून पडले! वर्तमानपत्रातून सपवाल्यावर कडक टीका झाली, पण ते वाईन पीत आराम करीत होते इटलीत अनेक कामगाराना आणि कचेऱ्याना १२ ते ३ पर्यंत जेवणाची सुटी असते कारण हे कर्मचारी जेवणासाठी घरी जाणार, भरपूर वाईन पिणार, मसालेदार जेवण घेणार, त्यानतर वामकुक्षी करणार आणि मग सवडीने पुन्हा कामावर येणार! या पेशवाई वागण्याने राष्ट्रीय उत्पन्न खाली जात आहे, परदेशी प्रवासी नाराज होत आहेत याची कुणालाही पर्वा नाही व्हेनिसमध्ये मी गेलो सकाळी दहा वाजता सहाशे लिराला बियर आणि आठशेला सॅडविच होते दुपारी एक वाजता जेवणासाठी त्याच कॅफेमध्ये गेलो आणि तेच जिन्नस मागवले त्या वेळी त्याचे दर आठशे आणि बाराशे लिरा, कारण जेवणाच्या वेळी व्हेनिसमध्ये परकीय प्रवाशाची जास्त गर्दी असते प्रवाशाना सर्व शक्य मार्गांनी लुबाडण्याचे कार्य इटलीत उन्हाळ्याच्या मोसमात सतत चालू असते मिलान ते रोम या प्रवासात मला मद्रासकडील दोघे प्रवासी भेटले होते रोमहून व्हेनिसला बरोबर जाऊ असे आमचे बोलणे झाले होते, पण व्हॅटिकनला ( सेंट पीटर्स चर्च ) ते दोघे भेटले तेव्हा म्हणाले, "आम्ही आमची पुढची सफर रद्द केली आहे कारण आमची दोघाचीही पैशाची पाकिटे रोममध्ये चोरीला गेली!"

## चलनवाढीचा कळस

युरोपमधील सर्व देशात इटलीचे चलनवाढीचे प्रमाण अधिक आहे, बेकारीचे

प्रमाण सर्वाधिक आहे आणि अत्याचाराचे प्रमाणही सर्वाधिक आहे लिरा हे इटालियन चलन जागतिक नाणेबाजारात दिवसेंदिवस घसरत आहे. इतर देशात ५ ते ८ टक्के चलनवाढ होत असता इटलीत दरसाल २१ टक्के चलनवाढ होत आहे ! पतप्रधान स्पॅडोलिनी यानी अधिकारस्वीकार केल्यानतर काही तासातच औद्योगिक कामगार सघटनानी धमकी दिली की, चलनवाढीच्या ( म्हणजे २१ टक्के ) प्रमाणात दरसाल वेतनवाढ झाली नाही तर देशभर सप करून सारा कारभार बद पाडू दरसाल एकवीस टक्के पगारवाढ कोणत्याही देशाला परवडेल काय ? पण इटालियन कामगार त्याचा विचार करीत नाहीत म्हणून जगात सपाचे किमान प्रमाण असणारा देश जपान तर दुसऱ्या टोकाला जास्तीत जास्त सप जेथे होतात तो देश म्हणजे इटली या देशाच्या अदाजपत्रकात या वर्षीची तूट ४५ अब्ज डॉलर्सची आहे पतप्रधान स्पॅडोलिनी हे रिपब्लिकन पक्षाचे आहेत, पण त्याच्या समिश्र मंत्रिमडळाच्या २७ पैकी १५ मत्री हे ख्रिश्चन डेमोक्रॅट पक्षाचे आहेत आणि परराष्ट्र संबध, गृह अशी महत्त्वाची खाती ख्रिश्चन डेमोक्रॅटस पक्षाकडे आहेत या देशातील राजकीय अस्थैर्य इतक्या शिगेला पोहोचले आहे की गेल्या ३६ वर्षांत इटलीत ४१ सरकारे आली ! देशाचा कारभार ३५ वर्षे ख्रिश्चन डेमोक्रॅट्स पक्षाकडे होता. कम्युनिस्टाचाही या देशावर जबरदस्त प्रभाव आहे ख्रिश्चन डेमोक्रॅट्स पक्षाने अनेकदा सरकार बनविण्यासाठी कम्युनिस्टाचे साहाय्य घेतले या दोन पक्षाचेही एकमेकाशी वैर. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, हे दोन्ही पक्ष एकमेकाना विटले आहेत आणि देशातील जनता या दोन्ही पक्षाना विटली आहे

## अत्याचारांचे थैमान

चलनवाढ आणि संप याबरोबरच अत्याचारातही इटलीचा क्रमाक पहिला आहे 'गॉड फादर' ही कादबरी आणि चित्रपट इटलीतील मफिया या अट्टल गुन्हेगाराच्या क्रूर कृत्यावर आधारला आहे पैशाची खडणी मागण्यासाठी व्यापारी, श्रीमत कारखानदार याना पळवून नेणे आणि खडणी मिळाली नाही तर त्याचा खून करणे या अत्याचारी प्रकाराना ऊत आला आहे त्याशिवाय गुन्हेगाराच्या टोळ्यामधील अतर्गत कलहामुळे खून, अत्याचार होतात ते वेगळेच राजकारणातील आत्यतिक टोकाच्या क्रातिकारकानी अलीकडेच बलोना स्टेशनवर टाकलेल्या बॉम्बमुळे ८५ लोक मरण पावले अर्थकारण आणि राजकारण यापासून सर्वस्वी अलिप्त असलेल्या पोप याच्यासारख्या धर्मप्रमुखाच्यावरही एका माथेफिरूने व्हॅटिकनच्या सेंट पीटर्स चर्चच्या आवारात अलीकडेच गोळी झाडली आणि त्या अत्याचाराने सबध सुसस्कृत जगाला धक्का दिला. गुन्हेगाराच्या टोळ्यापुढे पोलिस अनेकदा हतबल होतात सरकार आणि पोलिस याना न मानणारा इटलीसारखा देश जगात दुसरा नसेल खून,

दरोडे, कोट्यवधी लिरा भरदिवसा पळवणे अशा मोठ्या गुन्ह्याच्या तपासाची पोलिसाच्यावर एवढी जबाबदारी असते की, कोणा प्रवाशाची बॅग पळवली किंवा पाकीट, पासपोर्ट चोरीला गेला अशा किरकोळ गुन्ह्याकडे लक्ष द्यायला त्याना वेळ नसतो कोणी तक्रार केलीच तर ते गुन्हा नोंदवून घेतात एवढेच नवा पासपोर्ट मिळवण्यासाठी फक्त त्या तक्रारीचा उपयोग होतो

संप, चलनवाढ, अत्याचार, बेशिस्त अशा अनेक अडचणींतूनही इटली देशाचा कारभार कसा चालतो हा एक चमत्कारच आहे. कारण इटली हा देशच लॅन्ड ऑफ मिरॅकल्स ( दैवी चमत्काराचा देश ) म्हणून विख्यात आहे.

# १२

## चार्वाकाचे खरे वारसदार आजचे इटालियन

इटली हा चमत्काराचा देश आहे हे तर खरेच पिसा येथील झुलता मनोराच पाहा ना गुरुत्वाकर्षणाचे सारे नियम झुगारून हा मनोरा शेकडो वर्षे आहे तिथेच उभा आहे प्रथमच त्याच्याकडे पाहणाऱ्या भाबड्या प्रेक्षकाला वाटते, आता हा कोसळून पडणार ! पण तो काही पडत नाही इटली या देशाचेही अगदी तसेच आहे सर्वत्र पसरलेल्या बेकारी, चलनवाढ, आणि अनागोंदीमुळे हा देश अराजकाचा बळी ठरणार असे गेल्या महायुद्धापासून वाटत होते, पण प्रत्यक्षात जर तुम्ही रोम, मिलान, व्हेनिस, फ्लॉरेन्स या इटलीतील प्रमुख शहरात गेलात तर तिथले जीवन अगदी निश्चित चालले आहे, असे आढळून येईल मी तेथे होतो ते सुट्टीचे दिवस होते प्रवासी येण्याचे आणि कोट्यावधी डॉलर्सची उलाढाल होण्याचे ते दिवस, पण इटलीतील बहुतेक कामगार चक्क महिनाभराच्या सुटीवर ! जगात काय वाटेल ते होवो, पण ऑगस्टमध्ये समुद्रकिनारी जाऊन पाण्यात डुंबत राहायचे, मग शीण घालविण्यासाठी सिझानो वाईन प्यायची आणि त्यावर मासे आणि स्पॅघेटी चापून विश्राती घ्यायची हा कार्यक्रम सोडायला इटालियन जनता तयार नाही

### सुट्ट्यांची प्राचीन परंपरा

सुट्ट्या घेणे ही इटलीतील प्राचीन परंपरा आहे ज्यूलियस सीझरच्या काळात ( इ स पूर्व ४९ ) या देशात वर्षातून शंभर दिवस सुटीचे असत. त्यापैकी बहुतेक सुट्ट्या धार्मिक असत. पुढे धर्माचे प्राबल्य कमी झाले, पण फुकट मिळणाऱ्या

मुद्द्याचे प्राबल्य कमी झाले नाही रेल्वे, बँका, टपाल कचेऱ्या, अशा सार्वजनिक ठिकाणी ऑगस्टमध्ये दहापैकी सात खिडक्यावर CHIUSO म्हणजे बद अशा पाट्या दिसतात काही कचेऱ्या १ ते ३१ ऑगस्टपर्यंत पूर्णपणे बद असतात कारखान्यातील कामगाराची वार्षिक रजा संपली असली, तरी या महिन्यात ८० ते ८५ टक्के कामगार आजारी पडतात आणि खुशाल सागरकिनारी जाऊन जलविहार करतात. खा, पी मजा कर--ऋणम् कृत्वा घृतम् पिबेत ' हा चार्वाकाचा आदेश जर कोणी प्रत्यक्षात आणीत असेल तर आजचा इटालियन

असे असूनही इटलीने काही बाबतीत विलक्षण प्रगती केली आहे, हा एक चमत्कारच उदाहरणार्थ, लहान उद्योगधद्यात हा देश जगातील पहिल्या पाच क्रमाकात आहे याचा अर्थ ग्रामोद्योगाबद्दल या लोकाना काही खास प्रेम आहे असा नसून, सरकारी कर बुडविणे या एकमेव उद्देशाने लक्षावधी नागरिक मोठ्या धंद्यापासून छोट्या धद्याकडे वळले आहेत वीस किंवा अधिक कामगार असलेल्या उद्योगधद्यावर कामगारविषयक, प्राप्तिकरविषयक कायदे पाळण्याचे बधन आहे म्हणून आता इटालियन उद्योगपती आपल्या मोठ्या धद्याचे विभाजीकरण करून लहान लहान भाग कत्राटे देऊन तयार करून घेतात स्वेटर्स, हातमोजे, पायमोजे वगैरे बनविण्याचा कोट्यवधी लिराचा धंदा इटलीत चालतो पण त्यापैकी ९५ टक्के उत्पादक सरकारला कर भरत नाहीत कारण ते दर रविवारी मालमोटारी भरून लोकरीचे गठ्ठे ग्रामीण भागाकडे नेतात, तेथील स्त्रियाना लोकर देतात आणि पुढच्या रविवारी तयार माल घेऊन येतात प्रत्येक स्त्री ही स्वतत्र कामगार आणि एक माणसाचा हा कारखाना ! जिन तयार करणे हा इटलीतील एक मोठा धदा आणि कित्येक धर्मोपदेशकही धर्माज्ञा मोडून जिनचा धदा करतात गेल्या वर्षी जिन व इतर तयार कपडे परदेशी निर्यात करून इटलीने १२ अब्ज डॉलर्स मिळविले पण सरकारला मात्र कररूपाने फारच थोडा पैसा मिळाला कारण हे सर्व कपडे वैयक्तिक जबाबदारीवरील लोकानी घरच्या घरी शिवून दिले इटलीच्या अर्थकारणाचा विरोधाभास असा की, प्रत्येक नागरिक अशा रीतीने पैसा मिळवून आहे, पण देश मात्र दरिद्री आहे म्हणूनच ' श्रीमत लोकाची वस्ती असलेला गरीब देश ' असा इटलीचा उल्लेख जगातील अर्थतज्ज्ञ करीत आहेत

ज्या थोड्या इटालियन वस्तूनी जगात नाव कमावले आहे, त्यात फियाट मोटारी, ऑलिव्हेटी टाईपरायटर्स, आणि फर्निचर याचा समावेश होतो फियाटने आता जी अगदी लहान मोटार काढली आहे, ती पेट्रोल व पार्किंगची जागा या दोन्हींत अतिशय सोयीची आहे कलेच्या क्षेत्रात इटालियन चित्रपट हे जगातील पहिल्या दर्जाचे असतात फ्रेडरिको फेलिनी ( ला रोमा, ला डॉल्स व्हिटा, ला स्ट्रॅडा ), व्हिटोरिया डी सिका ( बायसिकल थीप ), रोझेलिनी, कार्लो पॉन्टी अशा इटालियन दिग्दर्शकानी

अनेक जागतिक पारितोषिके मिळविली आहेत सोफिया लॉरेन आणि लोलोब्रिजिडा या अभिनेत्री आणि मॅस्ट्रोनीनीसारखे नट यानी आतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली आहे. इटालियन फार्स युरोपमध्ये अतिशय लोकप्रिय आहेत 'ॲक्सिडेंटल डेथ ऑफ ॲन अनार्किस्ट' आणि 'कान्ट पे' हे उत्कृष्ट इटालियन फार्स मी लडनच्या रगभूमीवर पाहिले. डॅरिओ फो यानी ते लिहिले आहेत.

## ख्रिश्चन धर्माची राजधानी

रोमचे सेंट पीटर्स चर्च पाहायची खूप उत्सुकता होती. हा विभाग पोप महाराजाच्या आधिपत्याखाली आहे व्हॅटिकन ही स्वतत्र भूमी आहे सेंट पीटर्स हे जगातील सर्वांत मोठे चर्च आणि त्यापुढचा चौक हा जगातील सर्वांत भव्य चौक. जगभर पसरलेल्या रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मीयाची ही धार्मिक राजधानी याच चौकात गेल्या मे महिन्यात पोप महाराज आपल्या भक्ताच्या अभिवादनाचा स्वीकार करीत असताना महेमत अली अगका नावाच्या तरुणाने त्याच्यावर अकल्पितपणे गोळ्या झाडल्या दहा फूट अतरावरून त्याने या गोळ्या झाडल्या जेथे हा भयानक प्रकार घडला ती जागा पाहताना मन सुन्न होऊन जाते. पोपना या गोळ्या लागल्या आणि ते सहायकाच्या अगावर कोसळले दीर्घकाळ ते रुग्णालयात होते खुनाच्या प्रयत्नानतर लगेच मारेकऱ्याला अटक झाली आणि खटला चालून त्याला शिक्षाही झाली मी रोममध्ये होतो तेव्हा अनेक महिन्याच्या उपचारानंतर पोप महाराजानी भक्ताना पहिलेच दर्शन आणि आशीर्वाद दिले. तो भव्य आणि अत्यत हृद्य प्रसंग पाहायला मिळाला अनपेक्षित झाडल्या गेलेल्या गोळ्यानी रक्तस्राव होत असतानाच पोप आपले सहकारी पुसानिसी याना म्हणाले, "माझी काळजी करू नका, देव त्याला क्षमा करो."

चोरटे, बनेल, अशा अत्याचारी इटालियन लोकानी भरलेल्या रोममध्ये अशा देवमाणसाचे वास्तव्य असावे याचे प्रथम दुःख होते, पण अधिक विचाराती पटते की, अशा पापी लोकानाच पुण्य देण्यासाठी पोप याच्यासारख्या साधु पुरुषाची अतिशय गरज असते जॉन पोप पाकिस्तानामध्ये गेले होते (फेब्रुवारी १९८१) तेव्हाही त्याच्या प्रवचनाच्या वेळी बॉब टाकण्यात आला होता. पण तेव्हा स्वत पोप तेथे येण्यास वीस मिनिटे उशीर झाला म्हणून ते बचावले होते.

## तरंगते शहर

रोमहून मी व्हेनिसला गेलो हे जगातील अत्यंत वेगळे शहर आहे त्याचे वैशिष्ट्य असे की रस्ते पाण्याचे आहेत मोटारी आणता येत नाहीत आणि केवळ सौंदर्याचा आस्वाद घेणे एवढेच कार्य इथे करायचे असते विमानाने आलात तर मार्को पोलो विमानतळावर उतरायचे, रेल्वेने आलात तर स्टेशनच्या पायऱ्या उतरल्यावरोबर

लागणाऱ्या ग्रँट कनॉल या हमरस्त्याने व्हेनिसमध्ये जायचे मोटारीने आलात तर पियाझा रोमा टूचेको अड्डयावर हजारो मोटारी ठेवण्याची सोय केलेली आहे तिथे मोटार ठेवून नौकेने शहरात यायचे रस्त्यावर जाताना मोटारीचे भोंगे न ऐकणे किंवा ट्रॅफिक जॅमचे बळी न होणे म्हणजे काय सुख असते ते व्हेनिसला गेल्याखेरीज कळणार नाही शहरातले रस्ते म्हणजे लहान-मोठे कालवे चहा प्यायला कोपऱ्या-वरच्या उपाहारगृहात जायचे तर नाव वल्हवीत जायचे शेकडो बेटाना जोडून हे अद्भुत तरंगते शहर निर्माण केले आहे अक्षरशः हजारावर जुने–नवे पूल दोन्ही बाजूना जोडणारे आहेत त्यापैकी सर्वात महत्त्वाचा पूल म्हणजे 'ब्रिज ऑफ साईज' निःश्वासाचा पूल या पुलाच्या एका बाजूला पूर्वी न्यायालय होते व दुसऱ्या बाजूला तुरुंग जन्मठेप किंवा फाशी झालेले कैदी न्यायालयाच्या इमारतीतून तुरुगात जाताना या पुलावर थायत खुल्या जगाकडे अखेरचे पाहून निःश्वास सोडत आणि तुरुंगाच्या दरवाज्याआड कायमचे जात. ड्यूकल पॅलेस हा पूर्वीच्या व्हेनिसच्या अधिपतीचा राजवाडा पाण्याने वेढलेल्या सुंदर भूमीवर असून, जुने वैभव दाखवीत उभा आहे. त्यात उत्कृष्ट इटालियन तैलचित्रे आहेत जवळचे चर्च आणि त्यापुढचा विस्तीर्ण चौक म्हणजे प्रवाशाच्या विरंगुळयाचे प्रमुख आकर्षण नक्षीचे लेस आणि काचेच्या कलाकृती याबद्दलही व्हेनिस प्रसिद्ध आहे

## कलावतांचे शहर

फ्लॉरेन्स हे इटलीतलेच नव्हे, तर जगाच्या सास्कृतिक इतिहासातील अत्यत महत्त्वाचे आणि काही बाबतीत रोमपेक्षाही अधिक महत्त्वाचे शहर. मायकेल अँजेलो, डि व्हिन्सी, सेलिनी अशा जगन्मान्य कलावताची ही मायभूमी युरोपमध्ये सास्कृतिक पुनरुज्जीवन ( रीनायसेन्स ) सुरू केले, ते येथील कलावत आणि पडितानी. डान्टे हा अभिजात कवी, बोकॅशिओ हा रोमॅटिक लेखक, गॅलीलिओ हा सशोधक आणि मॅकिव्हेली हा राजकारणपंडित हे सारे याच फ्लॉरेन्सचे आपापल्या क्षेत्रातील हे दिग्गज सेंट मरिया हे येथील चर्च दीडशे वर्षे बाधले जात होते आणि १४३६ मध्ये त्याचे उद्‌घाटन झाले तेव्हा ते जगातील सर्वात मोठे चर्च होते प्राचीन कला, साहित्य इत्यादींची इतकी संग्रहालये फ्लॉरेन्समध्ये आहेत की, हे शहर म्हणजे एक वस्तु-संग्रहालय आहे महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीनेही या शहराला खास महत्त्व आहे. ते असे की येथील कॅसीन उद्यानात युवराज राजाराम छत्रपती याचा अर्धपुतळा आणि छत्री आहे. 'अव्हेन्यू ऑफ द इंडियन' असे या भागाचे नाव आहे ते राजाराम छत्रपती या भारतीय नावावरून दिले आहे छत्रपती शिवाजी महाराजाचे जे प्रत्यक्ष ( डायरेक्ट ) वंशज आहेत, त्याच्या नावापूर्वी 'छत्रपती' लावण्यात येते, पण त्या घराण्यातील इतराच्या नावाच्यामागे 'छत्रपती' हा शब्द लिहिण्याचा प्रघात आहे

युवराज राजाराम छत्रपती हे १८७० मध्ये युरोपच्या प्रवासात असताना फ्लॉरेन्समध्ये आजारी पडून निधन पावले. त्याचे रक्षा-विसर्जन अर्नाेन आणि म्युगॉन या नद्यांच्या संगमावर फ्लॉरेन्समध्ये करण्यात आले.

युरोपमधील इतर देशाच्या तुलनेने इटली हा अस्वच्छ, गर्दीचा आणि महागाई, गुन्हेगारीने अधिकाधिक भरलेला देश आहे हे खरे, पण या देशात एक प्रकारचे चैतन्य आणि गमत आहे हेही खरे त्यामुळेच युरोपमधील इतर कोणत्याही देशापेक्षा इटलीलाच अधिक परकीय प्रवासी भेट देतात तसे पाहिले तर हा देश लहानच त्याचे क्षेत्रफळ १ लक्ष ६ हजार चौरस मैल आणि लोकसंख्या फक्त सहा कोटी. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या आसपास पण जगाच्या इतिहासात या देशाने भला आणि बुरा या दोन्ही प्रकारचा फार मोठा वाटा स्वतःकडे घेतला आहे गॅरीबाल्डी आणि मॅझिनी या इटालियन देशभक्तानी स्वातन्त्र्यवीर सावरकर याना स्फूर्ती दिली, यावरून महाराष्ट्रापर्यंत इटलीची छाप कशी पडली हे दिसून येते.

इटलीतील छोट्या उद्योजकानी फार कल्पकतेने आपली कामे चालविली आहेत सुती कापड, लोकरी कापड, इंजिनिअरिंगमधील छोट्या वस्तू, नक्षीचे कापड या नेहमीच्या मालाबरोबरच उटाच्या केसाच्या वस्तूसारख्या काही अगदी वेगळ्या वस्तूचेही येथे उत्पादन होते काचेचे छोटे–एक ते दीड इंच उचीचे–अतिशय सुदर आणि हुबेहूब प्राणी हे परदेशी प्रवाशाचे मोठे आकर्षण आहे इटलीतील सध्याचा सर्वात मोठा व्यवसाय म्हणजे फॅमिली बिझनेस किंवा कौटुंबिक व्यवसाय या आणि अशा वस्तू कुटुबानी घरच्या घरीच बनविणे, त्यावर कर नाही आणि कामगारविषयक कायदेही नाहीत अनेक सरकारी अधिकारीच अशा कौटुबिक व्यवसायात गुतले आहेत त्यामुळे सरकारचे बुडणारे कर कसे वसूल करता येतील, याची कुणालाच चिंता नाही कित्येक सरकारी कर्मचारी कामाच्या वेळेनतरच नव्हे तर कचेरीच्या वेळेतही दोनचार तास काढून खासगी धद्यात काम करतात, तिथे कोण कुणाला थाबवणार ?

## वाईन – शांपेनसाठी निदर्शने

या इटालियन लोकाचे ज्वलत प्रश्नही मोठे मनोरंजक असतात त्याना वाईन आणि शापेन फार आवडते पण अलीकडे फ्रेंच लोकानी इटलीत शापेन आणि वाईन पाठविण्याबर निर्बंध आणल्यामुळे कधी नव्हे तर सर्व इटालियन लोक आपल्यातले मतभेद विसरून एकत्र आले त्यानी जोरदार निदर्शने केली का ? तर आम्हाला अधिक वाईन आणि शापेन मिळालीच पाहिजे म्हणून ! अशा गभीर आणि अत्यावश्यक प्रश्नावरच इटालियन लोक एकत्र येतात एरव्ही सरकार बनविणे किंवा शेती, ऊर्जा वगैरे प्रश्नाबाबत ते उदासीन असतात इटली हा पेट्रोलबाबत परावलबी

देश पण त्याबाबत काही संशोधन करावे किंवा ऊर्जेची इतर निर्मितिकेंद्रे शोधावी यात त्याचे मन नाही

सरकारला किमान कर भरायचे किंवा ते भरणे पूर्णपणे टाळायचेच आणि वर सरकारकडूनच बेकारी भत्ता उकळायचा हा लक्षावधी इटालियनांचा राजरोसचा धंदा आहे बेकारी भत्ता घेणारे ८० टक्के लोक खासगी धंद्यात काम करतात. पण तो ' फॅमिली बिझिनेस ' असल्याने त्याची कोठेही नोंद नसते सहा कोटी लोकसंख्येच्या या देशात दीड कोटीवर म्हणजे एकचतुर्थांशवर लोक कोणता ना कोणता भत्ता सरकारकडून घेतात कोणी बेकार म्हणून नोंद करतात, कोणी गरीब म्हणून तर कोणी अपंग म्हणून आपआपल्या मतदारसंघातील जास्तीत जास्त लोकांना फुकटचा सरकारी भत्ता खाऊ घालून आपल्या मताची निश्चिती करायची हा एक कलमी कार्यक्रम वर्षानुवर्षे अमलात आणणारे अनेक खासदार आणि मंत्री या देशात आहेत त्यांच्याकडून भ्रष्टाचार आवरण्याचे काम कसे होणार? आणि तरीही पिसाच्या कलडल्या मनोऱ्यासारखा इटली हा देशही कलंडता असूनही न पडता वर्षानुवर्षे उभाच आहे.

# १२

## स्वित्झर्लंड : त्रेसष्ट लाख लोकांचा स्वर्ग

इटलीसारख्या बकाल देशातून स्वित्झर्लंडला आले की, जमीन-अस्मानाचा फरक दिसतो स्वित्झर्लंडमधले पर्वत, दऱ्या, नद्या, बर्फ, रस्ते, गाव इतकी देखणी की जणू हा भूतलावरचा स्वर्गच आहे असे वाटते उत्कृष्ट राहणीमान, लोकशाही, शांततामय जीवन, अप्रतिम सृष्टिसौंदर्य 'अशा अनेक देणग्याची खैरात परमेश्वराने या देशावर केली आहे जगाच्या कानाकोपऱ्यातून लक्षाधीश आणि कोट्यधीश विश्रांतीसाठी, स्फूर्तीसाठी या निवांत देशात येतात. तसं पाहिलं तर हा देश अगदीच छोटा सोळा हजार चौरस मैलाच क्षेत्रफळ आणि लोकसंख्या फक्त त्रेसष्ट लाख पण स्वित्झर्लंड-मधील राहणीचे मान पश्चिम युरोपमध्ये सर्वांत उच्च आहे.

**फक्त घड्याळच !**

सर्व तऱ्हेच्या सुविधा असूनही स्वित्झर्लंडमध्ये एक रुखरुख लागते. ती अशी की, या देशात समृद्धी आहे, पण चैतन्य नाही ऑर्सन वेल्स यानी ही कथा अचूकपणे मांडली आहे : " इटलीत अत्याचार, युद्ध, खून, सारं काही आहे पण या देशान मायकेल अन्जेलो, लिओनार्डो डी व्हिन्सी असे जागतिक कीर्तीचे चित्रकार निर्माण केले जगाच सांस्कृतिक पुनरुज्जीवन इटलीने केले या उलट स्वित्झर्लंडमध्ये शांतता, ५०० वर्षांची लोकशाही आणि आर्थिक समृद्धी आहे, पण स्वित्झर्लंडने जगाला काय दिलं ? तर तासाच्या ठोक्याला चिमणीबाहेर येणारं फक्त घड्याळ ! "

झुरिक, लुगानो, बर्न अशा स्वित्झर्लंडमधील रमणीय शहरात गेलं की त्या नद्या,

जलाशय, उंची हॉटेल आणि डोळ्याचं पारण फेडणारी वनश्री दिसून मनाची थकावट जाते हे खरं असलं तरी ज्याच्यामुळं एखादा देश आदराला पात्र होतो, असं आज इथ काय आहे या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही. आपल्याकडच उदाहरण द्यायचं तर उटकमंड हे अतिशय रमणीय आणि स्वच्छ सुंदर शहर आहे त्या उलट कलकत्ता हे जगातलं सर्वांत गलिच्छ शहर. पण कलकत्त्याच्या कर्तृत्वाची तुलना उटकमंडच काय पण भारतातल इतर कोणतेही शहर करू शकणार नाही इटलीच्या बकालपणाला विटून स्वित्झर्लंडमध्ये श्रीमंती निवातपणा उपभोगताना हाच विचार मनात आल्यावाचून राहात नाही

स्वित्झर्लंडचे दरडोई उत्पन्न जगात पहिल्या क्रमाकाचे आहे ( माणशी १४,२०८ डॉलर्स ). अमेरिकेचा या जागतिक चढाओढीत नववा क्रमांक लागतो ( १०,७०० डॉलर्स ) चलनवाढ आणि बेकारी याचे युरोपमध्ये सर्वांत कमी प्रमाण आहे ते स्वित्झर्लंडमध्ये स्विस फ्रॅंक हे जगातील एक अत्यंत बळकट चलन आहे आतर-राष्ट्रीय राजकारणाचे तणाव, महायुद्ध, गटबाजी यात हा देश कधी पडत नाही खऱ्याखुऱ्या अर्थी हा देश तटस्थ आहे पण तरीही संरक्षणाला त्याने कमी लेखलेले नाही प्रत्यक्ष सैन्यात असलेले लोक आणि प्रादेशिक सेनेसारखे अर्धवेळ काम करणारे मिळून सहा लाख सैनिक उभे करण्याची क्षमता स्वित्झर्लंडजवळ आहे.

## सार्वमताची तरतूद

आपला देश 'डायरेक्ट डेमॉक्रसी'चा आहे असे स्विस लोक अभिमानाने सागतात त्यात बरेचसे सत्य आहे इतर लोकशाही देशाच्या तुलनेने स्विस लोक-शाहीत लोकमताचे प्रतिबिंब पडण्याची अधिक तरतूद आहे हे खरे कारण इतर देशात पार्लमेंटने एखादे विधेयक संमत करून राष्ट्राध्यक्षाची त्यावर सही झाली की तो कायदा बनतो स्वित्झर्लंडमध्ये अशा कायद्याला सार्वमत घेऊन आव्हान देता येते. विधेयकाचा कायदा झाल्यानतरही तीन महिन्यात तीस हजार लोकाच्या सह्याचा अर्ज सरकारकडे आल्यास त्या कायद्यावर सार्वमत घेण्याची तरतूद घटनेत आहे. समत झालेले कायदे सार्वमतानी फेटाळल्याची अनेक उदाहरणे स्वित्झर्लंडच्या इतिहासात आहेत

### 'प्रायव्हेट सोल्जर'

या लहानशा देशातून मोठे सैन्य उभारता येते याचे कारण असे की, प्रत्येक स्विस नागरिकाला लष्करी सेवा करणे आवश्यक असते विसाव्या वर्षी प्रत्येक नागरिकाला संरक्षक दलात भरती होऊन चार महिन्याचे लष्करी शिक्षण घ्यावे लागते दर दोन वर्षांनी त्याला असेच लष्करी शिक्षण घेणे आवश्यक असते जे अधिकृत लष्करात

जातात त्याना सोल्जर ' आणि असे काही काळ लष्करात असतात त्याना ' प्रायव्हेट सोल्जर ' म्हणतात विद्यापीठातील प्राध्यापकही खासगी सैनिक असतोच या पद्धतीचा स्विस लोकाच्या जीवनावर दूरगामी परिणाम झाला आहे कारण केवळ पुस्तकी जगात न राहता संगीतकार असो, की शिक्षक असो त्याला काही ना काही लष्करी शिक्षण मिळालेले असते आणि त्यामुळे त्याची सर्वांगीण उन्नती होण्यास मदत होते प्रत्येकाच्या घरी शस्त्रे असतात म्हणूनच फ्रान्स स्वित्झर्लंडपेक्षा किती तरी मोठा देश असूनही फ्रान्सच्या राजापेक्षा स्वित्झर्लंडने अधिक सैन्य उभारल्याचा दाखला इतिहासात आहे स्वित्झर्लंड हा डोंगराचा आणि दऱ्याचा देश असल्यामुळे मुळातच येथील लोक काटक व प्रकृतीने उत्तम त्यातच सक्तीच्या लष्करी सेवेची जोड मिळाल्याने देशाच्या रक्षणाची त्याची तयारी युरोपमधील इतर कोणत्याही राष्ट्राच्या तुलनेने अधिक मोठी आहे गेल्या दीडशेहून अधिक वर्षांत हा देश युद्धात ओढला गेला नाही असा शेवटचा प्रसंग म्हणजे १९१४ चा तरीही स्वसरक्षणाबाबत स्वित्झर्लंडने अजिबात कुचराई केलेली नाही सभोवती दोन महायुद्धाचा भडका उडाला असतानाही या देशाने आपली तटस्थता आणि शातता सोडली नाही

देशात डोंगर व दऱ्या यानी बहुतेक जमीन व्यापली आहे त्यामुळे नद्या असूनही शेतीला लायक अशी फार थोडी जमीन आहे स्वित्झर्लंडचे फक्त ११ टक्के लोक शेतीवर अवलबून आहेत शक्य ती सर्व जमीन लागवडीखाली आणली गेली आहे या थोड्याशा जमिनीवर द्राक्षे व धान्य पिकवून, दूधदुभते तयार करून शेतकरी जगतात. या भागात उत्तम वाईन्स तयार होतात. हा देश तसा निसर्गरम्य आणि शात निवात असला तरी येथील बहुसख्य जनता शेतकरी नाही स्वित्झर्लंडमधील ८० टक्के लोक कारखान्यात काम करतात स्वतःचे छोटे उद्योगधदे चालवितात किंवा सरकारी व इतर सार्वजनिक क्षेत्रात काम करतात

स्वित्झर्लंड हा युरोपमधील एक अत्यंत महागडा देश आहे झूरिक, जिनिव्हामधील हॉटेलात एका खोलीला एका माणसाला दररोज आठशे ते हजार रुपये पडतात लहान गावी पाचशे ते सहाशे कॉफीच्या कपाला अकरा रुपये आणि बियरच्या लहान ग्लासला नऊ रुपये पडतात मोठ्या गावी दोन खोल्याचे भाडे दरमहा सहा हजार रुपये असूनही जागा सहसा मिळत नाहीत युरोपमधील इतर देशाच्या तुलनेने येथील स्त्री-मुक्ती चळवळही मागासलेलीच आहे भारतातही स्त्रियाना पूर्वीपासून मतदान करता येते, पण स्वित्सर्लंडमधील स्त्रियाना सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क अगदी अलीकडे म्हणजे १९७१ मध्ये मिळाला !

भाषेच्या बाबतीत स्वित्झर्लंडची अवस्था काहीशी भारतासारखीच आहे या छोट्या देशात अमेरिका किंवा फ्रान्ससारखी एक भाषा बोलली जात नाही, तर फ्रेंच,

जर्मन, इटालियन आणि रोमॅनॅश अशा चार भाषा बोलल्या जातात वृत्तपत्रे ही अर्थातच अशाच अनेक भाषात निघतात

### बॅंकिंगवर भर

जगातील सर्वसामान्य लोकाना स्वित्झर्लॅंडचे नाव घड्याळांमुळे माहीत झालेले असते. स्विस घड्याळे ही जगातील सर्वोत्कृष्ट मानली जात पण गेल्या वीस-पचवीस वर्षात जपानने या क्षेत्रातून स्वित्झर्लॅंडला पार हटवले आहे इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने मनगटी घड्याळे चालू लागल्यापासून जपानने या क्षेत्रात क्रमांक एकचे स्थान पटकावले आहे अजूनही रोलेक्ससारखे खानदानी स्विस कारखाने जोरात चालू आहेत, पण स्विस घड्याळाचे जगातले प्रमुखत्व मात्र संपले आहे आता या देशाचा मुख्य भर दोन गोष्टींवर आहे बॅंकिंग आणि परकीय प्रवासी

शांत, सुंदर आणि स्थिर देश म्हणून स्वित्झर्लॅंड हा जगातील सर्व प्रवाशांचे कित्येक वर्षे प्रमुख आकर्षण बनला आहे इथे महागाई आहे हे खरे, पण इथे येणारे बहुतेक परकीय प्रवासी हे उच्च उत्पन्न गटातले असतात, आणि त्यांच्या स्वतःच्या देशातही त्यांचे राहणीमान उच्च असते. त्यामुळे त्याना महागाईची झळ लागत नाही. हिवाळ्यात आल्प्स पर्वतावर बर्फ पडते त्याचा भरपूर उपयोग करून स्वित्झर्लॅंडमध्ये ‘ विंटर स्पोर्ट्स ’ ठेवण्यात येतात इतर वेळीही देशातील शेकडो सुंदर तळ्याजवळची उंची हॉटेले परदेशी प्रवाशानी भरगच्च भरलेली असतात देशाच्या उत्पन्नाचा मोठा वाटा या प्रवाशानी बाहेरून आणलेल्या पैशातून येत असतो.

### गुप्ततेची हमी

स्वित्झर्लॅंडमध्ये बॅंकिंगचे खास नियम आहेत तेथे शंभर टक्के गुप्ततेची हमी असते स्विस सरकार प्राप्तिकर किंवा इतर करासाठी तुमच्या खात्याची तपासणी करीत नाही. स्विस बॅंकातून ठेवलेला पैसा कोठून आणला व कोणत्या भल्या-बुऱ्या मार्गांनी आणला याची चौकशी होत नाही. खातेदाराचे नाव न देता एखादा कोडवर्ड ( परवलीचा शब्द ) व क्रमांक दिला तरी चालते चेकवर सही न करता त्याच परवलीच्या शब्दाने व आकड्याने पैसे काढता येतात अशा व्यवस्थेमुळे जगातील अनेक देशातील काळ्या पैशाचा ओघ स्वित्झर्लॅंडकडे येतो राजकीय पुढारी, उद्योगपती, व्यापारी, स्मगलर्स यांच्याबरोबरच जगातील विविध राष्ट्रांच्या गुप्तहेरांचाही पैसा स्विस बॅंकातून निर्धास्तपणे ठेवलेला असतो गुप्ततेची हमी आणि देशाचे स्थैर्य यामुळे अब्जावधी डॉलर्सचे व्यवहार या लहानशा देशात होतात प्रचंड रकमांचे व्यवहार करण्यासाठी येणारे कोट्यधीश बादशाही हॉटेलातून राहतात आणि बॅंकिंगच्या अनुषंगाने मग हॉटेल, खाद्यपदार्थ, मद्यपानगृहे, नृत्यगृहे अशी इतर

क्षेत्रेही जोमाने चालतात बॅंकिंगची परंपरा या देशात मध्ययुगापासून होती या भागातील श्रीमंत सावकार युरोपमधील राजानाही कर्जे देत असत, पण पुढे सर्वत्र बॅंका निघाल्यावर सावकाराचे व्यवहार कमी झाले मात्र गेल्या अर्ध्या शतकात स्विस बॅंकानी व्यवहार गुप्त ठेवण्याचे व खातेदाराचे नाव उघड न करताही व्यवहार करण्याचे धोरण ठेवल्यामुळे या व्यवसायाची अभूतपूर्व भरभराट झाली सध्या स्वित्झर्लंडमध्ये दर चौदाशे लोकामागे एक बॅंक आहे. युरोपातील करबुडव्यानी या बॅंकाच्या मार्फत अवाढव्य व्यवहार करून आपले व्यापारी जाळे पसरले आहे. माफिया या जगप्रसिद्ध गुन्हेगारी टोळीचे आर्थिक व्यवहार याच बॅंकाच्या मार्फत होतात अमेरिकेने मात्र खास करार करून अमेरिकन गुन्हेगाराचे व्यवहार काही अटींवर तपासण्याची परवानगी स्विस बॅंकाकडून मिळविली आहे पण हे अपवादात्मकच उदाहरण आहे कारण कोणते खाते कुणाचे आहे याचाच पत्ता नसेल, तर गुन्हेगाराच्या खात्याची तपासणी करण्याचा हक्क मर्यादित अर्थानेच बजावता येईल.

## फटकून राहण्याचे धोरण

स्वित्झर्लंड हा जगापासून अलग राहिलेला देश आहे त्याची तटस्थता इतक्या पराकोटीला गेली आहे की, त्याने अद्याप युनोचे सभासदत्वही घेतलेले नाही ! मात्र युनेस्कोसारख्या यूनोच्या खास विभागाच्या काही कार्यात स्वित्झर्लंड सहभागी होतो इतका श्रीमंत देश, पण जगातील गरीब देशाना आर्थिक साहाय्य करण्यात सर्वांत मागे असेल तर तो हा देश ज्याला सामाजिक जाणीव म्हणतात तिचा या देशात जवळ जवळ अभावच आहे इतर सर्व राष्ट्राशी फटकून राहणे एवढेच याचे परराष्ट्रीय धोरण. परराष्ट्राना मदत करायचीच तर जवळच्या राष्ट्राला. इटलीत भूकंप झाला तेव्हा स्वित्झर्लंडने साहाय्य केले पण याचे मुख्य कारण म्हणजे स्विस लोक भाषा आणि धर्माने इटलीला जवळ आहेत ऑफ्रिका, भारत किंवा दूरच्या विकसनशील देशाना साहाय्य करण्यात या धनाढ्य देशाचा हात आखडता असतो. रेडक्रॉस ही जगाला या देशाची देणगी असली तरी तिचेही कार्य इथल्यापेक्षा अमेरिका, कॅनडा या देशातच अधिक जोमदार असते.

स्वत.पुरते पाहणारा स्विस माणूस आपल्या आणि आपल्या कुटुंबियाच्या भवितव्याची उत्तम तरतूद करून ठेवतो जवळपास प्रत्येक स्विस नागरिकाचा भक्कम विमा उतरलेला असतो सरकारी आकडेवारीनुसार प्रत्येक स्विस माणूस आपल्या उत्पन्नातील १५ टक्के रक्कम शिल्लक टाकतो किंवा दीर्घ मुदतीच्या रोख्यात गुतवतो म्हणूनच दारिद्र्याचे पूर्ण उच्चाटन करण्यात हा देश यशस्वी झालेला आहे परदेशाना साहाय्य करण्यात स्वित्झर्लंड उदार नसला तरी हा देश इतर देशाना कधीही भारभूत झालेला नाही हेही खरे आहे जगातील अनेक मोठमोठ्या कारखान्यानी आणि

व्यापाऱ्यानी स्विस विमा कंपन्याकडून विमे उतरून घेतले आहेत कारण चोख व्यवहार आणि स्थैर्याची खात्री याबाबत स्विस विमा कंपन्या अग्रेसर आहेत स्विस नॅशनल बँकेचा सुवर्णाचा राखीव साठा मोठमोठ्या राष्ट्राच्या साठ्यापेक्षाही अधिक आहे. स्विस चलन हे जगातील अत्यंत बळकट चलन असल्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे

## अर्थशक्तीचे आधार

स्वित्झर्लंडच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा परिणाम त्या देशाच्या अर्थनीतीवर झाला आहे समुद्र जवळ नसल्याने वाहतुकीचा खर्च वाढतो देशातील बाजारपेठ लहान असल्याने परदेशाशी व्यापार वाढवावा लागतो अर्थातच परदेशानी मोठ्या प्रमाणावर व्यापार करावा म्हणून किमान कर ठेवावा लागतो जगातील अत्यंत कमी कर असलेल्या देशापैकी स्वित्झर्लंड हा एक देश आहे या देशात सर्व कर मिळून ३ ते ५ टक्के पर्यंत होतात. परकीय कारखाने आणि तज्ञ याना हा देश उत्तेजन देतो सध्या इथे सुमारे अकरा लाख परकीय काम करीत आहेत जिनिव्हा विद्यापीठातील ५० टक्के विद्यार्थी परकीय आहेत देशातील सात विद्यापीठातून शिक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था आहे आणि साक्षरतेचे प्रमाण ९९ टक्के आहे उद्योगधंद्यात स्विस घड्याळे जगप्रसिद्ध आहेत पण या देशाचा सर्वांत मोठा उद्योग रसायने व औषधे याचे उत्पादन आहे बासल हे जगातील अत्यंत महत्त्वाच्या रसायन उद्योगकेंद्रापैकी एक आहे अल्युमिनियम हे आणखी एक महत्त्वाचे उत्पादन विजेची मुबलकता असल्याने स्विस उद्योगधंदे देशाला भरपूर अर्थशक्ती प्राप्त करून देतात मशिन टूल्सची निर्यात हा या अर्थशक्तीचा एक मोठा आधार ९७ टक्के घड्याळे, रसायने, अल्युमिनियम आणि मशिन टूल्स परदेशी पाठवणारा हा देश मोटारीच्या उत्पादनाच्या बाबतीत शभर टक्के परावलबी आहे

लुगानोच्या हॉटेलमध्ये मला एक स्विस उद्योगपती भेटले मी त्याना विचारले, " स्वित्झर्लंडमध्ये इतर सर्व क्षेत्रात एवढी प्रगती व संपन्नता असताना स्त्रियाना दीर्घकाळ राजकीय अधिकार नसावेत हे आश्चर्यच नाही का ? " त्यावर ते म्हणाले, " याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आमच्या देशाचे स्थैर्य शेकडो वर्षे देशाचा कारभार अत्यंत सुरळीतपणे चालला आहे आणि तोही स्त्रियाना मतदानाचा अधिकार नसतानाही चालला आहे, मग त्यात बदल कशासाठी करायचा असे नेत्यानाच नव्हे तर स्त्रियानाही वाटत आहे तीन प्रातानी प्रथम १९७० मध्ये स्त्रियाना मतदानाचे हक्क दिले पण ५ टक्के स्त्रियाही मत देण्यासाठी आल्या नाहीत ! गेली पन्नास वर्षे काही समाज सुधारक स्त्रियाना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून प्रयत्न करीत होते, पण खुद्द स्त्रियाच त्याविषयी निरुत्साही होत्या १९७२ पासून स्त्रियाना मतदानाचा हक्क

मिळाला त्याबरोबरच पार्लमेंट आणि प्रांताच्या विधिमंडळासाठीही त्यांना निवडणूक लढवता येते पण अजून संसद, विधिमंडळे, नगरपालिका यात स्त्रियांचे प्रमाण दोन टक्क्यांवर गेलेले नाही स्विस स्त्रियांनाच जर सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात स्वारस्य नाही, तर पुरुषांनी त्यांच्यासाठी उगाच आकांत करण्यात काय अर्थ आहे ? ”

## आत्मकेंद्रित लोक

बाझलमध्ये मला एस कृष्णन नावाचा दक्षिण भारतीय भेटला तो एका बँकेत काम करतो गेली तीन वर्षे तो स्वित्झर्लंडमध्ये आहे त्याचा अनुभव फारसा उत्तेजक नाही तो म्हणाला, “ इथे पैसा चांगला मिळतो हा एकमेव फायदा पण स्विस लोक फार आत्मकेंद्रित आहेत ते परकीयांना आपल्या समाजात मिसळून घेत नाहीत काम झाल्यावर डोंगरांच्याकडे आणि झाडांच्याकडे पाहात राहणे एवढेच माझ्या हाती राहते त्यामुळे कधी एकदा इथली नोकरी संपवून भारताकडे परततो असे मला झाले आहे ”

स्वित्झर्लंड हा एकंदरीत शांततेचा देश निदर्शने, संप, लाठीमार असे प्रकार इथे फार क्वचित घडतात पण अलीकडेच तरुण पिढीतले असमाधान धुमसत असल्याचे सरकारला आढळून आले आहे राहण्याच्या जागेची टंचाई आणि वाढती महागाई याविरुद्ध झूरिक, बाझल आणि बर्नला निदर्शने झाली झूरिकला तर आक्रमक निदर्शकांच्यावर अश्रुधूर सोडण्यात आला झूरिकमधील एका नाट्यगृहाच्या पुनर्रचनेसाठी सरकारने १५ लाख पौंड खर्च करण्याची अनुमती दिली नृत्य, नाट्य, संगीत यावर एवढा खर्च करण्यापेक्षा यूथसेंटर्सना ( युवककेंद्रे ) ही मदत द्यावी म्हणून तरुणांनी ही निदर्शने केली होती तरुणांच्या असंतोषाचे हे कारण तात्पुरते असले तरी त्यांचे अधिक महत्त्वाचे भांडण आहेच. जुन्या पिढीने आता राजकारणातून, नगरपालिकेतून निवृत्त व्हावे आणि नव्या पिढीच्या हाती सूत्रे द्यावीत म्हणून पॅरिसहून आलेल्या स्वातंत्र्याची पुरस्कर्ती स्विस तरुण पिढी निदर्शने करीत आहे. स्वित्झर्लंडचे हवामान जगातील सर्वांत उत्कृष्ट त्याचा एक परिणाम असा झाला आहे की, सरासरी आयुर्मानही दीर्घ आहे अर्थातच राजकारण आणि समाजकारणात तीस ते चाळीस वर्षे तेच नेते आहेत याविरुद्ध अस्वस्थ आणि उत्सुक तरुण पिढी निदर्शने करीत आहे पण तीही सौम्यच बर्न या राजधानीच्या गावचे मंत्रिमंडळाच्या किंवा फेडरल कौन्सिलच्या सत्तेला धक्का पोहोचण्यासारखी ही चळवळ नाही महिनाभराच्या अस्वस्थतेनंतर स्विस जीवन पुन्हा शांत आणि सुरळित चालू आहे. बदलांना ज्या समाजात कमीत कमी वाव आहे, असा हा समाज दीर्घकाळ शांतता, समृद्धी आणि कर्तृत्वहीनता यांत मशगूल राहील यात शंका नाही.

# १४

## हॉलंड : समुद्राबरोबरची सततची लढाई

गेल्या वीस वर्षांत मी हॉलंडला तीन वेळा गेलो आहे आणि प्रत्येक वेळी या लहानशा पण कल्पक देशाने माझ्या मनावर अधिकाधिक छाप पाडली आहे देश लोकाना जन्म देतो अशी इतरत्र परपरा असली तरी हॉलडच्या लोकानीच या देशाला जन्म दिला आहे इतर सारे जग परमेश्वराने निर्माण केले, पण हॉलड मात्र डच लोकानीच निर्माण केला अशी यथार्थ म्हण युरोपमध्ये प्रचलित आहे नेदर्लंड हे हॉलडचे दुसरे आणि अधिकृत नाव आहे त्या नावाची फोड केली तर या म्हणीची सत्यता पटते नेदर म्हणजे खालचा किंवा समुद्रसपाटीखालचा आणि लँड म्हणजे देश एके-काळी जिथे पाणी, दलदल होती, तेथे डच लोकानी बाध घालून, समुद्र मागे हटवून आणि कालवे काढून देश तयार केला इतर देशातले लोक भूगोल शिकतात, डच लोक बदलतात त्यानी शेकडो वर्षे उग्र सागराबरोबर युद्ध केले आहे आणि ते जिंकले आहे त्याचा सूड म्हणून अजूनही कधी कधी समुद्र उसळतो आणि एखादे धरण फोडून गावात पाणीच पाणी होते, पण त्यामुळे निराश न होता उद्योगी डच लोक पुन्हा धरण बाधतात आणि सागराला दूर पिटाळतात

समुद्रबरोबरची हॉलंडची ही लढाई दोन हजार वर्षे चालू आहे खिस्ताच्या काळा-पासून या लोकानी बाध घालून समुद्र हटवण्यास सुरुवात केली ती लढाई अजून चालूच आहे जगातील हा अत्यंत शातताप्रिय देश लोणी, मासे आणि फुले हे मुख्य उत्पादन हॉलडचे क्षेत्रफळ फक्त पधरा हजार चारशे पन्नास चौरस मैल. त्यापैकी अर्ध्याहून अधिक जमीन समुद्र मागे हटवून लोकानी आपल्या कर्तबगारीने मिळविलेली.

लोकसंख्याही कमीच म्हणजे फक्त एक कोटी पन्नास लक्ष. पण हे लोक अतिशय कल्पक आणि काटक. दर्यावर्दी म्हणून पहिल्या क्रमांकावर असलेल्या या डचानी तीनशे वर्षांपूर्वी भारत आणि इंडोनेशियासारख्या दूरवरच्या राष्ट्रात येऊन व्यापार वाढवला आणि वसाहतीही स्थापन केल्या पण साम्राज्यवादाचा हव्यास नसलेल्या हॉलंडने आपल्या वसाहती सोडून दिल्या डचाची आणि भारतीयाची एका बाबतीत मात्र जवळीक आहे ती म्हणजे या दोन्ही देशात जन्मसंख्येचे प्रमाण जगातील सरासरीपेक्षा खूपच अधिक आहे. या दोन देशातला सर्वांत मोठा फरक म्हणजे हालंडमध्ये पर्वत नाहीत कारण हा देश समुद्र मागे हटवून तयार केलेला आहे.

युरोपमधील इटली किंवा फ्रान्ससारख्या देशाशी तुलना करता हॉलंडमध्ये खूपच स्वस्ताई आहे ॲमस्टरडॅम या राजधानीतही १० ते १२ डॉलर्सपर्यंत हॉटेल मिळू शकते ( १०० ते १२० रु ) दहा ते बारा रुपयात जेवण आणि दीड रुपयात कॉफी मिळू शकते. वाहतूक अतिशय स्वस्त आहे रुपयाचे तिकीट बसने किंवा ट्रॅमने पाच मैल नेऊ शकते पाच रुपयाना हैनिकेन ही उत्कृष्ट बियर मिळते. देशात दूध मुबलक असल्याने कॉफीपेक्षाही आइस्क्रीम स्वस्त आहे. हॉलंडसारखे बार किंवा मद्यगृहे इतर युरोपियन देशात क्वचितच दिसतात पॅरिसमधील बार इतके भरलेले असतात की, उभे राहायलाही कशीबशी जागा मिळते याउलट हॉलंडमधील मद्यगृहात भरपूर जागा असते बियर व इतर पेये पिण्याची सोय इथे असते. असे नव्हे तर बिलियर्डस, बुद्धिबळे, चेकर्स, डार्ट इत्यादी खेळ निवातपणे खेळण्याच्याही सोयी डच बारमध्ये मुबलक असतात युरोपमध्ये फॅशनकडे किमान लक्ष देणारा हा देश आहे. स्वित्झर्लंड, फ्रान्स या देशातील स्त्री-पुरुषाचे अद्ययावत, चटपटीत पोषाख पाहता डचाचे कपडे गबाळेच वाटतात रस्त्यावर जिकडे तिकडे सायकली भिरभिरतच असतात या बाबतीत ॲमस्टरडॅम आणि पुणे याच्यात बरेच साम्य आहे सायकल हे डचाचे इतके आवडते वाहन आहे की, त्याची राणीसुद्धा काही वेळा मौज म्हणून सायकलवरून सहल करते नव्या राणीची सायकलवर बसलेल्या पोझमधील छायाचित्रे हा हॉलंडमधील आम जनतेचा कौतुकाचा विशेष असतो. राजघराण्यातील गेल्या तीनही पिढ्या राण्याच्याच आहेत हा एक योगायोग

राणी ज्युलियना हिने आपली राजकन्या बिट्रिक्सला राणीपद मिळावे म्हणून स्वत.च्या ७२ व्या आणि मुलीच्या ४२ व्या वर्षी राज्यत्याग करून मुलीला राणी केले. त्यापूर्वी ज्युलियनाच्या आईनेही राज्यत्याग करून मुलीला गादीवर आणले होते. इंग्लंडप्रमाणेच हॉलंडमध्येही जनतेचे राजघराण्यावर प्रेम आहे, आणि इंग्लंडप्रमाणेच डच राजघराणेही दैनंदिन राजकारणापासून अलिप्त असते ज्युलियनाने ३२ वर्षे राज्य केले एप्रिल १९८० मध्ये राज्यावर आल्यानतर राणी बिट्रिक्स हिने मे महिन्यात हेगमध्ये ३५ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. ३५ वर्षांपूर्वी त्याच दिवशी

हॉलंड हा नाझी गुलामगिरीतून स्वतंत्र झाला

मी ॲमस्टरडॅममध्ये गेलो, तेव्हा एरव्ही शांत असणाऱ्या या देशात दोन मोठी आंदोलने चालली होती पहिले होते अमेरिकेच्या न्यूट्रॉन बॉंब तयार करण्याच्या घोषणे-विरुद्ध. अनेक ठिकाणी न्यूट्रॉन बॉंबच्या विरोधी घोषणांचे फलक अडकविलेल्या पथकांची निदर्शने रस्त्यावर चाललेली होती दुसरे आंदोलन अंतर्गत होते जलवाह-तुकीची वाहतूक कत्राटे घेणाऱ्याचे आणि नावाड्यांचे वितुष्ट आले होते त्यामुळे एक वेगळेच आंदोलन मला पाहायला मिळाले आपल्याकडे जसे ' रस्ता रोको ' आंदोलन होते तसे ' कालवा रोको ' आंदोलन ॲमस्टरडॅममध्ये चालले होते शहरातल्या सर्व प्रमुख कालव्यामध्ये नावाड्यांनी आपल्या नावा आडव्या–उभ्या करून जलवाहतूक थांबवलेली होती मोठे कत्राटदार व्यापाऱ्याकडून भरमसाठ पैसे घेतात, पण प्रत्यक्ष काम करणाऱ्या नावाड्यांना मात्र पुरेसा मोबदला देत नाहीत, अशी त्यांची तक्रार होती.

रिज्क म्युझियम ( शाही संग्रहालय ) हे हॉलंडचं एक मानचिन्ह आहे पूर्वी मी ते दोन वेळा पाहिलं होतं पण जगातील काही सर्वोत्कृष्ट कलाकृती या संग्रहालयात असल्यानं वारंवार त्या पाहण्याचा मोह कोणाही रसिकाला होतो म्हणून मी तिसऱ्यांदा ते पाहिलं हॉलंड हा वास्तविक प्रतिकूल निसर्गाशी झगडणारा देश पण या छोट्या देशानं चित्रकलेच्या क्षेत्रात मिळविलेली कीर्ती अद्भुत आहे रेम्ब्रा हा जगप्रसिद्ध चित्रकार जवळ जवळ अर्धशतक ॲमस्टरडॅममध्ये होता आणि त्यानं इथं दोन हजारावर चित्रं काढली त्याचं घर आता प्रदर्शनात रूपांतरित करण्यात आलं आहे. व्हॅन गॉग यानं चित्रकलेच्या क्षेत्रात नवी वाट शोधली त्याच्या उत्कृष्ट कलाकृती याच शहरात निर्मिल्या गेल्या हा श्रेष्ठ डच चित्रकार नंतर इथून पॅरिसला गेला मॉन्ड्रीयन हाही पहिल्या दर्जाचा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा चित्रकार याच देशाचा रेम्ब्राचं ' नाईट वॉच ' हे अमर चित्र ॲमस्टरडॅममधील रिज्क म्युझियममध्ये ठेवण्यात आलं आहे. व्हॅन गॉग या डच चित्रकारानं आपलं प्रेम व्यक्त करण्याकरता आपला कान कापून प्रेयसीकडे पाठवला होता ही कथा चित्रकलेच्या क्षेत्रात एक अद्भुत सत्यकथा म्हणून प्रसिद्ध आहे

राजवाड्यासमोरचा चौक ( डॅम स्क्वेअर ) हे ॲमस्टरडॅममधील एक महत्त्वाचं ठिकाण आहे पण त्यापेक्षाही महत्त्वाचं ठिकाण म्हणजे प्रिन्सेग्रात रस्त्यावरचं २६३ क्रमांकाचं घर हिटलरनं हॉलंडवर स्वारी करून ज्यूंची कत्तल करण्यास सुरुवात केली, तेव्हा याच घरात ॲन फ्रॅंक ही चौदा वर्षांची मुलगी आणि तिचं कुटुंब सतत दोन वर्षं पोटमाळ्यावर लपून बसलं होतं आणि त्या विलक्षण अनुभवावर त्या मुलीनं लिहि-लेलं पुस्तक आणि चित्रपट यांनी जगभर खळबळ माजवली त्याचं नाव 'डायरी ऑफ ॲन् फ्रॅंक'.

मिळाला त्याबरोबरच पार्लमेंट आणि प्रांताच्या विधिमंडळासाठीही त्यांना निवडणूक लढवता येते पण अजून संसद, विधिमंडळे, नगरपालिका यात स्त्रियांचे प्रमाण दोन टक्क्यावर गेलेले नाही स्विस स्त्रियांनाच जर सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात स्वारस्य नाही, तर पुरुषांनी त्यांच्यासाठी उगाच आकांत करण्यात काय अर्थ आहे ?"

## आत्मकेंद्रित लोक

बाझलमध्ये मला एस कृष्णन नावाचा दक्षिण भारतीय भेटला तो एका बँकेत काम करतो गेली तीन वर्षे तो स्वित्झर्लंडमध्ये आहे. त्याचा अनुभव फारसा उत्तेजक नाही तो म्हणाला, "इथे पैसा चांगला मिळतो हा एकमेव फायदा पण स्विस लोक फार आत्मकेंद्रित आहेत ते परकीयांना आपल्या समाजात मिसळून घेत नाहीत काम झाल्यावर डोंगराच्याकडे आणि झाडाच्याकडे पाहात राहणे एवढेच माझ्या हाती राहते त्यामुळे कधी एकदा इथली नोकरी संपवून भारताकडे परततो असे मला झाले आहे"

स्वित्झर्लंड हा एकदरीत शांततेचा देश निदर्शने, संप, लाठीमार असे प्रकार इथे फार क्वचित घडतात पण अलीकडेच तरुण पिढीतले असमाधान धुमसत असल्याचे सरकारला आढळून आले आहे. राहण्याच्या जागेची टंचाई आणि वाढती महागाई याविरुद्ध झूरिक, बाझल आणि बर्नला निदर्शने झाली झूरिकला तर आक्रमक निदर्शकांच्यावर अश्रुधूर सोडण्यात आला झूरिकमधील एका नाट्यगृहाच्या पुनर्रचनेसाठी सरकारने १५ लाख पौंड खर्च करण्याची अनुमती दिली नृत्य, नाट्य, संगीत यावर एवढा खर्च करण्यापेक्षा यूथसेंटर्सना (युवककेंद्रे) ही मदत द्यावी म्हणून तरुणांनी ही निदर्शने केली होती तरुणांच्या असंतोषाचे हे कारण तात्पुरते असले तरी त्याचे अधिक महत्त्वाचे भांडण आहेच जुन्या पिढीने आता राजकारणातून, नगरपालिकेतून निवृत्त व्हावे आणि नव्या पिढीच्या हाती सूत्रे द्यावीत म्हणून पॅरिसहून आलेल्या स्वातंत्र्याची पुरस्कर्ती स्विस तरुण पिढी निदर्शने करीत आहे. स्वित्झर्लंडचे हवामान जगातील सर्वात उत्कृष्ट त्याचा एक परिणाम असा झाला आहे की, सरासरी आयुर्मानही दीर्घ आहे अर्थातच राजकारण आणि समाजकारणात तीस ते चाळीस वर्षं तेच नेते आहेत याविरुद्ध अस्वस्थ आणि उत्सुक तरुण पिढी निदर्शने करीत आहे पण तीही सौम्यच बर्न या राजधानीच्या गावचे मन्त्रिमंडळाच्या किंवा फेडरल कौन्सिलच्या सत्तेला धक्का पोहोचण्यासारखी ही चळवळ नाही महिनाभराच्या अस्वस्थतेनंतर स्विस जीवन पुन्हा शांत आणि सुरळित चालू आहे बदलांना ज्या समाजात कमीत कमी वाव आहे, असा हा समाज दीर्घकाळ शांतता, समृद्धी आणि कर्तृत्वहीनता यात मशगूल राहील यात शंका नाही.

१४

# हॉलंड : समुद्राबरोबरची सततची लढाई

गेल्या वीस वर्षांत मी हॉलंडला तीन वेळा गेलो आहे आणि प्रत्येक वेळी या लहानशा पण कल्पक देशाने माझ्या मनावर अधिकाधिक छाप पाडली आहे देश लोकाना जन्म देतो अशी इतरत्र परंपरा असली तरी हॉलंडच्या लोकानीच या देशाला जन्म दिला आहे इतर सारे जग परमेश्वराने निर्माण केले, पण हॉलंड मात्र डच लोकानीच निर्माण केला अशी यथार्थ म्हण युरोपमध्ये प्रचलित आहे नेदर्लंड हे हॉलंडचे दुसरे आणि अधिकृत नाव आहे त्या नावाची फोड केली तर या म्हणीची सत्यता पटते. नेदर म्हणजे खालचा किंवा समुद्रसपाटीखालचा आणि लँड म्हणजे देश. एके-काळी जिथे पाणी, दलदल होती, तेथे डच लोकानी बाध घालून, समुद्र मागे हटवून आणि कालवे काढून देश तयार केला इतर देशातले लोक भूगोल शिकतात, डच लोक बदलतात. त्यानी शेकडो वर्षे उग्र सागराबरोबर युद्ध केले आहे आणि ते जिकले आहे. त्याचा सूड म्हणून अजूनही कधी कधी समुद्र उसळतो आणि एखादे धरण फोडून गावात पाणीच पाणी होते, पण त्यामुळे निराश न होता उद्योगी डच लोक पुन्हा धरण बाधतात आणि सागराला दूर पिटाळतात

समुद्राबरोबरची हॉलंडची ही लढाई दोन हजार वर्षे चालू आहे ख्रिस्ताच्या काळा-पासून या लोकानी बाध घालून समुद्र हटवण्यास सुरुवात केली ती लढाई अजून चालूच आहे जगातील हा अत्यत शाततासप्रिय देश. लोणी, मासे आणि फुले हे मुख्य उत्पादन हॉलंडचे क्षेत्रफळ फक्त पधरा हजार चारशे पन्नास चौरस मैल. त्यापैकी अर्ध्याहून अधिक जमीन समुद्र मागे हटवून लोकानी आपल्या कर्तबगारीने मिळविलेली

लोकसंख्याही कमीच म्हणजे फक्त एक कोटी पन्नास लक्ष पण हे लोक अतिशय कल्पक आणि काटक दर्यावर्दी म्हणून पहिल्या क्रमाकावर असलेल्या या डचानी तीनशे वर्षांपूर्वी भारत आणि इडोनेशियासारख्या दूरवरच्या राष्ट्रात येऊन व्यापार वाढवला आणि वसाहतीही स्थापन केल्या. पण साम्राज्यवादाचा हव्यास नसलेल्या हॉलडने आपल्या वसाहती सोडून दिल्या. डचाची आणि भारतीयाची एका बाबतीत मात्र जवळीक आहे ती म्हणजे या दोन्ही देशात जन्मसंख्येचे प्रमाण जगातील सरासरीपेक्षा खूपच अधिक आहे या दोन देशातला सर्वात मोठा फरक म्हणजे हालंडमध्ये पर्वत नाहीत कारण हा देश समुद्र मागे हटवून तयार केलेला आहे

युरोपमधील इटली किंवा फ्रान्ससारख्या देशाशी तुलना करता हॉलडमध्ये खूपच स्वस्ताई आहे ॲमस्टरडॅम या राजधानीतही १० ते १२ डॉलर्सपर्यंत हॉटेल मिळू शकते ( १०० ते १३० रु ) दहा ते बारा रुपयात जेवण आणि दीड रुपयात कॉफी मिळू शकते वाहतूक अतिशय स्वस्त आहे. रुपयाचे तिकीट बसने किंवा ट्रॅमने पाच मैल नेऊ शकते पाच रुपयाना हैनिकेन ही उत्कृष्ट बियर मिळते. देशात दूध मुबलक असल्याने कॉफीपेक्षाही आइस्क्रीम स्वस्त आहे हॉलडसारखे बार किंवा मद्यगृहे इतर युरोपियन देशात क्वचितच दिसतात पॅरिसमधील बार इतके भरलेले असतात की, उभे राहायलाही कशीबशी जागा मिळते याउलट हॉलडमधील मद्यगृहात भरपूर जागा असते बियर व इतर पेये पिण्याची सोय इथे असते असे नव्हे तर बिलियर्डस, बुद्धिबळे, चेकर्स, ड्रॉट इत्यादी खेळ निवातपणे खेळण्याच्याही सोयी डच बारमध्ये मुबलक असतात युरोपमध्ये फॅशनकडे किमान लक्ष देणारा हा देश आहे स्वित्झर्लंड, फ्रान्स या देशातील स्त्री पुरुषाचे अद्ययावत, चटपटीत पोषाख पाहता डचाचे कपडे गबाळेच वाटतात रस्त्यावर जिकडे तिकडे सायकली भिरभिरतच असतात. या बाबतीत ॲमस्टरडॅम आणि पुणे याच्यात बरेच साम्य आहे सायकल हे डचाचे इतके आवडते वाहन आहे की, त्याची राणीसुद्धा काही वेळा मौज म्हणून सायकलवरून सहल करते नव्या राणीची सायकलवर बसलेल्या पोझमधील छायाचित्रे हा हॉलडमधील आम जनतेचा कौतुकाचा विशेष असतो राजघराण्यातील गेल्या तीनही पिढ्या राण्याच्याच आहेत हा एक योगायोग

राणी ज्युलियना हिने आपली राजकन्या बिट्रिक्सला राज्ञीपद मिळावे म्हणून स्वतःच्या ७२ व्या आणि मुलीच्या ४२ व्या वर्षी राज्यत्याग करून मुलीला राणी केले. त्यापूर्वी ज्युलियनाच्या आईनेही राज्यत्याग करून मुलीला गादीवर आणले होते इग्लडप्रमाणेच हॉलडमध्येही जनतेचे राजघराण्यावर प्रेम आहे, आणि इग्लडप्रमाणेच डच राजघराणेही दैनंदिन राजकारणापासून अलिप्त असते ज्युलियनाने ३२ वर्षे राज्य केले एप्रिल १९८० मध्ये राज्यावर आल्यानतर राणी बिट्रिक्स हिने मे महिन्यात हेगमध्ये ३५ वा स्वातन्त्र्य दिन साजरा केला. ३५ वर्षांपूर्वी त्याच दिवशी

हॉलंड हा नाझी गुलामगिरीतून स्वतंत्र झाला

मी ॲमस्टरडॅममध्ये गेलो, तेव्हा एरव्ही शांत असणाऱ्या या देशात दोन मोठी आंदोलने चालली होती पहिले होते अमेरिकेच्या न्यूट्रॉन बॉंब तयार करण्याच्या घोषणे-विरुद्ध अनेक ठिकाणी न्यूट्रॉन बॉंबच्या विरोधी घोषणाचे फलक अडकविलेल्या पथकांची निदर्शने रस्त्यावर चाललेली होती दुसरे आंदोलन अंतर्गत होते. जलवाह-तुकीची वाऊक कंत्राटे घेणाऱ्यांचे आणि नावाड्यांचे वितुष्ट आले होते त्यामुळे एक वेगळेच आंदोलन मला पाहायला मिळाले आपल्याकडे जसे रस्ता रोको ' आंदोलन होते तसे ' कालवा रोको ' आंदोलन ॲमस्टरडॅममध्ये चालले होते शहरातल्या सर्व प्रमुख कालव्यामध्ये नावाड्यांनी आपल्या नावा आडव्या-उभ्या करून जलवाहतूक थांबवलेली होती मोठे कंत्राटदार व्यापाऱ्यांकडून भरमसाठ पैसे घेतात, पण प्रत्यक्ष काम करणाऱ्या नावाड्यांना मात्र पुरेसा मोबदला देत नाहीत, अशी त्यांची तक्रार होती

रिज्क म्युझियम ( शाही संग्रहालय ) हे हॉलंडचं एक मानचिन्ह आहे पूर्वी मी ते दोन वेळा पाहिलं होतं पण जगातील काही सर्वोत्कृष्ट कलाकृती या संग्रहालयात असल्यानं वारंवार त्या पाहण्याचा मोह कोणाही रसिकाला होतो म्हणून मी तिसऱ्यांदा ते पाहिलं हॉलंड हा वास्तविक प्रतिकूल निसर्गाशी झगडणारा देश पण या छोट्या देशानं चित्रकलेच्या क्षेत्रात मिळविलेली कीर्ती अद्भुत आहे रेम्ब्रां हा जगप्रसिद्ध चित्रकार जवळ जवळ अर्धशतक ॲमस्टरडॅममध्ये होता आणि त्यानं इथं दोन हजारांवर चित्रं काढली त्याचं घर आता प्रदर्शनात रूपांतरित करण्यात आलं आहे. व्हॅन गॉग यानं चित्रकलेच्या क्षेत्रात नवी वाट शोधली त्याच्या उत्कृष्ट कलाकृती याच शहरात निर्मिल्या गेल्या हा श्रेष्ठ डच चित्रकार नंतर इथून पॅरिसला गेला. मॉन्ड्रीयन हाही पहिल्या दर्जाचा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा चित्रकार याच देशाचा रेम्ब्रांचं ' नाईट वॉच ' हे अमर चित्र ॲमस्टरडॅममधील रिज्क म्युझियममध्ये ठेवण्यात आलं आहे. व्हॅन गॉग या डच चित्रकारानं आपलं प्रेम व्यक्त करण्याकरता आपला कान कापून प्रेयसीकडे पाठवला होता ही कथा चित्रकलेच्या क्षेत्रात एक अद्भुत सत्यकथा म्हणून प्रसिद्ध आहे

राजवाड्यासमोरचा चौक ( डॅम स्क्वेअर ) हे ॲमस्टरडॅममधील एक महत्त्वाचं ठिकाण आहे पण त्यापेक्षाही महत्त्वाचं ठिकाण म्हणजे प्रिन्सेग्रात रस्त्यावरचं २६३ क्रमांकाचं घर हिटलरनं हॉलंडवर स्वारी करून ज्यूंची कत्तल करण्यास सुरुवात केली, तेव्हा याच घरात ॲन फ्रॅंक ही चौदा वर्षांची मुलगी आणि तिचं कुटुंब सतत दोन वर्षं पोटमाळ्यावर लपून बसलं होतं आणि त्या विलक्षण अनुभवावर त्या मुलीनं लिहिलेलं पुस्तक आणि चित्रपट यांनी जगभर खळबळ माजवली त्याचं नाव 'डायरी ऑफ ॲन् फ्रॅंक'.

लोणी आणि फुले याबरोबरच हॉलंड आणखी एका गोष्टीबद्दल जगप्रसिद्ध आहे. ती म्हणजे हिऱ्याचा व्यापार हॉलंडमध्ये हिरे सापडत नाहीत पण ॲन्टवर्प, ॲमस्टरडॅम अशा ठिकाणी हिऱ्याना पैलू पाडण्याची मोठमोठी केंद्रे आहेत. हे पैलू पाडण्याचं काम लोकाना मोफत पाहण्याचीही सोय आहे बंद काचेतून पैलू पाडताना कुशल कामगार दिसतात ॲंटवर्प आणि ॲमस्टरडॅममध्ये हिऱ्याचा व्यापार करणारे अनेक भारतीय विशेषतः गुजराथी व्यापारी दिसतात हॉलंड आणि भारत याचा आणखी एक वेगळयाच संदर्भात विशेष संबंध आला आहे केरळमध्ये कोचीन येथे अजूनही डच पॅलेस आहे तीनशे वर्षांपूर्वी या वाड्यात हेंडरिक व्हॅनऱ्हीड या नावाचा डच गव्हर्नर राहात असे त्याला वनस्पतिशास्त्राचा छंद होता त्याने मलबार भागातील शेकडो वनस्पतींच्यावर संशोधन केले, आणि ' हार्टस मलबारिक्स ' नावाचा एक हजार पानाचा ग्रंथ लिहिला या ग्रंथात त्याने एका मल्याळी भाषिक डॉक्टरचे शिफारसपत्र छापले आहे १६७८ मध्ये ॲमस्टरडॅममध्ये प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथातच प्रथम मल्याळी भाषा छापील स्वरूपात दिसली गव्हर्नर ऱ्हीड याचा हा ग्रंथ वनस्पतिशास्त्रात एक मूलभूत ज्ञानाचा ठेवा मानला जातो डचानी भारताचा काही भाग आणि इंडोनेशिया याच्यावर काही काळ राज्य केले होते याची खूण आजही दिसते ती उपाहारगृहातून मिळणाऱ्या पापडाची तळलेले, भाजलेले पापड बऱ्याच डच उपाहारगृहात आढळतात गव्हर्नर हेंडरिक ऱ्हीडने प्रस्तावनेत असा उल्लेख केला आहे की, सिलोनमधील कोलंबो हे शहर डचानी पूर्वेतील आपली राजधानी करावी पण डचाचे भारतातूनच उच्चाटन झाल्याने ही महत्त्वाकांक्षा फलद्रूप झाली नाही

मी फ्रॅंकफूर्टहून बॉनमार्गे ॲमस्टरडॅमला जात असताना माझ्या डब्यात हॉलंडचे इंग्लंडमधील राजप्रतिनिधी श्री ज्योई व त्याच्या पत्नी होत्या सहज बोलताना मी म्हटले, " ॲमस्टरडॅम मला अतिशय आवडते कारण ते शांत आणि निष्पाप आहे " त्यावर श्रीमती ज्योई म्हणाल्या, " दहाबारा वर्षांपूर्वी तुम्ही म्हणता तशी परिस्थिती होती पण आता ती खूपच बदलली आहे याचे मुख्य कारण म्हणजे युरोपमधे झालेली हिप्पींची फार मोठी आयात. ॲमस्टरडॅम, हेग, ॲन्टवर्प ही शांत, निवांत शहरे आणि येथे स्वातंत्र्याचा पूर्ण आविष्कार झालेला असल्याने निरुद्योगी हिप्पी मोठ्या प्रमाणावर आले त्यानी मोकळ्या जागा राहण्यासाठी व्यापण्यास सुरुवात केली त्याना स्क्वॅटर्स ' म्हणतात शहरातल्या खुल्या जागाच नव्हे, तर खासगी मालकीची मोकळी घरेही त्यानी जबरदस्तीने ताब्यात घेतली आणि भाडे वगैरे काही न देता ती वापरण्यास सुरुवात केली त्यामुळे भांडणे, कोर्ट-कचेऱ्या, तणाव, पोलिसांच्याकडून सक्तीने हकालपट्टी आणि त्याविरुद्ध हिप्पींनी न्यायालयाकडे घेतलेली धाव याना ऊत आला. गेल्या दोनतीन वर्षांत तर ही अस्वस्थता, निदर्शने आणि हकालपट्ट्या याना एवढा ऊत आला की, हॉलंडच्या सरकारला या प्रकाराना आळा

घालण्यासाठी खास कायदे करावे लागले. या कायद्यानुसार रिकामी जागा आणि घरे याचा अनधिकृत ताबा घेणाऱ्याना शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आली पूर्वी असे प्रसंगच कधी न आल्याने कायदे त्याबाबत अस्पष्ट होते तसेच एक नवा कायदा करून रिकाम्या पडलेल्या जागाना घरमालकाच्या सूचनेनुसार पोलिसाचे सरक्षण मिळण्याची सोय करण्यात आली ''

स्क्वॅटर्सना गुन्हेगार ठरविण्यात आल्याने हिप्पी अधिकच खवळले आणि त्यानी प्रमुख शहरी उग्र निदर्शने केली ॲमस्टरडॅममधील डॅम चौकात तर दोन हजार हिप्पी ठाण माडून बसले त्याना हलविताना पोलिसाना पुरेवाट झाली कारण हॉलंड हे तसे शात राष्ट्र असल्याने अशा मोठ्या निदर्शनाना तोंड देण्याचा पोलिसाना सराव नव्हता आणि दुसरी अडचण म्हणजे हिप्पींच्या एवढ्या मोठ्या संख्येची सोय करण्यासाठी तुरुगातही जागा नव्हती ! गेल्या दहा वर्षांत हॉलंडसारख्या लहान देशात सात हजार हिप्पी आले पूर्वीच्या डच वसाहतीतून गेल्या पधरा वर्षांत तीस हजार लोक काम मिळविण्यासाठी हॉलडमध्ये आले हॉलडसारख्या लहान देशाला हा भार सोसण्या-सारखा नाही, म्हणून व्हिसा देताना अधिक काटेकोर धोरण सरकार स्वीकारीत आहे. राणी बिट्रिक्सच्या राज्यारोहणाच्या वेळी दहा हजार बेकार आणि हिप्पींनी केलेल्या निदर्शनामुळे परपराप्रिय डच नागरिक व सरकार अधिकच व्यथित झाले आहे

ख्रिश्चन डेमोक्रॅटट्स आणि लिबरल हे दोन राजकीय पक्ष हॉलडमध्ये विशेष प्रबल आहेत सरकार बनविण्यात त्याचा प्रभाव असतो हा देश उद्योगधद्यात मागे असल्याने नवीन काम किंवा नोकऱ्या निर्माण होणे सोपे नाही दूधदुभते, फुले, शेतीनिष्ठ उद्योग, हिऱ्याना पैलू पाडण्याचे काम अत्यत कुशल हजारो कामगाराना काम मिळण्याचे ते क्षेत्र नव्हे त्यामुळे हॉलडची आर्थिक परागतीच होत आहे. बेकाराचे प्रमाण शेकडा ५ टक्क्यावरून ५½ टक्क्यावर गेले आहे आणि वाढत्य अस्वस्थतेचे तेही एक कारण आहे चलनवाढीचे प्रमाण ४½ वरून ६ टक्क्यावर आले आहे इटलीसारख्या देशातील २१ टक्के चलनवाढीच्या मानाने हे प्रमाण अतिशय कमी असले तरी शेतीप्रधान देशाला एवढी वाढही त्रासदायक झाली आहे त्यामुळे देशाच्या अंदाजपत्रकात चार कोटी गिल्डर्सची तूट धरण्यात आली आहे (एक गिल्डर म्हणजे सुमारे साडेतीन रुपये) जहाजबाधणी हा हॉलडचा एक मोठा व्यवसाय होता पण गेल्या पंचवीस तीस वर्षांत जपानने या व्यवसायातून हॉलंडला पार हटवले आहे सध्या जगातील ५० टक्के जहाज बाधणी एकट्या जपानमध्ये होते तरीही रॉटरडॅम, ॲमस्टरडॅममध्ये डच जहाज-बाधणी व्यवसाय अजून जीव धरून आहे, पण त्याची वाढ होण्याऐवजी तो उतरणीलाच लागला आहे त्या मानाने युरोपमधील जहाज-बाधणीचा अधिक हिस्सा अलीकडे प. जर्मनीने घेतला आहे जर्मनीच्या फॉकर कंपनीने हॉलडमधील शिपॉल विमानतळाजवळ

सुरू केलेल्या विमान-बांधणीच्या कारखान्याने या देशाला आधुनिक कारखानदारीचे प्रवेशद्वार खुले करून दिले असले तरी त्याची क्षमता डचांना मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासारखी नाही. एन्डहोवेन येथील फिलिप्सचा कारखानाही महत्त्वाचा आहे पण ज्याला यंत्रयुग म्हणतात किंवा त्यापुढचे विद्युदणूचे युग ते मात्र अजूनही हॉलंडच्या उद्योगधंद्यात अवतरलेले नाही.

अनेक शहरात आगीपासून बचाव करणाऱ्या फायर ब्रिगेड असतात ॲमस्टरडॅम शहराच्या नैसर्गिक परिस्थितीमुळे इथे जास्त करून 'वॉटर ब्रिगेड्स' आहेत अनंत कालवे आणि ॲम्स्टले ही नदी यांचा परिणाम असा झाला आहे की माणसे, मोटारी, घोडे किंवा घोडागाडी कालव्यात पडतात कधी कधी थंडीच्या दिवसात पाण्याचे बर्फ होते आणि लोक त्यावर स्केटिंग करतात पण काही ठिकाणी बर्फाचा फार पातळ पापुद्रा असतो, तो फुटतो आणि स्केटिंग करणारा पाण्यात पडतो अशा लोकांना, प्राण्यांना आणि वस्तूंना पाण्यातून वर काढणाऱ्या वॉटर ब्रिगेड्स आहेत त्यासाठी खास नावा, पट्टीचे पोहणारे आणि क्रेन्स आहेत कालव्यात पडलेली मोटार वर काढली तर नगरपालिकेच्या वॉटर ब्रिगेडला वीस डॉलर्स द्यावे लागतात. इतरांच्या बाबतीतली सेवा मोफत असते भरपूर पाणी असल्याने अजूनही हॉलंडमध्ये पवनचक्क्या दिसतात. पण आता विजेचे उत्पादन मुबलक असल्याने या पवनचक्क्या मुख्यतः शोभेच्या व परंपरेच्या वस्तू झाल्या आहेत

हॉलंडचा आणि भारताचाच नव्हे, तर महाराष्ट्राचाही फार जुना संबंध आहे. छ शिवाजी महाराजांच्या दरबारात एक डच प्रतिनिधी आला होता आणि त्याने व्यापारासाठी सवलती मिळण्याविषयी अर्ज केला होता शिवाजी महाराजांचे जे अधिकृत चित्र म्हणून मान्य झाले आहे, ते एका डच चित्रकाराने काढलेले आहे. हॉलंडमधील हेग या गावी आंतरराष्ट्रीय न्यायालय आहे हॉलंडमधील शांतता आणि त्या देशाची तटस्थता लक्षात घेऊन पूर्वीच्या 'पीस पॅलेस'मध्ये हे न्यायालय आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याची अकॅडमीही हेगमध्ये आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आगबोटीच्या झरोक्यातून उडी मारून मार्सेलिसच्या किनाऱ्यापर्यंत पोहत जाण्याचा पराक्रम केला. पण त्यांना अटक करण्यात आली ते ब्रिटिशांचे कैदी पण ही अटक फ्रान्सच्या हद्दीत झाली म्हणून त्यांच्यावर हक्क कोणाचा याबाबत हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला चालला होता भारत आणि पोर्तुगाल यांच्यात गोव्याविषयीचाही वाद याच न्यायालयात चालला होता ॲमस्टरडॅम हे जरी हॉलंडमधील सर्वांत मोठे शहर असले, तरी या देशाचा राज्यकारभार हेग या लहान गावातून चालतो सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ स्पिनोझा यांचे निधन याच गावी झाले हॉकी आणि बुद्धिबळे हे दोन खेळ भारताप्रमाणेच हॉलंडमध्येही फार लोकप्रिय आहेत. हॉकी खेळताना भारतीय शीख खेळाडू डोक्यावर कसले तरी फळ बांधून खेळतात असा

हॉलंडमध्ये समज आहे वास्तविक शिखानी आपले केस बाधलेले असतात.

डच लोकाचे आयुर्मान दीर्घ आहे स्त्रियाचे सरासरी आयुष्य ७६ वर्षांचे आणि पुरुषाचे ७१ वर्षांचे आहे उत्तम हवामान आणि भरपूर सकस अन्न यामुळे आयुर्मान वाढले असले तरी वृद्धाचा प्रश्न अधिकाधिक गभीर होत आहे लोकसंख्यावाढीचे प्रमाणही युरोपमधील इतर देशाच्या मानाने अधिक आहे याचा परिणाम म्हणजे मुले आणि वृद्ध किंवा कमाई करण्यास निरुपयोगी अशाची सख्या वाढली आहे डच लोक मूलतःच शाततािप्रय आहेत. पण अलीकडे आधुनिक युरोपमधील अस्वस्थतेची बीजे या देशातही पसरू लागली आहेत स्क्वॅटर्सपेक्षा अधिक आक्रमक अशी क्रॅकर्स ही संघटना रिकामी घरे व्यापण्याचा आणि दडेली करण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहे त्याना हुसकून लावण्याचा तातडीचा कार्यक्रम हाती घेत असतानाच डच सरकारने येत्या पाच वर्षात ६५ हजार नवी घरे बाधण्याची योजनाही आखली आहे उपद्रवकारक हिप्पींच्या आयातीवर बंदी, जुन्या वसाहतीतून येणाऱ्यावर कडक निर्बंध आणि घराच्या संख्येत वाढ यामुळे डच सरकार लवकरच पूर्वीची शात आणि प्रगतिकारक परिस्थिती पुन्हा प्राप्त करून घेईल असा सभव आहे.

# १५

## चिमुकला बेल्जियम आणि शांतनिवांत : लक्झेंबर्ग

बावीस वर्षांपूर्वी मी प्रथम बेल्जियमला गेलो तेव्हा व्हिसाचा फॉर्म भरताना अनेक अनपेक्षित रकाने दिसले तुमच्या वडलाचे लग्न केव्हा झाले आईचे माहेरचे नाव काय? आजोबाचे राष्ट्रीयत्व कोणते? आजीचे माहेरचे नाव काय? आजोबा आणि आजीची जन्मतारीख काय? त्याचा विवाह कधी झाला? असे अनेक तपशील खरे तर सर्वसाधारणपणे कुणाच्याच लक्षात नसतात कारण सबध घराण्याची–नव्हे दोन्ही घराण्याची–वशावळ घेऊन कोणी हिंडत नसतो मी तर लडनहून व्हिसा मागितला होता हे तपशील भारतातून मागवून घेण्याएवढा वेळ नव्हता व्हिसा फॉर्मवर सक्त ताकीद होती : प्रत्येक रकाना भरलाच पाहिजे माझी अडचण मी बेल्जियम कॉन्सुलेटच्या अधिकाऱ्यास सांगितली तेव्हा तो म्हणाला, " आम्हाला केवळ रकाने भरलेले पाहिजेत. तुम्ही वाटेल ती नावे आणि तारखा घातल्या तरी चालतील." मी विचारले, " पण इतक्या तपशिलाची आवश्यकताच काय?" त्यावर त्या अधिकाऱ्याने सांगितले, " खरे तर तुमच्यासारख्यासाठी हे रकाने नाहीतच बेल्जियम हा देश अनेक युरोपियन देशांना लागून आहे तो मोक्याचा देश असल्याने युरोप-मधले गुन्हेगार इथे येतात व लपून राहतात कधी कधी हे गुन्हेगार नाव बदलून, खोटी लग्ने करून बेल्जियमचा आश्रय घेतात त्याच्या गुन्हेगारी पूर्वजाचा किंवा सध्याच्या नातेवाइकाचा मागोवा घेता यावा म्हणून हे रकाने आहेत "

त्याच्या या स्पष्टीकरणावरून बेल्जियमचे स्वरूप लक्षात येते. हा तसा शांतताप्रिय देश पण त्याला तीस वर्षांत दोन परकीय आक्रमणाना तोंड द्यावे लागले. दोन्ही

महायुद्धात या लहानशा देशाने स्वातंत्र्य गमावले आणि पुनः ते मिळवले. या देशाचा इतिहास अतिशय वेगळा आणि मनोरंजक आहे १८३० मध्ये ब्रिटिशानी बेल्जियम आणि हॉलंड या दोन्ही देशाना संयुक्त रीत्या स्वातंत्र्य दिले तेव्हा त्याचे नाव युनायटेड किंग्डम ऑफ द नेदर्लंड्स असे होते, पण बेल्जियमच्या लोकाना हॉलंड-मध्ये सामावून जायचे नव्हते त्याना आपले स्वतंत्र अस्तित्व हवे होते त्यासाठी ब्रुसेल्समधील ऑपेरा हाऊससमोर स्वतंत्र अस्मितेच्या चळवळीचा नारळ फुटला हॉलंडमध्ये जाऊन निष्प्रभ होण्यापेक्षा आपण फ्रान्ससारख्या मोठ्या देशात सामील होऊ असे या मोहिमेचे म्हणणे होते. पण ब्रिटिशाना फ्रान्सला अधिक बलाढ्य करायचे नव्हते सत्तेचा समतोल या त्या वेळी प्रचलित असलेल्या राजकीय प्रणालीस अनुसरून बेल्जियम हा स्वतंत्र देश करण्यात आला

फ्रेंच भाषा बोलणारे आणि फ्लेमिश भाषा बोलणारे असे दोन प्रमुख गट त्या वेळी बेल्जियममध्ये होते डच भाषेच्या अभिमान्याना इतकी हार खावी लागली की, सरकार दरबार, न्यायालये आणि विद्यापीठे यातून डच भाषेवर बंदी घालण्यात आली कारण कोणत्याही परिस्थितीत पुनः हॉलंडमध्ये सामील होण्यास बेल्जियमचा कडक विरोध होता मात्र फ्रेंच व फ्लेमिश भाषिकामधील चढाओढ थांबली नाही या दोन्ही भाषिकाचे ५० टक्के प्रतिनिधी सरकारमध्ये असावे अशी घटनेत तरतूद करण्यात आली, पण फ्लेमिश भाषिक अधिक कर्तबगार निघाले आणि त्याची लोकसंख्या फ्रेंच भाषिकापेक्षा अधिक झाली! एकेकाळी ५० टक्के अशी समान विभागणी असणाऱ्या राष्ट्रात आता फ्लेमिश भाषिक ५६ टक्के आणि फ्रेंच भाषिक ४४ टक्के आहेत आपली जननसंख्या वाढविण्याचे गंभीर आवाहन फ्रेंच भाषिकाच्या मेळाव्या-तून अद्याप करण्यात येते!

महाराष्ट्रात घरोघरी हा देश कोणत्या एका वस्तूमुळे परिचित असेल तर तो आरशामुळे बेल्जियमच्या काचेचा आरसा म्हणजे त्या क्षेत्रातील अखेरचा शब्द मी ब्रुसेल्समध्ये हॉटेलच्या खोलीत गेलो तेव्हा मला वाटले होते की, उत्कृष्ट आरसे याच देशात तयार होत असल्याने खोलीत सगळीकडे आरसेच आरसे असतील! पण तसा प्रकार आढळला नाही इतर देशातील हॉटेल्सप्रमाणे इथेही खोलीत एक आणि स्नानगृहात एक असे दोनच आरसे होते ब्रुसेल्समधील नव्हे तर संबंध बेल्जियममधील सर्वांत प्रसिद्ध चौक म्हणजे ग्रँड प्लास या चौकाला गोथिक पद्धतीच्या जुन्या इमारतींनी विशेष प्रतिष्ठा दिली आहे टाऊन हॉल ही सतराव्या शतकातील नक्षीदार आणि भव्य इमारत दीर्घकाल लक्षात राहणारी आहे चौक जुन्या पद्धतीचा, विटाएवढे दगड जमिनीत रोवून केलेला आहे मध्यभागी फुलाचे विक्रेते हॉलंड, फ्रान्स, बेल्जियममधील फुलाचे शेकडो गुच्छ ठेवून बसलेले असतात, हे दृश्य मन प्रसन्न करते मॅनकेन चौकातला एका अज्ञात मुलाचा पुतळा-कम–

कारंजा हे आणखी एक अगदी वेगळे प्रेक्षणीय स्थळ सात-आठ वर्षांच्या मुलाचा हा पुतळा लघुशंका करतानाचा आहे तोच कारंजा ! ऑपेरा रॉयल या संगीत नाट्यगृहासमोर क्रांतीचा प्रारंभ झाला, ते या देशातील जनतेचे अभिमानाचे ठिकाण

बेल्जियमचे क्षेत्रफळ फक्त ११,७८१ चौरस मैल आणि लोकसंख्या एक कोटी दहा लक्ष एवढीच आहे पण या दोन्हींच्या तुलनेने या देशाने जगात अतिशय महत्त्वाचे स्थान मिळवले आहे युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिस्टाची ही राजधानी. जागतिक शाता मोहिमेची मुख्य कचेरी ब्रुसेल्समध्ये युरोपमध्ये अलीकडेच अमेरिकेच्या न्युट्रॉन बॉम्बविरुद्ध प्रचंड चळवळ झाली, तिचा केंद्रबिंदू ब्रुसेल्स हाच कारण या देशाची मोक्याची भौगोलिक जागा एका बाजूला फ्रान्स, दुसऱ्या सरहद्दीवर प. जर्मनी, वर हॉलंड आणि चौथ्या बाजूला इंग्लंडपासून अगदी जवळच असलेल्या खाडीची हद्द या मोक्याच्या जागेमुळे गुप्तहेराचे एक प्रभावी केंद्र म्हणून राजनैतिक विश्वात ब्रुसेल्सचा दबदबा आहे देश इतका लहान पण आर्थिकदृष्ट्या विलक्षण जोमदार १९७० नंतरच्या दहा वर्षांत बेल्जियमचे औद्योगिक उत्पादन एक्याऐंशी टक्क्यानी वाढले ! चलनवाढीचा दर आटोपशीर म्हणजे फक्त साडेचार टक्के आहे जगातील कोणत्याही देशात निर्माण होत नाही एवढे अणुशक्तीपासूनचे दर माणशी उत्पादन बेल्जियमचे आहे दर माणशी निर्यातीच्या प्रमाणात बेल्जियमचा जगात पहिला क्रम आहे दर साल दर माणशी सहा हजार डॉलर्सच्या मालाची निर्यात हा छोटा देश करतो हा एक चमत्कारच आहे देशातले ७० टक्के कामगार कोणत्या ना कोणत्या कामगार संघटनाचे सभासद असूनही औद्योगिक उत्पादन पहिल्या प्रतीचे आहे बेल्जियम फ्रँक हे जगातील अत्यंत बळकट चलनापैकी एक आहे या देशात संपाचे प्रमाण अत्यल्प आहे याचे कारण असे की, वस्तूंच्या किंमती ज्या प्रमाणात वाढतात, त्याच प्रमाणात वेतनही वाढते एखाद्या तिमाहीत एक टक्क्याने जरी किंमती वाढल्या तरी लगेच कामगाराचे वेतन एक टक्क्याने वाढविण्यात येते कामगार भरपूर काम करतात आणि कटकटी निर्माण करीत नाहीत म्हणून अनेक देश बेल्जियममध्ये कारखाने काढण्यास उत्सुक असतात. या देशाचे सरकारही जास्तीत जास्त सवलती देऊन परकीय गुंतवणुकीला उत्तेजन देते याचा परिणाम असा झाला आहे की, देशातील ऐंशी टक्के कारखाने परकीयांच्या मालकीचे आहेत आणि त्याचे ६० ते ८५ टक्के उत्पादन निर्यात होते

बेल्जियममध्ये प्रत्यही नवे उद्योगधंदे निघतात आणि काम मिळण्याची भरपूर संधी आहे म्हणून इटली, स्पेन, मोरोक्को अशा तुलनेने गरीब देशातील हजारो कामगार या देशात आले आहेत बेल्जियमच्या लोकसंख्येपैकी पंचवीस टक्के लोक मूळचे परकीय आहेत त्यानाही इथे सर्व ऐहिक सुखे मिळतात इटली–फ्रान्सच्या मानाने स्वस्ताई आहे मध्यवर्ती देश असल्याने केबलच्या साहाय्याने पाच देशातील

टेलिव्हिजनचे कार्यक्रम तेरा चॅनेल्सवर पाहता येतात विश्रांतीसाठी परदेशात जायचे तर रेल्वेने चार तासात कुठूनही जाता येते सुदर समुद्रकिनारा आहे हवामान चागले आहे सुबत्ता आणि सपत्ती आहे वर्णभेद नाही राजकीय, आर्थिक शातता आहे, स्थैर्य आहे अमेरिकेसारख्या अवाढव्य देशापेक्षाही हा देश अधिक सुखी आहे बेल्जियममध्ये कायमचे वास्तव्य करणाऱ्या भारतीयाची संख्या थोडी आहे पण व्यापारासाठी विशेषतः हिऱ्याच्या व्यापारासाठी तेथे वारवार जाणारे गुजराथी व्यापारी मोठ्या प्रमाणावर आहेत बेल्जियममध्ये लोकशाही असली तरी हॉलड, इग्लडप्रमाणे राजा अथवा राणीही आहे या दोन्ही देशाप्रमाणे बेल्जियम जनतेचेही आपल्या राजघराण्यावर नितात प्रेम आहे चित्रकला, काचेचे उत्कृष्ट सजावटीचे सामान, ऑपेरा, नाटके, नृत्य ही बेल्जियमची सास्कृतिक अंगे विशेष प्रसिद्ध आहेत. जर्मनीच्या प्रभावामुळे नाटकापेक्षाही ऑपेराचे कार्यक्रम अधिक होतात तसेच फ्रान्सच्या प्रभावामुळे चित्रकलाही भरभराटीत आहे गोल्फ, टेनिस आणि घोड्यावरून रपेट याची बेल्जियम लोकाना विशेष आवड आहे. ब्रुसेल्ससारख्या मोठ्या शहरातील अनेक रेस्तरॉमध्ये बिलियर्डस खेळण्याची सोय आहे व्हिस्की किंवा वाईनपेक्षा या देशात बियरची लोकप्रियता अधिक आहे. हा शेजारच्या जर्मनीचाच प्रभाव आहे

आतरराष्ट्रीय राजकारणात हा देश विशेष पुढाकार घेत नाही जागतिक महत्त्वाच्या बहुतेक प्रमुख बाबतींत अमेरिका, ईग्लड, फ्रान्स याची बाजू हा देश घेतो मात्र न्यूट्रॉन बॉम्बविरोधी निदर्शनाचे ब्रुसेल्स हे केद्र आहे याचे कारण असे की, सरकारचा जरी पाश्चात्त्याना पाठिंबा असला, तरी सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कामगाराना युद्ध अथवा अस्वस्थता नको आहे पचवीस टक्के लोक परदेशातून आले असल्याने युद्धाच्या प्रसगी आपल्याला आपल्या गरीब देशात परत जावे लागेल ही भीतीही आहेच, परदेशी भाडवलाचे कारखाने अशाततेमुळे बद झाले तर बेकारी वाढेल ही भीतीही कामगाराना भेडसावते बेल्जियममधले सध्याचे समृद्ध सुखी आणि शात जीवन सोडण्याची त्याची तयारी नाही नजीकच्या भविष्य काळात तरी तसा सभव नाही

साहित्यातही फ्रेंच आणि फ्लेमिश साहित्य असे दोन ठळक प्रवाह आहेत समृद्ध फ्रेंच साहित्याच्या प्रभावामुळे फ्लेमिशपेक्षा फ्रेंच विभागाची अधिक भरभराट झाली आहे. आल्बर्ट ॲनीपर्क ( कादबरी ), फर्नांड क्रॉमेनिक व जॉर्ज सिऑन ( नाटक ) आणि ॲड्री सूडेन कॅंप व जोसेफ डेलमेल ( काव्य ) अशी साहित्यातील काही प्रमुख नावे सागता येतील फ्रेंच आणि फ्लेमिश या दोन्ही भाषातून विपुल पुस्तके आणि नियतकालिके प्रसिद्ध होतात. मात्र फ्रान्समधून येणारा फ्रेंच साहित्याचा प्रचंड लोढ फ्लेमिश पुस्तकाना सहज नामोहरम करतो

बेल्जियममधून मी लक्झेंबर्गला आलो हा देश बेल्जियम, फ्रान्स आणि जर्मनी

याच्या सीमेवर एका छोट्या खोबणीत आहे तो इतका लहान आहे की, त्यावर अनेक विनोद प्रचलित आहेत यापैकी असा असा–

एक अमेरिकन कुटुंब बेल्जियममधून फ्रान्सकडे मोटारीने जात होते बायको म्हणाली, " अहो, इथंच कुठतरी लक्झेंबर्ग नावाचा देश आहे, तो जाता जाता पाहू या का ? "

नवरा म्हणाला, " हो. थाव मी नकाशा काढतो " असं म्हणून चालत्या मोटारीतून ते नकाशा पाहू लागले तेवढयात परत म्हणाले, " अग मी नकाशा उघडतो आहे, तेवढ्यात तो देश गेलासुद्धा ! "

असा हा चिमुकला, मोठ्या नकाशातही लक्षात न येणारा देश ! ५१ मैल लांब आणि ३५ मैल रुंद एवढाच हा देश. लोकसंख्या ४ लाख ७० हजार आपल्याकडचा कोल्हापूर जिल्हाही याच्या तिप्पट मोठा आहे हा देश पाहण्याची मला उत्सुकता होती ती वेगळ्याच कारणासाठी कारण १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री यांनी भारतातील संस्थाने खालसा करण्याचा धडाका लावला, तेव्हा कोल्हापूरचे दिवाण म्हणाले होते, " लक्झेंबर्ग जर स्वतंत्र राहू शकते तर कोल्हापूर का राहू नये ? " तेव्हा मी कोल्हापुरात होतो आणि तेव्हापासून लक्झेंबर्ग हा काय प्रकार आहे तो पाहण्याची मला उत्सुकता लागून राहिली होती !

हा एवढासा देश असल्यामुळे आक्रमकाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा अनेकदा बळी झाला आहे सीझरपासून हिटलरपर्यंत अनेकांनी याच्यावर आक्रमण केले कारण या देशाचे सैन्य ते कितीसे असणार आणि त्याची प्रतिकारक्षमता ती केवढी असणार ! पण या देशाचा विशेष असा की, तरीही इतर मोठ्या देशात मिसळून जावे किंवा परकीय आक्रमणाखाली राहावे याला त्याचा विरोध आहे अनेकदा गमावलेले स्वातंत्र्य परत मिळवून हा चिमुकला देश आपला राज्यकारभार स्वतःच पाहात आहे त्यांनी आपली भाषाही स्वतंत्र ठेवली आहे जर्मन आणि फ्रेंच यांचे काहीसे विचित्र मिश्रण म्हणजेच लीझबर्गीश या देशाचे क्षेत्रफळ गणिताच्या हिशोबाने बरोबर ९९९ चौरस मैल येते इथ येणारे परकीय प्रवासी गमतीने विचारतात, " आणखी एकच मैल जमीन कुठून तरी मिळवून पूर्ण एक हजार का करीत नाही ? " त्यावर इथले लोक उत्तर देतात, " तसा एक मैल आम्ही मिळवला होता, पण त्या जमिनीवरच्या नागरिकांना आमची भाषा बोलता येत नव्हती म्हणून आम्ही ती जमीन परत दिली ! "

मी लक्झेंबर्गला गेलो, तेव्हा त्या देशाविषयी गाईड बुकातून जे वाचले होते त्यावरून तेथे खूपच स्वस्ताई असेल अशी माझी समजूत होती इटली आणि फ्रान्सपेक्षा हा देश स्वस्त आहे, बेल्जियमइतक्याच इथ किंमती आहेत पण प जर्मनीपेक्षा हा देश पाच टक्क्यांनी महागच असेल पण कमी नाही इथे एक मात्र सोय आहे तीन देशांचे चलन इथे मुक्तपणे स्वीकारतात लक्झेंबर्ग शहर खूप मोठे, स्वच्छ आणि सुंदर

आहे बऱ्याच इमारती अजूनही जुन्या दगडाच्या आहेत इमारतीसमोर छोट्या देखण्या बागा आहेत देशाची एकचतुर्थांश जनता या राजधानीच्या शहरात राहते. दुकानातून जपानी आणि अमेरिकन अद्ययावत वस्तू दिसतात. या देशातील सर्वांत मोठा उद्योगधदा म्हणजे पोलादाचा 'आरबड स्टील कपनी' हा युरोपमधील तिसऱ्या क्रमाकाचा सर्वांत मोठा पोलादाचा कारखाना आहे लक्झेंबर्गच्या जनतेपैकी सुमारे ५० टक्के लोक औद्योगिक कामगार आहेत पोलादाबरोबरच अलीकडच्या काळात कॉम्प्युटर्स, नायलॉन याचेही कारखाने निघाले आहेत. देशातील १२ टक्के लोक शेतीवर अवलबून आहेत द्राक्षापासून वाईन तयार करण्याचा मोठा व्यवसाय चालतो. लक्झेंबर्ग शहरातून अनेक जलप्रवाह जात असल्याने शहरात ६० पूल आहेत अनेक जुने किल्ले असले तरी ग्रँड ड्यूकचा किल्ला सर्वांत मोठा व महत्त्वाचा शहरातील दोन रस्ते १९०० वर्षांपूर्वी रोमन विजेत्यानी बाधलेले आहेत लक्झेंबर्गमध्ये वाईनच्या पहिल्या मोसमाचा महोत्सव होतो आपल्याकडच्या गोव्यासारखा शात निवात देश, अमेरिकेच्या मानाने स्वस्ताई आणि ग्रामीण जत्रा, महोत्सव याची विविधता यामुळे लक्झेंबर्गला दरसाल पधरा लक्ष म्हणजे देशाच्या लोकसंख्येचे तिप्पट परकीय प्रवासी भेट देतात अमेरिकेच्या दृष्टीने या छोट्याशा देशाला एक वेगळेच महत्त्व आहे ते असे की गेल्या महायुद्धात १९४४–४५ मध्ये बॅटल ऑफ द बल्ज या नावाने विख्यात असलेली टॅक्सची घनघोर लढाई याच देशात झाली हिटलरच्या सैन्याने आणि विमानानी लक्झेंबर्गची साठ हजार घरे उद्ध्वस्त केली अमेरिकेच्या पहिल्या आणि तिसऱ्या सैन्य विभागानी हिटलरच्या सैन्याचा हल्ला परतवला या लढाईत मरण पावलेल्या पाच हजार अमेरिकन सैनिकाची थडगी हॅम येथे आहेत युद्धक्षेत्रात जागतिक कीर्ती मिळवणारे जनरल जार्ज बॅटन याचेही थडगे येथे आहे त्याच्या जीवना-वरील अभिजात चित्रपट जगभर कोट्यवधी लोकानी पाहिला आहे नाझींच्या आक्रमणापासून स्वतत्र झाल्यानंतर लक्झेंबर्ग राष्ट्र हा स्वातन्त्र्यदिन दरसाल जूनमध्ये साजरा करते युद्धकाळात हिटलरने लक्झेंबर्गच्या सोळा हजार लोकाना अटक करून पूर्व सीमेवर सक्तीने आपल्या बाजूने लढायला लावले होते. ही भयानक आठवण अजूनही इथले लोक विसरलेले नाहीत

एकेकाळी या छोट्या देशात अनेक सरदार, दरकदार किंवा जहागीरदार होते. त्याचे किल्ले, गढ्या, वाडे अजूनही तसेच आहेत कित्येक नद्याच्या आडव्या उभ्या प्रवाहानी रस्त्यानी वळणे घेतली आहेत टेकड्या-डोगरानी वाटेतच उंचवटे उभे केले आहेत आणि विशेष म्हणजे जिकडे तिकडे हिरवीगार झाडे, हिरवळी आहेत. या सर्वांमुळे मला लक्झेंबर्गला गेल्यावर गोव्यासच आल्यासारखे वाटले दोन्हीतील आणखी एक साम्य माझ्या निदर्शनाला आले ते असे, की इ स ६९८ मध्ये विलिब्रोर्ड नावाचा खिश्चन धर्मप्रसारक संत निधन पावला त्याचे शव अजूनही

एक्टरनॅक इथे कॉफिनमध्ये आहे असे सागतात दरवर्षी तेथे मोठी जत्राही भरते गोव्यातही असेच एका संताचे शव ठेवले आहे हे सर्वश्रुतच आहे गोव्याची फेणी प्रसिद्ध आहे, तशीच इथली मॉसेल वाईन प्रसिद्ध आहे. लक्झेंबर्गची ९५ टक्के जनता रोमन कॅथॉलिक धर्माची आहे

या देशाला स्वतःच्या भाषेचा जाज्वल्य अभिमान आहे, पण गमत अशी की लक्झेंबर्ग रेडिओ केंद्रावरून बारा भाषातून कार्यक्रम प्रसारित केले जातात! कारण आसपासच्या सर्व देशातील विविध भाषिक श्रोत्यापर्यंत कार्यक्रम नेऊन जास्तीत-जास्त जाहिराती मिळवणे हा या रेडिओ केंद्राचा हेतू आहे युद्धकाळात नाझी आक्रमकानी याच केंद्रावर लॉर्ड हॉ हॉ ( विल्यम जेम्स ) याना पाश्चिमात्याविरुद्ध विषारी प्रचार करण्यास भाग पाडले युद्धानतर इग्लडमध्ये लॉर्ड हॉ हॉ याच्यावर खटला भरण्यात आला आणि त्याना राष्ट्रद्रोहाबद्दल फाशीची शिक्षा झाली.

या लहान पण अतिशय मनोरजक देशातून मी पश्चिम जर्मनीला गेलो.

# १६

## दोन जगे विभागणारी बर्लिनची भिंत

जर्मनीत गेल्यावर मला सर्वांत अधिक उत्सुकता होती, ती जगप्रसिद्ध बर्लिनची भिंत पाहण्याची ही भिंत तेरा ऑगस्ट १९६१ च्या रात्री घालण्यात आली आणि सुसंस्कृत जगाला हादरा बसला हजारो वर्षांच्या दीर्घ मानवी इतिहासात असा प्रकार कधीही झाला नव्हता तुरुंग निर्माण झाले होते पण देशाचाच तुरुंग यापूर्वी कधी अस्तित्वात आला नव्हता योगायोग असा की, ऑगस्ट १९८१ च्या दहा तारखेला मी जर्मनीत गेलो तेरा तारखेला बर्लिन भिंतीचा विसावा वाढदिवस दोन्ही बाजूंना अगदी वेगळ्या प्रकारे साजरा होणार होता पूर्व जर्मनीत आनंदोत्सव तर पश्चिम जर्मनीत शोकदिन म्हणून दिवस साजरा होत होता या अपूर्व प्रसंगी बर्लिनमध्ये हजर राहायचेच असे मी ठरवले

त्या वेळी मी फ्रँकफुर्टमध्ये होतो, तिथून बर्लिनला जाणे कटकटीचे, खर्चाचे आणि बराच वेळ लागणारे होते कारण यासाठी पश्चिम जर्मनीची सरहद्द ओलांडून एकशे-दहा मैल आत पूर्व जर्मनीत जावे लागणार होते फ्रँकफुर्ट फुल्डाला गाडी बदलायची, तेथून नेव्हर, तेथून हॅम्स्टेड हे सरहद्दीचे गाव आणि नंतर बंद गाडीतून बर्लिन सकाळी साडेसातला फ्रँकफुर्ट मेनवरून गाडी होती, ती संध्याकाळी पाच वाजता बर्लिनला पोहोचणार होती पण काहीही असले तरी जगाच्या इतिहासातील हा महत्त्वाचा मैलाचा दगड पाहायलाच हवा होता. हॅनोव्हरपर्यंतचा प्रवास चांगला झाला तेथून पुढे मात्र वातावरणात थंडपणा आला हॅनोव्हरला पश्चिम जर्मन सरहद्द पोलिस गाडीत आले त्यांनी प्रत्येकाचा पासपोर्ट, व्हिसा वगैरे पाहिला पूर्व जर्मन

सरहद्दीत प्रवेश करावा लागत असल्याने हा व्हिसा गाडीतच देतात पण बर्लिनच्या आधी गाडीतून खाली उतरण्यासाठी हा व्हिसा उपयोगी पडत नाही हॅम्स्टेड हे सरहद्दीवरचे स्टेशन आले आणि मला एक अपूर्व दृश्य दिसले

हे स्टेशन येण्यापूर्वीच सर्व डब्याना कुलपे लावण्यात आली गाडीतील कुणालाही बर्लिन येण्यापूर्वी खाली उतरता येऊ नये एवढेच नव्हे तर पूर्व जर्मनीतील कोणीही गाडीत प्रवेश करू नये म्हणून ही व्यवस्था होती स्टेशनवर दोन्ही बाजूचा बंदोबस्त एवढा होता की, सध्या युद्धच चालू आहे असे वाटत होते दोन्ही जर्मनीचे सैनिक मशिनगन्स सज्ज करून उंच टॉवर्सवरून दुर्बिणीतून निरीक्षण करीत पहारा करीत होते पूर्व जर्मनीचे सैनिक तर प्लॅटफॉर्मच्या दोन्ही बाजूना अजस्र कुत्र्याचे पट्टे हातात धरून उभे होते वाघाच्या आकाराचे ते काळे, हिंस्र कुत्रे पाहिल्याबरोबरच भीती वाटत असे पूर्व जर्मनीतील कोणीही चोरून आगगाडीत किंवा आगगाडीवर चढण्याचा प्रयत्न केला तर त्याला ते कुत्रे फाडून खातील, अशी तरतूद करण्यात आली होती हॅम्स्टेड ते बर्लिन आणि पुढे बर्लिनची भिंत या भागात असे सहाशे कुत्रे ठेवण्यात आले आहेत त्याना खास शिक्षण देण्यात आले आहे त्याना दुरूनच माणसाचा वास येतो पळून जाणाऱ्याच्या अंगावर उडी मारून त्याला नामोहरम करण्यास हे कुत्रे पटाईत आहेत पण पूर्व जर्मनीतील लोकाची स्वातन्त्र्याची जिद्द एवढी जबरदस्त की, त्याच्यापैकी काहींनी या कुत्र्याना अंगावर घेऊन त्याचेच पट्टे त्याच्या गळ्याभोवती आवळून कुत्री मारून पश्चिम जर्मनीत प्रवेश केला आहे अर्थात त्यापेक्षा अनेकपट स्वातन्त्र्येच्छू कुत्र्याना किंवा मशिनगन्सना बळी पडले आहेत

सरहद्दीवर अर्धा तास आमची गाडी उभी राहिली दोन्ही बाजूच्या रक्षकानी खुणा करून ' ओकेचा 'चा इशारा दिला त्यापूर्वी आमच्या सामानाची तपासणी होऊन आत शस्त्रे, अमली पदार्थ आहेत काय याची चौकशी झाली गाडी पूर्व जर्मनीतून चालू लागली तेव्हा मला जे दृश्य दिसले, ते अविस्मरणीय आहे दोन्ही बाजूना ताराची कुपणे, दर अर्ध्या फर्लांगावर मोकळे सोडलेले दक्ष कुत्रे. पूर्वी त्याच्या पट्ट्याचा कुत्र्याना मारण्यासाठी उपयोग झाला म्हणून आता हे कुत्रे मोकळे सोडले आहेत त्यामुळे ते अधिक मोठ्या क्षेत्राचे रक्षणही करू शकतात बर्लिन शहर येण्यापूर्वीच सिमेंट कॉंक्रीटची भिंत सुरू झाली भिंतीची उंची सुमारे दहा फूट आहे तीवर पुन्हा दोन अडीच फूट ताराचे कुपण बऱ्याच ठिकाणी दिसते विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे पूर्व जर्मनीच्या या भागात एकही नागरिक दिसला नाही मुळात वस्तीच अगदी तुरळक. असलीच तर ती सैन्याच्या बराकीची बहुतेक कारखाने आणि घरे पडीक आणि रिकामी टेहळणी करणाऱ्या सैनिकासाठी अधून-मधून उंच मनोरे त्यावर सर्चलाईट आणि मशिनगन्स घेऊन होशियार असलेले पूर्व

जर्मन सैनिक एकूण सगळे वातावरण तंग होते अस्वस्थ करणारे होते बर्लिन वॉल या नावाने विख्यात असलेल्या कोणालाही भयग्रस्त करणाऱ्या आधुनिक काळातील सर्वात मोठ्या वादग्रस्त केंद्राकडे आम्ही सरकत होतो

या बर्लिन भिंतीचा इतिहास विलक्षण आहे महायुद्धानंतर बर्लिन शहराचा एक भाग रशियाच्या ताब्यात होता तर दुसरा भाग अमेरिका, फ्रान्स आणि ब्रिटन या दोस्त राष्ट्राच्या ताब्यात होता १३ ऑगस्ट १९६१ रोजी रात्री दीड वाजता पूर्व जर्मनीतून पश्चिम जर्मनीकडे जाणारी आगगाडी रशियन हद्दीत थांबविण्यात आली. तिच्यातील सर्व उतारूंना तिकिटाचे पैसे देऊन परत पाठविण्यात आले रात्री २ वाजून ७ मिनिटांनी पूर्व जर्मन लष्कराची गाडी आली त्या आगगाडीतून सैनिकांनी शिलिंग यंत्रे, काटेरी तारा आणि सिमेंटचे खांब उतरून घेतले भराभर त्यांनी आपली हद्द आणि पश्चिम जर्मन हद्द यात काटेरी तारांचे कुंपण घालण्यास सुरुवात केली

पश्चिम बर्लिनच्या हद्दीतून टेहळणी बुरुजावरून कॅप्टन बेक नावाचा लष्करी अधिकारी दुर्बिणीतून हे पाहात होता त्याने ब्रिटन, अमेरिका आणि फ्रान्स यांच्या बर्लिनमधील प्रमुखांना ही घटना तावडतोब फोनवरून कळवली त्यांनीही आपापल्या राजधान्यांना गुप्त संदेश पाठवले त्या वेळी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष जनरल दि गॉल विश्रांती-साठी रमणीय ग्रामीण परिसरात गेले होते त्यांचे परराष्ट्रमंत्री मर्हिल हे रजेवर होते ब्रिटनचे पंतप्रधान हॅरोल्ड मेकमिलन हे यॉर्कशायर परगण्यात शिकारीसाठी गेले होते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी हेही विश्रांतीसाठी हियानिस पोर्ट येथे गेले होते त्या दिवशीच्या त्यांच्या कार्यक्रमात सकाळी चर्चमध्ये प्रार्थना आणि नंतर नदीत मासे पकडणे एवढ्या दोनच नोंदी होत्या. अशा मोक्याच्या वेळी तारेचे कुंपण घातल्या-बरोबर पन्नास हजार पूर्व जर्मन सैनिकांनी आजची कुप्रसिद्ध भिंत बांधायला सुरुवात केली सिमेंटच्या विटांचे डोंगराएवढे ढीग आणि हजारो टन सिमेंट आधीच तयार होते. पन्नास हजार लोकांनी अत्यंत थोड्या वेळाच दोस्त राष्ट्रांची टेहळणी पथके दुर्बिणीतून हे दृश्य टिपत असतानाच ती क्रूर भिंत बांधली ! पूर्व जर्मनी, झेकोस्लो-व्हिया आणि रशिया यांचे अवाढव्य लष्कर मशिनगन्स आणि तोफा यांच्यासह सवध सरहद्दीवर तयार होते ही सर्व तयारी इतक्या गुप्ततेने केली होती की, दोस्त राष्ट्राच्या शेकडो गुप्तहेरांपैकी एकालाही त्याची कल्पना आली नव्हती या अकल्पित घटनेने दोस्त राष्ट्रांचे प्रमुख थक्क झाले, आणि हताशही झाले ही भिंत पूर्व जर्मन हद्दीत बांधली जात असल्याने तीबद्दल आक्षेप घेणे किंवा तिची उभारणी थांबविण्याचा प्रयत्न करणेही कठीण होते

" बर्लिनला जाऊन पश्चिम जर्मनीसाठी कोण लढणार ? " अशी हतबल प्रतिक्रिया ब्रिटनचे पंतप्रधान मॅक्‌मिलन यांनी या वेळी व्यक्त केली १९६८ मध्ये रशियाने झेकोस्लोव्हियावर आक्रमण केले तेव्हा दोस्त राष्ट्रांनी हीच पळपुटेपणाची प्रतिक्रिया

व्यक्त केली अगदी अलीकडे, १९७९ मध्ये अफगाणिस्तानात रशियन लष्कर शिरले तेव्हाही यापेक्षा अधिक काही पाश्चात्त्य राष्ट्रे करू शकली नाहीत बर्लिनची भिंत ही रशिया आणि पूर्व जर्मनीच्या तत्परतेचे स्मारक आहे तसेच अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या नाकर्तेपणाचेही स्मारक आहे

बर्लिनला पोहोचल्यावर मला प्रथम त्या भिंतीकडे जायचे होते या भिंतीचे सर्वांत प्रमुख आणि महत्त्वाचे केंद्र म्हणजे ब्रँडनबर्ग गेट ही कमान म्हणजे पश्चिम जर्मनीची विजय कमान होती ती आता पूर्व जर्मनीत आहे या कमानीपासून शभर फुटावर भिंत आहे दरम्यानची जमीन नो मॅन्स लँड किंवा तटस्थ भूप्रदेश आहे या कमानी-जवळ मला जायचे होते पण मला 'वॉल' ला समानार्थी जर्मन शब्द माहीत नव्हता आणि ब्रँडनबर्गचा माझा उच्चार जर्मनांना समजेना मग मी स्टेशनवर मिळणाऱ्या पिक्चर पोस्ट कार्डमधून त्या कमानीचे चित्र विकत घेतले आणि एका टॅक्सी ड्रायव्हरला दाखवून मला तेथे न्यायला सांगितले. स्टेशनपासून अडीच तीन मैलावर ती जागा होती

ब्रँडनबर्ग कमानीजवळ ब्रिटिश विभागात उंच पाचाड ठेवून त्यावर फळ्या टाकण्यात आल्या आहेत त्यावरून भिंतीपलीकडे पूर्व जर्मनीचा भाग पाहता येतो हा एक विलक्षण अनुभव होता पश्चिम जर्मनीच्या बाजूला फलक होता LIBERTY ENDS HERE ( इथे स्वातंत्र्याचा शेवट होतो ) याउलट पूर्व जर्मनीच्या भागात मोठा फलक होता FRONTIER OF VICTORY त्या फलकामागे बरीच जमीन मोकळी ठेवण्यात आली आहे या जमिनीवर तारांची भेंडोळी सोडण्यात आली आहेत या तारा साध्या नसून त्यातून प्रचंड दाबाची वीज खेळविण्यात आली आहे या तारेला स्पर्श झाल्याबरोबर विजेच्या झटक्याने माणूस तेथल्या तेथे मरून जावा, अशी व्यवस्था केली आहे त्याशिवाय ऑटोमॅटिक मशिनगन्स आहेत तारेजवळ कोणीही अनधिकृत माणूस गेला तर त्या मशिनगन्समधून तुफान वेगाने गोळ्या सुटतात त्याच्याही पलीकडे पाण्याचा खंदक आहे तो ओलांडून येणे अशक्य त्यानंतर कुत्र्यांची रांग त्यापलीकडेच मनोऱ्यावर मशिनगन्स घेऊन टेहळणी करणारे पूर्व जर्मन सैनिक आहेत लोकांनी स्वतःचा देश सोडून जाऊ नये म्हणून एवढी भयानक यंत्रणा जगाच्या इतिहासात इतरत्र कुठेही सज्ज ठेवली गेलेली नाही प जर्मनीच्या बाजूला भिंतीवर रंगवलेले एक वाक्य अजून मला आठवते पूर्व बर्लिनकडे बाणाने खुणा करून लिहिले होते HIGH JUMP TRAINING AREA ( उंच उडी मारण्याचे शिक्षण देण्याची जागा ) दोन जर्मनींतील हा भाग 'चेक पॉइंट चार्ली' या नावाने प्रसिद्ध आहे

एवढी प्रचंड खबरदारी का घ्यावी लागली ? कारण ही भिंत उभारली जाण्यापूर्वी पूर्व जर्मनीचे तीस लक्ष नागरिक आपला विभाग सोडून पश्चिम जर्मनीत स्वातंत्र्यासाठी

गेले. रशिया व पूर्व जर्मन सरकारने कडक बंधने आणली तेव्हा कित्येक जण बोगदे खणून गेले, कोणी हेलिकॉप्टरच्या साहाय्याने गेले, कोणी खरेदीसाठी किंवा नातेवाइकाना भेटण्यासाठी म्हणून तात्पुरता परवाना घेऊन गेले ते परतलेच नाहीत. या तीस लाख लोकानी स्वेच्छेने केलेले स्थलांतर म्हणजे 'पायानी केलेले मतदान' आहे, असे प. जर्मनीचे नेते म्हणतात. दोन बर्लिनमध्ये जे अनेक अडथळे आहेत, ते प्राणपणाने ओलांडण्याचा प्रयत्न करणारे ७० लोक आतापर्यंत मारले गेले. बर्लिनच्या स्वतंत्र विभागात भिंतीपासून दहा फुटावर एका सामुदायिक थडग्यावर दररोज फुले ठेवून त्याच्या स्वातंत्र्याकाक्षेला अभिवादन करण्यात येते. रात्रभर या भिंतीवर प्रखर सर्चलाईट असतो. त्याशिवाय फिरते फ्लड लाईटस् मनोऱ्यावरून पाळत ठेवत असतात.

बर्लिन शहराची जबरदस्त पकड दोन्ही जर्मनींवर एवढी मोठी आहे की, कोणीही आपल्या जमिनीपैकी एक इंचही सोडायला तयार नाही. अजून दोस्ताचे १४ हजार सैनिक प. बर्लिनमध्ये आहेत. १८७१ पासून ही जर्मनीची राजधानी आहे. हिटलरच्या नाझी राजवटीचे आणि युरोपमधील कामगार चळवळीचे हे केंद्र. दुसऱ्या महायुद्धात ८ मे १९४५ रोजी दोस्ताच्या विमानानी हे शहर उद्ध्वस्त केले. युद्ध संपल्यानतर रशिया, अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या चार राष्ट्राचा ताबा या शहरावर आला. पण नतर रशिया आणि दोस्त राष्ट्रात तणाव निर्माण झाले. दोस्तानी बर्लिनच्या आपल्या विभागात जर्मन डॉईश हे चलन सुरू केले, त्याला रशियाने आपल्या विभागात वेगळे चलन सुरू करून उत्तर दिले. थोड्याच दिवसांत २४ जून १९४८ रोजी रात्री रशियाने पश्चिम जर्मनी आणि प. बर्लिन याच्यामधील आगगाडी व मोटारीची वाहतूक अचानक बंद केली व बर्लिनच्या नागरिकाची कोंडी करून त्याना जेरीस आणण्याचा रशियाचा हा डाव सफल झाला नाही. कारण जगाच्या इतिहासातील सर्वात मोठी विमान-वाहतूक करून दोस्त राष्ट्रानी सतत अकरा महिने कोंडीत सापडलेल्या प. बर्लिनच्या नागरिकाना सर्व मालाचा उत्तम पुरवठा केला. अखेर रशियाला ही नाकेबंदी उठवून पूर्वीप्रमाणे खुष्कीचा मार्ग खुला करावा लागला. मात्र त्यापासून धडा घेऊन प. जर्मनीने आपली राजधानी बॉन येथे हलवली. सध्या संयुक्त बर्लिनची लोकसंख्या ३२ लक्ष आहे. त्यापैकी २१ लक्ष लोक पश्चिम बर्लिनमध्ये राहतात.

मी बर्लिनमध्ये होतो, त्या सायकाळी भिंतीच्या दोन्ही बाजूना जाहीर सभा चालू होत्या. पूर्व बर्लिनमधील सभातून नेते गर्वाने सागत होते की, भांडवलशाही राष्ट्राना रोखण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. या विजय-भिंतीचा एक तुकडाही भांडवलवाल्याना वीस वर्षांत हलवता आला नाही. प. बर्लिनच्या जाहीर सभातील नेते सागत होते, "ही भिंत केवळ दोन विभागातील नाही. ती दोन संस्कृतींतील कृत्रिम भिंत

आहे ज्या समाजव्यवस्थेला आपल्या नागरिकाना अटकाव करण्यासाठी सिमेंट व पोलादाची भिंत उभी करावी लागते, ती व्यवस्था भीतीच्या आणि दहशतीच्या वातावरणातच जगते कधी ना कधी ही भीतीची भिंत कोसळून पडेल आणि दोन जर्मनी एकत्र होऊन दोन्हींना स्वातंत्र्याची फळे चाखता येतील, असा आमचा विश्वास आहे ”

पण हाही राजकीय प्रचाराचाच भाग आहे, हे प्रत्यक्ष त्या शहरात वावरताना आणि इंग्रजी भाषिक जर्मन नागरिकाशी बोलताना लक्षात येते मी अनेक जर्मनाना भिंतीविषयी विचारले त्याच्या मताचा अर्थ असा, “आज जे लोक चाळिसच्या पुढचे आहेत, त्याना अजून या भितीविषयी तिरस्कार वाटतो आणि त्या भिंतीपली-कडच्या आपल्या मित्राविषयी आणि नातेवाइकाच्याविषयी कणव व प्रेम वाटते पण तरुण पिढीला या भिंतीचा तसा अडथळाच वाटत नाही, कारण भिंतीपूर्वीचे मुक्त आयुष्य त्यानी पाहिलेलेच नाही आपण काय गमावतो हेच त्याना कळलेले नाही त्यानी ही भिंत गृहीत धरली आहे दोन वेगळ्या सस्कृती, वेगळ्या समाजव्यवस्था त्याच्या दृष्टीने आता अपरिहार्य आहेत ”

आश्चर्य असे की ही भिंत उभारल्यानतरही १ लक्ष ७० हजार लोक पूर्व जर्मनीतून पळून गेले. प्रथम ते युगोस्लाव्हियासारख्या कमी कडक देशात प्रवासी म्हणून किंवा कामधद्यासाठी म्हणून गेले आणि तेथून ग्रीससारख्या देशात जाऊन मग पश्चिम जर्मनीत गेले त्यापैकी निदान २५ टक्के लोक २५ वर्षांखालील होते याचाच अर्थ असा की तरुण पिढीने भिंत मान्य केलेली आहे, हा दावा सर्वस्वी खरा नाही पूर्व जर्मनीत राहणीचे मान कमी आहे, नोकरीसाठी कमी संधी आहे आणि स्वातंत्र्यावर बरीच बधने आहेत, ही या पलायनाची मुख्य कारणे आहेत त्याबद्दल बोलताना पळून आलेल्या एका तरुणाने सांगितले, “ तरुण पिढीने मान्य केले आहे ते बर्लिन भिंतीचे भौगोलिक अस्तित्व मात्र याचा अर्थ असा नव्हे की, तिचे राजकीय आणि सास्कृतिक अस्तित्व आम्हाला मान्य आहे पोलादी पडदा ही एक कल्पना आहे पण तिचे प्रत्यक्ष अस्तित्व म्हणजे सिमेंट कॉंक्रीटची ही भिंत ”

दोन बर्लिनच्या मध्ये १०३ मैल लाब ही भयानक भिंत पसरलेली आहे भिंतीच्या दोन्ही बाजूना दोन वेगळ्या, विरोधी सस्कृती जगत आहेत पूर्व बर्लिनमधील दूरदर्शन-वर प. बर्लिनमधील कार्यक्रम दिसतात त्यात दिसणारी मुक्त डिपार्टमेंट स्टोअर्स, भरपूर अन्नाचा साठा, पन्नास साठ प्रकारचे आईस्क्रीम, स्वस्त आणि वाटेल तेवढ्या सिगारेटस्, बीयरच्या वाहणाऱ्या तोट्या हे सर्व पाहून पूर्व जर्मनीतील नागरिक विषण्ण होतात आणि आपल्या तोकड्या संसाराची त्याच्याशी तुलना करतात भिंतीपलीकडच्या नातेवाइकाना किंवा मित्राना भेटायला जायचे तर परवाना मिळणे अतिशय कठीण कारण तो नागरिक परत न येण्याचा संभव अधिक अशा या दबलेल्या समाज-

व्यवस्थेचे प्रतिबिंब एका गाण्यात अप्रतिमपणे पडले आहे पिंक फ्लॉईड नावाचा गायकांचा समूह हे गाणे म्हणतो

" All in all you are just another
Brick in the wall "

( मानवा, तू कोण आहेस ? त्या भिंतीतली आणखी एक वीट, एवढेच )

# १७

## अखंड महोत्सवांचा चिरतरुण देश

प. जर्मनीतील फ्रँकफुर्ट हा माझ्या जगप्रवासातील अखेरचा मुक्काम होता. पण त्या सुप्रसिद्ध गावी मी पोहोचलो, तो अगदी आडनीड वेळेला – रात्री दहा वाजता! कारण त्या गाडीशिवाय मला अन्य गाडीच नव्हती. मला ज्या पत्त्यावर जायचे होते, ते गाव फ्रँकफुर्टपासून आणखी दहा मैल दूर होते. त्या ऑफेनबॅक गावी जाईपर्यंत पावणे अकरा वाजले. स्टेशनसमोरच्या तीन टॅक्सीवाल्यांपैकी एकही माझ्या पत्त्यावर यायला तयार होईना. इतक्यात आणखी एक टॅक्सी तेथे आली. त्या ड्रायव्हरला मी पत्ता दाखवला आणि स्वच्छ इंग्रजीत मला एका स्त्रीचे शब्द ऐकू आले, "यस सर, आय कॅन ड्रॉप यू देअर." मी टॅक्सीत बसलो. ती टॅक्सी चालविणारी मुलगी अठरा एकोणीस वर्षांची असेल. ती म्हणाली, "मी रात्री आठ ते बारापर्यंत टॅक्सी चालवते आणि माझ्या शिक्षणाचा खर्च त्यातून भागवते." जर्मनीच्या नव्या पिढीचे प्रसन्न दर्शन मला त्या अपरात्री घडले होते. ही पिढी काटक, कष्ट करणारी, ज्ञानपिपासू आहे, असे प्रथमदर्शनी मत नंतरच्या अनेक अनुभवांनीही पक्के झाले.

हिटलरचा उदय, त्याने पाशवी आक्रमण करून जगावर लादलेले युद्ध, त्यापायी बेचिराख झालेला जर्मनी आणि त्या राखेतून फिनिक्स पक्ष्यासारखा पुन्हा उभारी धरलेला जर्मनी हा सारा इतिहास सर्वांना माहीतच आहे. पूर्वेकडे जपान आणि पश्चिमेत प. जर्मनी ही मानवाच्या अतुल आशावादाची आणि अखंड परिश्रमाची धगधगती उदाहरणे आहेत. प. जर्मनीने अल्पावधीतच मिळविलेली आर्थिक सुबत्ता आणि सामाजिक स्थैर्य ही युरोपच्या हेव्याचा विषय झाली आहेत, असे 'टाईम'ने

( २४ ऑगस्ट, १९८१ ) म्हटले आहे मार्क हे जगातील एक अत्यंत बळकट चलन आहे युरोपमधील अनेक देशांनी आपली अर्थव्यवस्था जर्मन मार्कशी निगडित केली आहे जर्मन लोकांचा स्वाभिमान आणि स्वभाषाभिमान हा केवळ वाखाणण्यासारखाच नाही तर अनुकरण करण्यासारखा आहे भाषाभिमानाने त्यांना परभाषेचा द्वेष शिकविला नाही गटेसारखा जर्मन पंडित संस्कृत भाषेपुढे नतमस्तक होता एका जर्मन भाषातज्ज्ञाने मराठीचे व्याकरण लिहिले आहे त्यांचा भाषाभिमान इतर भाषांचे प्रेमही बाळगतो

या देशाने आपल्या लेखकांवर, संगीतकारांवर, कलावंतांवर अपरंपार प्रेम केले आहे. प. जर्मनीतील सर्व प्रमुख शहरांतील निदान वीस पंचवीस टक्के रस्ते आणि चौक यांना लेखकांची आणि संगीतकारांची नावे दिली आहेत. देशातील ८५ टक्के नाट्यसंस्था आणि नाट्यगृहे यांना राज्य सरकारे किंवा केंद्र सरकार यांचे आर्थिक साहाय्य मिळते ऑपेरा किंवा संगीत नृत्यमय कार्यक्रम या प्रकारात प जर्मनीचा क्रमांक जगात पहिला लागतो ' लॅंड ऑफ ऑपेरा ' असा आपल्या देशाचा उल्लेख करताना जर्मन नागरिक अभिमानाने फुलून जातो जर्मनीत शंभरवर कायमच्या ऑपेरा करणाऱ्या संस्था आहेत दरसाल बेरूथ ऑपेरा महोत्सवात जगातील सर्वोत्कृष्ट नृत्यसंगीतिकेचे कार्यक्रम होतात जगप्रसिद्ध संगीतमहर्षी रिचर्ड वॅग्नर यांचा नातू या ऑपेराचे भव्य सेटिंग तयार करतो जर्मनीतील हा सर्वात लोकप्रिय आणि प्रतिष्ठेचा महोत्सव असतो

संगीतावर जर्मन लोकांचे एवढे प्रेम, की परकीय प्रवासी ते पाहून थक्क होतो बर्लिन फिलॉर्मिक हॉल हे जर्मनीतील सर्वात मोठे संगीताच्या कार्यक्रमाचे केंद्र अडीच हजार लोकांची व्यवस्था असणारे हे प्रेक्षागृह युरोपमधील सर्वात मोठे प्रेक्षागृह आहे नाटक हा तितकाच आवडीचा विषय या लहान देशात अडीचशे नाट्यगृहे आहेत. त्यात होणाऱ्या नाटकांपैकी ३३ टक्के नाटके युरोपमधील इतर देशांची असतात अमेरिका, जपान, इंग्लंड अशा दूरच्या देशांचीही नाटके होतात अगदी अलीकडे मराठीतील ' घाशीराम कोतवाल ' आणि ' मृच्छकटिक ' नाटके जर्मनीत झाली होती शेक्सपिअरसारख्या जुन्या अभिजात नाटककारापासून आयानेस्कोसारख्या अत्याधुनिक नाटककारापर्यंतच्या कलाकृती मोठ्या उमेदीने सादर केल्या जातात आणि त्यांना प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळतो

पुस्तक-प्रकाशनात जर्मनीचा जगात चौथा क्रमांक आहे या देशात दरसाल साठ हजार पुस्तके प्रसिद्ध होतात त्यापैकी सहा हजार पुस्तके परकीय भाषांतून जर्मन भाषेत भाषांतरित केलेली असतात फ्रॅंकफुर्ट येथे अलीकडेच भरलेल्या जागतिक ग्रंथजत्रेत तीन लक्ष पुस्तके ठेवण्यात आली होती या प्रदर्शनात भाग घेतलेल्या तीन हजार प्रकाशकांपैकी बावीसशे प्रकाशक परदेशी होते भारतातील चौतीस प्रकाशकांनी

त्यात भाग घेतला होता लेखकाविषयी ग्रथालयानी कृतज्ञता दाखवावी हे तत्त्व प्रस्थापित करणारा जर्मनी हा जगातील पहिला देश आहे सार्वजनिक ग्रथालयातून ( ज्याना सरकारी अनुदान असते ) वाचकाना दिल्या जाणाऱ्या प्रत्येक पुस्तकावर लहानसा सरकारी कर असतो हा कर दरसाल ग्रंथालयानी सरकारकडे भरायचा या करातून सरकार वृद्ध व गरजू लेखकाना कायमचे आर्थिक साहाय्य करते लेखक, गरजू असेल तर तो वृद्ध नसला तरी त्याला सन्मानाने दरमहा साहाय्य पाठविण्यात येते ज्या लेखकाच्या पुस्तकावर ग्रथालय कमाई करते, त्या लेखकाला त्या कमाईचा वाटा मिळाला पाहिजे, हे तत्त्व प्रत्यक्ष आचरणात आणणारे प जर्मनी हे जगातील पहिले राष्ट्र आहे गथर ग्रास, हेन्रिक बॉल, अर्नो स्मिट्झ आणि मेरी लुई काश्निझ ( कवयित्री ) हे आजचे आघाडीचे जर्मन साहित्यिक आहेत 'ग्रुप ४७' नावाची संघटना आधुनिक जर्मन साहित्यावर बरीच छाप पाडून आहे या सघटनेने लेखकाची अस्मिता वाढवली आणि नव्या दमाच्या लेखकाना पारितोषिके दिली त्यानंतर 'ग्रुप ६७' या संघटनेने तेच कार्य पुढे चालू ठेवले आहे पुस्तक-प्रकाशनाबाबत जर्मनी हा पायाभूत देश आहे कारण याच देशातील मैंझ या गावी १४५५ मध्ये जोहान्स गटेनबर्ग यानी छपाईचा शोध लावून प्रकाशनाच्या जागतिक क्रातीची ज्योत पेटविली अजूनही 'हैडलबर्ग' ही छपाईची यत्रे जगात पहिल्या क्रमाकाची मानली जातात.

चित्रकला आणि शिल्पकला याचीही जोपासना जर्मनीने फार वर्षांपासून केली आहे हिटलरच्या काळात काही प्रमुख चित्रकार देश सोडून गेल्याचा अपवाद सोडला तर जर्मनीने चित्रकलेत महनीय कामगिरी केली आहे पॅरिसहून आलेल्या नवकलेला जर्मनीत उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला एवढेच नव्हे तर ऑस्कर कोकोस्कर, ओटो पियन, गंथर युकर आणि हैंझ मॅक या जर्मन चित्रकारानी विसाव्या शतकातील चित्रकलेवर आपल्या स्वतत्र प्रतिभेची छापही पाडली चित्रकलेतील सररियालिझमच्या प्रवाहाचा उल्लेख करताना मॅक्स अर्न्स्ट याचे नाव गौरवाने घेतले जाते तसेच युरोपियन शिल्पकारात बर्नार्ड शूल्झ याचे स्थान अतिशय आदरणीय आहे

जर्मनी हा महोत्सवाचा देश आहे अगदी कडक थडीचे आणि बर्फाचे दोन-अडीच महिने सोडले, तर इतर काळात वर्षभर कुठे ना कुठे कसला तरी महोत्सव चालूच असतो त्यात चित्रपट महोत्सव, नाट्य महोत्सव, संगीत महोत्सव, चित्रकला महोत्सवापासून ऑक्टोबरच्या बियर महोत्सवापर्यंत सर्व प्रकारचे महोत्सव असतात. बर्लिनला जागतिक चित्रपट महोत्सव भरतो बेर्थ येथील रिचर्ड वॅग्नर संगीत महोत्सव तर सतत महिनाभर चालत असतो म्युनिकमध्ये जुलै–ऑगस्टमध्ये ऑपेरा महोत्सव चालतो बॉनमध्ये बीथोव्हेन महोत्सव होतो अठराव्या शतकातील संगीताचा महोत्सव हर्सफीडमध्ये होतो हॅम्बुर्गमध्ये नाट्यमहोत्सव होतो म्युनिकच्या बियर महोत्सवाला काही वर्षांपूर्वी मी हजर होतो ऑक्टोबरमध्ये नवी बियर येते म्हणून त्याला ऑक्टोबर

महोत्सव म्हणतात लॉवेन ब्रॉसारख्या जगविख्यात बियर कपन्या त्या वेळी पाच पाच हजार लोकाना सुशोभित भव्य मडपातून मोफत बियर देतात सगीत, नाट्य, कला याच्या या अखड महोत्सवानी जर्मनीला चिरतरुण ठेवले आहे या देशाचा दुर्दम्य उत्साह, शक्ती. आशावाद आणि गतिमानता याची विलक्षण छाप कोणावरही पडते

हा महोत्सवाचा देश आहे, तसाच जत्राचाही आहे जत्रा म्हणजे धार्मिक अर्थाच्या नव्हेत, तर पुस्तक जत्राच्यासारख्या व्यावसायिक 'जर्मन कौन्सिल ऑफ ट्रेड फेअर्स अँड एक्झिबिशन'तर्फे दरसाल पाऊणशेवर जत्रा भरतात. त्यापैकी हॅनोव्हर फेअर ही सर्वांत मोठी असते व्यापार आणि उद्योग याच्या या विकासासाठी दर-साल भरवण्यात येणारी ही जत्रा हॅनोव्हर येथील सहा लक्ष चौरस मीटर्सच्या विस्तीर्ण जागेत थाटली जाते जर्मनीतील व परदेशातील पाच हजार उद्योगसमूह आणि व्यापारी कपन्या तीत भाग घेतात फ्रॅंकफुर्ट येथे संगीत क्षेत्रातील वाद्याचा मेळा भरतो बर्लिनमध्ये आतरराष्ट्रीय शेती व अन्न जत्रा भरते त्याशिवाय चित्रकला, शिवणकाम, आतरराष्ट्रीय पर्यटन, ग्रंथ, मोटार वाहतूक, रसायने, क्रीडासाहित्य, इंजिनिअरिंग, पॅकेजिंग, इमारत बाधकाम, रेडिओ व टी व्ही अशा विविध क्षेत्राना वाहिलेल्या जत्रा फ्रॅंकफुर्ट, मेंझ, बर्लिन, हॅंबुर्ग, म्युनिक, हॅनोव्हर, डयूसेलडॉर्फ इत्यादी शहरी भरत असतात

सॉकर ( फुटबॉलचा एक प्रकार ) हा जर्मनीतील सर्वांत लोकप्रिय खेळ हा खेळ खेळणारे साठ हजार संघ जर्मनीत असून, त्याची सभासदसंख्या वीस लक्षावर आहे शिक्षणाच्या बाबतीत तर जर्मनीची परपरा फार जुनी आहे हैडलबर्ग विद्या-पीठाची स्थापना १३८६ मध्ये झाली आणि पाचशे वर्षे कार्य करणारी अनेक विद्यापीठे आजही जर्मनीत भरभराटीत आहेत मुलाना सहाव्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंत शिक्षण सक्तीचे आहे बावीस विद्यापीठे आणि दहा प्रमुख वशविज्ञानाच्या संस्थात विद्यार्थी पुढील शिक्षण घेऊ शकतात नोबेल पारितोषिक मिळविलेले अनेक प्राध्यापक जर्मन विद्यापीठातून अध्यापन करीत आहेत सध्या विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या वीस लक्ष विद्यार्थ्यांपैकी पचवीस हजार परकीय आहेत

प जर्मनीचे क्षेत्रफळ सुमारे अडीच लक्ष चौरस किलोमीटर्स असून लोकसंख्या साडेसहा कोटी आहे त्यापैकी पन्नास लक्ष लोक परकीय आहेत लोखड, पोलाद, यंत्रसामग्री, मोटार, रसायने, विजेची यत्रे आणि डेटा प्रोसेसिंग यंत्रे हे जर्मनीचे मुख्य उत्पादन आहे उत्कृष्ट मशिन टूल्स तयार करण्यात हा देश जगात पहिल्या क्रमाकावर आहे मर्सिडिस आणि व्होल्कस वॅगन या जर्मनीच्या मोटारी जगभर धावत आहेत बेयर या औषधे व रसायने तयार करणाऱ्या कपनीचे नाव आपल्या महाराष्ट्रातही पन्नास वर्षांपासून गावोगावी पसरले होते याची अनेकाना माहिती असेलच हेक्स्ट या रसायनाच्या जर्मन कपनीने आतरराष्ट्रीय ख्याती मिळविली आहे मोठे पाईप्स, विशेष

बळकट पोलाद आणि टर्बाइन्स याच्या दर्जेदार उत्पादनातही हा लहान देश जगात पहिल्या क्रमांकावर आहे १९४५ मध्ये संपूर्ण बेचिराख झालेल्या या देशाने रूर व्हॅली आणि इतर भागात जे औद्योगिक साम्राज्य अल्पावधीत उभारले त्याला जपान या एकाच तत्सम देशाची तोड आहे जर्मन कामगाराची उद्योगप्रियता, चिकाटी आणि तत्परता यानीच देशाला आर्थिक बळ दिले आहे विशेष म्हणजे एवढे अवाढव्य औद्योगिक साम्राज्य असूनही जर्मनीत संपाचे प्रमाण अत्यत कमी आहे याचे स्पष्टीकरण करताना एका कामगारनेत्याने सागितले, "युद्धानंतर आमचे पहिले कर्तव्य म्हणजे देशाला आर्थिक स्थैर्य पुन्हा मिळवून देणे हे होते त्यासाठी अविरत श्रम करून सुट्या कमीत कमी घेऊन आणि वेतनही कमी घेऊन जर्मन कामगारानी प्रथम उद्योग-धद्याची उभारणी केली. त्या काळात मालक आणि कामगार यानी एकदिलाने काम करण्याची आवश्यकता होती त्याच वेळी कामगारानाही पटले की ही भागीदारी अशीच पुढे चालू ठेवली पाहिजे तुम्हाला गाईचे दूध सतत हवे असेल तर तिला मारून खाणे हा मूर्खपणा आहे तीच गोष्ट कारखान्याची कामगाराना स्थिर जीवन हवे तर सप करून उत्पादनात खड पडू देता कामा नये आज जर्मन कामगाराला दरसाल पधरा हजार डॉलर्स सरासरी पगार मिळतो (दरमहा दहा हजार रुपये) तो या विचारी व दूरदृष्टीच्या कामगाराच्या धोरणामुळेच" तुफान औद्योगिक प्रगतीमुळे प जर्मनीची अर्थव्यवस्था इतकी बळकट झाली आहे की, जर्मनीइतकी परदेशात भाडवलाची गुतवणूक जगातील इतर कोणत्याही देशाने केलेली नाही—अमेरिकेनेसुद्धा

उत्कृष्ट आर्थिक साहाय्यामुळे आपल्या नागरिकाना अधिकाधिक सेवा देणे जर्मनीला शक्य झाले आहे अमेरिका, इग्लड व फ्रान्स यानी जर्मनीने स्वतःचे मोठे लष्कर ठेवू नये, असे जे बधन जर्मनीवर घातले आहे, त्याचाही फायदा या देशाला मिळाला कारण संरक्षण-व्यवस्थेवरचा अवाढव्य खर्च वाचून तोच पैसा सामाजिक गरजासाठी उपलब्ध करता आला सध्या जर्मनीचे सैन्य फक्त तीन लक्ष चाळीस हजारच आहे पण ते युरोपमधील सर्वोत्कृष्ट सैन्य आहे प जर्मन सरकार आपल्या नागरिकाना आरोग्य, वृद्धापकाळातील भत्ता, बेकारी भत्ता, अपगाना साहाय्य इत्यादी सुविधा मिळवून देण्यासाठी एकदर अदाजपत्रकातील ३१ टक्के खर्च करते हा एक जागतिक विक्रमच आहे युरोपमधील इतर देशाच्या तुलनेने जर्मनीतील बेकारीचे आणि चलन-वाढीचे प्रमाण अतिशय कमी आहे प बर्लिनवर मात्र सरकारला तेथून येणाऱ्या उत्पादनापेक्षा बराच अधिक खर्च करावा लागतो

प बर्लिन हे जर्मनीचे एक कायमचे दुखणे आहे कम्युनिस्ट जर्मनीत आत एकशेदहा मैलावरचे हे शहर प जर्मनीच्या अकरा राज्यापैकी एक राज्य असले तरी बाकीच्या दहा राज्यापासून हे एखाद्या बेटासारखे अलग पडले आहे तिथे वस्ती करण्यात सर्वसाधारणपणे लोक नाखूष असतात कारण मूळ जर्मनीत जाऊन यायचे तर

पुण्या – मुबईएवढा प्रवास आणि खर्च होतो प जर्मन सरकारने प्रचड खर्च करून हे या शहराचे अस्तित्व टिकवले आहे बर्लिनच्या एकदर खर्चापैकी ५५ टक्के रक्कम केंद्र सरकारचे अनुदान आहे बर्लिनमध्ये राहणाऱ्याला इतर भागापेक्षा तीस टक्के प्राप्तिकर कमी आहे बर्लिनला सक्तीच्या लष्कर भरतीचा कायदा लागू नाही त्यामुळे केवळ लष्करात जाणे टाळावे म्हणून १८ ते २८ वर्षांच्या युवकाची प्रचड सख्या या शहरात आहे पण शिक्षण अगर इतर विधायक कार्यापेक्षा बडखोर चळवळी करण्या-कडेच या तरुणपिढीचे अधिक लक्ष आहे तुर्कस्तान, पाकिस्तान वगैरे भागातून अडीच लाख कामगार येथे आले आहेत त्यामुळे राहण्यासाठी घरे मिळत नाहीत रिकामी घरे सक्तीने ताब्यात घेण्याची चळवळ तरुणानी सुरू केली असून, त्याना आवरताना पोलिसाची त्रेधा उडत आहे

प जर्मनीत सुमारे पधरा हजार भारतीय आहेत, त्यापैकी सुमारे पाचशेजण महा-राष्ट्रीय आहेत भारतीयापैकी सर्वांत मोठा गट केरळमधून आलेल्या नर्सेसचा आहे. त्याची सख्या चार हजार आहे मराठी भाषिकात बहुतेक इजिनिअर्स आहेत. हे मुख्यत. कलोन, बॉन, फ्रँकफुर्ट व म्युनिक येथे राहतात हॅम्बुर्ग हे जर्मनीतील सर्वांत मोठे बदर आहे तेथे बरेच भारतीय मरीन इजिनिअर्स म्हणून काम करतात

फ्रँकफुर्ट हा माझा जगप्रवासातील अखेरचा मुक्काम येथे माझा पृथ्वीप्रदक्षिणा अधिक पाच हजार मैलाचा पाऊणशे दिवसाचा व चाळीस हजार रुपये खर्चाचा दीर्घ प्रवास संपला तिथून थेट पॅन ॲमच्या विमानाने मुबईला आलो. जग किती विविध आहे त्यात स्फूर्तीचे आणि उत्साहाचे किती अगणित झरे आहेत, उत्तुग व्यक्तिमत्त्वाचे लोक आणि परिश्रमाने जागतिक विक्रम करणारे अनेक देश आहेत याची माझ्या मनावर कायमची छाप पडली या प्रवासात मला जगातील उत्कृष्ट नाटके पाहायला मिळाली अवर्णनीय वनश्री, चित्रकलेचे व शिल्पकलेचे निवडक नमुने, विख्यात दिग्दर्शकाचे व कलाकाराचे चित्रपट, असे पुढील आयुष्यात सतत स्फूर्ती देत राहणारे अनुभव घेता आले या प्रदीर्घ व घाईगर्दीच्या प्रवासातही कोण-तीही दुर्घटना घडली नाही या सहवासात ज्यानी ज्यानी मला साहाय्य केले त्याच्याविषयीच्या कृतज्ञ भावनेने मी हा माझा पाचवा परदेश प्रवास सपविला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. २७३८५
मध्य. शाखा (स्थल प्रत)

# १८

# देशोदेशीचे विनोद

परदेश पर्यटन करताना मी प्रेक्षणीय स्थळे तर पाहतोच, पण विनोद हा माझ्या आवडीचा विषय असल्याने आसपास काही विनोदी घटना आढळतात का, काही खास त्या देशाचे विनोद ऐकायला मिळतील का, इकडेही माझे लक्ष असते जगातील काही देशातील लोक विशिष्ट बाबतींत प्रसिद्ध असतात स्कॉच लोकानी चिक्कू म्हणून नाव मिळवले आहे तर फ्रेंच लोक जादा रंगेल म्हणून प्रसिद्ध आहेत रशियन रूक्ष असतात तर ब्रिटिश लोक शिष्टाचाराच्या सव्यापसव्यात मनमोकळेपणा हरवून बसतात जर्मन लोक शिस्तीचे अतिभोक्ते तर त्याउलट इटालियन लोक आळशी आणि गबाळे म्हणून विख्यात युरोपमध्ये नाटकातून आणि रेव्ह्यूसारख्या तमाशावजा प्रसंगातून इतर देशाची टिंगल करण्याकडे बराच कल असतो फ्रेंच लोक स्वतःला जादा रंगेल समजत नसून आपण तेवढे रसिक आणि ब्रिटिश लोक मख्ख असतात, असे समजतात उलट लंडनला चालणाऱ्या नाटकातून किंवा ब्रिटिश वृत्तपत्रातून फ्रेंचांचे जे चित्र दिसते त नीतीच्या बाबतीत सैल आणि वाईन व स्त्री सहवासातच रमणारे प्रेमवीर असे दिसते अलीकडेच मी जो जगप्रवास केला, त्या वेळी पाहिलेले व ऐकलेले काही विनोद मराठी वाचकासाठी मी देत आहे त्यात कोणत्याही देशाबद्दल अनादर निर्माण व्हावा हा हेतू नसून त्यांच्या वैशिष्ट्याकडे खेळकर दृष्टीने पाहावे एवढाच उद्देश आहे

## मृत्युपत्र

पॅरिसमधल्या स्त्रियाना सौंदर्य-प्रसाधनाचे भारी वेड त्यावर एक कथा अशी आहे की, पॅरिसमधली एक वृद्ध स्त्री आखेरच्या आजारात आपल्या वकिलाला म्हणाली, " माझे मृत्युपत्र करायचे आहे त्या मृत्युपत्रात असं लिहा, की माझी राख पॅरिसमधल्या सौंदर्य-प्रसाधनाच्या दुकानात थोडी थोडी टाकावी "

वकील म्हणाला, " हे मृत्युपत्र जरा विचित्रच नाही का? तुम्हाला या पत्रातसुद्धा आणि विशेषतः मेल्यानतरही सौंदर्य-प्रसाधनाच एवढ महत्त्व आहे की काय ? "

वृद्ध बाई म्हणाली, " छे ! छे ! तसं नाही हो वकीलसाहेब ! माझ्या एकुलत्या एक मुलीवर माझा जीव आहे पण ती मला भेटायला येत नाही माझी राख जर सेंट्स, पॉवडर, लिपस्टिक्सच्या दुकानात पसरली, तर मृत्यूनतर का होईना, पण माझी आणि माझ्या मुलीची नक्की भेट होईल ! "

एका ऑलिंपिक सामन्यात धावण्याच्या सर्व शर्यतींत रशियन स्पर्धक पहिले आले हा चमत्कार कसा झाला असेल असा प्रश्न फ्रेंच पत्रकाराने विचारला, तेव्हा अमेरिकन पत्रकार म्हणाला, " त्यात काय आश्चर्य ? अहो, सरकारी मशिनगन्समधून सुटणाऱ्या गोळ्या चुकविण्यासाठी रशियन लोकाना इतक्या जोरान धावण्याचा सराव करावाच लागतो "

पोलडमध्ये आगामी निवडणुकीच्या वेळी कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल कम्युनिस्ट सरकारच्या मंत्रिमडळात चर्चा चालली होती गृहमंत्री म्हणाले, " इतर देशात मतदानाच्या दिवशी दारूची दुकान बद असतात. आपणही तसंच करू या "

" छे ! छे ! " पतप्रधान म्हणाले, " दारू दुकान उघडीच ठेवा अहो, दारू पिऊन टर्र झाल्याशिवाय कम्युनिस्ट पक्षाला कोण मत देणार ? "

## दोनशे प्रकारचे आईस्क्रीम

पूर्व बर्लिन व पश्चिम बर्लिन याच्यात कम्युनिस्टानी एक भिंत घातली आहे या भिंतीच्या दोन्ही बाजूसंबधी अनेक विनोद प्रचलित आहेत कम्युनिस्टाच्या पूर्व बर्लिनमधून काही तासाचे परमिट घेऊन आलेल्या एका जर्मनाने पश्चिम बर्लिनमधील समृद्धी पाहिली पण आपण त्यापेक्षा कमी आहो हे तो कबूल करीना पश्चिम बर्लिनमधला त्याचा मित्र म्हणाला, " आमच्याकडे खाद्यपदार्थांत केवढी तरी विविधता असते नुसते आईस्क्रीमच घे अरे, आमच्या दुकानावर पाट्याच पाहा ' ७० प्रकारचे आइस्क्रीम कोणतेही घ्या

पूर्व बर्लिनमधला मित्र म्हणाला, " त्यात काय विशेष आमच्या दुकानावरसुद्धा पाट्या आहेत : २०० प्रकारचे आइस्क्रीम "

" ओ बापरे ! दोनशे व्हरायटीज ! मजा असेल तुमची "

" तस काही नाही पाटीवर दोनशे प्रकार लिहिलेले असतात, पण आइस्क्रीम मिळते एकाच प्रकारचे सरकारी "

## चिकट स्कॉच

स्कॉच लोक चिकट म्हणून प्रसिद्ध आहेत बाजारात खरेदीसाठी गेले की ते किंमतीबद्दल बरीच घासाघीस करतात असाच एक स्कॉच माणूस बायकोला घेऊन न्यूयॉर्कच्या कपड्याच्या दुकानात गेला एका स्कर्टकडे पाहून त्याने विचारले, " याची किंमत किती ? "

" पंचावन डॉलर्स " विक्रेता म्हणाला

" पंचावन ! छे छे ! चाळीस डॉलर्स करता का ? " विक्रेत्याने नकार दिला त्याच दुकानात पुढे त्याला एक कोट दिसला किंमत होती ऐंशी डॉलर्स स्कॉच माणसाने म्हटले, " साठपर्यंत द्या, म्हणजे घेतो " त्यालाही नकार मिळाला चार तास तो दुकानात चौकशी करीत होता अखेर त्याची बायको म्हणाली, " अहो चला, आता, घरी जायला उशीर होतोय " स्कॉच माणसाजवळ घड्याळ नव्हतेच त्याने विक्रेत्याला विचारले, " किती वाजले ? "

" पाच " विक्रेता म्हणाला

" पाच ? फार होतात साडेतीन करा, म्हणजे जमेल ! " स्कॉच माणूस सवयीने म्हणाला

स्कॉटलंडमध्ये चार भाऊ होते त्यापैकी एक जण नशीब काढण्यासाठी म्हणून अमेरिकेला गेला वीस वर्षांनी अमाप पैसा शिल्लक टाकून तो परत आला स्कॉटलंड-मध्ये त्याच्या स्वागतासाठी त्याचे तिन्ही भाऊ स्टेशनावर हजर होते पण तिघांच्याही दाढ्या लांबच लांब वाढल्या होत्या अमेरिकेहून आलेला श्रीमंत भाऊ म्हणाला, " इकडे दाढी वाढवायची फॅशन आहे की काय ? "

एक भाऊ म्हणाला, " तशी काही फॅशन नाही पण घरातल एकुलत एक ब्लेड तू अमेरिकेला नेलस मग आम्ही दाढी कशी करणार ? "

## आळशी इटालियन

जपानी कारखान्यातील व्यवस्थापक अत्यंत वक्तशीर आणि तेथील शिस्त अतिशय

कडक एक आळशी इटालियन एकदा जपानमधील कारखान्यात कामाला लागला तो कारखाना होता काचसामानाचा व्यवस्थापकाने इटालियन कामगाराला आधीच बजावलं, "इथ तू म्हणशील तेवढा पगार मिळेल, पण वेळेवर यायला हवं मन लावून काम करायला हवं काही तुटलफुटल तर लगेच दुसऱ्या दिवशी मेमो मिळेल "

इटालियनाने साऱ्या अटी मान्य केल्या कामाच्या पहिल्याच तासात त्याच्या हातून एक मोठ काचसामान फुटलं लगेच त्याने व्यवस्थापकाला पत्र लिहायला सुरुवात केली, "तुमच्या उद्याच्या मेमोला माझं उत्तर अस की या काचसामानाचे जेवढे पैसे असतील ते माझ्या पगारातून कापून घ्यावे आणि तेवढ्या रकमेने माझा पगार वाढवावा "

जर्मनीतील गुप्तहेर खात्याला एक टायपिस्ट मुलगी हवी होती गुप्तहेर खात्याने त्या जागेसाठी अशी जाहिरात दिली '

"टायपिंग आणि शॉर्टहँडची पूर्ण माहिती असलेली, २० ते २५ वर्षापर्यंतची मुलगी पाहिजे अट ती निरक्षर असली पाहिजे कारण गुप्त कागदपत्रे तिला टाईप करायची आहेत ती तिला वाचता येऊ नयेत पगार . दरमहा सहाशे मार्क. अर्ज दुसऱ्याकडून लिहून घेतलेले असावेत "

## दोन टक्के कमिशन

ज्यू लोक अतिशय व्यापारी वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध आहेत कोणत्याही प्रसंगी त्याचे व्यापारी हिशोब ते विसरत नाहीत एकदा एका चालत्या आगगाडीवर दरोडा पडला हातात बंदुका आणि पिस्तुले घेऊन दरोडेखोरानी गाडीतील प्रत्येकाला रोकड, दाग-दागिने, बाहेर काढून आपल्या हवाली करण्याचा हुकूम केला एका डब्यातील बाकी सर्वांनी आपल्याजवळची सर्व संपत्ती दिली

एक ज्यू म्हणाला, "माझ्याजवळ फक्त एक हजार डॉलर्स आहेत "

"ठीक ते पैसे माझ्याकडे दे "

ज्यूने पैसे दिले दरोडेखोराने पैसे मोजले पण ते ९८० डॉलर्सच निघाले त्यावर त्याने पिस्तुल रोखून ज्यूला विचारले, "आणखी वीस डॉलर्स कुठ आहेत ?"

"कुठे आहेत म्हणजे ?" सात्त्विक संतापाने तो ज्यू म्हणाला, "ते मी घेतले सर्व रोखीच्या व्यवहारावर दोन टक्के कमिशन देण्याची पद्धत सगळीकडे आहे. ते तुम्हाला माहीत नाही काय ?"

हॉलंडच्या घोडदलातील एका सैनिकाने आपली बदली विमानदलात करावी असा

अर्ज केला. त्याची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यान त्याच कारण विचारल तेव्हा तो सैनिक म्हणाला, "विमानदल अधिक सुरक्षित आहे"

अधिकारी आश्चर्यानं म्हणाला, "ते तस तुला का वाटत?" त्यावर घोडदलातील सैनिकान सागितल, "साहेब, आपण विमानातून पडलो तरी विमान परत येऊन आपल्याला लाथा मारीत नाही!"

स्वित्झर्लंड हा जगातील अत्यंत श्रीमंत देश आहे अनेक देशातील लक्षाधीश उत्तर कालात किंवा सुटीच्या दिवसात झूरिक, लुगानो, जिनिव्हा इत्यादी स्विस गावातील बड्या हॉटेलमध्ये विश्रांतीसाठी येतात येथील हॉटेलेही महाग असतात भारतासारख्या गरीब देशातला एक प्रवासी मोठा धीर करून झूरिकमधल्या एका हॉटेलमध्ये उतरला हॉटेलच्या पोऱ्याने त्याची बॅग नेऊन खोलीत ठेवली आणि टिपची वाट पाहू लागला भारतीय प्रवाशाने उदार होऊन पाच डॉलर टिप द्यायचा निर्णय घेतला पण त्याच्याजवळ मोड नव्हती म्हणून त्याने शंभर डॉलर्सची नोट पोऱ्याच्या हातावर ठेवून म्हटल, "जा रे याची मोड घेऊन ये"

ती नोट तशीच खिशात ठेवून पोऱ्याने सलाम करून म्हटल, "साहेब, स्वित्झर्लंड-मध्ये शंभर डॉलर हीच मोड आहे इथं त्याची पुनः मोड होत नाही थँक यू"

जर्मन पोलिस म्हणजे हुकूम असेल तसा अक्षरशः बजावणार एकदा म्युनिकच्या पोलिस कमिशनरन हुकूम दिला, "सर्व मोटारी रस्त्यात थांबवा ड्रायव्हिंग लायसेन्स नसेल तर चेकिंग करा"

त्याचप्रमाणे म्युनिकच्या पोलिसानी मोटार ड्रायव्हर्सना विचारायला थांबवून विचा-रायला सुरुवात केली, "लायसेन्स आहे का?" ड्रायव्हरने 'आहे" म्हणून सागितल की पोलिस म्हणत, "मग जा तर साहेबाचा हुकूम आहे की त्याच्याजवळ लायसेन्स नसेल त्याचीच लायसेन्स बारकाईन तपासून चेक करा तुमच्याजवळ लायसेन्स असेल तर चेकिंग करण्याचा हुकूम नाही"

## निर्बुद्ध इटालियन

इटालियनानी युरोपमधील सर्वांत निर्बुद्ध लोक म्हणून लौकिक मिळवला आहे त्याच्या बुद्धिमत्तेच्या अनेक गोष्टी ऐकायला मिळतात एकदा रोमच्या एका चौकात एका उंच काठीला चार इटालियनानी घट्ट धरले होते आणि पाचवा इटालियन हातात एक टेप घेऊन त्या बाबूवर चढत होता हे विचित्र दृश्य एका अमेरिकन प्रवाशाने पाहिले त्याने विचारले, "हा माणूस बाबूवर कशासाठी चढतो आहे?"

बाबू धरून राहणाऱ्यापैकी एकाने सागितले, "या काठीची उंची त्याला

मोजायची आहे म्हणून तो टोकापर्यंत जाईल आणि हातातल्या टेपने काठीची उंची मोजील "

प्रवासी म्हणाला, " अरे बाबानो, मग त्यासाठी काठीवर चढायला कशाला पाहिजे ? तीच काठी रस्त्यात आडवी ठेवून मोजता येणार नाही का ? "

त्यावर त्या अमेरिकन प्रवाशाच्या अज्ञानाची कीव करीत तो इटालियन म्हणाला, " अरे मूर्खा, आम्हाला या काठीची उंची मोजायची आहे, लांबी मोजायची नाही, म्हणून तो वर चढतो आहे ! "

गेल्या महायुद्धात मुसोलिनीन अस जाहीर केल, की जो कोणी अमेरिकन सैनिकाना पकडून देईल, त्या इटालियनाना प्रत्येक अमेरिकन शिपायामागे पन्नास हजार लिराच बक्षीस देण्यात येईल दोन इटालियन फिरत फिरत आपल्या देशाची हद्द ओलांडून चुकुन फ्रान्समध्ये आले रात्री एका मैदानावर ते झोपले त्याच रात्री एक अमेरिकन डिव्हिजन त्या मैदानात आली दहा हजार अमेरिकन सशस्त्र सैनिकाच्यामध्ये हे दोघे नि:शस्त्र इटालियन आरामात झोपले होते. सकाळी त्याच्यापैकी एकजण जागा झाला पाहतो तो आपल्याभोवती अमेरिकनाचा तळ त्याने जवळच्या सैनिकाना विचारले, " किती अमेरिकन आहेत इथं ? "

" दहा हजार " सैनिक म्हणाला त्याबरोबर त्या इटालियनान आपल्या मित्राला हलवून जाग केल आणि तो आनदान म्हणाला, " अरे मित्रा ! ऊठ, आपण लक्षाधीश नव्हे, तर कोट्याधीश झालो हे एवढे दहा हजार अमेरिकन सैनिक पकडून आपण मुसोलिनीपुढे उभे केले, की पैसाच पैसा मिळेल बघ आपल्याला ! "

इटलीतील तयार कपड्याच्या एका दुकानदाराने आपल्या पुतण्याला आपल्या दुकानात नोकरीला ठेवला. काका जेवायला बाहेर गेला होता तेवढ्यात पुतण्याने एक सूट विकला काकाला तो म्हणाला, " हे बघा, तिथ सूट होता तो विकून मी ५८००० लिरा मिळवल्या "

काका म्हणाला, " मूर्खा, त्या सुटावर १ लाख ५८ हजार लिरा अशी किंमत लिहिली होती आणि तो तू फक्त ५८ हजार लिराला विकलास ? "

पुतण्या म्हणाला, " काका, माझी चूक झाली माझ्या पगारातून एक लाख लिरा कापून घ्या मी नुकसान केल तुमच "

काका म्हणाला, " तशी काही गरज नाही अरे अठ्ठावन हजारातसुद्धा आपल्याला त्या सुटात आठ हजार लिरा फायदाच झाला पण एक लाख अठ्ठावन हजाराला विकला असतास तर जास्त फायदा झाला असता एवढंच ! "

अमेरिकेत पैसा म्हणजे दैवत सारे महत्त्व पैशाला. न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजमध्ये एकदा एका सट्टेबाजाचं दिवाळं निघाल त्यानंतर दोन दिवसांनी तो आपल्या बायकोला म्हणाला, "माझ दिवाळ निघाल हे कळल्याबरोबर माझे निम्मे मित्र माझ्याशी बोलेनासे झाले ते माझी ओळखही दाखवीत नाहीत "

बायकोनं त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करीत म्हटलं, "काही हरकत नाही पण तुमचे निम्मे मित्र तरी जिव्हाळ्याचे आणि सच्चे आहेत ना? मग झाल तर ते तरी तुमच्याशी बोलतात ना?"

"बोलतात ग पण माझ दिवाळ निघालंय ही बातमी अजून त्याना कळलेली नाही म्हणून!"

इटालियन लोक चोरीच्या कामात अतिशय तरबेज एक इटालियन कामगार चार महिने हॉस्पिटलमध्ये राहून बरा झाला जाताना डॉक्टरनी त्याला दोन लाख साठ हजार लिराच बिल दिल त्या कामगारान त्यातले निम्मे पैसे दिले आणि तो म्हणाला, "डॉक्टरसाहेब, उरलेल्या पैशाच्याऐवजी ती तुमचा कायमचा फायदा करून दिला आहे "

"कसला बुवा?" डॉक्टरनी विचारल

कामगार म्हणाला, "मी अशी व्यवस्था केली आहे की, यापुढं तुमच्या दवा-खान्याच विजेच बिल निम्मं येईल "

डॉक्टर एकदम खूष झाले त्यानी विचारल, "वा! तू इलेक्ट्रिकल इंजिनियर आहेस की काय?"

कामगार म्हणाला, "छेः छेः साहेब, गेल्या चार महिन्यात माझे नातेवाईक आणि मित्र मला पाहायला येत असत या सर्वांच्या बरोबर मी तुमच्या हॉस्पिटलमधून चोरलेले विजेचे बल्ब घरी पाठवले आहेत मी पन्नास टक्के बल्ब घरी नेले म्हणून तुम्हाला यापुढ विजेचं निम्म बिल येईल!"

पोलिश लोक मदबुद्धीचे म्हणून प्रसिद्ध आहेत दोन पोलिश मित्र मॉस्कोला गेले एकाला १ नबरच्या बसन जायच होत दुसऱ्याला ४ नबरच्या इतक्यात बस आली त्या बसमध्ये दोघेही चढले कंडक्टरपुढे रुबलची नोट धरून तो पोलिश इसम म्हणाला, "मला १ नंबरच तिकीट द्या आणि याना ४ नंबरच "

कडक्टर म्हणाला, "अहो, ही बस त्या मार्गावरून जात नाही "

त्यावर पोलिश मित्र म्हणाला, "कमाल आहे तुमची अहो बसवर चक्क १ आणि ४ हे आकडे आहेत ना? मग आधी याना एक नबरला सोडा आणि मग मला ४ नबरच्या रूटवर सोडा "

## शिष्ट ब्रिटिश

ब्रिटिश लोक शिष्टाचाराबद्दल अतिशय दक्ष असतात त्याउलट अमेरिकन लोक पहिल्याच भेटीत हे अत्यंत अनौपचारिकपणे वागतात. लंडनमध्ये आलेल्या एका अमेरिकनाने रोड रस्त्यावर एका ब्रिटिश गृहस्थाला थांबवून विचारलं, " हाय जॉन, तुझ्याकडे शभर पौंडाची मोड आहे का ? "

ब्रिटिश माणूस नापसंती दाखवीत म्हणाला, " तुम्हाला मॅनर्स आहेत की नाहीत ? तुम्हाला मोडच हवी तर तुम्ही प्लीज ' शब्द वापरून नम्रपणे विचारायला हव "

त्यावर तो अमेरिकन वरमला मग त्याने ब्रिटिश मॅनर्स आठवून नम्रपणे विचारलं, " आपली ओळख नसताना मी हे धाष्ट्य करतो याबद्दल, साहेब, आपण मला क्षमा करावी पण आपल्याकडे शभर पौंडाची मोड असेल तर ती मला देण्याची आपण प्लीज कृपा करता का ? "

यावर खूष होऊन ब्रिटिश नागरिकाने आदबीने सांगितले, " महाशय, आपण मला मोड आहे काय असे विचारून माझा जो सन्मान केलात त्याबद्दल धन्यवाद आपल्याला कळविण्यास अत्यंत खेद होतो की, दुर्दैवान माझ्याजवळ शभर पौंडाची मोड नाही "

जगातील सर्व राष्ट्रात इटलीचा क्रम भ्रष्टाचाराच्या बाबतीत पहिला लागेल रोम मध्ये एक पोलिस अधिकारी झोपला असताना त्याच्या बायकोने कपाटात ठेवलेल्या त्याच्या पॅटच्या खिशातून पाच हजार लिराच्या दहा नोटा चोरल्या आणि ती पाकीट बंद करून पॅटमध्ये ठेवणार तोच नवरा जागा झाला बायकोन पैसे चोरले हे लक्षात आल्याबरोबर तो ताडकन उठला आणि त्यान बायकोची मान पकडली दरडा-वणीच्या सुरात तो म्हणाला, " मी तुझा नवरा आहे तसाच कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारीही आहे तू चोरी केलीस की नाही ? "

" होय " बायकोन गुन्हा कबूल केला

" किती पैसे चोरलेस ? "

" पाच हजार लिराच्या दहा नोटा "

" मग आता पुढ काय करायच ? " त्यान विचारलं

" नेहमीचच " असं म्हणून बायकोने नवऱ्याच्या हातात दहापैकी पाच नोटा ठेवल्या, त्यावर खूष होऊन नवरा म्हणाला, " हा ! आता कशी वळणावर आलीस जा तर झोप जा " असं म्हणून त्या अधिकाऱ्यानं पाच नोटा खिशात ठेवल्या आणि तो निश्चित मनानं झोपी गेला.

एका उपाहारगृहातून एक केक चोरल्याबद्दल एका ज्यूवर पोलिसानी खटला

भरला आरोपीच्या वकिलान कोर्टाला सांगितल, " साहेब, आरोपी हा चोर नाही. केवळ भूक लागली म्हणून त्यानं केक चोरला. तो जर सराईत असता तर केकच्या कपाटाजवळच मालकाच्या टेबलाच्या उघड्या खणात शभर डॉलर्स होते ते त्यान चोरले नसते का? तेव्हा भूतदयावादी दृष्टिकोणातून या खटल्याकडे पाहून आरोपीस सोडून द्यावे "

न्यायाधीशाना ते म्हणण पटल त्यानी आरोपीला सांगितल, " तू जर पश्चात्ताप व्यक्त केलास आणि पुनः अशी चूक करणार नाहीस अशी कबुली दिलीस तर तुला सोडून देण्यात येईल "

आरोपी म्हणाला, " साहेब, मला खरोखरच असा पश्चात्ताप होतो की एक क्षुद्र केक घेण्याएवजी मी ते शभर डॉलर्स का चोरले नाहीत! मी पुनः अशी चूक करणार नाही "

REFBK-0024385

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २४३८५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ ग्रन्थालय
६५६
24305
7/11/84

# दिशान्तर